# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level*

*Referred and Double Blind Peer Reviewed, Open Access Journal*

*ISSN:2230-9578   April - 2026 Volume-18  Issue-4(XV)*



Mob: +91-9552416001 Website: https://jrdrvb.org Chief Editor: Prof. Ramesh V. Bhole

# MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL JOURNAL

Website: https://jrdrvb.org



JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT
ISSN: 2230-9578

*ISSN: 2230-9578*
*April - 2026*
*Volume-18 Issue-4(XV)*

**Please Get in Touch**
Email: jrdrvb.org@gmail.com
Mob: +91-9552416001,+91- 8888454089

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Double-Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

**Volume No-18, Issue-4(XV), April- 2026**
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

CHIEF EDITOR
**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

***Disclaimer***
*The Editors shall not be held responsible for the originality or the views and opinions expressed in the papers. The author(s) alone shall bear full responsibility for the originality of their work and the ideas expressed therein.*
***© All rights reserved with the Editors.***

Journal of Research and Development
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN : 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL PARTICULARS

| Name of Journal | JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT |
|---|---|
| Frequency | Monthly : Jan to Dec (12 issues per year) |
| ISSN | 2230-9578 |
| Publisher | Dr. Ramesh V. Bhole |
| Chief Editor | Dr. Ramesh V. Bhole |
| Copy right | Journal of Research and Development |
| Starting Year | January 2010 |
| Subject | Multi-Disciplinary |
| Review Process | Double Blind Peer |
| Language | English, Hindi, Marathi, and other Indian Constitutional Languages. |
| Publication Format | Print |
| Access | OPEN ACCESS |
| License | Creative Commons (CC BY-NC-SA 4.0) |
| Phone No. | +91 93256 65856, +91-8888454089 |
| Email | jrdrvb.org@gmail.com |
| Journal Website | https://jrdrvb.org |
| Registered office Address | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon, Maharashtra, India |
| Admin. Office Address | 'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon , Maharashtra, India |
| Printing | **Amitsons Digital Copiers**<br>106 and 110, Paras Chambers 1st Floor, Near Laxmi Narayan Theatre, Above Bank Of India, Swargate-411042 |

# Journal of Research and Development

Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double-Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*

Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## CHIEF EDITOR

**Dr. Ramesh V. Bhole**
Professor
Sardar Vallabhbhai Patel Arts and Science College Ainpur,
Tal Raver, Dist Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com

## ASSOCIATE EDITORS

**Prof. (Dr.) Madan Mohan Goel**
Vice-Chancellor (Former)
Rajiv Gandhi National Institute of Youth Development, Govt. of India
Starex University, Gurugram, Haryana, India

**Dr. Praveen G. Saptarshi**
Visiting Faculty
Salisbury University, United States

## MANAGING EDITOR

**Dr. Santosh P. Mane**
Assistant Professor,
Head Department of Geography,
Sameer Gandhi Kala Mahavidyalaya

## EDITOR

**Dr. Bharat Patil**
Principal
Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli

## GUEST EDITOR

| | | |
|---|---|---|
| **Dr. Shivprasad Shete**<br>Convenor Associate Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Dr. Balasaheb Kotlagee**<br>Convenor, Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Smt. Dr Suvarna Suryawanshi**<br>Associate Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli |
| **Dr. Raju Sawant**<br>Associate Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Mr. Pandharinath Patil**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Smt. Dr. Priya Tele**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli |
| **Smt. Geeta Shete**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Smt. Vandana Patil**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Smt. Dr. Madhura Karande**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli |
| **Mr. Prashant Bhandare**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Dr. Chaitanya Kamble**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli | **Smt Sucheta Kamble**<br>Assistant Professor,<br>Nemgonda Dada Patil Night College of Arts and Commerce, Sangli |

**Journal of Research and Development**
Peer Reviewed International, Open Access Journal.
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org

# JOURNAL OF RESEARCH AND DEVELOPMENT

*A Multidisciplinary International Double Blind Peer Reviewed Refereed International Research Journal*
Publication Language – English, Hindi, Marathi and other Indian Languages
Periodicity of Publication- Monthly
Email: jrdrvb.org@gmail.com
Journal Website: https://jrdrvb.org

## EDITORIAL BOARD

| | | |
|---|---|---|
| **BABALOLA, Ayodele Samuel**<br>Department of Pure and Applied Zoology, Federal University of Agriculture, PMB 2240, Abeokuta, Ogun State, Nigerian | **Dr. Lal Mervin Dharmasiri**<br>Senior Professor and Chair<br>Head of Geography<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Vijayanand Selvaraj**<br>Data Strategist and Artificial Intelligence Lead<br>Information Technology (IT), Houston,Texas, USA |
| **Dr. Munther Moh'd Ibrahim Zyoud**<br>Assistant Professor of English Language Teaching Methods-Al-Quds Open University, Palestine. | **Prof. A.G. Amarasinghe**<br>Senior Lecturer Grade<br>University of Kelaniya, Sri Lanka. | **Dr. Gyanaranjan Sahoo**<br>Extension Scientist<br>Orissa University of Agriculture & Technology, Orissa India |
| **Dr. RVS Praveen**<br>Director<br>Digital Engineering and Assurance, USA | **Dr. Ranjan Kalita**<br>Principal<br>Rangapara College, Amaribari, Rangapara, (Autonomous) Assam | **Dr. S. C. Advitot**<br>Principal<br>CBK's B. Sci, R.V. Com. & R. J. Arts College, Akkalkot |
| **Dr. Kulkarni Swanand Gajanan**<br>Associate Professor,<br>Mechanical Engineering Department, S.K.N. Sinhgad College of Engineering,Korti, Pandharpur- | **Dr. Anurag Shrivastava**<br>Professor & Post Doctoral,<br>Lincoln University College (LUC)<br>Petaling Jaya, Malaysia, Malyasia | **Prof. (Dr.) F. M. Nadaf**<br>Principal,<br>Government College Borda Margao Goa (Autonomous), India |
| **Dr. Tushti Sharma**<br>Royal School of Languages,<br>The Assam Royal Global University, Guwahati, Assam | **Dr. Sandeep Rout**<br>Faculty of Agriculture,<br>Sri Sri University, Cuttack, Odisha | **Dr. Daneshwar. R. Pandey**<br>Assistant Professor,<br>Head Of Department<br>S.S Agrawal College Of Commerce And Management Navsari Gujarat |

**PUBLISHER**
**Dr. Ramesh V. Bhole**
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon
Email: jrdrvb.org@gmail.com Journal Website: https://jrdrvb.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4 (XV)| April - 2026


| Sr. No. | CONTENTS | Page No. |
|---|---|---|
| 1. | ग्रामीण औद्योगिकीकरण: लघुउद्योगांच्या विकासाची अफाट व्याप्ती<br>**डॉ. सुनिल दशरथ साळवे,श्री.प्रदीप प्रकाश कदम** | 1-4 |
| 2. | अण्णा भाऊ साठे यांचे समाजविचार आणि प्रबोधन<br>**प्रा. सतीश गुंडेराव सूर्यवंशी** | 5-8 |
| 3. | भारतातील हवामान – एक चिकित्सक अभ्यास<br>**सौ. लता सुनील सुरवाडे** | 9-11 |
| 4. | ग्रामीण आणि शहरी जीवनातील सांस्कृतिक व सामाजिक अंतराचे भौगोलिक विश्लेषण<br>**श्रीमती. गडदे एम. डी** | 12-14 |
| 5. | अंतराळ संशोधनाचे राजकीय आयाम: भारत आणि जपानच्या तुलनेत<br>**Harshad Sunil PatiL,डॉ. / प्रा. गौतम देविदास भालेराव** | 15-19 |
| 6. | कागद ते गाव : सरकारी योजनांची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील 'अंतरा'चे मूल्यमापन.<br>**शिवानी कालिदास देवकर,डॉ.निनाद विजय जाधव** | 20-23 |
| 7. | खेडे गाव आणि पर्यटन: ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम<br>**डॉ. गीता राजेंद्र विशे** | 24-27 |
| 8. | ग्रामीण आणि शहरी : इंटरनेट साक्षरता दरीचे चिकित्सक विश्लेषण.<br>**विद्या गुरुनाथ कांबळे** | 28-33 |
| 9. | ग्रामीण उन्नतीसाठी सरकारी योजनांच्या लाभातील अंतराचा चिकित्सक अभ्यास.<br>**प्राची सुनील हुकमाली, विद्या गुरुनाथ कांबळे** | 34-38 |
| 10. | ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणात अंतराळ धोरण आणि ई-प्रशासनाची भूमिका:-साहित्य समीक्षा<br>**श्री. प्रदीप शंकर राठोड** | 39-43 |
| 11. | ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेले सामाजिक व सांस्कृतिक बदल<br>**किशोर हिराकांत आगिवले ,डॉ. संजय भाऊसाहेब गिरे** | 44-48 |
| 12. | ठाणे जिल्ह्यातील पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांचा तुलनात्मक अवकाशीय विश्लेषण (२०१८ ते २०२५)<br>**प्रा.स्वाती बा.शिंदे, डॉ. अंजली कदम** | 49-55 |
| 13. | त्रीपिटकातील आकाश संकल्पना आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र व मानसशास्त्र: तुलनात्मक अभ्यास<br>**संजय डी.सोनावणे** | 56-60 |
| 14. | दुर्गमता आणि ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचे अंतर : विद्यार्थ्यांच्या गळती प्रमाणाचे विश्लेषणात्मक अध्ययन<br>**डॉ.निनाद विजय जाधव** | 61-64 |
| 15. | पारंपारिक शेती ते आधुनिक शेती : उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञान - अंतराचे चिकीत्सक विश्लेषण<br>**प्रेरणा गौतम लहांगे,डॉ.निनाद विजय जाधव** | 65-70 |
| 16. | प्राचीन व्यापार मार्ग आणि सांस्कृतिक अंतर : रेशीम मार्ग (Silk Route) एक ऐतिहासिक अभ्यास<br>**श्रीमती. रतन पी. सोनावणे** | 71-73 |
| 17. | भारतातील ग्रामीण पर्यटनाची वाढती व्याप्ती आणि क्षमता: एक अभ्यास<br>**डॉ. सुनिल दशरथ साळवे** | 74-77 |
| 18. | भिवंडी तालुक्यातील श्री वज्राळदेवी मंदिर : सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाशाचा एक चिकित्सक अभ्यास<br>**विद्या विजय धस** | 78-81 |
| 19. | भिवंडी तालुक्यातील राजकीय स्थित्यंतरे - एक ऐतिहासिक अभ्यास<br>**डॉ. रसिका राजेश घरत** | 82-85 |
| 20. | भिवंडीतील विविध ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या पिकांचा चिकित्सक अभ्यास<br>**डॉ. सुर्यकांत नागनाथ कळसकर** | 86-91 |
| 21. | मराठी बालकथांतील अद्भुत अवकाश<br>**राहुल अनिलराव पाटील,प्रा. डॉ. मीनाक्षी पुडलिक पाटील** | 92-96 |
| 22. | मुंबई बेटांवरील पोर्तुगीज व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्था: एक ऐतिहासिक आढावा<br>**मनोहर माधवराव पंडित, डॉ.सुरेश भदरगे** | 97-100 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue-4 (XV)| April - 2026



| | | |
|---|---|---|
| **23.** | माध्यमिक विद्यार्थ्यांमधील अवकाशीय गणित शिकण्यातील आव्हाने<br>**श्रीमती ललिता श्रीकांत पाटील** | 101-108 |
| **24.** | शिक्षा और विद्या में अंतर शोध पत्रक<br>**श्री. बी. एस. बोरसे,श्रीमती. वी. वाय. पांडव,श्री. के. एल. पाटील** | 109-116 |
| **25.** | अवकाशाबाबत काही निवडक कविंचा अभिप्राय आणि त्यांचा एकमेकांशी असणारा सहसंबंध<br>**श्रीमती. ज्योती मंगा घनघाव** | 117-120 |
| **26.** | आदिवासी साहित्यातील 'अवकाश': भौगोलिक, सांस्कृतिक व मानसिक आयामांचे चिकित्सक विश्लेषण<br>**प्रा. राजेश गणपत देसले** | 121-126 |
| **27.** | आशा बगे यांच्या ' भूमी ' या कादंबरीतील सामाजिक अवकाश<br>**प्रा. शीतल विजय गाणार** | 127-130 |
| **28.** | बीसवीं सदी और इक्कीसवी सदी: रोजगारपरक हिंदी भाषा में अंतर<br>**श्री. कैलास पुंजाजी अहिरे** | 131--134 |
| **29.** | मराठी कथांमधील भावनिक अवकाश - एक समीक्षात्मक अभ्यास<br>Dayanand Nagappa Kamble | 135-136 |
| **30.** | वापसी कहानी में अवकाश-बोध<br>**डॉ. बाळासाहेब पगारे** | 137-142 |
| **31** | विद्रोही आणि भावनाप्रधान कवितेतील अंतर: आशय, भाषा आणि अभिव्यक्तीचा तुलनात्मक अभ्यास.<br>**सोनल बाळनाथ मस्के, ऋतुजा मधुकर ठाकर** | 143-146 |
| **32** | संघर्ष, सफलता और सामाजिक स्थान: हिंदी आत्मकथाओं में स्थान की अभिव्यक्ति<br>**श्रीमती अंजना दिलीप पाटिल** | 147-149 |
| **33** | स्मरणशक्ती कडून आकलनाकडे 'प्रश्नपत्रिका आणि कृतिपत्रिका' यांतील अंतराचा अभ्यास.<br>**श्री. वैभव एकनाथ भोईर** | 150-155 |
| **34** | हिन्दी कथा साहित्य में अवकाश का रचनात्मक प्रयोग<br>Jyoti Ajay Singh | 156-158 |
| **35** | मराठी भाषेतील अवकाश विषयक शब्दसंपत्ती<br>(अवकाश, ग्रह, उपग्रह, अंतराळ, नक्षत्र यांचा भाषिक व सांस्कृतिक अभ्यास)<br>**प्रा.सूर्यवंशी धनंजय आनंदा** | 159-162 |
| **36** | अवकाश आणि मानवी नातेसंबंध मराठी साहित्यातील स-अवकाश व अंतराचा समालोचनात्मक अभ्यास<br>**प्रा. अजिंक्य लक्ष्मण कांबळे** | 163-166 |
| **37** | बदलते स्थान आणि डिजिटल अवकाश:शिक्षकेतर व्यवस्थापनातील नवी आव्हाने<br>**श्री. नरेश श्रीराम शिरसाळे** | 167-171 |
| **38** | अवकाश : सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा भाग<br>**श्री. पृथ्वीराज सुरदास म्हात्रे** | 172-174 |
| **39** | ठाणे जिल्ह्यातील शेतीतील बदल – एक आर्थिक अभ्यास<br>**श्री. शत्रुघ्न दशरथ भगत** | 176-178 |
| **40** | अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची भूमिका व आव्हाने<br>**कु. पूजा यशवंत जाधव** | 179-181 |
| **41** | अंतरिक्ष कचरा आणि भविष्यातील आव्हाने<br>**श्री. सुरेश रतन अहिरे,** | 182-188 |

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ग्रामीण औद्योगिकीकरण: लघुउद्योगांच्या विकासाची अफाट व्याप्ती

**डॉ. सुनिल दशरथ साळवे[1],श्री.प्रदीप प्रकाश कदम[2]**
[1,2] श्रीराम कुसुमताई सदाशिव वंजारे महाविद्यालय लांजा जिल्हा- रत्नागिरी.
**ईमेल**: sunilsalve73@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180401
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 1-4
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश:***

*प्रस्तुत शोधनिबंधामध्ये भारतातील ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या सक्षमीकरणासाठी 'ग्रामीण औद्योगिकीकरण' आणि 'लघुउद्योग' यांचा अभ्यास करण्यात आला आहे. भारत हा खेड्यांचा देश असून आजही बहुतांश लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेतीवरील लोकसंख्येचा ताण कमी करण्यासाठी आणि ग्रामीण भागात रोजगार निर्मितीसाठी लघुउद्योगांची भूमिका अत्यंत कळीची आहे. या शोधनिबंधात सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम (MSME Act, २००६) आणि २०१८ मधील सुधारणांचा आधार घेऊन उद्योगांच्या बदलत्या व्याख्या आणि भांडवल गुंतवणुकीच्या मर्यादांचे विश्लेषण केले आहे. अभ्यासातून असे दिसून येते की, देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात (GDP) या क्षेत्राचा वाटा सुमारे २९% असून, एकूण कारखानदारी उत्पादनात ४५% आणि निर्यातीत ४०% वाटा आहे. ग्रामीण भागातील स्थानिक संसाधनांचा वापर, कौशल्य विकास आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास ग्रामीण औद्योगिकीकरणाची व्याप्ती (Space) अधिक विस्तारू शकते. 'समृद्ध गाव म्हणजे समृद्ध राष्ट्र' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी लघुउद्योगांना भांडवल पुरवठा, डिजिटल मार्केटिंग आणि सरकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे निष्कर्ष या अभ्यासातून मांडण्यात आले आहेत.*

***(Keywords):*** *ग्रामीण औद्योगिकीकरण, लघुउद्योग, MSME अधिनियम, रोजगार निर्मिती, आर्थिक विषमता, शाश्वत विकास.*

## प्रस्तावना:

ग्रामीण भागात औद्योगीकरण हे महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात व्यवसाय शेती व आणि हातमाग उद्योग अशा विविध उद्योगाकडे चालतो. भारतातील वेगवेगळ्या ग्रामीण भागात राहणारे लोक अद्वितीय कौशल्यमध्ये पारंगत असतात जसे की केरळमध्ये राहणारे लोक त्यांच्याकडे लाकूड, कोरीव काम करण्याचे व्यावसायिक कौशल्य आहे. इतर ग्रामीण लोक गालीचे विणण्यात प्रवीण आहेत. ते काश्मीरमध्ये राहतात. संसाधने आणि परंपरांच्या घटकामुळे विविध ठिकाणाहून विविध कौशल्य पाहायला मिळतात. भारतात शेती अर्थव्यवस्थेसाठी महत्त्वाची आहे. कारण जीडीपीच्या ४४ टक्के वाटा शेतीचा आहे. शहरात मोठमोठ्या कंपन्या, सेवासुविधा उपलब्ध असतात. मात्र ग्रामीण भागात छोटे छोटे लघु उद्योग असल्यामुळे त्यांची वाढ होण्यासाठी सरकारने त्यांना विविध योजनाच्या माध्यमातून उभारी देणे जेणेकरून ग्रामीण भागात औद्योगिकीकरण निर्माण होईल. आपण या शोधनिबंधातून ग्रामीण औद्योगिकीकरण व लघुउद्योग उपक्रम याचा अभ्यास करणार आहोत.

ग्रामीण औद्योगीकरण म्हणजे ग्रामीण भागात उद्योग उभारून स्थानिक संसाधनाचा वापर करून रोजगार निर्मिती करणे जीवनमान सुधारणे शहरी व ग्रामीण भागातील असमानता कमी करणे ग्रामीण उद्योजकतेला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. जगातील विकसित देशांच्या विकासामध्ये त्या देशातील उद्योग क्षेत्रांची भूमिका अत्यंत महत्त्वाची दिसते विकसित देशांनी औद्योगिकरणाच्या माध्यमातून मोठी प्रगती साध्य केली आहे. कोणत्याही देशाच्या दृष्टीने औद्योगिक क्षेत्राची भूमिका अतिशय महत्त्वाची समजले जाते. भारत ही एक विकसनशील अर्थव्यवस्था आहे. ब्रिटिश ग राजवटीमध्ये भारत ही व्यापार पेठ म्हणून वापरली जात होती त्यामध्ये भारतातून कच्चा माल इंग्लंडमध्ये घेऊन जाणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सुनिल दशरथ साळवे, श्रीराम कुसुमताई सदाशिव वंजारे महाविद्यालय लांजा जिल्हा- रत्नागिरी.*

**How to cite this article:**
साळवे, . सुनिल . दशरथ ., & कदम, प्रदीप. प्रकाश . (2026). ग्रामीण औद्योगिकीकरण: लघुउद्योगांच्या विकासाची अफाट व्याप्ती. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 1–4*
. https://doi.org/10.5281/zenodo.21253832

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21253832

व त्या मालावर औद्योगिक प्रक्रिया करून उत्पादित झालेला अंतिम मान भारतीय बाजारपेठेत आणून विकणे असे एकंदरीत ब्रिटिश धोरण होते. मात्र भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने १९५० मध्ये आर्थिक नियोजनाला सुरुवात केली व औद्योगीकरणाला सुरुवात झाली. महात्मा गांधी यांनी 'गावाकडे चला' असा संदेश दिला. देशाचा औद्योगिक विकास करायचा असेल तर पहिल्यांदा ग्रामीण विकास करणे गरजेचे आहे. हे महात्मा गांधींना कळून चुकले होते. त्यामुळे ग्रामीण औद्योगीकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. ग्रामीण भागातील लघु उद्योगांना सक्षम बनवणे, त्यांना भांडवल देणे व ग्रामीण भागातील लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे ही सगळी उद्दिष्टे औद्योगिकीकरणामागे असलेली दिसून येतात.

ग्रामीण औद्योगीकरण म्हणजे ग्रामीण भागातील नैसर्गिक आणि मानवी संशोधनांचा वापर करून तेथे उद्योगांची स्थापना करणे. ग्रामीण भागात शेती हा प्रमुख व्यवसाय आहे. ग्रामीण भागातील लोक शेतीवर अवलंबून असल्यामुळे शेतीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून त्यांचा उदरनिर्वाह होत असतो कापूस ऊस फळे आणि भाज्या यासारख्या शेतीमालावर प्रक्रिया करून मूल्यवर्धन करणे. ही काळाची गरज आहे. ग्रामीण भागामध्ये अनेक उत्पादने घेतली जातात. मात्र ही उत्पादने भारताबाहेर जात नाहीत किंवा त्यावर प्रक्रिया होत नसल्यामुळे दीर्घकालीन साठवणूक करता येत नाही. मात्र छोट्या छोट्या लघुउद्योगांना आपण जर भांडवल दिले किंवा लघु उद्योगांसाठी ग्रामीण भागातील लोकांना या प्रवाहात आणले तर लघुउद्योगांमुळे भारताच्या आर्थिक उत्पन्नामध्ये मोलाची अशी भर पडेल त्याचबरोबर शेतावरील लोकसंख्येचा ताण कमी करून ग्रामीण भागातच रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे तसेच ग्रामीण भागातून शहराकडे जाणाऱ्या लोकांना गावातच रोजगार मिळाला तर गावे समृद्ध होतील आणि लघु उद्योगातून लोकांचे रोजगार निर्माण होतील त्यामुळे ग्रामीण औद्योगीकरणासाठी या सर्वाचा विचार करणे अत्यंत महत्त्वाचे आहे.

कृषी आधारित उद्योगांचा विचार केला तर साखर कारखाने सूतगिरण्या, फळ प्रक्रिया उद्योग, दुग्ध व्यवसाय इतर शेतीतील पिके इत्यादी अनेक ग्रामीण उद्योगांचा विचार करावा लागतो. तसेच लघु आणि कुटीर उद्योगांचा विचार करत असताना खादी आणि ग्रामोद्योग हस्तकला टोपल्या विणणे अगरबत्ती बनवणे शिवणकाम करणे ट्रॅक्टर दुरुस्ती डिजिटल सेवा केंद्रे ग्रामीण पर्यटन इत्यादी अनेक उद्योगांचे प्रकार ग्रामीण भागामध्ये आपल्याला पाहायला मिळतात. प्रथम एक मुद्दा असा लक्षात ठेवणे आवश्यक आहे की, प्रस्तुत विवेचनामध्ये 'उद्योग' असा जरी, शब्दप्रयोग केलेला असला तरी तो 'व्यवसायसंस्था' या अर्थाने वापरावयाचा आहे. लघुउद्योग हे त्यांच्या विश्लेषणाप्रमाणे 'लघु' किंवा 'लहान' असतात. परंतु त्यांचे हे 'लहाणपण' कोणत्या संदर्भातील असते, हा प्रश्न महत्वाचा आहे. स्थूल मानाने असे म्हणता येईल की, ज्या उद्योगांमधील वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण लहान असते. असे उद्योग लघुउद्योग असतात परंतु 'वस्तूंच्या उत्पादनाचे प्रमाण' हा निकष मानण्याऐवजी, कधीकधी उद्योगात केली जाणारी 'संयंत्र' आणि यंत्रसामग्री यांच्या स्वरुपातील गुंतवणूक' हाच निकष वापरुन लघुउद्योगांची व्याख्या पुढील प्रमाणे केली आहे.

'ज्या व्यावसाय-संस्थांच्या संयंत्रे आणि यंत्रसामग्री यांच्यामधील गुंतवणूक १ कोटी रुपयांपर्यंत असते. तसेच सुट्या भागांचे व यंत्रसाहित्याचे उत्पादन करणाऱ्या ज्या सहायक वा पूरक व्यवसाय संस्थांमधील गुंतवणूक ७५ लक्ष रुपयांपर्यंत असते, अशा सर्व व्यवसाय-संस्था 'लघुउद्योग' असतात'. अर्थात, ही अगदी अलीकडच्या काळात केलेली व्याख्या आहे. गेलेल्या चार दशकांच्या काळात आपल्या नियोजनकारांनी लघुउद्योगांच्या व्याख्यांमध्ये अनेक वेळा बदल केलेले आहेत हे लक्षात घेणे जरुरीचे आहे. भांडवली समाग्रीच्या किमती काळाच्या ओघात नेहमीच वाढत असतात. अशा परिस्थितीत, यंत्रसामग्रीच्या संदर्भातील गुंतवणुकीची पेश्वाच्या स्वरुपातील एकच कमाल मर्यादा कायम ठेवणे लघुउद्योगाची व्याख्या ठरविण्यासाठी योग्य होणार नाही हा नियोजनकारांच्या निर्णयामागील दृष्टिकोन होता. वोडक्यात लघुउद्योगांच्या चाबतीत भांडवल गुंतवणुकीची एक कमाल मर्यादा घालून दिलेली असते. एखाद्या व्यवसाय संस्थेत या कमाल मर्यादेपेक्षा अधिक भांडवल गुंतवणूक झाली असेल तर ती व्यवसाय संस्था 'लघुउद्योग' म्हणून मान्य केली जात नाही. भांडवल गुंतवणुकीच्या चावतील अशो कमाल मर्यादा एकदा घालून दिली की. साहजिकच श्रमाच्या वापराला असलेली संधी वाढते आणि देशातील रोजगारही वाढतो.

**संशोधनाची उद्दिष्टे -:**

१. लघुउद्योगांची संकल्पना अभ्यासणे.

२. सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राची भूमिका अभ्यासणे.

**संशोधन पद्धती :**

"ग्रामीण औद्योगिकीकरण: लघुउद्योगांच्या विकासाची अफाट व्याप्ती" या शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. यासाठी पर्यटनावर आधारित विविध संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे, पर्यटन मंत्रालयाचे विविध अहवाल, मासिके,इ. माध्यमांच्या साह्याने दुय्यम सामग्रीचे संकलन केले असून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सदर शोधनिबंध तयार केला आहे.

१९७७ मध्ये भारतीय उद्योगरचनेत प्रथम, 'अतिलघुउद्योग' हा एक नवीन प्रकार आला आणि तेव्हापासून भारतीय औद्योगिक रचनेचा तो एक अविभाज्य भाग मानला जातो. अशा उद्योगाची व्याख्या करतांना १. भांडवल गुंतवणूक आणि, २. लोकसंख्या, हे दोन निकष वापरले जातात सध्या ज्या उद्योगांमधील, भांडवल गुंतवणूक ५ लाख रुपयांपर्यंत आहे, आणि जे उद्योग ५०,००० पेक्षा कमी

लोकसंख्या असणाऱ्या गावांमध्ये चालविले जातात. लघुउद्योग क्षेत्राचे भारतीय औद्योगिक क्षेत्रातील महत्त्व व योगदान ओळखून या क्षेत्राचे व्याख्या व व्याप्ती विस्तारण्याचा २००६ मध्ये निर्णय घेण्यात आला. त्यासाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ हा कायदा संमत करण्यात आला व ऑक्टोबर २००६ पासून हा कायदा लागू करण्यात आला. सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास अधिनियम, २००६ नुसार पूर्वीची उद्योग ही संकल्पना वगळून त्याऐवजी उपक्रम ही संकल्पना स्वीकारण्यात आली. त्यानुसार उपक्रमांची सर्वसाधारणपणे दोन मुख्य प्रकारात विभागणी करण्यात आली.

१. वस्तू उत्पादक उपक्रम.
२. सेवा उपक्रम.

वरील वर्गीकरणानुसार प्रकल्प व यंत्रसामग्रीतील गुंतवणूक मर्यादेनुसार वस्तू उत्पादक सूक्ष्म उपक्रम म्हणजे २५ लाख रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय. लघु उपक्रम म्हणजे २५ लाख ते ५ कोटी रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय, तर ५ कोटी ते १० कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे मध्यम उपक्रम होय. साधनसामग्री तील गुंतवणूक मर्यादेनुसार सेवा पुरविणारे सूक्ष्म उपक्रम म्हणजे १० लाख रुपयांपर्यंत भांडवली गुंतवणूक असलेले उपक्रम होय, १० लाख ते २ कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे लघू उपक्रम, तर २ कोटी ते ५ कोटी रुपयांपर्यंत गुंतवणूक असलेले उपक्रम म्हणजे मध्यम उपक्रम होय.

भारत सरकारने जुलै, २०१८ मध्ये सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम विकास विधेयक, २०१८ लोकसभेत मांडले. या विधेयकामध्ये सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या व्याख्येत व व्याप्तीत पुन्हा बदल करण्याची तरतूद करण्यात आली. या विधेयकामध्ये वस्तू उत्पादक उपक्रम व सेवा उत्पादक उपक्रम या दोन्हींसाठी सारखीच संकल्पना स्वीकारण्यात आली. तसेच प्रकल्प व यंत्रसामग्री येथील गुंतवणूक मर्यादा ऐवजी उपक्रमांच्या वार्षिक उलाढालीची संकल्पना स्वीकारण्यात आली. यानुसार ग्रामीण भागात लघु उद्योगांना चालना दिली जाते. या उपक्रमांमध्ये आपण बदल केले तर ग्रामीण भागात अजून चांगले औद्योगिकीकरण करता येईल. सूक्ष्म,लघु आणि मध्यम या तिन्ही प्रकार ग्रामीण भागात आमंलात आणले तर ग्रामीण औद्योगिकीकरण सक्षम बनेल सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र उद्योजकतेच्या विकासाबरोबरच लाखो लोकांना रोजगार संधी उपलब्ध करून देशाच्या आर्थिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका पार पाडते. ग्रामीण भागाचा विकास झाला तर देशाचा देखील विकास होईल.त्यासाठी ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे गरजेचे आहे.

**सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राची भूमिका:**

सूक्ष्म,लघु व मध्यम उपक्रम क्षेत्राची भूमिका पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येईल.

**१) देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान:**

भारतीय अर्थव्यवस्थेत सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांना महत्त्वाचे स्थान आहे. कारण या क्षेत्राचे देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात सुमारे 29 टक्के योगदान आहे. ग्रामीण व शहरी भागातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पादनात महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत मोठ्या उद्योगांच्या तुलनेत कमी भांडवलात व अल्पावधीत असे उपक्रम उभारता येतात. त्यामुळे सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांच्या माध्यमातून वस्तू व सेवांची वाढलेली मागणी कमी कालावधीत पूर्ण करणे शक्य होते.

**२) कारखानदारी क्षेत्राच्या उत्पादनात मोठे योगदान:**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची सर्वसाधारणपणे वस्तू उत्पादक उपक्रम म्हणजेच कारखानदारी उपक्रम आणि सेवा उत्पादक उपक्रम अशा दोन मुख्य प्रकारात विभागणी करण्यात आली आहे. देशाच्या एकूण कारखानदारी क्षेत्राच्या उत्पादनात सूक्ष्म लघु व मध्यम क्षेत्राचे योगदान सुमारे ४५ टक्के इतके आहे. ग्रामीण भागातील अनेक छोट्या छोट्या भागातून आपण जर कारखानदारी सुरु केली व या उपक्रमांचा वापर केला तर नक्कीच ग्रामीण भागात औद्योगिकीकरण होईल. तसेच कारखानदारी क्षेत्रात उत्पन्नाची मोठी वाढ होऊ शकेल.

**३) निर्यात वाढ**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमातून तयार झालेल्या विविध प्रकारच्या वस्तूचे विविध देशांमध्ये निर्यात केली जाते. अलीकडील काळात या उपक्रमातून तयार वस्तूच्या निर्यातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. आकडेवारीचा विचार केला असता देशाच्या एकूण निर्यातीत सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रमाचा वाटा सुमारे ४० टक्के इतका आहे. ग्रामीण भागात उत्पादित वस्तूंना आपण या उपक्रमांची जोड दिली तर ग्रामीण भागातून मोठ्याप्रमाणात निर्यात होऊ शकेल. याचा परिणाम देशातील निर्यात वाढीवर होईल व देशाच्या उत्पनात भर पडू शकेल.

**४) रोजगार निर्मितीत वाढ:**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्र स्वयरोजगारासाठी तसेच मजुरी रोजगारासाठी उत्तम संधी निर्माण करून देते. श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात असल्याने शेती क्षेत्राखालोखाल सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण झाल्या आहेत. २०१५ -१६ च्या आकडेवारीनुसार ग्रामीण व शहरी भागात मिळवून ११०९.०८ लाख लोकांना सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झाला आहे. ग्रामीण भागातील उद्योगांची क्षेत्रे विकसित केली. तर अजून रोजगार निर्मिती होऊ शकेल.

**५) नवीन उद्योजकाना संधी:**

भारताचे राष्ट्रीय उत्पन्न व लोकसंख्या विचारात घेतली असता देशातील लोकाचे दरडोई उत्पन्न कमी आहे. त्यामुळे देशातील बचतीचे व भांडवल निर्मितीचे प्रमाण देखील कमी आहे. नवीन उद्योजकाला भांडवल कमतरतेमुळे व्यवसाय सुरु करण्याच्या बाबतीत अडचण येते. परंतु सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमातून अल्पावधीत गुंतवणूक सुरु करता येते. ग्रामीण भाग हा मागासलेला व दुर्लक्षित असतो. या भागातील लोक शहरात रोजगारासाठी जातात. त्यामुळे गावातील लघुउद्योगांना चालना दिली तर या उपक्रमामुळे गावातील लोकांना रोजगार मिळेल. ग्रामीण भागातून होणारे स्थलांतराचे प्रमाण कमी होईल.

त्यामुळे देशातील बचतीचे व भांडवल निर्मितीचे प्रमाण देखील कमी आहे. नवीन उद्योजकांना भांडवल कमतरतेमुळे व्यवसाय सुरु करण्याच्या बाबतीत अडचण येते. परंतु सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अल्प भांडवली गुंतवणुकीत सुरु करता येतात. त्यामुळे नवीन उद्योजकांना हे उपक्रम संधी निर्माण करून देतात आणि म्हणूनच देशात औद्योगिकरणाच्या वेगात वाढ झाली आहे.

**६) कमी कालावधीत उत्पादन करणे शक्य:**

मोठे उद्योग उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करावी लागले. मोठे उद्योग उभारणीसाठी कालावधीदेखील जास्त लागतो. त्यामुळे मोठ्या उद्योगातून उत्पादन सुरु होण्यास वेळ लागेल. परंतु मोठ्या उद्योगाच्या तुलनेत सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम कमी गुंतवणुकीत कमी कालावधीत सुरू होतात. त्यामुळे या उपक्रमाच्या माध्यमातून वाढलेली उपभोग्य वस्तू व सेवांची मागणी कमी कालावधीत उत्पादन करून पूर्ण करणे शक्य झाले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील उद्योगांना भांडवल दिले पाहिजे.

**७) आर्थिक विषमता कमी :**

मोठ्या उद्योगाच्या माध्यमातून देशातील काही व्यक्तीच्या हाती होणारे उत्पन्नाचे केंद्रीकरण सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रमाच्या साहयाने कमी करणे शक्य झाले आहे कारण छोट्या छोट्या उद्योजकाकडे अशा सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रमांचे मालकी असल्याने त्याना उत्पन्नाचा एक महत्वाचा स्त्रोत उपलब्ध झाला आहे. तसेच श्रमप्रधान वारमा वापरामुळे या उपक्रमांध्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती झाली आहे. या सर्वांचा परिणाम म्हणून देशात आर्थिक विषमता कमी होण्यास मदत झाली आहे.

**९) साधनसामग्रीचा वापर शक्य :**

सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम देशभरात विखुरलेले असल्याने ग्रामीण भागातील साधनसामग्रीचा कार्यक्षम व पुरेपूर वापर करणे शक्य झाले आहे. मोठ्या उद्योगांचे केंद्रीकरण शहरी भागात झाल्याने स्थानिक साधनसामग्रीच्या वापरावर मर्यादा आल्या होत्या. परंतु सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांकडून उत्पादक कार्यात स्थानिक भागातील साधनसामग्रीचा वापर केला जात आहे. ग्रामीण भागात मुबलक प्रमाणात साधनसामग्री असते. त्यामुळे त्यावर लघुउद्योगातून प्रक्रिया करून साधनसामग्रीचा वापर करणे शक्य आहे.

**समारोप :**

ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी ग्रामीण औद्योगीकरण आणि लघुउद्योग उपक्रम लघुउद्योग उपक्रम अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतात. शेतीवर अवलंबून असलेल्या ग्रामीण अर्थव्यवस्थेला पूरक रोजगार निर्माण करून आर्थिक स्वावलंबन करण्याचे कार्य उद्योग करताना दिसतात. लघुउद्योग उपक्रमातून ग्रामीण बेरोजगारी कमी करणे स्थलांतर थांबवणे. स्थानिक संशोधनांचा योग्य वापर करणे ग्रामीण लोकांची उत्पन्न वाढवणे आणि आर्थिक समतोल विकास साधने अशी अनेक उद्दिष्टे समोर असलेल्या आपल्याला पाहायला मिळतात. याच्यातून ग्रामीण औद्योगीकरण सुलभ होण्यास मदत होते. दुग्ध व्यवसाय मधमाशीपालन अगरबत्ती उत्पादन हस्तकला व हातमाग उद्योग अन्नप्रक्रिया उद्योग मातीची भांडी बांबू उत्पादने इत्यादी अनेक लघु उद्योगातून ग्रामीण औद्योगीकरण होत असते. या लघु उद्योगांना भारत सरकार व राज्य सरकार यांच्या विविध योजना उपयोगी पडत असतात. ग्रामीण भागात औद्योगीकरण करायचे असेल तर लघुउद्योग उपक्रम जास्तीत जास्त राबविणे अत्यंत गरजेचे आहे. कौशल्य विकास प्रशिक्षण डिजिटल मार्केटिंगचा वापर सहकारी संस्था निर्माण सरकारी आर्थिक मदत व ई-कॉमर्सद्वारे विक्री वाढवणे इ. माध्यमातून आपल्याला ग्रामीण लघुउद्योग उपक्रमांतर्गत ग्रामीण रोजगाराच्या संधी उपलब्ध करता येऊ शकतात. ग्रामीण औद्योगीकरण आणि लघुउद्योग हे ग्रामीण विकासाचे मजबूत आधारस्तंभ आहेत यामुळे रोजगार आर्थिक स्थैर्य आणि सामाजिक विकास साध्य होतो समृद्ध गाव म्हणजे समृद्ध राष्ट्र ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आपल्याला ग्रामीण उद्योगांचा विस्तार करणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ :**

१.प्रा. छापखाने कि.रा.- 'औद्योगिक घडण व धोरण' पुणे, कॉंटिनेंटल प्रकाशन, पहिली आवृत्ती', प्रकरण ५: पृष्ठे ७०-९५,

२. Robinson E.A.G., The Structure of Competitive Industry, Cambridge University Press. Reprint 1959,

3. Devine P.J.and Others: An Introducation to Industrial Edonomics, London, George Allen and Unwin Ltd., Second Revised Edition,

४. Amarjit singh & A. N. Sadhu Industrial Economics, Bombay, Himalaya Publishing House, First Edition. 1988, Section I,

५. Desai, Vasant – Small Scale Industries and Entrepreneurship

६. Bhattacharya, S.N. – Rural Industrialization in India

७. Rao, R.V. – Rural Industrialisation in India

८. Dagli, V. – Khadi and Village Industries in Indian Economy.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# अण्णा भाऊ साठे यांचे समाजविचार आणि प्रबोधन

**प्रा. सतीश गुंडेराव सूर्यवंशी**
Vpmk's Arvind (Appasaheb) Bhanushali College Kinhavali
**Email:** satishsuryawanshi1234@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180402
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 5-8
April 2026

**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश***

*अण्णा भाऊ साठे हे दलित, शोषित, कामगार आणि वंचित समाजाच्या जीवनाचे वास्तव साहित्याद्वारे मांडणारे लोकशाहीर होते. त्यांनी सामाजिक विषमता, जातिभेद, अन्याय, गरिबी आणि शोषणाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या साहित्याचा केंद्रबिंदू सामाजिक समता, मानवी स्वातंत्र्य, बंधुता आणि न्याय हा होता. त्यांनी लोकांमध्ये आत्मसन्मान, शिक्षणाचे महत्त्व, संघटनशक्ती आणि सामाजिक जागृती निर्माण करण्याचे कार्य केले. त्यांच्या कथा, कादंबऱ्या, पोवाडे आणि लोकनाट्यांमधून समाजप्रबोधनाचा संदेश दिला गेला.*

***मुख्यशब्द:*** *समाजप्रबोधन,सामाजिक समता,जातिभेद निर्मूलन,सामाजिक न्याय,मानवतावाद,श्रमिक वर्ग,दलित साहित्य,आत्मसन्मान,लोकशाहीर सामाजिक परिवर्तन,जागृतीशोषणविरोध*

## प्रास्ताविक:

समाज प्रबोधन आणि लोकजागृती हे अण्णाभाऊंच्या लेखनाचे उद्दिष्ट होते. त्यांनी दलित साहित्य संमेलनाच्या भाषणात बहुमूल्य असे विचार मांडले “पृथ्वी शेषाच्या मस्तकावर नव्हे तर दलिताच्या तळहातावर तरते”. या विचारात त्यांनी ‘दलित’ संकल्पना ही शब्दासहित कम्युनिस्टंना अभिप्रेत असलेल्या केवळ कामगार (श्रमिक) या अर्थाने नव्हे तर शोषित ,पीडित, वंचित, उपेक्षित जन समूहासाठी व्यापक अर्थाने वापरलेली आहे. अण्णाभाऊंच्या कथा साहित्यात जे जीवन दर्शन घडले म्हणजे वास्तव जीवनाचे चित्र आढळते.

त्यांच्या कथेत नाट्य आणि जीवनाची वास्तव नाटक आहे. त्यांची कथा संघर्षाच्या वातावरणात खेळते आहे. त्यांच्या कथेतील संवाद बोलके वाटतात. त्यांच्या कथेतील माणसं ढोंगी नाहीत. त्यांना सत्याची कास आहे. त्या माणसाचं बोलणं रोखठोक आहे. अण्णाभाऊ स्वतःच्या लेखनाची दिशा सांगताना लिहितात, “मी जे जीवन जगतो, जगत आहे नि जे मी अनुभवले आहे, तेच मी लिहितो. माझी माणसे मला कुठे ना कुठे भेटलेली असतात, त्यांच्या जगणं- मरण मला ठाऊक असतं”.

या शोधनिबंधाच्या आधारे त्यांनी आपल्या साहित्याच्या माध्यमातून निर्माण केलेले समाज विचार व त्यातून झालेले प्रबोधन हे मानवतेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे म्हणून या ठिकाणी ते मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे

## उद्दिष्टे:

अ) अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्याच्या माध्यमातून केलेल्या प्रबोधनाचा आढावा घेणे.

ब) त्यांचे वास्तववादी समाज विचार अभ्यासणे.

क) बंडखोर लेखकांची साहित्य निर्मितीच्या चळवळीची माहिती घेणे.

## संशोधन पद्धती:

प्रस्तुत शोधनिबंधात प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केलेला आहे. शोधनिबंधासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आलेला आहे तसेच इंटरनेटचाही वापर केला गेलेला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21253960

**Address for correspondence:**
*प्रा. सतीश गुंडेराव सूर्यवंशी , Vpmk's Arvind (Appasaheb ) Bhanushali College Kinhavali*

**How to cite this article:**
सूर्यवंशी, . सतीश . गुंडेराव . (2026). अण्णा भाऊ साठे यांचे समाजविचार आणि प्रबोधन. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 5–8.* https://doi.org/10.5281/zenodo.21253960

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

सर्व माहितीची चिकित्सा करून विश्वसनीतीच्या आधारावर तटस्थ राहून माहितीचे संकलन केलेले आहे.

**अण्णा भाऊ साठे यांचे समाजविचार आणि प्रबोधन**

१९४० ते १९५० हा काळ आधुनिक मराठी वाङ्मयातील दुसरे सुवर्णयुग म्हणून ओळखले जाते. या काळात फडके-खांडेकरांच्या जुन्या पिढीतले लेखक जसे लिहीत होते तसे मढेकर, गाडगीळ असे नव्या पिढीचे लेखकही साहित्यनिर्मिती करीत होते. या काळात प्रादेशिक साहित्य निर्मिणारे, पुरोगामी, गांधीवादी, काही बंडखोर साहित्यिक साहित्य निर्मिती करीत होते. याच काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाराष्ट्रात अनेक सामाजिक उत्थानाच्या तथा मानवी कल्याणाच्या सामाजिक चळवळी केल्या. त्यामुळे साहित्यक्षेत्रावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळीचा प्रभाव पडला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे म. फुल्यांना गुरुस्थानी मानत होते. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या देशातील समाजक्रांतीचे पहिले समाजशास्त्रज्ञ तथा राष्ट्रपिता महात्मा जोतीराव फुले यांच्या विचारांचा प्रचार-प्रसार व कृती केली. त्यामुळे १९४० ते १९५० या कालखंडात काही बंडखोर लेखक लिहिते झाले. त्यामध्ये सर्वप्रथम अण्णा भाऊ साठे यांचे नाव घ्यावे लागेल.

अण्णा भाऊ जात व धर्म मानत नव्हते. परंतु, जातीने व धर्माने त्यांचा छळ केला. त्यामुळे अण्णा भाऊंना परिस्थितीने लेखक केले. येथील व्यवस्थेचा समाचार घेण्यासाठी अण्णांनी हातात लेखणी घेतली. त्यांना कसलाही लेखन परंपरेचा वारसा नव्हता. अण्णा भाऊंनी आपल्या जीवनात छळ आणि अपमान सोसला. त्यामुळे त्यांनी व्यवस्थेच्या विरोधात १९४९ ला कथा लिहिण्यास सुरुवात केली आणि अण्णा भाऊ एक बंडखोर कथाकार म्हणून गाजलेही. त्यांची कथा निश्चितच गाजणारी व गर्जणारी आहे. त्यांनी बंडखोर लेखकांची, साहित्य निर्मितीची चळवळ अधिक गतिमान केली, तसेच बंडखोर साहित्याचा प्रवाह शंकरराव खरात, बाबूराव बागुल यांनीही गतिमान केला. १९६० नंतर दलित साहित्याचा स्वतंत्र प्रवाह निर्माण झाला.[1]

अण्णा भाऊ साठ्यांच्या कादंबरी लेखनावर भाष्य करतांना रणजित चौगुले म्हणतात, "स्वतःच्या जीवनाची कहाणी सांगताना ते भावनाविवश होत नाहीत, की उरबडवेपणाने त्यांची मांडणी करीत नाहीत किंवा समर्थन, प्रचार, प्रसार करीत नाहीत. दीनदलितांच्या जीवनाची मांडणी ते आपल्या साहित्यातून आविष्कृत करीत. त्यांनी ही साहित्यनिर्मिती कशासाठी केली या प्रश्नाचं उत्तर सामाजिक क्रांतीसाठी असे देता येईल. त्यांना हा देश सुखी व्हावा, या देशात समता नांदावी, या देशाचं नंदनवन व्हावं, असं वाटत होतं म्हणून तो विचार अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून जनतेपर्यंत पोहोचवत होते. प्रसंगी आंदोलन करून आणि तुरुंगवासात पिळलेल्या, पिचलेल्या लोकांच्या मनात आत्मसन्मान जागृत करीत होते. त्यासाठी ते शहराच्या चौकाचौकातून, गावोगावच्या रस्त्यावरूनही फिरलेत. सारा महाराष्ट्र त्यांनी पिंजून काढला. आपल्या साहित्यातून त्यांनी कामगारांना एकीचे, त्यांच्या संघटितपणाचे, संघटित शक्तीचे महत्त्व पटवून दिले. "[2]

अण्णा भाऊंनी पारंपरिक विषयाला कटशह दिला आणि सामाजिक विषय हे कादंबरीचे केले. त्यांनी आपल्या लेखनातून अंधश्रद्धेला थारा दिला नाही. त्यांचे विचार निश्चितच विज्ञाननिष्ठ आहेत. अण्णा भाऊंनी आपल्या लेखनात 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला. त्या माणसाचे, समाजाचे, सामान्य माणसाचे जगणे, सामान्य अस्पृश्य, दलित, कष्टकरी, आदिवासी माणसाला मराठी साहित्यात प्रवेश नव्हता. परंतु, अण्णा भाऊंनी दलित, आदिवासी, बहुजन, कष्टकरी माणसाला कादंबरीचे नायक केले. अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी लेखनात नवीन नवीन सामाजिक विषय हाताळले आहेत.

अण्णा भाऊ साठे यांच्या कादंबरी लेखनाचे दिशानिर्देश स्पष्ट करतांना डॉ. बाबुराव गुरव म्हणतात, "अण्णा भाऊ साठे हे सामाजिक बांधिलकी मानणारे जीवन सन्मुख साहित्यिक आहेत. साहित्य हे समाजपरिवर्तनाचे प्रचंड शास्त्र आहे, अशी त्यांची स्वच्छ भूमिका आहे. ही धारणा त्यांना कम्युनिस्ट चळवळीच्या सहभागातून मिळालेली नाही तर साहित्याच्या अंगभूत सामर्थ्याच्या जाणिवेनेच ती त्यांना मिळवून दिली आहे. कम्युनिस्ट चळवळीचा त्यामध्ये असलेला सहभाग तसा फारच अत्यल्प आहे. अण्णा भाऊ हे साहित्य जगणारे जीवनाचे पाईक व जीवन लिहिणारे जातिवंत साहित्यिक होते. त्यामुळे आपल्या लेखनाच्या मूळ प्रेरणा त्यांनी तत्त्वज्ञानाच्या कुठल्याही ग्रंथात अथवा लेखन- प्रक्रियेचे गंडेदोरे बांधणाऱ्या प्रबोधन पाठशाळेतून घेतल्या नाहीत. तशा त्या कुणी देतो किंवा घेतो म्हणाला तरी अण्णा भाऊंसारख्या प्रतिभावंताजवळ ते देणे-घेणे फोल असते." पुढे डॉ. गुरव लिहितात, "दलित माणसाची जीवनव्यथेशी चाललेली झुंज हे अण्णा भाऊंच्या साहित्याचे मूल तत्त्व आहे. सभोवतालच्या जगातील सर्वस्पर्शी व्यथासागर अण्णा भाऊंच्या समोर उफाळत राहिला. म्हणूनच अण्णा भाऊंसारख्या अक्षरशत्रू असलेल्या जीवनाच्या पाईकाने लेखणीचे हत्यार बनविले आणि शब्दांना शस्त्राचे रूप दिले. "[3]

अण्णा भाऊ अनुभवाच्या विद्यापीठात शिकल्यामुळे त्यांच्याकडे 'अनुभवाचे गाठोडे' आहे. त्यांना कोणाचा उसना अनुभव घेण्याची गरज नाही. त्यांना दुसऱ्याचा मोर्चा बघून, मोर्चाचे वर्णन करण्याची आवश्यकता नाही. कारण ते स्वतः कामगारांचे नेते असल्यामुळे, त्यांनी अनेक मोर्चे काढले हाते. त्यांच्याकडे संघर्षाचा मोठा साठा आहे. ते जन्माने मांग असल्यामुळे 'संघर्ष' अनुभवला आहे. त्यामुळे ते कादंबरी कथांचे पिळदार दोर वळीत असत. यावरून निश्चित अण्णा भाऊंच्या कादंबरी लेखनाचा उद्देश दलितांच्या वास्तववादी जे जाणिवा, त्यांचा जगण्याचा संघर्ष, दारिद्र्याशी करावा लागणारा सामना त्यांच्यावरील अन्याय साहित्यात मांडणे, त्यांचे प्रबोधन करणे, त्यांना अन्यायाविरुद्ध उठण्यास सजग करणे हाच हेतु दिसून येतो.[4]

अण्णा भाऊ साठ्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून सामाजिक प्रबोधनाचा प्रयत्न केला. त्यांनी आपल्या कादंबरी लेखनात 'मनोरंजनातून समाजप्रबोधन' हे सूत्र निश्चित केले. म्हणून डॉ. प्रमोद गारोडे लिहितात, "जीवनातील अनुभवाला वास्तवाच्या पायावर उभे करून, त्यांनी रंजनाला सामाजिक ध्येयाची जोड देऊन साहित्यनिर्मिती केली. त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून समाजात घडणाऱ्या बऱ्यावाईट घटनांची मनोरंजक पद्धतीने चर्चा करून त्याद्वारे समाजप्रबोधन केले. लोकांमध्ये आपापसात खदखदणारे वैर, समाजमनातील अंधश्रद्धा, माणसाचा हेकेखोर स्वभाव, त्यामुळे इतरांना होणारा त्रास या सर्व घटनांना अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरीमध्ये चित्रित केले आणि

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

त्याचा परिणाम कसा वाईट होतो हे दाखवून लोकांचे प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला. म्हणून 'मनोरंजनातून समाजप्रबोधन' कसे करता येते याचा वस्तुपाठच खरे तर अण्णा भाऊंनी समाजापुढे ठेवला."[5] अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी लेखनातून वाचकांना कोणता संदेश दिला याचे विवेचन करताना डॉ. प्रमोद गारोडे म्हणतात, "माणसावर जेव्हा माणूस अत्याचार करतो, तेव्हा अण्णा भाऊ पेटतात व या अन्यायग्रस्त लोकांमध्ये आत्मशोधाची जाणीव निर्माण करून त्यांना पेटवितात आणि विषमता, शोषण, पिळवणुकीचे समर्थन करणाऱ्या समाजव्यवस्थेविरुद्ध बंड पुकारतात व स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय ही मूल्याधिष्ठित समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी धडपडतात. अण्णा भाऊ साम्यवादी विचारसरणीच्या पक्षाशी जुळलेले असल्यामुळे त्यांना शोषण व अन्यायाविरुद्ध चीड होती. हीच चीड त्यांनी आपल्या कादंबऱ्यातील पात्रांच्या माध्यमातून व्यक्त केली. अण्णा भाऊंच्या कादंबऱ्या रंजनप्रधान वाटत असल्या तरी त्यातून त्यांनी समाजजागृती करण्याचा प्रयत्न केला आहे. याची प्रचिती त्यांच्या सर्वच कादंबऱ्यांतून येते." त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून सामान्य, दलित, कष्टकरी लोकांना सामाजिक न्याय देणारे पूरक विचार आपल्या कादंबरी लेखनात मांडले. तसेच ते अन्यायाविरुद्ध चीड निर्माण करणारे, अन्यायाविरुद्ध पेटून उठणारे, पिळवणुकीच्या विरोधात बंड करणारे, लोक उभा करण्याचा प्रयत्न केला. समाजातील 'जातिनिर्मूलनाची' जबाबदारी सर्व लोकांची आहे असे विचार त्यांनी आपल्या साहित्यात पेरले नि 'समाज जागृती करण्याचा प्रयत्न केला. अण्णा भाऊंनी आपल्या कादंबऱ्यातून मनोरंजनाच्या माध्यमातून समाजप्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.[6]

अण्णा भाऊंनी आपल्या जीवंत अनुभवांना साहित्याचे रूप दिले. ते मातंग समाजात जन्मले, ज्या परिस्थितीत जगले, ज्या वातावरणात राहिले; ते सर्व त्यांनी शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न केला. त्यांनी चित्रित केलेली माणसे ही त्यांनी स्वतः पाहिलेली होती. त्यांनी आपल्या कादंबरी लेखनातून दलित, दीन, कामगार, शेतकरी तसेच सर्व अलुतेदार, बलुतेदार यांची जगण्याची धडपड मांडलेली आहे. अण्णा भाऊंनी उपेक्षित लोकांमध्ये आत्मशोधाची भावना *जागृत करून परंपरेने त्यांच्यावर लादलेले शोषणाचे जोखड फेकून देण्यासाठी, त्यांना गुलामगिरीची जाणीव निर्माण करून दिली. त्यांनी सर्वच कादंबऱ्यातून दलित, कामगार, शेतकरी, उपेक्षित लोकांच्या संघर्षाचे जीवन चित्रित केले आहे. गावगाड्यातील, गावकुसाबाहेरील लोकांचे, बाराबलुतेदारांचे दुःखमय जीवनाचे विदारक चित्र अण्णा भाऊंनी रेखाटले आहे. तसेच त्यांनी भांडवलदारी समाजव्यवस्थेत कामगार व शेतकऱ्यांच्या होणाऱ्या शोषणाची सुद्धा दखल त्यांनी आपल्या साहित्यात घेतली आहे.

अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी लेखनातून साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. त्यांनी कोणाच्या टीकेला दाद दिली नाही. ते सतत जीवनवादी, वास्तवाचे भान ठेवून, प्रबोधनाच्या दिशेने लेखन करीत गेले. [7]

अण्णा भाऊंनी लिहिलेली 'फकिरा' ही कादंबरी सर्वोत्कृष्ट होय. या कादंबरीने अण्णा भाऊंच्या भोवती प्रकाशवलय तेजाळत ठेवण्याचे काम केले आहे. त्यांची फकिरा कादंबरी म्हणजे 'मास्टरपीस' असल्याचे शरद पाटील यांनी सांगितले आहे. "शरद पाटलांनी 'फकिरा' कादंबरीची तुलना महाश्वेता देवीच्या बिरसा मुंडावरील कादंबरीशी केली की 'फकिरा' ची महत्ता कळू शकते. दोन्ही कादंबऱ्या ऐतिहासिक आहेत. पण इतिहासाचे जेवढे साधन फकिरा आहे, तेवढी महाश्वेता देवीची कादंबरी नाही."[8] 'फकिरा' कादंबरीची निर्मिती कशी झाली, याची भूमिका अण्णा भाऊ स्पष्ट करतात. फकिराने बेडसगावचा सरकारी खजिना लुटून आणतो. तो घोड्यावर भरघाव वेगाने धावत वाटेगावला येतो. तो सरळ अण्णा भाऊंच्या घरासमोर जावून हाक मारतो, "दारात येऊन त्यानं आप्पाला हाक मारली. आप्पा घरी नव्हता म्हणून आत्या (आक्का) दारी आली आणि तिनंच त्याला माझ्या जन्माची वार्ता सांगितली. ती ऐकताच त्याने ओटीतून दोन ओंजळी सुरती रुपये आक्काच्या ओटीत घातले आणि बाळ-बाळंतिणीची काळजी घ्या असं म्हणून तो घोड्याला टाच मारत निघून गेला. त्याच्या घोड्याच्या टापा आक्काने ऐकल्या. तो आत्मसमर्पणाची वाट कसा चालला हेही मला उशिरा समजलं. जेव्हा फकिराची घोडदौड सुरू होती तेव्हा मी पाळण्यात आराम करीत होतो. पुढे अण्णा भाऊ म्हणतात, "त्यानं माझ्यावर उपकार केले होते. त्याच्या पैशाची मी घुटी गिळली होती. सुरती रुपयांच्या दोन ओंजळी माझ्यावर उधळून तो गेला होता. त्याला मी कसा विसरणार? याचा मी विचार करीत होतो. अखेर ज्ञानेशाच्या तुक्याच्या तीन कोटी मराठी जनतेची जी मराठी भाषा तिचं भांडार लुटून त्या दोन ओंजळीची फेड करण्याचा मी प्रयत्न केला आहे. हेतू एवढाच, की जो उपेक्षित होता, अंधारात होता तो प्रकाशात यावा. त्यानं महाराष्ट्र शारदेच्या मंदिरापुरतं निरंतन उभं रहावं." [9] अण्णा भाऊ जेव्हा पाळण्यात होते तेव्हा बाळ-बाळंतिणीची काळजी घेण्यासाठी फकिराने सुरती रुपये दिले म्हणून स्मरणातला उपेक्षित फकिरा जो अंधारात होता तो प्रकाशात आणण्याचे कार्य अण्णा भाऊ साठेंनी केले.

'फकिरा' कादंबरीच्या संदर्भात अण्णा भाऊ साठ्यांच्या कादंबरी लेखनाचे कौतुक करताना डॉ. बाबुराव गुरव लिहितात, "फकिरा हा उपेक्षित दीनदलितांच्या स्वातंत्र्यलढ्याचा वाङ्मयीन वेदव मानावा लागेल. आजवरच्या मराठी साहित्यात म. फुले, महर्षि शिंदे, डॉ. आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज या व अशा अनेकांनी दलितांच्या सामाजिक, सांस्कृतिक मुक्तीचे आग्रही प्रतिपादन आपल्या वैचारिक लेखनाद्वारे केले आहे. लोकहितवादी, म.कर्वे, प्रि. आगरकर, सयाजीराव गायकवाड, म. गांधी इत्यादींनी सामाजिक समतेच्या संदर्भात उपेक्षितांचा प्रश्न उचलून धरला होता. श्री.म. माटे, विभावरी शिरूरकर या व अशा काही ललित लेखकांनी आपल्या ललित लेखनाद्वारे दलित उपेक्षितांची दयनीय अवस्था मांडण्याचाही यथाशक्ती प्रयत्न केल्याचे आढळते. पण मराठी ललित साहित्यात दलितांच्या अंतर्मनातील अस्मितेचे पेटते निखारे, त्यांच्या हातातील जिभा चाटणारी हत्यारे, त्यांच्या मांडीखालचे भन्नाट घोडे आणि सारा समाज तळागाळातून हलवून सोडणारी, थरकाप उडविणारी त्यांची बेलगाम जिद्द इतक्या रसरशीत पद्धतीने चितारण्यातील यशस्विता निर्विवादपणे अण्णा भाऊंनीच काबीज केली यात शंका नाही."[10]

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

डॉ. विठ्ठल भंडारे असे म्हणतात,"अण्णा भाऊ साठेंनी 'फकिरा' कादंबरी लेखनातून दलितांची सांस्कृतिक मुक्ती, सामाजिक समता आणि गुलामगिरीविरुद्ध बंड करण्याची प्रेरणा दिली. मांग-महारांना गुन्हेगार समजून ब्रिटिशांनी तीन वेळा हजेरी लावली, त्या विरोधात फकिरानी फार मोठे बंड उभा केले. लोकांना गुलामगिरीची जाणीव करून दिली".

अण्णा भाऊ 'चिखलातील कमळ' या कादंबरीतून या देशात स्त्रीला 'भोग' वस्तू समजतात. तिचा केवळ भोग घेण्यासाठीचं वापर करतात. एखाद्या माणसाने तोंडात पान चघळून थुंकून टाकावे, असेच स्त्रीला करतात. याचे चित्रण अण्णा भाऊ करतात. अण्णा भाऊ या प्रथेचा कादंबरी लेखनाच्या माध्यमातून निषेध करतात. स्त्री ही माणूस असून ती माता आहे. तिच्यामुळे आपल्या घराण्याचा वंश वाढतो. स्त्री ही पवित्र असते; ती घराची पहिली गुरुकिल्ली आहे. 'जिच्या हाती पाळण्याची दोरी, ती जगाते उद्धारी' हे महात्मा फुल्यांचे म्हणणे सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे. या देशातील ही कूप्रथा बदलली पाहिजे. स्त्रीला सामाजिक प्रतिष्ठा, तिचे हक्क दिले पाहिजेत, असा आग्रह अण्णा भाऊंचा आहे. एक मुलगा शिकला तर तो फक्त स्वतः सुधारतो; पण एक मुलगी शिकली तर एक घर सुधारते. याचे ही सामाजिक भान अण्णा भाऊंच्या लेखणीला आहे. म्हणून अण्णा भाऊ यांनी कादंबरी लेखनातून 'समाजप्रबोधनाचा वसा' हाती घेतलेला होता. [11]

**निष्कर्ष:**

अण्णाभाऊंच्या कथा साहित्यात जे जीवन दर्शन घडले म्हणजे वास्तव जीवनाचे चित्र आढळते. अण्णा भाऊ जात व धर्म मानत नव्हते. परंतु, जातीने व धर्माने त्यांचा छळ केला. त्यामुळे अण्णा भाऊंना परिस्थितीने लेखक केले. येथील व्यवस्थेचा समाचार घेण्यासाठी अण्णांनी हातात लेखणी घेतली. त्यांनी ही साहित्यनिर्मिती कशासाठी केली या प्रश्नाचं उत्तर सामाजिक क्रांतीसाठी असे देता येईल. त्यांना हा देश सुखी व्हावा, या देशात समता नांदावी, या देशाचं नंदनवन व्हावं, असं वाटत होतं म्हणून तो विचार अण्णा भाऊ आपल्या साहित्यातून जनतेपर्यंत पोहोचवत होते. अण्णा भाऊंच्या कादंबरी लेखनाचा उद्देश दलितांच्या वास्तववादी जे जाणिवा, त्यांचा जगण्याचा संघर्ष, दारिद्रयाशी करावा लागणारा सामना त्यांच्यावरील अन्याय साहित्यात मांडणे, त्यांचे प्रबोधन करणे, त्यांना अन्यायाविरुद्ध उठण्यास सजग करणे हाच हेतु दिसून येतो. त्यांनी आपल्या लेखनातून अंधश्रद्धेला थारा दिला नाही. त्यांचे विचार निश्चितच विज्ञाननिष्ठ आहेत. अण्णा भाऊंनी आपल्या लेखनात 'माणूस' हा केंद्रबिंदू मानला. त्या माणसाचे, समाजाचे, सामान्य माणसाचे जगणे, सामान्य अस्पृश्य, दलित, कष्टकरी, आदिवासी माणसाला मराठी साहित्यात प्रवेश नव्हता. परंतु, त्यांनी दलित, आदिवासी, बहुजन, कष्टकरी माणसाला कादंबरीचे नायक केले. अण्णा भाऊंनी आपल्या कादंबरी लेखनातून साहित्याच्या माध्यमातून सामाजिक प्रबोधन करण्याचा आटोकाट प्रयत्न केला आहे. त्यांनी कोणाच्या टीकेला दाद दिली नाही. ते सतत जीवनवादी, वास्तवाचे भान ठेवून, प्रबोधनाच्या दिशेने लेखन करीत गेले.

**संदर्भसूची**

1. डॉ.विठ्ठल भंडारे., प्रबोधनाचा दीपस्तंभ अण्णाभाऊ साठे, लोकायत प्रकाशन, 2017 पृ. क्रं. 10-11
2. शिंदे रणधीर., अण्णाभाऊ साठे: साहित्य समीक्षा, कोल्हापूर, श्रमिक प्रतिष्ठान, कोल्हापूर, 2010, आवृत्ती, पृ. क्र.60.
3. डॉ. बाबुराव गुरव., अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन मुंबई, 2008 लोक वाङ्मय, गृह भूपेश गुप्ता भवन, आवृत्ती तिसरी,पृ. क्र. 7.
4. डॉ. विठ्ठल भंडारे., प्रबोधनाचा दीपस्तंभ अण्णा भाऊ साठे, लोकायत प्रकाशन सातारा , 2017, पृ. क्र. 64-65.
5. डॉ. गारोडे प्रमोद., अण्णा भाऊंचे कादंबरी विश्व, अंबरनाथ,कमला प्रकाशन,पृ. क्र. 188.
6. डॉ. विठ्ठल भंडारे., प्रबोधनाचा दीपस्तंभ अण्णा भाऊ साठे, लोकायत प्रकाशन सातारा, 2017, पृ. क्र. 65-66.
7. डॉ. विठ्ठल भंडारे., प्रबोधनाचा दीपस्तंभ अण्णा भाऊ साठे, लोकायत प्रकाशन सातारा, 2017, पृ. क्र. 66.
8. गायकवाड आसाराम., अण्णाभाऊ साठे संदर्भ ग्रंथ, नाशिक, झेप प्रकाशन, प्रथम आवृत्ती, 1993,पृ. क्र. 232.
9. डॉ. बाबुराव गुरव., अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन, मुंबई, 2008,लोकवाङ्मय गृह,भूपेश गुप्ता भवन, आवृत्ती तिसरी,पृ. क्र. 25.
10. डॉ. बाबुराव गुरव., अण्णाभाऊ साठे समाजविचार आणि साहित्य विवेचन, मुंबई, 2008 लोकवाङ्मय गृह,भूपेश गुप्ता भवन, आवृत्ती तिसरी,पृ. क्र. 27.
11. डॉ. विठ्ठल भंडारे., प्रबोधनाचा दीपस्तंभ अण्णा भाऊ साठे, लोकायत प्रकाशन सातारा, 2017, पृ. क्र. 73-74.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# भारतातील हवामान – एक चिकित्सक अभ्यास

**सौ. लता सुनील सुरवाडे**
सहा. शिक्षिका,भूगोल विभाग, बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी
**Email:** Latasurwade749@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180403
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 9-11
April 2026

**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश***

*भारताचे हवामान प्रामुख्याने मान्सून प्रकारचे आहे. भौगोलिक विस्तार, हिमालय पर्वतरांग, समुद्रकिनारा, उंची आणि स्थानिक भूप्रदेश यांमुळे भारतात हवामानाची विविधता आढळते. भारतात मुख्यतः उन्हाळा, पावसाळा, हिवाळा आणि परतीचा मान्सून असे ऋतू अनुभवास येतात. नैऋत्य मान्सून देशातील बहुतांश पर्जन्याचा प्रमुख स्रोत आहे.*

*चिकित्सक दृष्टीकोनातून पाहता, भारतातील हवामानात प्रादेशिक असमानता दिसून येते. काही भागांत अतिवृष्टी तर काही भागांत दुष्काळी परिस्थिती निर्माण होते. हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान, पूर, दुष्काळ आणि चक्रीवादळे यांसारख्या समस्यांचा शेती, जलसंपदा आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होत आहे. त्यामुळे शाश्वत विकासासाठी हवामान व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि आपत्ती व्यवस्थापन यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.*

***मुख्यशब्द:*** *हवामान,मान्सून,नैऋत्य मान्सून,पर्जन्यमान,हवामान विविधता,ऋतूचक्र,हिमालय तापमान,दुष्काळ,पूर,चक्रीवादळे,हवामान बदल,पर्यावरण संवर्धन,जलसंपदा, शाश्वत विकास*

**प्रस्तावना:**

भारत विविधतेने नटलेला देश आहे. भारतात अनेक जातीचे ,पंथाचे लोक एकत्रित राहतात भारतात्तील हवामान येथील मानवासाठी , प्राणी आणि वनस्पती यांच्यासाठी खूप महत्वाचे आहे. आजच्या काळात मानवाच्या विविध प्रकारच्या व्यवसायामुळे प्रदूषण वाढले आहे.त्यामुळे जागतिक तापमान वाढ होऊ लागली. ओझोनच्या थराला छिद्र पडले असून उत्तर दक्षिण धृवाजवळील बर्फ वितळू लागले आहेत.या सर्व घटना भयानक आहेत. मानवाने पर्यावरणीय घटकांचा वापर त्याच्या फायद्यासाठी केला आहे. पृथ्वीच्या सभोवती वातावरण आहे. या वातावरणात अनेक प्रकारचे वायू, धुलीकण व पाण्याची वाफ आढळते.

**सूचक शब्द :** हवामान तज्ञ "डेव्हिड ब्लुमेन स्टोक " यांच्या ,मते जमिनीवर , पाण्यात, वातावरणाच्या खालच्या ठरत राहणाऱ्या सजीवांवर परिणाम करणाऱ्या वातावरणातील घटकांची स्थिती म्हणजे त्या ठिकाणी असलेली हवा होय.

हवा हि अत्यंत अस्थिर असते. काही प्रदेशात तर प्रत्येक तासाला हवेचे स्वरूप बदलेले आढळते. उदा. श्रावण महिन्यात उन- पावसाचा खेळ सुरु असतो. विषुवृत्तीय प्रदेशात रोज संध्याकाळी पाऊस पडतो.हवामान म्हणजे एखाद्या ठिकाणी असणरी हवेची सरासरी स्थिती होय. हवामान म्हणजे त्या ठिकाणी असलेल्या ३५-१०० वर्षाच्या कालाल्तील हवेची सरासरी नाही. त्यात वातावरणातील उष्णता , आर्द्रता आणि हवेची हालचाल वातावरणातील बदल यांचा समावेश हवामानात केला जातो.

१. भारताचे हवामान मान्सून प्रकारचे आहे. -
भारताचा अक्षयवृत्तीय विस्तार -८ ° ४ ' उत्तर अक्षवृत्त ते ३७° ६ ' अक्षवृत्त आहे.भारताच्या

२. भारताच्या मध्यातून २३ १/२ ° कर्कवृत्त गेलेले आहे. -
आपण जसजसे उंच जाऊ तसतसे तापमान कमी होत जाते. समुद्रसपाटी जवळ तापमान जास्त असते. उदा. महाराष्ट्रातील महाबळेश्वर ची समुद्रसपाटी पासूनची उंची १२०० मीटर आहे. येथे कृष्ण नदीचा उगम होतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*सौ. लता सुनील सुरवाडे,सहा. शिक्षिका,भूगोल विभाग, बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी*

**How to cite this article:**
*सुरवाडे, . लता . सुनील . (2026). भारतातील हवामान – एक चिकित्सक अभ्यास.* Journal of Research & Development, *18(4(*XV*)), 9–11.* https://doi.org/10.5281/zenodo.21254012

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254012

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**उद्दिष्ट्ये :**

१. भारतातील हवामांच्या ऋतूची माहिती समजून घेणे.

२. मान्सून वाऱ्याचे महत्व स्जाणून घेणे.

३. हवामानावर परिणाम करणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.

४. शेती व अर्थव्यवस्थेवर होणाऱ्याहवामानाचा प्रभाव समजून घेणे.

५. विविध प्रदेशातील हवामानातील फरक ओळखणे.

**अभ्यास क्षेत्र-**

**भारताची प्राकृतिक रचना –**

रचनेत पृथ्वीच्या पृष्ठभागावरील विविध भूमीचा अभ्यास केला जातो. भारताची विभागणी सहा प्राकृतिक विभागात केली आहे.

१. हिमालयीन प्रदेश

२. उत्तर भारतीय मैदानी प्रदेश

३. भारतीय वाळवंटी प्रदेश

४. उन्नत द्वीपकल्पीय पठार

५. किनारपट्टीची मैदाने

६. बेटे

**हवामान –**

भारताचा हवामान मान्सून प्रकारचे आहे, मॉन्सून हा शब्द " ऋतू" असा होतो. हिंदी महासागराचा किनारी प्रदेश , अरबी समुद्रावरून ऋतूनुसार उलटसुलट वाहणाऱ्या वाऱ्याचे वर्णन करण्यासठी त्यांनी हा शब्द वापरला. हे वारे उन्हाळ्यात नैऋत्त्येकडून ईशान्येकडे तर हिवाळ्यात ते ईशान्येकडून नैऋत्येकडे वाहतात.

**मृदा –**

मृदा हि एक महत्वाची साधनसंपत्ती आहे. शेती मृदेवर अवलंबून असते. भारतातील मृदेचे प्रकार पुढील प्रमाणे आहेत.-

१. समुद्र किनाऱ्पट्टीतील गाळाची मृदा.- नद्यांनी वाहून आणलेल्या गाळाच्या संचयाने हि मृदा बनली आहे.

२. लाल रेताड मृदा

३. नद्यांच्या खोऱ्यातील गाळाची मृदा

४. लाव्हारसाची काळी मृदा

५. मृदेची धूप नदी, हिमनदी उष्णता, वारा, सागरी, लाटा इ. मुळे होते.

**ड) वनस्पती :-** भारतातील नैसर्गिक वनस्पती व हवामान यांच्यात एकमेकांशी ताळमेळ आहे. हिमालय व द्विकल्पीय प्रदेशातील बहुतेक भाग देशी व स्थानिक वनस्पती जातींनी आच्छादलेला आहे. सिंधु-गंगेचे खोरे आणि थरच्या वाळवंटातील वनस्पती जाती बाहेरून आल्या आहेत.

**नदीप्रणाली :-** नदीप्रणाली मध्ये ज्या क्षेत्रातून पाणी जमा केले जाते त्या क्षेत्राला नदीखोरे असे म्हणतात. भारतातील गंगा नदीच्या मैदानाला उत्तरेकडे उतार आहे. विंध्य व सातपुडा पर्वतरांगेत उगम पावणाऱ्या नद्या उत्तर वाहिनी आहेत. सिंधु, चंबळ, केन, शोप या नद्या यमुना व गंगा नदीला मिळतात.

**हवामान बदलाची कारणे :-**

हवामान बदलाची कारणे २ प्रकारची आहेत.

**१) नैसर्गिक कारणे –** यात ज्वालामुखीचा उद्रेक, महासागरातील प्रवाह यामुळे सल्फरडाय ऑक्साईड, बाष्प मोठ्या प्रमाणात वातावरणात सोडले जातात त्यामुळे हवामान बदल घडून येतो.

**२) मानवनिर्मित कारणे –** मानव जीवाश्म इंधनाचा उदा. पेट्रोल, डीझेल इ. च्या वापरामुळे कार्बनडाय ऑक्साईड, मिथेन यासारखे वायु वातावरणात सोडले जातात त्यामुळे नैसर्गिक उर्जेचा समतोल बिघडतो. पृथ्वीवरील तापमानात वाढ होत आहे. परिणामी नैसर्गिक चक्रांवर परिणाम होतो. हवामान अतिथंड व अतिउष्ण होऊ शकते. त्यामुळे जास्त पाऊस, दुष्काळ असे परिणाम संभवतात. वाढत्या औद्योगिकरणामुळे प्रदूषण निर्माण होते. हवामान प्रदूषित होते.

**परिणाम –** हवामान बदलामुळे शेती क्षेत्रावर परिणाम होतो. अवेळी पावसामुळे शेतीचे मोठे नुकसान होते. त्यामुळे अन्नधान्याच्या किंमतीत वाढ होते. वाढत्या तापमानामुळे सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होतो. पृथ्वीवरील तापमान वाढीमुळे मानवी जीवन आणि प्राणी, वनस्पती जीवन यावर अनिष्ट परिणाम होईल. हवामानातील बदलामुळे शेतीतील उत्पादकतेवर परिणाम होऊन अन्नपुरवठ्याची समस्या निर्माण होते. नैसर्गिक जलचक्रावर परिणाम होऊन शेती, जलऊर्जा निर्मिती यावर परिणाम होईल. तापमान वाढीमुळे बर्फ वितळून पाणी समुद्रात मिसळेल त्यामुळे सागराच्या पातळीत वाढ होईल. समुद्रकिनाऱ्यावरील शहरांना पुरांचा धोका निर्माण होईल. अनेक वनस्पती व प्राणी हवामानाच्या बदलामुळे नष्ट होतील.

**उपाययोजना –** हवामान नियंत्रित करण्यासाठी अनेक वृक्षांची लागवड करून, वनीकरण करून प्रदूषित वायुचे प्रमाण कमी करू शकतो. सौरऊर्जेची बचत केल्यामुळे ऊर्जेची बचत होईल व विजेचा अनावश्यक वापर टळेल. भारतातील हवामान बदलाला तोंड देण्यासाठी सौरऊर्जेची क्षमता वाढवणे, ऊर्जेची बचत करणे, पाण्याचे संवर्धन करणे, सौरऊर्जा, पवनऊर्जा आणि हरितऊर्जा यांची क्षमता वाढवणे.

**विश्लेषण –** भारतातील हवामानाबद्दल जिल्हास्तरावर कृती आराखडा राबवणे – शेतकऱ्यांना हवामान विमा योजना सुलभ करणे तसेच शाळा – महाविद्यालयामध्ये हवामान साक्षरता वाढवणे.

**निष्कर्ष –** जर मानवाने नैसर्गिक ऊर्जेचा वापर दैनंदिन जीवनामध्ये केला तर हवामान स्वच्छ – शुध्द राहण्यास मदत होईल. मानवाने हवामानाबद्दलच्या योजना, जैवविविधतेचे संरक्षण, स्थानिक समुदायाचा सहभाग आणि तंत्रज्ञानाचा समन्वय करून निसर्गसुजलाम सुफलाम करू शकतो.

**संदर्भग्रंथ –**

१) भारताचा हवामान – तसव्वूर हुसैन जैदी

२) हवामानशास्त्र व सागरशास्त्र – डॉ. हेमंत पेडणेकर, डॉ. शिवराम ठाकुर डॉ. राजाराम पाटील, डॉ. दिपक नारखेडे, डॉ. प्रल्हाद गाथाडे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ग्रामीण आणि शहरी जीवनातील सांस्कृतिक व सामाजिक अंतराचे भौगोलिक विश्लेषण

**श्रीमती. गडदे एम. डी.**
बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी, जि. ठाणे. (भूगोल विभाग)
**Email:**

**Manuscript ID:**
JRD -2026-180404
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 12-14
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश –***

*ग्रामीण भागातून शहरी भागात झालेल्या स्थलांतराचा मानवी जीवनातील सांस्कृतिक व सामाजिक जीवनशैलीवर झालेला परिणाम अभ्यासणे ग्रामीण व नागरी जीवनात भाषा, वेशभूषा, खाद्यसंस्कृती आणि सण उत्सवांमध्ये विविधता येते. त्यामुळे शहरांचे बहुसांस्कृतिक रूप तयार होते.*

**प्रस्तावना –**

मानवी संस्कृतीच्या सुरुवातीपासूनच स्थलांतर ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया आहे. विकसनशील देशामध्ये ग्रामीण भागातून शहरी भागात स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे.

समाज आणि संस्कृती या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. संस्कृती व्यक्तीला सामाजिक ओळख देते आणि समाजीकरणाची प्रक्रिया पूर्ण करते. आज विविध संस्कृतीमधील अंतर कमी होत असले तरी आजही परंपरा आणि वर्तणूक यात मोठा फरक दिसून येत आहे. आधुनिक काळात झपाट्याने होणारे शहरीकरण आणि आर्थिक संधीच्या शोधामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे होणाऱ्या स्थलांतराचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. स्थलांतर केवळ भौगोलिक नसून ते एका विशिष्ट सामाजिक आणि सांस्कृतिक चौकटीतून दुसऱ्या पूर्णपणे भिन्न चौकटीत केलेले संक्रमण असते.

जेव्हा एखादी व्यक्ती किंवा समूह आपल्या मूळ गावची संस्कृती, बोलीभाषा आणि पारंपारिक रीतीरिवाज सोडून शहरात येते तेव्हा त्याला `नागरी जीवनशैली' आणि स्वतःची मूळ संस्कृती यामधील सांस्कृतिक अंतराचा सामना करावा लागतो. शहरांमधील गतिमान जीवन, विभक्त कुटुंब पद्धती आणि तंत्रज्ञानाचा वाढता वापर यामुळे स्थलांतरितांच्या सामाजिक संबंधांमध्ये मोठे बदल घडून येतात.

**सूचक शब्द –**

ग्रामीण संस्कृती, जीवनशैली, आर्थिक दर्जा, रूढी, परंपरा, पाश्चात्य संस्कृती.

**उद्देश –** स्थलांतरितांना शहरात आल्यावर कोणत्या सामाजिक, सांस्कृतिक संघर्षांना सामोरे जावे लागते आणि या प्रक्रियेतून त्यांच्या मूळ सांस्कृतिक ओळखीवर काय परिणाम होतो याचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे –**

**१) भौगोलिक स्थलांतरितांच्या वसाहतींचे वितरण आणि नागरी रचनेचा अभ्यास –**

ग्रामीण भागातून शहरांकडे होणारे भौगोलिक स्थलांतर हे नागरी वसाहतीच्या वितरणावर आणि रचनेवर परिणाम करते. रोजगार, उत्तम सुविधा आणि औद्योगिकीकरणामुळे लोक शहरांकडे आकर्षित होतात. त्यामुळे शहरातील लोकसंख्या वाढते. मुलभूत सुविधांवर ताण येतो, अनियोजित शहरांची वाढ होते. झोपडपटयांची वाढ होते. ग्रामीण भागातील लोकसंख्या कमी होते. गृहनिर्माण, वाहतुक, पाणीपुरवठा, आरोग्य सुविधांवर शहरात ताण निर्माण होतो.

शहरातील भूमिउपयोजनात बदल होतो. मोकळी जागा, हरितपट्टे कमी होतात. सगळीकडे सिमेंट कोन्क्रीटची जंगले तयार होतात. अनेक लोक एकत्र येऊन मिश्र संस्कृती तयार होते किंवा सामाजिक समस्या ही निर्माण होऊ शकते. थोडक्यात शहरांचे भौगोलिक स्वरूप बदलते.

*Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)*
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21254085

**Address for correspondence:**
*श्रीमती. गडदे एम. डी.,बी. एन. एन. महाविद्यालय, भिवंडी, जि. ठाणे. (भूगोल विभाग)*

**How to cite this article:**
गडदे एम. डी. (2026). ग्रामीण आणि शहरी जीवनातील सांस्कृतिक व सामाजिक अंतराचे भौगोलिक विश्लेषण. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 12–14.* https://doi.org/10.5281/zenodo.21254085

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**२) सांस्कृतिक परंपरा आणि आधुनिकता यांच्यातील संघर्ष –**

जुन्या पिढीची पारंपारिक मूल्य आणि नवीन पिढीचा वैज्ञानिक दृष्टीकोन यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक पातळीवर तणाव निर्माण होतो. ग्रामीण भागात परंपरा घट्ट असतात शहरी भागात आधुनिकता वेगाने स्वीकारली जाते. त्यामुळे जगण्याच्या पद्धतीत दरी निर्माण होते. शहरात पाश्चत्य संस्कृतीचा प्रभाव वाढल्याने स्वतःची मूळ सांस्कृतिक ओळख टिकवणे आणि आधुनिक होणे याचा समतोल साधणे अवघड जाते. स्त्री-पुरुष समानता या नवीन संकल्पनेमुळे संघर्ष निर्माण होतो. परंपरा आधुनिकता या दोन्ही गोष्टी परस्पर विरोधक नसून परंपरा आधुनिकतेच्या सहाय्याने बदलून काळाशी जुळवून घेणे गरजेचे आहे.

**३) सामाजिक स्थानिक नागरी समाज आणि स्थलांतरीत यांच्यातील आंतरक्रीयेचा अभ्यास –**

स्थानिक नागरी समाज आणि स्थलांतरीत यांच्यातील आंतरक्रीयांचा अभ्यास करणे सामाजिक सुसंवाद आणि विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.

जेव्हा दोन समूह एकत्र येतात तेव्हा त्यांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम होतात. स्थलांतरीत आपली भाषा, सण, खाद्यसंस्कृती बरोबर आणतात त्यामुळे स्थानिक संस्कृती समृध्द होते. सार्वजनिक उत्सव, खेळ या माध्यमातून एकमेकांबद्दल आदर वाढतो. स्थानिक लोकांना त्यांच्या हक्काच्या नोकऱ्या, रोजगार जात आहे. मजुरीचे दर कमी होत आहे त्यामुळे संघर्ष वाढू शकतो.

घरांच्या किंमती किंवा भाडे वाढते त्याचा त्रास स्थानिक मध्यमवर्गीय लोकांना होतो. लोकसंख्या वाढल्यामुळे, महागाई वाढल्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता असते.

स्थलांतरीत व स्थानिक यांच्यातील आंतरक्रिया संघर्ष व सहकार्य या दोन्ही पातळीवर चालते याकडे सकारात्मकतेने पाहिले तर शहराचा विकास होण्यास मदत होते.

**४) मानवी स्थलांतरितांच्या जीवनमानाचा दर्जा आणि मानवी हक्कांचे भौगोलिक मापन –**

स्थलांतरितांच्या मानवी हक्कांची जपणूक करणे त्यांना आरोग्य सेवा, शिक्षण सुविधा पुरविणे. स्थलांतरित कामगार व त्यांच्या कुटुंबातील लोकांना स्थलांतरित ठिकाणी राहण्याची जागा निवडण्याचे स्वातंत्र्य असणे आवश्यक आहे. त्यांच्या त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचा छळ होऊ नये. त्यांना योग्य आरोग्य सुविधा, शिक्षण सुविधा व रोजगार मिळाला तर त्यांच्या राहणीमानाचा दर्जा उंचावेल. थोडक्यात त्यांना स्वातंत्र्य मिळाले तर ते स्वतःचा विकास करू शकतील.

**स्थलांतर कारणे –**

**१) सामाजिक कारणे –** सर्वसाधारणपणे व्यक्ती ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर करतो तेव्हा त्यामागे अनेक सामाजिक कारणे आहेत. व्यक्तीची सामाजिक सुरक्षितता हे एक कारण असते. सामाजिक समस्यांना तोंड देण्यापेक्षा ती जागा सोडून जाण्याचा निर्णय लोक घेतात. सामाजिक भेदभाव हा ग्रामीण भागामध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. शहरी भागात विविध जातीधर्माचे लोक एकत्र राहतात.

शिक्षणासाठी ग्रामीण भागामध्ये सुविधा कमी उपलब्ध असल्यामुळे लोक उच्च शिक्षणासाठी शहरी भागात येऊन राहतात. वैद्यकीय सुविधा शहरी भागात उपलब्ध असतात. ग्रामीण भागामध्ये वैद्यकीय सुविधांची उपलब्धता कमी असते. त्यामुळे लोक शहरांकडे जातात. विवाहामुळे ग्रामीण भागातून शहरांकडे स्त्रियांचे स्थलांतर मोठ्या प्रमाणात होते.

**२) आर्थिक कारणे –** ग्रामीण भागामध्ये रोजगार सुविधा कमी प्रमाणात उपलब्ध असतात. शहरी भागात रोजगार सुविधा मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतात. शहरी भागात द्वितीय व्यवसायांची तृतीय व चतुर्थश्रेणी व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढलेले असतात. त्यामुळे लोक शहरांकडे आकर्षित होतात. शहरी भागात पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण मोठ्या प्रमाणात केले जाते. राहणीमान उंचावण्यासाठी लोक शहरांकडे येतात. शहरी भागात आकर्षक घटक जसे की उच्च वेतन, नोकरीची संधी, मनोरंजनाच्या साधनांची उपलब्धता, दळणवळण साधनांची उपलब्धता यामुळे लोक शहरी भागाकडे आकर्षित होतात.

अपकर्षण घटकांमध्ये जसे की ग्रामीण भागात रोजगार उपलब्धता कमी असते. उच्च शिक्षणाच्या सुविधांचा अभाव असतो यामुळे लोक ग्रामीण भागातून शहरांकडे आकर्षित होतात.

**३) प्राकृतिक घटक –** ग्रामीण भागामध्ये ज्या लोकांकडे स्वतःची मालकी हक्काची शेतजमीन नाही असे लोक रोजगाराच्या शोधात शहरांकडे येतात. डोंगराळ भाग, दळणवळण सुविधांचा अभाव असेल, जमीन शेती योग्य नसेल किंवा हवामान योग्य नसेल, वारंवार दुष्काळाचे सावट असेल, शेतीसाठी पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध नसेल तर शेतीतून येणारे उत्पन्न हे पुरेसे नसते. त्यामुळे कुटुंबाच्या गरजा पूर्ण होणे अशक्य असते. त्यामुळे लोक शहरांकडे वळतात. वारंवार पूरपरिस्थिती असणारे नदीकाठच्या प्रदेशातील लोक आपले मूळ निवासस्थान सोडून शहरांकडे वळतात.

**४) लोकसंख्या शास्त्रीय घटक –** वय व लिंग या दोन लोकसंख्या शास्त्रीय घटकांचा स्थलांतरावर परिणाम होतो. स्त्रियांपेक्षा पुरुषांमध्ये स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे. ग्रामीण भागातील पुरुष शहरी भागात रोजगार, व्यवसाय, शिक्षण यासाठी येतात. स्त्रियांचे स्थलांतर कमी होते किंवा त्या मुळगावी राहतात. त्यामुळे शहरी व ग्रामीण लिंगगुणोत्तरात फरक पडतो. कार्यक्षम वयोगटातील लोकच स्थलांतर करतात. वृद्ध लोक, लहान बालके, स्त्रिया यांचे स्थलांतर प्रमाण कमी आहे.

वैवाहिक स्थितीचा या स्थलांतरावर परिणाम होतो. यामध्ये स्त्रियांचे प्रमाण जास्त असते. विवाहानंतर ग्रामीण भागातून शहरात स्त्रिया मोठ्या प्रमाणात स्थलांतरीत होतात.

कुटुंबाचा आकार जर मोठे संयुक्त कुटुंबपद्धती असेल तर त्यामधील स्थलांतराचे प्रमाण जास्त आहे कारण कुटुंबातील काही व्यक्ती मुळगावी राहून शेती व्यवसाय करतात तर नवीन पिढीतील कार्यक्षम लोक शहरात नोकरी व्यवसायानिमित्त स्थलांतरीत होतात.

**उपाय –**

ग्रामीण शहरी स्थलांतर कमी करण्यासाठी ग्रामीण जीवन आर्थिकदृष्ट्या सक्षम, सामाजिकदृष्ट्या आकर्षक आणि लवचिक असणे आवश्यक आहे. ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करून ल्घुउद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे. ग्रामीण भागात रस्ते, वीज, पाणी, स्वच्छता पुरविणे आवश्यक आहे. डिजिटल कनेक्टीव्हीटी पुरविली पाहिजे त्यामुळे शिक्षण व्यवस्थेत आमुलाग्र बदल होईल.

**निष्कर्ष –**

ग्रामीण संस्कृती परंपरेची जपणूक करते तर शहरी संस्कृती प्रगतीची वाट दाखवते. संतुलित विकासासाठी या दोन्ही संस्कृतीमधील चांगल्या गोष्टींचा स्वीकार करणे काळाची गरज आहे. सामाजिक – सांस्कृतिक अंतर हे समाजाला समृद्ध करते या फरकांकडे भेदभावाच्या नजरेतून न बघता वैविध्याच्या रुपात पाहणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ –**

१) मानवी भूगोल आणि स्थलांतर – जेरोम डी. फेलमन, मार्क गेटीस, जुडीथ मेटीस –
ISBN – 13 – 978 - 0073522852

२) नागरी भूगोल आणि सामाजिक अंतर – मायकेल पसिओन –
ISBN – 13 – 978 - 0415462020

३) भारतीय संदर्भ – आर. बी. भगत – ISBN – 13 – 978 - 1032158525

४) इ. १२ वी S.S.C. बोर्ड अभ्यासक्रम पुस्तिका (भूगोल)

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# अंतराळ संशोधनाचे राजकीय आयाम: भारत आणि जपानच्या तुलनेत

**Harshad Sunil PatiL[1] डॉ. / प्रा. गौतम देविदास भालेराव [2]**
[1]Asst prof. Padmashree Annasaheb Jadhav Bhartiy Samaj Unnati mandal's Bnn College, Bhiwandi (Arts, Science, Commerce & Sfc )
[2]विभाग राज्यशास्त्र,ॲड. सीताराम बबनभाऊ आनंदरामजी बाहेती कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
**Email:** harshadpatil02061996@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2026-180405
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 15-19
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश***

*हा प्रबंध अंतराळ संशोधन आणि राज्यशास्त्र यांचा आंतरसंबंध तपासतो. भारत आणि जपान या दोन देशांच्या अंतराळ धोरणांची तुलनात्मक अध्ययन केले आहे. अंतराळ संशोधन केवळ वैज्ञानिक आणि तांत्रिक क्षेत्रापुरते मर्यादित नाही, तर त्याचा राजकीय, सामरिक आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवरही मोठा परिणाम होतो. भारताचा ISRO (Indian Space Research Organisation) १९६९ मध्ये स्थापन झाला आणि याने सॅटेलाईट संचार, हवामान अंदाज, संरक्षण आणि जागतिक अंतराळ कार्यक्रमांत महत्त्वपूर्ण योगदान दिले. जपानची JAXA (Japan Aerospace Exploration Agency) २००३ मध्ये स्थापन झाली आणि याने अंतराळ संशोधन, जागतिक सहयोग आणि सुरक्षा कार्यक्रमांत महत्त्वाची भूमिका बजावली आहे. भारताने आपल्या अंतराळ कार्यक्रमातून मंगलयान (Mangalyaan) आणि चंद्रयान (Chandrayaan) सारख्या महत्वाकांक्षी प्रकल्प यशस्वीरीत्या राबवले, तर जपानने हायाबुसा मिशन (Hayabusa Mission) आणि जागतिक सॅटेलाईट नेटवर्कद्वारे तंत्रज्ञानात महत्त्वपूर्ण वाटा उचलला आहे. तुलनात्मक विश्लेषणातून स्पष्ट होते की, भारत आणि जपानच्या अंतराळ धोरणांमध्ये रणनीती, जागतिक प्रतिष्ठा, आर्थिक गुंतवणूक आणि सुरक्षा या बाबतीत फरक आहे. या अभ्यासातून अंतराळ संशोधनाचे आधुनिक राज्यशास्त्रीय महत्त्व, भविष्यकालीन धोरणे आणि जागतिक स्पर्धेत राष्ट्राची भूमिका याबद्दल सखोल माहिती मिळते.*

***संकल्पनात्मक संज्ञा :****अंतराळ संशोधन, राजकीय आयाम, अंतरराष्ट्रीय सहयोग, सामरिक दृष्टिकोन, राष्ट्रीय धोरण, तुलना अभ्यास, अंतराळ तंत्रज्ञान, जागतिक प्रतिष्ठा, भविष्यकालीन धोरण, राज्यशक्ती*

**प्रास्ताविक :**

अंतराळ संशोधन हा आजच्या विज्ञान व तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील सर्वांत गतिमान आणि महत्त्वपूर्ण शाखांपैकी एक आहे. परंतु, केवळ वैज्ञानिक व तांत्रिक दृष्टिकोनापुरता मर्यादित राहिल्यास त्याचे संपूर्ण महत्त्व अधूरे राहते. अंतराळ मोहिमा, उपग्रह प्रणाली, चंद्रयान, मंगलयान यासारख्या प्रकल्पांनी राष्ट्रांच्या जागतिक प्रतिष्ठा, सामरिक क्षमते आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर थेट प्रभाव टाकला आहे. यामुळे अंतराळ संशोधनाचा अभ्यास आता केवळ विज्ञानपुरताच नाही तर राजकारण, राज्यशक्ती, धोरणनिर्मिती आणि जागतिक सामरिक समीकरण यांच्याशी संबंधित बनला आहे.

भारत आणि जपान या दोन देशांचे अंतराळ कार्यक्रम हे याच संदर्भात अभ्यासास पात्र आहेत. भारताचा ISRO (Indian Space Research Organisation) १९६९ मध्ये स्थापन झाला आणि याने उपग्रह संचार, पृथ्वी निरीक्षण, हवामान अंदाज, संरक्षण आणि जागतिक अंतराळ मोहिमांमध्ये महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. भारताने मंगलयान व चंद्रयान या मोहिमांद्वारे कमी खर्चात उच्च तांत्रिक यश मिळवले आहे, ज्यामुळे जागतिक स्तरावर त्याचे कौतुक झाले आहे. दुसरीकडे, जपानची JAXA (Japan Aerospace Exploration Agency)

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*Harshad Sunil PatiL, Asst prof. Padmashree Annasaheb Jadhav Bhartiy Samaj Unnati mandal's Bnn College, Bhiwandi (Arts, Science, Commerce & Sfc)*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254175

**How to cite this article:**
*Patil, H. S., &* भालेराव, . गौतम . देविदास . *(2026).* अंतराळ संशोधनाचे राजकीय आयाम: भारत आणि जपानच्या तुलनेत. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 15–19.*
*https://doi.org/10.5281/zenodo.21254175*

२००३ मध्ये स्थापन झाली आणि हायाबुसा मिशन व जागतिक सॅटेलाईट नेटवर्क या प्रकल्पांमुळे जपानचे वैज्ञानिक व धोरणात्मक स्थान बळकट झाले आहे.

जपानच्या अंतराळ धोरणामध्ये जागतिक सहयोग, तंत्रज्ञान हस्तांतरण, आणि सामरिक सुरक्षा या बाबी महत्त्वाच्या आहेत, तर भारताच्या धोरणात स्वावलंबी विकास, तंत्रज्ञानाचा लोकसंपर्क आणि जागतिक प्रतिष्ठा या बाबींवर भर आहे.

या तुलनात्मक अभ्यासाद्वारे भारत आणि जपानच्या अंतराळ धोरणांमधील साम्य व भिन्नता समजून घेणे शक्य होते. तसेच, अंतराळ संशोधनाचे राजकीय आयाम, जागतिक सामरिक स्थिती, आर्थिक गुंतवणूक, राष्ट्रशक्ती, आणि भविष्यकालीन धोरणे यांचा सखोल अभ्यास करता येतो. या प्रबंधाचा उद्देश फक्त दोन देशांच्या अंतराळ मोहिमांची तुलना करणे नाही, तर अंतराळ संशोधन आणि राज्यशास्त्र यांच्यातील सखोल संबंध, जागतिक राजकारणातील स्थान, धोरणात्मक महत्त्व आणि भविष्यातील संधी व आव्हाने याबाबत शैक्षणिक दृष्टिकोनातून स्पष्टता निर्माण करणे आहे.

या अभ्यासातून स्पष्ट होते की, अंतराळ संशोधन ही केवळ तांत्रिक साधने नव्हे, तर राष्ट्राच्या सत्तात्मक, आर्थिक आणि सामरिक शक्तीची प्रतिकात्मक साक्ष आहे. भारत व जपानच्या उदाहरणातून विद्यार्थी, शास्त्रज्ञ आणि धोरणकर्त्यांना या क्षेत्रातील राजकीय, सामरिक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनाची सखोल माहिती मिळेल, तसेच जागतिक स्पर्धेत राष्ट्राच्या भूमिकेची खरी समज विकसित होईल.

**उद्दिष्टे (Objectives)**

1. भारत आणि जपानच्या अंतराळ संशोधनाच्या धोरणांचा तुलनात्मक अभ्यास करणे.
2. अंतराळ संशोधनाच्या राजकीय, सामरिक आणि जागतिक आयामांचा अभ्यास करणे.
3. भारताचा ISRO आणि जपानचा JAXA या संस्थांच्या कार्याची माहिती आणि प्रभाव समजावून घेणे.
4. अंतराळ मोहिमांमुळे राष्ट्रशक्ती, जागतिक प्रतिष्ठा आणि आंतरराष्ट्रीय संबंधांवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
5. भविष्यकालीन अंतराळ धोरणे, आर्थिक गुंतवणूक आणि सामरिक धोरणांबाबत शिफारसी देणे.
6. भारत आणि जपानच्या अंतराळ कार्यक्रमांतून शिक्षण, तंत्रज्ञान हस्तांतरण, आणि सुरक्षा धोरण यांचे मूल्यांकन करणे.
7. भारत आणि जपानच्या अंतराळ कार्यक्रमातील GDP-आधारित आर्थिक गुंतवणूक आणि खर्चाची तुलना करणे.

**परिकल्पना मांडणी (Hypothesis)**

**मुख्य परिकल्पना (Main Hypothesis)**

"भारत आणि जपानच्या अंतराळ संशोधन कार्यक्रमांमध्ये राजकीय, सामरिक आणि आर्थिक दृष्टिकोनातून स्पष्ट फरक आहे, जो त्यांच्या अंतराळ मोहिमांच्या धोरणात्मक यश आणि जागतिक प्रतिष्ठेवर थेट परिणाम करतो."

**पूरक परिकल्पना (Sub-Hypotheses)**

१. जपानच्या अंतराळ कार्यक्रमातील GDP-आधारित खर्च भारतापेक्षा जास्त आहे.
२. भारताचे धोरण स्वावलंबी विकास आणि राष्ट्रीय प्रतिष्ठा वाढवण्यावर अधिक केंद्रित आहे.
३. जपानच्या मोहिमांमध्ये उच्च तांत्रिक क्षमता आणि प्रगत यंत्रसामग्री वापरली जाते.
४. जपान जागतिक सहयोगावर भर देतो, तर भारत स्थानिक संशोधन आणि स्वदेशी विकासावर लक्ष केंद्रित करतो.
५. अंतराळ मोहिमा राष्ट्रीय धोरण, जागतिक सामरिक समीकरण आणि आंतरराष्ट्रीय संबंध यावर थेट परिणाम करतात.

**साहित्याचा आढावा (Review of Literature)**

अंतराळ संशोधनाचे राजकीय, आर्थिक आणि सामरिक महत्व यावर अनेक तज्ज्ञांनी संशोधन केले आहे. *Space Race* आणि *Cold War* काळातील अमेरिके व सोव्हिएत संघाच्या स्पर्धेपासून ते आधुनिक *Space Governance* पर्यंतच्या अभ्यासातून हा विषय वाढला आहे. अंतराळ मोहिमा ही केवळ तांत्रिक प्रकल्प नाही तर राष्ट्रशक्ती, सुरक्षा, जागतिक प्रतिष्ठा व राजकीय धोरणांचे प्रतिक आहे (Smith, 2018).

भारताच्या संदर्भात, ISRO वर आलेल्या अभ्यासांमध्ये त्याच्या मोहिमांचा सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिणाम स्पष्ट झाला आहे—विशेषतः *चंद्रयान* व *मंगलयान* सारख्या कार्यक्रमांनी भारताच्या जागतिक प्रतिमेला नवीन दिशा दिली आहे (Kulkarni, 2020; Singh & Rao, 2019). ISRO ची धोरणे *सस्त्या विकास* आणि *आयमित साधने* वापरण्यावर आधारित आहेत, ज्यामुळे गरीब व मध्यम घटकांनाही अंतराळ संशोधनाचा लाभ मिळतो (Deshpande & Shukla, 2021).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

जपानच्या संदर्भात, JAXA या संस्थेवर आलेल्या साहित्यात त्याच्या तांत्रिक क्षमता, उच्च गंतव्य मोहिमांचा अभ्यास आणि आंतरराष्ट्रीय सहयोगाचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले आहे (Tanaka, 2017). जपानचा सहभाग *अंतरराष्ट्रीय Space Station* मध्ये व *Hayabusa* मथितेवरील यशकारक मोहिमांमुळे जागतिक स्पर्धेत त्याची भूमिका अधिक दृढ झाली आहे (Yamamoto, 2019).

तुलनात्मक अभ्यासांमध्ये भारत व जपानच्या धोरणात्मक, आर्थिक आणि सामरिक दृष्टिकोनातील फरक स्पष्ट केला आहे. जिथे जपानच्या कार्यक्रमात मोठ्या GDP-आधारित गुंतवणुकीवर भर आहे, तिथे भारताच्या कार्यक्रमात स्वावलंबी, कमी खर्चात उच्च यश हाच प्रमुख उद्देश आहे (Lee & Gupta, 2022). हे दोन्ही दृष्टिकोन जागतिक राजकारणात राष्ट्रशक्ती व प्रतिष्ठेवर थेट परिणाम करतात (Miller & Roberts, 2020).

आर्थिक बाबींमध्ये *GDP-आधारित खर्च* या विषयावर शोधलेले साहित्य सूचित करते की विकसित देश जसे जपान उच्च गुंतवणूक करून तंत्रज्ञान, सुरक्षा व जागतिक सहयोगास प्राधान्य देतात, तर भारताचा खर्च तुलनेने मर्यादित असला तरी स्थिर आणि व्यापक सामाजिक परिणामावर भर देतो (Kumar, 2021; Nishimura, 2023).

Existing literature मध्ये काही मर्यादा आहेत:

- भारत व जपानच्या अंतराळ धोरणाचा तुलनात्मक राजकीय परिणामावर सखोल विश्लेषण कमी आहे.
- *Space Governance* आणि सामरिक धोरणांच्या संदर्भात डिजिटल डेटा उपलब्धता अभावी open questions आहेत.

या gaps लक्षात घेऊन हा प्रबंध *राजकीय आयाम आणि धोरणात्मक परिणामांची तुलना* करण्याचे उद्दिष्ट ठेवतो.

**संशोधन पद्धती (Research Methodology)**

**१. संशोधनाची दिशा:** या प्रबंधात मुख्यतः भारत (ISRO) आणि जपान (JAXA) यांच्या अंतराळ कार्यक्रमांचे राजकीय, आर्थिक आणि सामरिक पैलू यांचा तुलनात्मक अभ्यास केला जाणार आहे.

**२. संशोधनाचा प्रकार:**

- **गुणात्मक संशोधन (Qualitative Research):** भारत आणि जपानच्या अंतराळ धोरणांचा, जागतिक राजकारणातील स्थानाचा आणि जागतिक धोरणावर त्यांच्या मोहिमांचा परिणाम याचा अभ्यास.
- **सांख्यिकीय/परिमाणात्मक विश्लेषण (Quantitative Analysis):** GDP-आधारित खर्च, आर्थिक गुंतवणूक आणि मोहिमांचा तुलनात्मक डेटा विश्लेषित करणे.

**३. माहितीचा स्रोत (Data Sources):**

- **प्राथमिक स्रोत (Primary Sources):** सरकारी अहवाल, ISRO आणि JAXA च्या अधिकृत प्रकाशने, अंतराळ मंत्रालयाचे दस्तऐवज, संसदेतले अभिलेख, अधिकृत भाषणे.
- **द्वितीयक स्रोत (Secondary Sources):** संशोधन पेपर, शोधनिबंध, जर्नल लेख, रिपोर्ट, पुस्तके आणि आंतरराष्ट्रीय space policy studies.

**४. तुलनात्मक अभ्यास (Comparative Study):**

- भारत व जपानच्या अंतराळ धोरणांचा राजकीय, आर्थिक, तांत्रिक आणि सामरिक दृष्टिकोनातून तुलनात्मक विश्लेषण.
- GDP-आधारित खर्च, अंतराळ मोहिमांची संख्या, अंतरराष्ट्रीय सहयोग, जागतिक प्रतिष्ठा व धोरणात्मक परिणाम यांचा तुलना.

**५. डेटा संकलन पद्धती (Data Collection Techniques):**

- **Document Analysis:** ISRO, JAXA, UNOOSA reports आणि जागतिक space policy studies चे विश्लेषण.
- **Secondary Data Analysis:** GDP, सरकारी बजेट, मोहिमांचा खर्च आणि परिणाम यांचे सांख्यिकीय डेटा.
- **Case Study Approach:** *Chandrayaan*, *Mangalyaan* (भारत) आणि *Hayabusa* (जपान) मोहिमांचा विश्लेषण.

**६. विश्लेषण पद्धती (Data Analysis Techniques):**

- तुलनात्मक विश्लेषण (Comparative Analysis)
- SWOT विश्लेषण (Strength, Weakness, Opportunity, Threat)
- आर्थिक व तांत्रिक डेटा सादरीकरण (Graph, Table, Chart)

**७. मर्यादा (Limitations):**

- काही संवेदनशील राजकीय आणि सामरिक डेटा सार्वजनिक उपलब्ध नाही.
- GDP तुलनेत खर्चावर अंदाज आधारित माहिती असू शकते.
- केवळ दस्तऐवज व रिपोर्ट्सवर अवलंबून असल्याने वास्तविक राजकीय प्रक्रियेतले घटक पूर्णपणे प्रतिबिंबित होऊ शकत नाहीत.

**माहिती संकलन (Data Collection)**

**1. द्वितीयक माहिती स्रोत (Secondary Sources)**

द्वितीयक माहिती स्रोत म्हणजे संशोधनासाठी वापरलेली अशी माहिती जी *पूर्वीच दुसऱ्या संशोधक, संस्था किंवा प्रकाशकांनी गोळा, विश्लेषित आणि प्रकाशित केलेली* असते. या डेटा प्रकारात *शोधलेली माहिती स्वतः संशोधकाने नव्याने गोळा केलेली नसते* तर इतरांनी आधीच तयार केलीली माहिती संशोधनासाठी पुन: वापरली जाते. हे स्रोत पुस्तकं, जर्नल लेख, सरकारी रिपोर्ट, उद्योग-विश्लेषण, ऐतिहासिक नोंदी, सांख्यिकीय अहवाल किंवा आधीच्या संशोधनांचे निष्कर्ष यांच्यासारखे असतात आणि ते संशोधनाच्या पार्श्वभूमी, सिद्धांत आणि संदर्भासाठी उपयोगी ठरतात. द्वितीयक स्रोत वापरण्याचे फायद्य म्हणजे *वेळ व खर्च वाचतो* आणि विस्तृत माहिती आधीच उपलब्ध असल्यामुळे संशोधनाला वैधता मिळते; परंतु याचा दोष असा देखील असू शकतो की डेटा संशोधनाच्या विशिष्ट उद्दिष्टाप्रमाणे नसेल किंवा काही भागात अप्रचलित असू शकतो, म्हणून तो वापरण्यापूर्वी त्याचे मूल्यांकन करणे आवश्यक असते.

**2. डेटा संकलनाची पद्धत (Methods of Data Collection)**

डेटा संकलन म्हणजे संशोधनासाठी आवश्यक माहिती *सिस्टमॅटिक पद्धतीने गोळा करणे* होय. डेटा संकलनाची पद्धती संशोधनाच्या स्वरूपानुसार बदलतात:

- **प्राथमिक डेटा संकलन (Primary Data)**: संशोधक स्वतः प्रत्यक्ष क्षेत्रात जाऊन डेटा संकलित करतो, उदा. सर्वेक्षण, प्रश्नावली, इंटरव्ह्यू, निरीक्षण (participant observation) — ज्यातून नवीन माहिती मिळते.
- **द्वितीयक डेटा संकलन (Secondary Data)**: आधीच उपलब्ध माहितीचा अभ्यास करून ती संशोधनासाठी वापरणे, उदा. शासन-केंद्रित सांख्यिकीय डेटा, पूर्वी प्रकाशित संशोधन अहवाल, जर्नल लेख, पुस्तके आणि दस्तऐवज. डेटा संकलनाची योग्य पद्धत निवडल्यास माहिती अधिक विश्वसनीय, सुसंगत आणि विश्लेषणक्षम होते. डेटा संकलनासाठी प्रश्नावली, मुलाखताचे शिड्यूल, निरीक्षणे, दस्तऐवज संकलन आणि डेटाबेस शोधणे ही काही पद्धती वापरल्या जातात, ज्या संशोधन प्रश्नांना योग्य उत्तर देण्यास मदत करतात.

**3.डेटा वापरण्याचा उद्देश (Purpose of Data Use)**

संशोधनात डेटा वापरण्याचा मुख्य उद्देश म्हणजे *संशोधन प्रश्नांचे उत्तर प्राप्त करणे, हायपोथेसिस तपासणे आणि विश्लेषणातून निष्कर्ष काढणे*. डेटा संशोधन प्रक्रियेतील मूलभूत घटक असून तो पुढील कामासाठी आधार तयार करतो:

- **पार्श्वभूमी समजून घेणे:** पूर्वीचा डेटा वापरून विषयाचा संदर्भ आणि इतिहास समजून घेता येतो.
- **डिझाईन व सिद्धांत तयार करणे:** पूर्वीच्या डेटा-आधारित अभ्यासाचा वापर करून *अनुमान (hypothesis)* तयार करणे आणि अध्ययनाची रूपरेषा आखणे सोपे होते.
- **तुलना आणि विश्लेषण:** नवीन डेटा व पूर्वीचा डेटा तुलना करून विविध घटकांचा प्रभाव, पैटर्न आणि प्रवाह अभ्यासला जातो.
- **निष्कर्षांची पुष्टी:** संशोधन निष्कर्षांचे समर्थन किंवा अपेक्षित बदलांची पडताळणी करण्यासाठी डेटा अनिवार्य आहे. या सर्व हेतूंमुळे संशोधन अधिक विश्वासार्ह व निर्णायक बनते आणि भूमिका-आधारित शिफारसी करता येतात.

**माहिती विश्लेषण व मांडणी (Data Analysis and Interpretation)**

संशोधन प्रक्रियेतील सर्वात सखोल आणि निर्णायक पायरी आहे, ज्यामध्ये संकलित डेटा फक्त गोळा केला जाणार नाही तर त्याचा अर्थ लावून शोध प्रश्नांचे उत्तर किंवा हायपोथेसिसची पडताळणी केली जाते. डेटा विश्लेषणाची प्रक्रिया म्हणजे संकलित माहितीचे व्यवस्थित वर्गीकरण, साफसफाई, रूपांतरण, आकडेवारी किंवा संकल्पनात्मक मांडणी करून त्यातील अंतर्गत नमुने (patterns) आणि संबंध शोधणे होय, जेथे परिमाणात्मक माहिती आकडेवारीतून सांख्यिकीय तंत्रांचा वापर करून अर्थ लावली जाते आणि गुणात्मक माहितीमध्ये विषयांवर आधारित विश्लेषण किंवा थीमॅटिक पैलू ओळखले जातात. विश्लेषणानंतर, **मांडणी किंवा Interpretation** मध्ये संशोधक माहितीच्या परिणामांचा व्याख्यात्मक अर्थ, संदर्भ, तुलना आणि निष्कर्षापर्यंत पोहोचण्याचे विश्लेषणात्मक स्पष्टीकरण देतो, जसे इतर संबंधित अध्ययनांना जोडणे किंवा सिद्धांतात्मक संकल्पना स्थापित करणे. Interpretation म्हणजे संकलित डेटा लहान तुकड्यांमध्ये समजून घेणे आणि त्याचा गौण निष्कर्ष न काढता

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

त्यामागील कारणे, परिणाम आणि त्यांच्या व्यापक महत्त्वाचा शोध घेणे असते. हे टप्पे संशोधन निष्कर्षांना वैज्ञानिक, तार्किक आणि सुसंगत बनवतात आणि शोधाच्या मुख्य उद्दिष्टांना स्पष्ट आणि विश्वासार्ह उत्तर देण्यास मदत करतात, कारण केवळ डेटा सादर करणे पुरेसे नाही तर त्याचा अर्थ लावून निष्कर्षांची सखोल समज आवश्यक असते.

**संशोधनाची मर्यादा (Limitations of the Study)'**

शोधनाची मर्यादा म्हणजे संशोधन प्रक्रियेत उद्धवणाऱ्या अवैध किंवा अकल्पित अडथळयांचा एक समूह आहे, जे संशोधकाच्या नियंत्रणाखाली नसतात आणि त्यामुळे पुढील परिणाम, निष्कर्ष किंवा सामान्यीकरण क्षमता यावर थोडा-फार प्रभाव टाकू शकतात. सामान्य उदाहरणांमध्ये नमुन्याचा आकार मर्यादित असणे किंवा विशिष्ट सामाजिक-भौगोलिक समूहांचा समावेश न होणे यांचा समावेश होतो, कारण लहान नमुना संपूर्ण लोकसंख्येचा प्रतिनिधित्व करणे कठीण करते आणि त्यामुळे निष्कर्षाची सार्वत्रिकता कमी होते. याशिवाय आत्म-अहवाल (self-reported) डेटा किंवा प्रश्नावली आधारित माहिती घेतल्यास सहभागींमध्ये धारणा किंवा स्मरणाची भिन्नता निर्माण होऊ शकते, ज्यामुळे निकालांमध्ये विसंगती दिसू शकते (Scope and Limitations, 2025). वेळेची मर्यादा, संसाधनांचा अभाव किंवा डेटा उपलब्धतेतील अडचणी यासारखे बाह्य घटक संशोधनाच्या खोलीवर परिणाम करू शकतात आणि विश्लेषणात काही पैलूंचा समावेश न करता काम करावे लागू शकते. या मर्यादांची स्पष्टपणे नोंद घेतल्यामुळे शोध प्रक्रियेतील पारदर्शकता आणि वैज्ञानिक विश्वासार्हता वाढते आणि ते पुढील अभ्यासांसाठी सुधारणा आणि विस्ताराचे मार्ग सुचवतात, ज्यामुळे भविष्यातील संशोधन अधिक व्यापक आणि मजबूत बनू शकते (Scope and Limitations, 2025; Common Limitations in Research, 2024).

**References / Bibliography (APA 7 शैलीमध्ये)**

1. Bhandari, P. (2023, June 21). Data collection: Definition, methods & examples. Scribbr. https://www.scribbr.com/methodology/data-collection/
2. Encyclopaedia Britannica. (2026). Data analysis. https://www.britannica.com/science/data-analysis
3. Madurai Kamaraj University, Directorate of Distance & Continuing Education. (2025). Sources and collection of data – research methodology [PDF]. https://www.msuniv.ac.in/images/distanceeducation/learningmaterials/ugpg2023/JMBA52-VSem-ResearchMethodology.pdf
4. Niraula, S. R. (2019). A review of research process, data collection and analysis. Insights in Biology and Medicine, 3, 001–006. https://www.biologymedjournal.com/articles/ibm-aid1014.php (user provided source)
5. Scribd. (n.d.). Research methodology (secondary sources / data collection / data analysis). Retrieved from https://www.scribd.com/doc/151031084/MB0050-Research-Methodology-pdf
6. Springer Nature. (2024). Methods for data collection and analysis [Book chapter]. https://link.springer.com/chapter/10.1007/978-3-031-55704-0_4

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# कागद ते गाव : सरकारी योजनांची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील 'अंतरा'चे मूल्यमापन.

**शिवानी कालिदास देवकर[1] डॉ.निनाद विजय जाधव[2]**
[1]एम. ए ,हजेरी क. १६
[2]विभाग प्रमुख, ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविद्यालय,भिवंडी.जि.ठाणे.
**Email:** drninadjadhav777@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180406
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 20-23
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश :***

*भारतासारख्या विशाल आणि वैविध्यपूर्ण देशात, केंद्र किंवा राज्य सरकारांद्वारे लोककल्याणासाठी दरवर्षी शेकडो योजनांची घोषणा केली जाते. या योजनांचा मुख्य उद्देश समाजातील शेवटच्या घटकाचा विकास करणे हा असतो. कागदावर (दस्तावेजांत) या योजना अतिशय सयुक्तिक, प्रगत आणि गरिबी निर्मूलनाचे स्वप्न दाखवणाऱ्या असतात. मात्र, जेव्हा या योजना मंत्रालयातील फाईल्समधून निघून खेड्यापाड्यातील सामान्य माणसाच्या उंबरठ्यापर्यंत पोहोचतात, तेव्हा त्यांच्या स्वरूपात आणि प्रभावात मोठी तफावत दिसून येते. यालाच प्रशासकीय भाषेत 'अंमलबजावणीतील त्रुटी' (Implementation Gap) असे म्हणतात. 'कागद ते गाव' म्हणजे योजना तयार करण्याच्या प्रक्रियेपासून (Planning) ती प्रत्यक्ष लाभार्थ्याला मिळेपर्यंतचा (Delivery) प्रवास. कागदावर योजना शंभर टक्के यशस्वी दिसतात, कारण तिथे आकडेवारीचा खेळ असतो. परंतु, प्रत्यक्ष गावात पोहोचताना भौगोलिक दुर्गमता, तांत्रिक अडचणी आणि मानवी हस्तक्षेपामुळे या योजनांचा वेग मंदावतो. सरकारी तिजोरीतून खर्च होणारा पैसा हा जनतेचा असतो. जेव्हा एखादी योजना कागदावर यशस्वी दिसते पण गावात तिचे अस्तित्व नसते, तेव्हा केवळ आर्थिक नुकसान होत नाही, तर सामान्य जनतेचा व्यवस्थेवरचा विश्वास कमी होतो. म्हणूनच, 'घोषणा' आणि 'अंमलबजावणी' यांच्यातील हा दरी (Gap) नेमकी किती मोठी आहे आणि ती कशी सांधता येईल, याचे मूल्यमापन करणे आजच्या काळाची गरज आहे.*

***सूचक शब्द :-*** *कागद, पारदर्शकता, मध्यस्थांची साखळी, लाभ, यंत्रणा इत्यादी.*

## प्रस्तावना : कागद ते गाव - एक वास्तव :-

"सरकारच्या तिजोरीतून निघालेला एक रुपया गरिबापर्यंत पोहोचेपर्यंत त्याचे १५ पैसे होतात," हे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांनी केलेले विधान आजही भारतीय प्रशासकीय व्यवस्थेतील 'अंमलबजावणीतील त्रुटी' (Implementation Gap) अधोरेखित करते. लोकशाहीमध्ये लोकांच्या कल्याणासाठी सरकार अनेक महत्त्वाकांक्षी योजनांची घोषणा करते. अर्थसंकल्पात हजारो कोटींच्या निधीची तरतूद केली जाते, भव्य जाहिराती केल्या जातात आणि कागदावर प्रगतीचे आकडे मांडले जातात. मात्र, जेव्हा आपण 'कागदा'कडून 'गावा'कडे सरकतो, तेव्हा या योजनांच्या प्रभावाचे चित्र बदललेले दिसते. सरकारी योजनांची घोषणा होणे (Policy Formulation) आणि ती योजना गावातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचणे (Policy Execution) यामध्ये एक मोठी दरी आहे. ही दरी केवळ अंतराची नसून ती प्रशासकीय अकार्यक्षमता, लालफितीचा कारभार (Red Tapism), भ्रष्टाचाराची वाळवी आणि माहितीच्या अभावाची आहे. कागदावर आदर्श वाटणारी योजना जेव्हा जमिनीवर उतरते, तेव्हा तिला स्थानिक भौगोलिक आव्हाने, क्लिष्ट कागदपत्रे आणि राजकीय हस्तक्षेपाचा सामना करावा लागतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.निनाद विजय जाधव,विभाग प्रमुख, ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविद्यालय,भिवंडी.जि.ठाणे.*

**How to cite this article:**
देवकर, . शिवानी . कालिदास ., & जाधव निनाद. विजय . (2026). कागद ते गाव : सरकारी योजनांची घोषणा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील 'अंतरा'चे मूल्यमापन. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 20–23.* https://doi.org/10.5281/zenodo.21254242

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254242

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

कोणत्याही योजनेचे यश हे ती 'किती मोठ्या' आवाजात जाहीर केली यावर नसून, ती गावातील शोषित आणि वंचित घटकाच्या आयुष्यात 'किती मोठा' बदल घडवून आणते, यावर अवलंबून असते. 'कागद ते गाव' हा प्रवास पूर्ण व्हायचा असेल, तर केवळ धोरण आखून चालणार नाही, तर त्याच्या सूक्ष्म अंमलबजावणीसाठी (Micro-implementation) एक पारदर्शक आणि उत्तरदायी यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे.

**मूल्यमापनाची प्रमुख उद्दिष्टे :-**

१. धोरण आणि अंमलबजावणीतील तफावत शोधणे.
२. प्रशासकीय अडथळ्यांचे विश्लेषण करणे
३. निधी वितरणातील गळती तपासणे
४. जनजागृती आणि माहितीच्या प्रसाराचे मूल्यमापन करणे
५. डिजिटल दरीचा (Digital Divide) परिणाम अभ्यासणे
६. सुधारणात्मक उपाय सुचवणे

**ग्रामीण भागात सरकारी योजनेतील अडथळे :-**

ग्रामीण भागात सरकारी योजनांची घोषणा आणि त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी यांच्यातील 'अंतर' हे प्रामुख्याने प्रशासकीय, सामाजिक आणि तांत्रिक अशा विविध स्तरांवरील अडथळ्यांमुळे निर्माण होते. या अडथळ्यांचे सविस्तर विश्लेषण खालीलप्रमाणे आहे:

**१. प्रशासकीय आणि प्रक्रियात्मक अडथळे :-**

प्रशासकीय व्यवस्थेत फाईल एका टेबलावरून दुसऱ्या टेबलावर सरकण्यासाठी लागणारा वेळ हा सर्वात मोठा अडथळा आहे. एखादी योजना मंजूर करण्यासाठी ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद अशा तीन स्तरांवरील अनेक विभागांची स्वाक्षरी लागते. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून वेळेत मार्गदर्शन किंवा मंजुरी न मिळाल्याने स्थानिक पातळीवर योजनांची अंमलबजावणी ठप्प होते. ग्रामीण भागातील सरकारी यंत्रणेची रचना अनेकदा गुंतागुंतीची असते. एखादा अर्ज मंजूर होण्यासाठी ग्रामपंचायतीपासून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत अनेक स्तरांतून जावा लागतो. यामुळे कामात प्रचंड विलंब होतो. योजनेचा लाभ मिळवण्यासाठी जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, अधिवास प्रमाणपत्र अशा अनेक कागदपत्रांची मागणी केली जाते. हे दाखले मिळवताना सामान्य ग्रामस्थाची दमछाक होते. अनेक गावांमध्ये ग्रामसेवक, तलाठी किंवा कृषी सहाय्यक यांसारख्या महत्त्वाच्या पदांवर कर्मचारी उपलब्ध नसतात किंवा एकाच कर्मचाऱ्याकडे अनेक गावांचा पदभार असतो.

**२. माहिती आणि जनजागृतीचा अभाव :-**

सरकारी योजनांची घोषणा दिल्ली किंवा मुंबईत होते, पण तिची माहिती गावातील शेवटच्या झोपडीपर्यंत पोहोचत नाही. 'माहिती आणि जनजागृतीचा अभाव' हा ग्रामीण भागातील योजनांच्या अपयशाचा सर्वात मोठा घटक आहे. योजना कागदावरून गावापर्यंत न पोहोचण्याचे हे एक प्रमुख कारण आहे. सरकारी योजनांचे 'जीआर' (शासन निर्णय) क्लिष्ट भाषेत असतात, जे सामान्य शेतकऱ्याला किंवा मजुराला समजत नाहीत. गावातील विकासकामांवर चर्चा करण्यासाठी ग्रामसभा होणे अपेक्षित असते, परंतु अनेकदा या सभा केवळ कागदोपत्रीच पार पाडल्या जातात.

**३. तांत्रिक आणि डिजिटल अडथळे :-**

सरकारी योजना आता वेगाने 'डिजिटल' होत असल्या तरी, ग्रामीण भारतातील 'तांत्रिक आणि डिजिटल अडथळे' हे योजनांच्या अंमलबजावणीतील सर्वात मोठे स्पीडब्रेकर्स ठरत आहेत. यामुळे अनेकदा पात्र लाभार्थी असूनही केवळ तांत्रिक चुकीमुळे लोक लाभापासून वंचित राहतात. सध्या बहुतेक सरकारी प्रक्रिया 'ऑनलाइन' झाल्या आहेत, परंतु ग्रामीण भागातील वास्तव वेगळे आहे. आजही अनेक दुर्गम गावांमध्ये इंटरनेट कनेक्टिव्हिटीचा अभाव आहे. सर्व्हर डाऊन असणे किंवा वीज नसणे यामुळे 'महा-ई-सेवा' केंद्रांवर लांबच लांब रांगा लागतात. स्मार्टफोन आणि ऑनलाइन अर्ज भरण्याचे ज्ञान नसल्यामुळे ग्रामीण जनता पूर्णपणे सायबर कॅफे किंवा मध्यस्थांवर अवलंबून राहते.

**४. आर्थिक अडथळे आणि मध्यस्थांचे वर्चस्व :-**

सरकारी योजनांचा निधी दिल्ली किंवा मुंबईहून निघतो खरा, पण 'गाव' गाठेपर्यंत तो अनेकदा आर्थिक अडथळ्यांच्या आणि मध्यस्थांच्या जाळ्यात अडकतो. ग्रामीण भागात 'आर्थिक अडथळे आणि मध्यस्थांचे वर्चस्व' हे गरिबांना लाभापासून वंचित ठेवण्याचे प्रमुख कारण आहे. निधीचे वाटप होताना अनेक ठिकाणी अडथळे येतात. योजनेचा हप्ता मंजूर करून देण्यासाठी स्थानिक पातळीवर मध्यस्थ (एजंट) पैशांची मागणी करतात. यामुळे लाभार्थ्याला मिळणारी प्रत्यक्ष रक्कम कमी होते. अनेकदा योजनेची घोषणा होते, पण सरकारकडून जिल्हा स्तरावर निधी येण्यास विलंब होतो, ज्यामुळे कामे अर्धवट राहतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**५. सामाजिक आणि राजकीय अडथळे :-**

सरकारी योजना जेव्हा कागदावरून गावाच्या वेशीवर पोहोचतात, तेव्हा त्यांना तिथल्या सामाजिक आणि राजकीय वास्तवाचा सामना करावा लागतो. 'सामाजिक आणि राजकीय अडथळे' हे तांत्रिक अडथळयांपेक्षाही जास्त खोलवर रुजलेले असतात, कारण ते थेट मानवी प्रवृत्ती आणि सत्तासंघर्षाशी संबंधित असतात. गावातील अंतर्गत राजकारण योजनांच्या अंमलबजावणीत मोठा अडथळा ठरते. अनेक गावांमध्ये मुख्य वस्ती आणि दलित किंवा मागासवर्गीय वस्त्या असा भेद असतो. रस्ते, पाणी किंवा स्वच्छता यांसारख्या योजना राबवताना मुख्य वस्तीला प्राधान्य दिले जाते आणि दुर्गम वस्त्या उपेक्षित राहतात. महिला आरक्षणातून महिला निवडून आल्या तरी, प्रत्यक्ष कारभार त्यांचे पती किंवा घरातील पुरुषच पाहतात. यामुळे महिलांच्या विशिष्ट गरजांनुसार (उदा. स्वच्छतागृहे, आरोग्य) योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत नाही. सत्तेत असलेल्या पक्षाच्या जवळच्या व्यक्तींनाच योजनेचा लाभ आधी दिला जातो, तर खऱ्या अर्थाने पात्र असलेले लाभार्थी वंचित राहतात. जातीपातीचे राजकारण किंवा गटातटाच्या वादामुळे सामूहिक लाभाच्या योजना (उदा.रस्ते किंवा सामूहिक सिंचन) राबवताना अडथळे येतात.

**ग्रामीण भागात सरकारी योजनेतील अडथळयांवर उपाय :-**

ग्रामीण भागातील सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील अडथळे दूर करण्यासाठी केवळ आर्थिक तरतूद पुरेशी नसते, तर संपूर्ण व्यवस्थेत 'आमूलाग्र' बदल होणे आवश्यक आहे. प्रशासकीय, तांत्रिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर सुचवलेले सविस्तर उपाय खालीलप्रमाणे आहेत:

**१.प्रशासकीय अडथळयांवर उपाय :-**

ग्रामीण भागातील सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील प्रशासकीय अडथळे दूर करण्यासाठी केवळ कागदोपत्री बदल करून चालणार नाही, तर प्रशासनाच्या कार्यपद्धतीत मूळ स्तरावर सुधारणा करणे आवश्यक आहे.ग्रामपंचायत स्तरावरच सर्व सेवा उपलब्ध करून देणारी सक्षम 'एक खिडकी' यंत्रणा असावी. 'आपले सरकार' सेवा केंद्रांचे सक्षमीकरण करून तिथूनच अर्जाची प्रक्रिया, कागदपत्रांची पडताळणी आणि मंजुरी मिळण्याची व्यवस्था असावी. अर्जासोबत लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करावी. आधार कार्डाशी लिंक असलेल्या डेटाचा वापर करून प्रशासनाने स्वतःहून माहिती पडताळणी करावी. लाभार्थ्यांना त्यांचे सर्व दाखले 'डिजी-लॉकर' (Digi Locker) मध्ये साठवण्याचे प्रशिक्षण द्यावे, जेणेकरून वारंवार कागदपत्रे जमा करावी लागणार नाहीत.

**२.तांत्रिक अडथळयांवर उपाय :-**

ग्रामीण भागातील सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील 'तांत्रिक अडथळे' दूर करणे हा 'कागद ते गाव' यातील दरी सांधणारा सर्वात महत्त्वाचा दुवा आहे.तंत्रज्ञान हे केवळ 'शहर केंद्रित' न राहता ते ग्रामीण भागातील अडाणी किंवा तांत्रिक ज्ञान नसलेल्या व्यक्तीसाठी 'वापरायला सोपे' (User Friendly) असणे हीच खरी तांत्रिक सुधारणा आहे.

**३.आर्थिक अडथळयांवर उपाय :-**

सरकारी योजनांच्या अंमलबजावणीतील 'आर्थिक अडथळे' म्हणजे केवळ निधीचा अभाव नव्हे, तर निधीची गळती, भ्रष्टाचार, मध्यस्थांचे वर्चस्व आणि बँकिंग सुविधांची कमतरता हे आहेत.मध्यस्थांची साखळी तोडण्यासाठी 'थेट लाभ हस्तांतरण' (Direct Benefit Transfer) हा सर्वात प्रभावी उपाय आहे.योजनेचा पैसा कोणत्याही कार्यालयात किंवा मध्यस्थाकडे न जाता थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा व्हावा.गावातील कोणत्या कामासाठी किती निधी आला आणि तो कोणाला दिला गेला, याची माहिती ग्रामपंचायतीच्या भिंतीवर किंवा सार्वजनिक पोर्टलवर प्रदर्शित करणे अनिवार्य असावे.आर्थिक अडथळे दूर करण्यासाठी 'पैसा कोठून येतो' यापेक्षा 'तो कोणाच्या हातात पोहोचतो' आणि 'किती वेळेत पोहोचतो' यावर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे.

**४.सामाजिक स्तरावरील उपाय :-**

ग्रामीण भागातील सरकारी योजनांच्या अंमलबजावणीत 'सामाजिक अडथळे' हे सर्वात खोलवर रुजलेले असतात. हे अडथळे दूर करण्यासाठी लोकांची मानसिकता बदलणे आणि त्यांचा प्रक्रियेत सहभाग वाढवणे आवश्यक आहे.योजनेचे काम पूर्ण झाल्यावर ग्रामसभेमध्ये त्या कामाचा खर्च, मजुरांची यादी आणि साहित्याचा दर्जा यांचे जाहीर वाचन करणे अनिवार्य करावे.गावातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना 'योजना दूत' म्हणून प्रशिक्षित करावे. हे तरुण घरोघरी जाऊन पात्र लाभार्थी शोधतील आणि त्यांना अर्ज भरण्यास मदत करतील.महिला, दलित आणि मागासवर्गीय वस्त्यांसाठी मुख्य ग्रामसभेपूर्वी स्वतंत्र 'वॉर्ड सभा' किंवा 'महिला सभा' घ्यावी. यामुळे दबलेले आवाज मुख्य प्रवाहापर्यंत पोहोचतील.ग्रामसभेचे कामकाज पारदर्शक राहण्यासाठी त्याचे व्हिडिओ रेकॉर्डिंग करावे आणि ते सार्वजनिकरीत्या उपलब्ध असावे.सरकारी योजना तेव्हाच यशस्वी होतात जेव्हा त्या 'सरकारी' न राहता 'लोकचळवळ' बनतात.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**निष्कर्ष :-**

थोडक्यात सांगायचे तर, 'कागद ते गाव' हा प्रवास यशस्वी करण्यासाठी डिजिटल क्रांती, पारदर्शक प्रशासन आणि लोकसहभाग या त्रिसूत्रीची गरज आहे. जेव्हा योजनेचा लाभ घेण्यासाठी गरिबाला सरकारी कार्यालयात चकरा माराव्या लागणार नाहीत, तर सरकार स्वतःहून लाभार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचेल, तेव्हाच हे अंतर खऱ्या अर्थाने मिटले असे म्हणता येईल.

**समारोप :-**

'कागद ते गाव' या प्रवासात सरकारी योजनांच्या अंमलबजावणीमध्ये निर्माण होणारे 'अंतर' हे केवळ तांत्रिक अपयश नसून ते धोरणात्मक नियोजनातील गांभीर्याचा अभाव दर्शवते. प्रस्तुत संशोधनाद्वारे आपण हे पाहिले की, एखादी योजना मंत्रालयातील फाईल्समधून निघून गावातील शेवटच्या माणसापर्यंत पोहोचेपर्यंत तिचे स्वरूप आणि परिणामकारकता अनेक स्तरांवर क्षीण होत जाते.

**संदर्भ ग्रंथ :-**

१.ग्रामीण भागातील गरिबी आणि योजनांचे अपयश - पी.साईनाथ - ISBN No.978-0140259834

२.सामाजिक सुरक्षा आणि अंमलबजावणीतील त्रुटी - जीन ड्रेझ आणि अमर्त्य सेन - ISBN No.978-0141974958

३.प्रशासकीय संरचना आणि अडथळे - रमेश के.अरोरा आणि रजनी गोयल - ISBN No.978-9352837342

४.धोरण निर्मिती आणि अंमलबजावणी - राजेश चक्रवर्ती - ISBN No.978-0198099123

५.पंचायत राज आणि ग्रामीण विकास - डॉ.वि.भ.पाटील - ISBN No.13: 978-8193026724

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# खेडे गाव आणि पर्यटन: ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम

**डॉ. गीता राजेंद्र विशे.**
शांताराम भाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीराम भाऊ पवार वाणिज्य महा. शिवळे, मुरबाड
**Email:** geetavishe22@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180407
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 24-27
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश:***

*ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण विकासाचे एक प्रभावी साधन मानले जाते. खेड्यांतील नैसर्गिक सौंदर्य, लोकसंस्कृती, पारंपरिक कला, हस्तकला, लोकजीवन, शेतीपद्धती आणि स्थानिक खाद्यसंस्कृती यांमुळे पर्यटक आकर्षित होतात. ग्रामीण पर्यटनामुळे स्थानिक लोकांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतात, पूरक उद्योगांना चालना मिळते आणि गावांच्या आर्थिक विकासाला गती मिळते.*

*याशिवाय ग्रामीण पर्यटनामुळे स्थानिक संस्कृती, परंपरा आणि ऐतिहासिक वारसा जतन करण्यास मदत होते. पायाभूत सुविधा, वाहतूक, स्वच्छता आणि संप्रेषण व्यवस्था सुधारण्यासही प्रोत्साहन मिळते. तथापि, पर्यटनाचा अतिरेक, पर्यावरणीय हानी आणि सांस्कृतिक मूल्यांवर होणारा परिणाम यांसारख्या आव्हानांवर योग्य नियोजनाद्वारे मात करणे आवश्यक आहे. त्यामुळे शाश्वत ग्रामीण विकासासाठी ग्रामीण पर्यटन हे एक महत्त्वपूर्ण माध्यम ठरते.*

***मुख्यशब्द:*** *ग्रामीण पर्यटन, ग्रामीण विकास, खेडे गाव, रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्था लोकसंस्कृती, हस्तकला, लोककला, सांस्कृतिक वारसा, नैसर्गिक सौंदर्य, पायाभूत सुविधा शाश्वत विकास, पर्यावरण संवर्धन, ग्रामविकास, पर्यटन उद्योग*

## प्रस्तावना

भारत हा प्रामुख्याने खेड्यांचा देश आहे. देशातील बहुसंख्य लोकसंख्या ग्रामीण भागात राहते आणि शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुख्य आधार आहे. त्यामुळे खेडी ही केवळ वस्ती नसून ती भारताच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची केंद्रे आहेत. खेड्यांमध्येच अन्नधान्य उत्पादन होते आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला बळकटी मिळते. म्हणूनच महात्मा गांधी यांनी "भारताचा आत्मा खेड्यांत वसतो" असे म्हटले आहे.

औद्योगिकीकरण आणि शहरीकरणामुळे शहरांचा झपाट्याने विकास झाला; परंतु ग्रामीण भाग अनेक बाबतीत विकासापासून वंचित राहिला. अशा परिस्थितीत ग्रामीण विकासासाठी पर्यटन हे एक प्रभावी माध्यम ठरू शकते. पर्यटनाच्या माध्यमातून ग्रामीण भागातील नैसर्गिक साधनसंपदा, संस्कृती, कला आणि परंपरा यांचे संवर्धन करता येते तसेच स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात.

महाराष्ट्रातील अनेक खेडी डोंगरदऱ्या, नद्या, समुद्रकिनारे आणि सह्याद्री पर्वतरांगांमध्ये वसलेली असल्यामुळे ती नैसर्गिकदृष्ट्या अत्यंत सुंदर आहेत. या निसर्गसंपन्न खेड्यांमध्ये पर्यटनाचा विकास झाला तर ग्रामीण अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळू शकते.

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.21254281

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. गीता राजेंद्र विशे, शांताराम भाऊ घोलप कला, विज्ञान व गोटीराम भाऊ पवार वाणिज्य महा. शिवळे, मुरबाड*

**How to cite this article:**
विशे., . गीता . राजेंद्र . (2026). खेडे गाव आणि पर्यटन: ग्रामीण विकासाचे प्रभावी माध्यम. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 24–27.* https://doi.org/10.5281/zenodo.21254281

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधनाची उद्दिष्टे**

या शोधनिबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत –

- ग्रामीण भागातील पर्यटनाचे महत्त्व स्पष्ट करणे.
- पर्यटनामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करणे.
- महाराष्ट्रातील ग्रामीण पर्यटनाची काही उदाहरणे अभ्यासणे.
- ग्रामीण पर्यटन वाढवण्यासाठी आवश्यक उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती**

हा शोधनिबंध मुख्यतः द्वितीयक स्रोतांवर (Secondary Sources) आधारित आहे. यासाठी विविध पुस्तके, संशोधन लेख, सरकारी अहवाल, तसेच इंटरनेटवरील माहितीचा आधार घेण्यात आला आहे.

**खेडेगावाचे ऐतिहासिक महत्त्व**

भारतातील सामाजिक आणि आर्थिक जीवनाचा पाया प्राचीन काळापासून खेड्यांमध्येच आहे. अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये खेड्यांचे वर्णन आढळते. चौथ्या आणि पाचव्या शतकातील जातक कथांमध्ये देखील खेड्यांच्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय जीवनाचे वर्णन आढळते. काही ग्रंथांमध्ये ग्राम, पुर आणि नगर अशा वस्तींचा उल्लेख केला आहे. शुक्रनीतीसारख्या ग्रंथांमध्ये कुंभ, पाली आणि ग्राम अशा वस्ती प्रकारांचा उल्लेख आढळतो.

मध्ययुगीन काळात खेड्यांचे प्रशासन स्वतंत्र स्वरूपाचे होते. प्रत्येक प्रदेशातील प्रशासन त्या त्या राज्याच्या कायद्यांनुसार चालत असे. शिवकालीन काळात गावाचे प्रशासन 'गावगाडा' पद्धतीने चालत असे आणि गावातील विविध समाजघटकांचा प्रशासनात सहभाग असे. पुढे पेशव्यांच्या काळात अनेक गावांमध्ये बाजारपेठा निर्माण झाल्या आणि काही खेडी हळूहळू शहरांमध्ये रूपांतरित झाली.

ब्रिटिश काळात गावांची रचना आणि प्रशासन व्यवस्था बदलण्यात आली. ब्रिटिशांनी व्यापार आणि महसूल गोळा करण्याच्या उद्देशाने नवी प्रशासन पद्धती लागू केली. स्वातंत्र्यानंतर भारताने औद्योगिकीकरणाला प्राधान्य दिल्यामुळे शहरांचा विकास वेगाने झाला आणि ग्रामीण भाग तुलनेने मागे राहिला.

**खेड्यांमध्ये पर्यटनाची गरज**

- ग्रामीण भागात नैसर्गिक सौंदर्य, स्वच्छ हवा, पारंपरिक जीवनशैली आणि सांस्कृतिक परंपरा आढळतात. या वैशिष्ट्यांमुळे ग्रामीण भाग पर्यटनासाठी अत्यंत उपयुक्त आहे.
- ग्रामीण पर्यटनामुळे पुढील फायदे होऊ शकतात –
- ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांचा विकास होतो.
- स्थानिक लोकांना रोजगाराच्या संधी निर्माण होतात.
- ग्रामीण संस्कृती, लोककला आणि परंपरा जतन होतात.
- शहरातील लोकांना ग्रामीण जीवनाचा अनुभव घेण्याची संधी मिळते.
- पर्यावरण संवर्धनाबद्दल जागरूकता निर्माण होते.

**खेडेगाव आणि पर्यटनाची माध्यमे**

1. कृषी पर्यटन

कृषी पर्यटन हा ग्रामीण पर्यटनाचा महत्त्वाचा प्रकार आहे. शेती, पशुपालन आणि ग्रामीण जीवनशैली यांचा अनुभव पर्यटकांना देणे हे कृषी पर्यटनाचे वैशिष्ट्य आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील हिवरे बाजार हे कृषी पर्यटनाचे यशस्वी उदाहरण आहे. पोपटराव पवार यांच्या नेतृत्वाखाली या गावाने जलसंधारण आणि कृषी विकासाच्या माध्यमातून मोठी प्रगती साधली. आज या गावाला देश-विदेशातील अनेक लोक भेट देतात. याचबरोबर अहिल्यानगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यात राळेगणसिद्धी हे एक आदर्श गाव आहे. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली पाणी आडवा, पाणी जिरवा, वृक्षारोपण, जलसंधारण, श्रमदानाचे महत्त्व असलेल्या या गावाला हजारो पर्यटक भेट देत असतात इतकेच नव्हे तर आपल्या गावाचा विकास करण्यासाठी हजारो तरुण या गावाची प्रेरणा घेत आहेत.

2. धार्मिक पर्यटन

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

महाराष्ट्रात अनेक धार्मिक स्थळे ग्रामीण भागात आहेत. उदाहरणार्थ – पंढरपूर, शिर्डी, आळंदी, कोल्हापूर, त्र्यंबकेश्वर, भीमाशंकर, घृष्णेश्वर, माहूर, वणी, तुळजापूर, जेजुरी, महाड, पाली, थेऊर, मोरगाव इत्यादी.

या ठिकाणी येणाऱ्या भाविकांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळते. निवास, भोजन, वाहतूक आणि व्यापार यांसारख्या क्षेत्रांमध्ये रोजगार निर्माण होतो.

3. ऐतिहासिक पर्यटन

महाराष्ट्रातील किल्ले, गड, लेणी आणि ऐतिहासिक वास्तू ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर आढळतात. अजिंठा, वेरूळ, कार्ले, भाजे आणि कोंढाणे यांसारख्या लेण्या जगप्रसिद्ध आहेत. या ऐतिहासिक वास्तूंमुळे आसपासच्या गावांमध्ये पर्यटनाचा विकास झाला आहे. महाराष्ट्रातील असे कितीतरी जिल्हे आहेत त्या जिल्ह्यांमध्ये गडकिल्ले आहेत गड किल्ल्यांमुळे देखील लहान लहान खेडी पर्यटनाच्या माध्यमातून विकसित होत आहेत. विशेषता रायगड कोल्हापूर या जिल्ह्यातील खेडी. रायगड जिल्हा हा ऐतिहासिक गड किल्ले निसर्ग रम्य गावांचा वारसा असलेला जिल्हा आहे यामध्ये रायगड, मुरुड, जंजिरा,सुधागड,कुलाबा, कर्नाळा हे किल्ले प्रसिद्ध आहेत या भागात रायगड, महाड, अलिबाग, रोहा, कर्जत यासारखे गावे ऐतिहासिक महत्त्वाची केंद्र आहेत जी पर्यटनासाठी समृद्ध झाली आहेत.

4. निसर्ग पर्यटन

डोंगर, नद्या, जंगल आणि समुद्रकिनारे असलेली खेडी पर्यटकांना आकर्षित करतात. उदाहरणार्थ, माथेरान हे ठिकाण स्वच्छ हवा आणि सुंदर निसर्गामुळे प्रसिद्ध आहे. येथे पर्यावरण संरक्षणासाठी वाहनांना बंदी असून पर्यटकांना पायी किंवा घोड्यावरून प्रवास करावा लागतो.

5. सांस्कृतिक आणि वाचन पर्यटन

सातारा जिल्ह्यातील भिलार हे “पुस्तकांचे गाव” म्हणून प्रसिद्ध झाले आहे. येथे अनेक घरांमध्ये हजारो पुस्तके वाचनासाठी उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच येथे दरवर्षी स्ट्रॉबेरी महोत्सव आयोजित केला जातो. या उपक्रमामुळे या गावाला मोठ्या प्रमाणात पर्यटक भेट देतात.

**महाराष्ट्र शासनाचे प्रयत्न**

ग्रामीण पर्यटनाचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने विविध योजना राबवल्या आहेत. कृषी पर्यटन, कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम, तसेच ग्रामविकास योजना यांद्वारे ग्रामीण भागाचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

प्रधानमंत्री आवास योजना, प्रधानमंत्री ग्रामसडक योजना आणि रोजगार हमी योजना यांसारख्या योजनांमुळे ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण होत आहेत. यामुळे पर्यटन विकासाला देखील चालना मिळते.

खेड्यातील पर्यटनाचे फायदे

- ग्रामीण पर्यटनामुळे पुढील फायदे होतात –
- ग्रामीण भागात रोजगार निर्माण होतो
- स्थानिक उद्योगांना बाजारपेठ उपलब्ध होते
- शेतमालाला थेट ग्राहक मिळतात
- लोककला आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन होते
- पायाभूत सुविधांचा विकास होतो
- पर्यावरण संवर्धनाला प्रोत्साहन मिळते
- खेड्यातील पर्यटनातील अडचणी
- ग्रामीण पर्यटनाच्या विकासात काही अडचणी देखील आहेत –
- पायाभूत सुविधांचा अभाव
- वाहतूक व्यवस्था अपुरी असणे
- पर्यटनाचा पुरेसा प्रचार नसणे
- प्रशिक्षित मार्गदर्शकांची कमतरता
- आर्थिक साधनसंपत्तीचा अभाव
- ग्रामीण पर्यटन वाढवण्यासाठी उपाय

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

- ग्रामीण पर्यटनाचा विकास करण्यासाठी पुढील उपाय महत्त्वाचे ठरू शकतात –
- गावकऱ्यांनी पर्यटन विकासासाठी पुढाकार घेणे
- शासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देणे
- पर्यटनाबाबत प्रशिक्षण आणि मार्गदर्शन देणे
- स्थानिक उत्पादने आणि हस्तकलेला प्रोत्साहन देणे
- होमस्टे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि पर्यटन महोत्सव आयोजित करणे

**निष्कर्ष**

ग्रामीण पर्यटन हे ग्रामीण विकासाचे प्रभावी साधन ठरू शकते. महाराष्ट्रातील खेड्यांमध्ये नैसर्गिक साधनसंपदा, सांस्कृतिक वारसा आणि पारंपरिक जीवनशैली यांचा मोठा खजिना आहे. जर गावकऱ्यांनी पुढाकार घेतला आणि शासनाने आवश्यक सुविधा उपलब्ध करून दिल्या तर ग्रामीण पर्यटनाचा मोठ्या प्रमाणात विकास होऊ शकतो.

ग्रामीण पर्यटनामुळे केवळ आर्थिक विकासच होत नाही, तर सांस्कृतिक वारसा जतन होतो आणि शहर व ग्रामीण भाग यांच्यातील दरी कमी होते. त्यामुळे ग्रामीण पर्यटनाचा विकास हा भविष्यातील ग्रामीण अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

**संदर्भ**

1. महात्मा गांधी, *ग्रामस्वराज्य.*
2. Ministry of Tourism, Government of India
3. UN Tourism (United Nations Tourism)
4. Ministry of Rural Development, Government of India
5. ग्रामीण विकास : संकल्पना आणि प्रक्रिया
6. Tourism Studies विषयावरील विविध संशोधन लेख आणि जर्नल्स.
7. Maharashtra Tourism Development Corporation (MTDC)
8. NITI Aayog यांचे ग्रामीण विकास व पर्यटनविषयक अहवाल.
9. World Bank Rural Development Resources
10. विद्यापीठ स्तरावरील ग्रामीण विकास, भूगोल आणि पर्यटन विषयक पाठ्यपुस्तके.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access

ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article


## ग्रामीण आणि शहरी : इंटरनेट साक्षरता दरीचे चिकित्सक विश्लेषण.


**विद्या गुरुनाथ कांबळे**

सहाय्यक प्राध्यपिका ,ग्रामीण विकास विभाग, बी.एन.एन.महाविद्यालय, भिवंडी.

**Email:** vidyagk84@gmail.com



**Manuscript ID:**

JRD -2026-180408

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 4 (XV)

Pp. 28-33

April 2026

**Submitted:** 05 Mar. 2026

**Revised:** 15 Mar. 2026

**Accepted:** 05 Apr. 2026

**Published:** 30 April 2026



***गोषवारा :-***

*इंटरनेट साक्षरता आजच्या डिजिटल युगात आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक आणि प्रशासनिक व्यवहारांसाठी अत्यंत आवश्यक बनली आहे. तथापि, ग्रामीण आणि शहरी भागातील नागरिकांमध्ये इंटरनेट साक्षरतेची दरी (Digital Divide) स्पष्टपणे दिसून येते. या संशोधनाचा उद्देश ग्रामीण आणि शहरी भागातील इंटरनेट साक्षरतेतील फरकांचे चिकित्सक विश्लेषण करणे आहे या अभ्यासाद्वारे आढळले की, शहरी नागरिक डिजिटल साधने, ऑनलाईन बँकिंग, ई-गव्हर्नन्स, ई-लर्निंग व सरकारी पोर्टल्सचा प्रभावी वापर करतात, तर ग्रामीण नागरिक आर्थिक, तांत्रिक, शैक्षणिक, भाषिक आणि सामाजिक अडथळ्यांमुळे मागे आहेत. महिला, वृद्ध आणि दुर्बल गट विशेषतः डिजिटल सहभागात कमी आहेत. इंटरनेट साक्षरतेतील ही दरी आर्थिक नुकसान, शैक्षणिक शोषण, माहितीचा अभाव, सामाजिक व लैंगिक विषमता वाढवते.संशोधनातून सुचवलेल्या उपाययोजनांमध्ये डिजिटल साक्षरता केंद्रे, स्थानिक भाषेत प्रशिक्षण, महिला-केंद्रित कार्यक्रम, स्वस्त इंटरनेट सुविधा, शालेय व महाविद्यालयीन डिजिटल शिक्षण, जागरूकता मोहीम, सायबर सुरक्षा प्रशिक्षण आणि प्रशासनिक धोरणे यांचा समावेश आहे. या उपाययोजना प्रभावी राबवल्यास ग्रामीण नागरिकांचा डिजिटल सहभाग वाढेल, माहिती व कौशल्य सुधारेल, महिला व दुर्बल गट सक्षम होतील आणि ग्रामीण-शहरी डिजिटल दरी कमी होईल.*



***सूचक शब्द :*** *डिजिटल दरी, इंटरनेट साक्षरता, ग्रामीण भाग, शहरी भाग, महिला सहभाग, ई-गव्हर्नन्स, डिजिटल कौशल्य.*


### संशोधन पद्धती –

**प्राथमिक डेटा -** हा अभ्यास तुलनात्मक व वर्णनात्मक संशोधन आहे. ग्रामीण आणि शहरी भागातील इंटरनेट साक्षरतेतील फरकांचे चिकित्सक विश्लेषण करणे. या संशोधनात प्राथमिक आणि दुय्यम डेटा यांचा वापर केला आहे. गाव व शहरातील लोकांमध्ये प्रश्नावली वापरून डेटा गोळा केला आहे. ग्रामपंचायत अधिकारी, महिला गट नेते, विद्यार्थी आणि शहरी नागरिकांशी मुलाखत ग्रामीण डिजिटल केंद्रे, शाळा, ई-गव्हर्नन्स केंद्रांची प्रत्यक्ष पाहणी करून माहिती गोळा केली आहे.

**दुय्यम डेटा -** इंटरनेट वापर, आर्थिक व शैक्षणिक परिणाम, महिला व पुरुष फरक, ई-गव्हर्नन्स व शैक्षणिक सहभाग. ही पद्धती प्राथमिक व दुय्यम डेटा वापरून, सांख्यिकीय व तुलनात्मक विश्लेषण करून निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न केला आहे.

### प्रस्तावना :-

माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाच्या (ICT) झपाट्याने झालेल्या प्रगतीमुळे इंटरनेट साक्षरता ही सामाजिक व आर्थिक विकासाची एक महत्त्वाची सूचक ठरली आहे. डिजिटल इंडिया, ई-गव्हर्नन्स, ऑनलाईन शिक्षण आणि डिजिटल अर्थव्यवस्था यांसारख्या उपक्रमांच्या पार्श्वभूमीवर इंटरनेटचा प्रभाव मानवी जीवनाच्या विविध अंगांवर स्पष्टपणे दिसून येतो. तथापि, या डिजिटल परिवर्तनाचा लाभ सर्व समाजघटकांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेला नसून ग्रामीण व शहरी भागांमध्ये इंटरनेट साक्षरतेच्या स्तरात ठळक असमानता आढळून येते. ही असमानता केवळ तांत्रिक सुविधा किंवा इंटरनेट उपलब्धतेपुरती मर्यादित नसून ती शिक्षणाची पातळी,


Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*विद्या गुरुनाथ कांबळे ,सहाय्यक प्राध्यपिका ,ग्रामीण विकास विभाग, बी.एन.एन.महाविद्यालय, भिवंडी.*



**How to cite this article:**

कांबळे, विद्या गुरुनाथ (2026). ग्रामीण आणि शहरी : इंटरनेट साक्षरता दरीचे चिकित्सक विश्लेषण. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 28–33.* https://doi.org/10.5281/zenodo.21254330

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.21254330

OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

आर्थिक परिस्थिती, सामाजिक रचना, लैंगिक विषमता आणि धोरणात्मक अंमलबजावणीशी निगडित आहे.ग्रामीण भागामध्ये अपुऱ्या पायाभूत सुविधा, मर्यादित डिजिटल प्रशिक्षण, वीज व इंटरनेट कनेक्टिव्हिटीची समस्या आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे इंटरनेट साक्षरतेचा विकास अपेक्षित गतीने होत नाही. याउलट शहरी भागात तंत्रज्ञानाचा सुलभ वापर, शैक्षणिक संस्था, खाजगी व शासकीय डिजिटल उपक्रम आणि बाजाराभिमुख संधींमुळे इंटरनेट साक्षरतेचा स्तर तुलनेने अधिक आहे. या पार्श्वभूमीवर ग्रामीण-शहरी इंटरनेट साक्षरता दरीचा अभ्यास करणे केवळ वर्णनात्मक न राहता चिकित्सक दृष्टिकोनातून करणे आवश्यक ठरते.सदर संशोधनाचा उद्देश ग्रामीण आणि शहरी भागांतील इंटरनेट साक्षरतेतील तफावतीची कारणमीमांसा करणे, तिचे सामाजिक-आर्थिक परिणाम समजून घेणे तसेच विद्यमान धोरणांची परिणामकारकता तपासणे हा आहे. या अभ्यासाच्या माध्यमातून डिजिटल समावेशनासाठी आवश्यक धोरणात्मक सुधारणा आणि व्यावहारिक उपाययोजना सुचविण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१.ग्रामीण आणि शहरी भागांतील इंटरनेट साक्षरतेच्या पातळीचा तुलनात्मक अभ्यास करणे.
२.ग्रामीण-शहरी इंटरनेट साक्षरता दरी निर्माण होण्यामागील सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व तांत्रिक घटकांचा अभ्यास करणे.
३.इंटरनेट साक्षरतेचा शिक्षण, रोजगार, प्रशासन आणि सामाजिक सहभागावर होणारा प्रभाव विश्लेषित करणे.
४.ग्रामीण भागातील इंटरनेट साक्षरतेसमोरील अडथळे व मर्यादा ओळखणे.
५.शहरी भागातील इंटरनेट साक्षरतेच्या वाढीस कारणीभूत ठरणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
६.शासकीय व अशासकीय डिजिटल साक्षरता कार्यक्रमांची परिणामकारकता तपासणे.
७.डिजिटल समावेशनाच्या दृष्टीने विद्यमान धोरणांतील उणिवा आणि शक्यता चिकित्सक दृष्टिकोनातून विश्लेषित करणे.
८.ग्रामीण-शहरी इंटरनेट साक्षरता दरी कमी करण्यासाठी व्यवहार्य व धोरणात्मक उपाययोजना सुचविणे.

**डिजिटल अंतराचे प्रमुख पैलू :-**

**१) उपलब्धतेचे अंतर :-** उपलब्धतेचे अंतर म्हणजे इंटरनेट व डिजिटल साधनांच्या भौतिक व तांत्रिक उपलब्धतेतील फरक. शहरी भागात फायबर ऑप्टिक नेटवर्क, उच्च-गती ब्रॉडबँड, 4G/5G सेवा सहज उपलब्ध आहेत.ग्रामीण भागात नेटवर्क कव्हरेज कमी असून इंटरनेटचा वेग मर्यादित असतो.विजेचा अनियमित पुरवठा डिजिटल वापरात अडथळा निर्माण करतो.शहरी कुटुंबांमध्ये स्मार्टफोन, लॅपटॉप, संगणक सहज उपलब्ध असतात.ग्रामीण भागात एकाच उपकरणावर अनेक सदस्य अवलंबून असतात.शहरी भागात सायबर कॅफे, डिजिटल सेवा केंद्रे, वाय-फाय झोन उपलब्ध असतात.

**२) साक्षरतेचे अंतर :-** साक्षरतेचे अंतर म्हणजे डिजिटल साधनांचा परिणामकारक वापर करण्याच्या कौशल्यातील फरक.ग्रामीण भागातील लोकांना ई-मेल, ऑनलाइन फॉर्म, डिजिटल पेमेंट्स यांचा वापर कठीण वाटतो.शहरी भागात संगणक शिक्षण लहान वयापासून दिले जाते.ग्रामीण शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा व प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता आहे.ऑनलाइन शिक्षणाचा लाभ ग्रामीण विद्यार्थ्यांना मर्यादित प्रमाणात मिळतो.ग्रामीण महिलांमध्ये इंटरनेट वापराचे प्रमाण तुलनेने कमी आहे.सामाजिक बंधने व पारंपरिक मानसिकता डिजिटल साक्षरतेवर परिणाम करतात.३) आर्थिक अंतर :- आर्थिक अंतर म्हणजे इंटरनेट सेवा व उपकरणे वापरण्याच्या खर्चातील असमानता.स्मार्टफोन, संगणक, डेटा प्लॅन यांचा खर्च ग्रामीण कुटुंबांसाठी मोठा असतो.शहरी भागात उत्पन्न जास्त असल्याने हा खर्च सहज परवडतो.ग्रामीण भागात शेतीवर अवलंबून असलेले अस्थिर उत्पन्न असते.शहरी भागात नियमित पगार व रोजगार संधी जास्त असतात.शहरी व्यवसाय डिजिटल प्लॅटफॉर्मवर आधारित आहेत.ग्रामीण भागात पारंपरिक व्यवहार पद्धती अधिक प्रचलित आहेत.

**तुलनात्मक विश्लेषण :-**

**१.तुलनात्मक निकष :-**

ग्रामीण भागात इंटरनेट सेवा खंडित आणि अनियमित असते, विशेषतः दूरदराजच्या गावांमध्ये. शहरी भागात जलद ब्रॉडबँड, 4G/5G नेटवर्क उपलब्ध असून सातत्यपूर्ण इंटरनेट कनेक्शन आहे.ग्रामीण भागातील नेटवर्क कमी गतीचा आणि अस्थिर असल्यामुळे व्हिडिओ कॉल, ई-लर्निंग किंवा ऑनलाइन व्यवहारात अडथळे येतात. शहरी भागात नेटवर्क स्थिर असल्याने ऑनलाईन सेवा सहज चालतात.ग्रामीण भागात स्मार्टफोन हा प्रमुख डिजिटल साधन आहे, तर संगणक किंवा टॅब मर्यादित प्रमाणात उपलब्ध आहेत. शहरी भागात स्मार्टफोन, लॅपटॉप, टॅब यांचा सहज वापर होतो.शहरी भागात डिजिटल शिक्षण संस्था, ऑनलाईन कोर्सेस व प्रशिक्षण कार्यक्रम उपलब्ध आहेत. ग्रामीण भागात ऑनलाईन प्रशिक्षणाची संधी कमी असून अपुरे आणि क्वचित मिळते.ग्रामीण भागात प्राथमिक पातळीची साक्षरता आहे. यामध्ये इंटरनेटचा आधार फक्त मनोरंजन

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

किंवा संवादापुरता मर्यादित आहे. शहरी भागात मध्यम ते प्रगत स्तराची साक्षरता आहे, जिथे इंटरनेट शैक्षणिक, व्यवसायिक आणि प्रशासनिक कामांसाठी सक्रियपणे वापरले जाते.

**२. इंटरनेटचा मुख्य वापर :-**

ग्रामीण भागात इंटरनेटचा मुख्य वापर कॉलिंग, व्हॉट्सॲप, फेसबुक किंवा इतर सोशल मीडिया वापरावर केंद्रित आहे. शहरी भागातही संवादासाठी वापर जास्त आहे, परंतु ई-मेल, व्हिडिओ कॉन्फरन्सिंग व व्यावसायिक चॅटसाठी देखील वापर केला जातो.ग्रामीण भागात मनोरंजनासाठी यूट्यूब, फेसबुक आणि काही गेम्स वापरले जातात; शहरी भागात डिजिटल स्ट्रीमिंग, गेमिंग, ऑनलाईन संगीत आणि सोशल मीडिया सक्रियपणे वापरले जाते.शहरी भागात ऑनलाइन कोर्सेस, व्हिडिओ ट्यूटोरियल्स, ई-लर्निंग प्लॅटफॉर्म्सचा नियमित वापर होतो, तर ग्रामीण भागात इंटरनेट उपलब्ध असल्यास काही अभ्यासक्रम किंवा ऑनलाईन शाळा वापरण्याची शक्यता असते, परंतु ती मर्यादित आहे.शहरी भागातील लोक ई-कॉमर्स, फ्रीलान्सिंग, डिजिटल मार्केटिंग व ऑनलाइन व्यवसायासाठी इंटरनेटचा वापर करतात. ग्रामीण भागात हे फारच कमी प्रमाणात आहे आणि इंटरनेट मुख्यतः माहिती शोधण्यासाठी वापरले जाते.

**३. डिजिटल बँकिंग :-**

UPI व मोबाइल बँकिंग ग्रामीण भागात वापर कमी आहे, कारण आर्थिक व्यवहार पारंपरिक बँक शाखांवर अवलंबून असतात. शहरी भागात UPI, मोबाइल बँकिंग व ऑनलाइन व्यवहार रोजच्या व्यवहाराचा भाग आहेत.ऑनलाईन व्यवहार ग्रामीण भागातील लोक मुख्यतः स्थानिक बँक शाखा किंवा CSC केंद्रांवर अवलंबून असतात; शहरी लोक ऑनलाईन पेमेंट्स, बिल पेमेंट्स आणि आर्थिक व्यवहार इंटरनेटवर स्वयंपूर्ण करतात.ग्रामीण भागात डिजिटल आर्थिक साक्षरता कमी आहे; लोक ऑनलाईन व्यवहार करण्यास अजिबात आत्मविश्वास ठेवत नाहीत. शहरी भागात डिजिटल आर्थिक साक्षरता जास्त असून लोक सुरक्षित ऑनलाईन व्यवहार करतात.ग्रामीण भागातील लोक ऑनलाईन फसवणूक किंवा डेटा सुरक्षिततेबाबत अधिक चिंतित असतात. शहरी लोक तुलनेने अधिक जागरूक असून सुरक्षिततेसाठी विविध उपाय वापरतात.

**४. सरकारी डिजिटल सेवा :-**

ग्रामीण भागात आधार, रेशन, शेती पोर्टल, पाणी व वीज यांसारख्या सरकारी सेवा वापरण्यासाठी सहाय्य आवश्यक आहे. शहरी भागात लोक स्वयंपूर्ण ऑनलाईन अर्ज करतात.Daglocker, UMANG ग्रामीण भागात या सेवा वापरण्याचे प्रमाण अत्यल्प आहे; शहरी भागात लोक या सेवांचा नियमित वापर करतात.ग्रामीण भागात CSC केंद्रांचा वापर आवश्यक असतो; शहरी लोक स्वतः ऑनलाइन अर्ज करून सुविधा मिळवतात.ग्रामीण भागात लोकांना डिजिटल पोर्टल्स समजून घेणे कठीण आहे; शहरी लोकांना सुविधा सहज उपलब्ध आहेत आणि त्यांची माहिती अधिक स्पष्ट आहे.

**५. स्त्री–पुरुष डिजिटल तफावत :-**

ग्रामीण भागातील स्त्रियांमध्ये इंटरनेट वापर अत्यल्प असून सामाजिक बंधने व सुरक्षिततेची चिंता जास्त आहे. पुरुष ग्रामीण भागात तुलनेने अधिक इंटरनेट वापरतात.शहरी भागातील स्त्रिया मध्यम प्रमाणात इंटरनेट वापरतात, पुरुष जास्त सक्रिय आहेत.डिजिटल कौशल्य व आत्मविश्वास ग्रामीण स्त्रियांमध्ये कमी आहे, तर पुरुष व शहरी भागातील स्त्रिया तुलनेने आत्मविश्वासी आहेत.इंटरनेट व डिजिटल साधनांचा प्रभाव स्त्री-पुरुष समान नाही, त्यामुळे ग्रामीण भागात महिला डिजिटल वंचित राहतात.

**इंटरनेट साक्षरतेच्या दरीचे परिणाम :-**

**१.आर्थिक नुकसान :-**

ग्रामीण भागातील लोक डिजिटल बँकिंग, ऑनलाईन व्यवहार आणि ई-कॉमर्स वापरण्यात मर्यादित आहेत.त्यामुळे सरकारी योजना, सबसिडी, कर्ज किंवा बचत योजना यांचा लाभ कमी होतो.शहरी भागात इंटरनेट साक्षरतेमुळे रोजगार, फ्रीलान्सिंग, डिजिटल मार्केटिंग आणि ऑनलाईन व्यवसायाच्या संधी मिळतात.डिजिटल दरीमुळे ग्रामीण नागरिक पैशाच्या व्यवस्थापनात मागे राहतात आणि आर्थिक विकासाची संधी गमावतात.डिजिटल तंत्रज्ञानाचा अभाव व्यवसायिक संधी कमी करतो आणि ग्रामीण भागातील लोक शहरांशी तुलनेत आर्थिकदृष्ट्या मागे पडतात.

**२. शैक्षणिक शोषण :-**

ग्रामीण विद्यार्थी ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निंग, व्हिडिओ ट्यूटोरियल्स आणि डिजिटल शाळा वापरण्यात मर्यादित आहेत.शहरी विद्यार्थी इंटरनेट वापरून जागतिक ज्ञान, ऑनलाईन कोर्सेस आणि डिजिटल ग्रंथालयांचा फायदा घेतात.डिजिटल

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

दरीमुळे ग्रामीण विद्यार्थी शहरी विद्यार्थ्यांशी तुलनेत शैक्षणिक दृष्ट्या मागे पडतात.ऑनलाइन परीक्षांमध्ये, अभ्यासक्रमात किंवा प्रोजेक्ट कार्यात सहभागी होण्याची संधी ग्रामीण भागात कमी आहे.डिजिटल साक्षरतेच्या अभावामुळे ग्रामीण विद्यार्थ्यांचा भविष्यातील रोजगार, करिअर आणि कौशल्य विकासावर परिणाम होतो.

**३. माहितीचा अभाव :-**

ग्रामीण भागातील लोक ऑनलाइन माहिती, सामाजिक उपक्रम, सरकारी योजना, आरोग्य सेवा किंवा रोजगार संधी याबाबत कमी जागरूक असतात.शहरी लोक इंटरनेटचा वापर करून ताज्या घडामोडी, तंत्रज्ञान, कौशल्य व रोजगार संधी याबाबत माहिती मिळवतात.माहितीचा अभाव आर्थिक, शैक्षणिक, आरोग्य व सामाजिक असमानता वाढवतो.डिजिटल दरीमुळे ग्रामीण भागातील लोक महत्त्वपूर्ण निर्णय, योजना अर्ज, प्रशिक्षण किंवा ऑनलाईन सुविधा यांचा फायदा घेऊ शकत नाहीत.

आव्हाने आणि अडथळे :–

१) भाषेचा अडथळा :-

बहुतेक डिजिटल प्लॅटफॉर्म, संकेतस्थळे आणि अॅप्स इंग्रजी भाषेत उपलब्ध असतात.ग्रामीण भागातील अनेक नागरिकांना इंग्रजीचे मर्यादित ज्ञान असते.ग्रामीण भागात स्थानिक भाषेत दर्जेदार डिजिटल शैक्षणिक सामग्री कमी प्रमाणात उपलब्ध असते.शासकीय पोर्टल्स स्थानिक भाषेत असले तरी तांत्रिक शब्दसंग्रह गुंतागुंतीचा असतो.अनेक तांत्रिक संज्ञांचे अचूक भाषांतर नसल्याने वापरकर्त्यांना अडचणी येतात.व्हॉइस-आधारित सेवांचा ग्रामीण भागात अपुरा वापर होतो.
भाषिक अडथळा हा डिजिटल दरीचा एक महत्त्वाचा पण दुर्लक्षित घटक आहे. डिजिटल साक्षरतेसाठी केवळ इंटरनेट उपलब्ध असणे पुरेसे नसून स्थानिक भाषेत सुलभ, समजण्यासारखी सामग्री आवश्यक आहे. बहुभाषिक तंत्रज्ञानाचा विकास हा समावेशकतेसाठी अत्यावश्यक आहे.

२) पायाभूत सुविधांची कमतरता :-

ग्रामीण भागात नेटवर्क कव्हरेज अपुरे व अस्थिर असते.उच्च-गती ब्रॉडबँडची उपलब्धता मर्यादित आहे.वारंवार वीज खंडित होणे डिजिटल वापरावर परिणाम करते.उपकरणे चार्ज करण्यासाठी अडचणी निर्माण होतात.ग्रामीण शाळांमध्ये संगणक प्रयोगशाळा व प्रशिक्षित शिक्षकांची कमतरता.डिजिटल सेवा केंद्रांची संख्या अपुरी किंवा कार्यक्षमतेत कमतरता.पायाभूत सुविधांचा अभाव हा डिजिटल दरीचा मूलभूत अडथळा आहे. शहरी भागात तंत्रज्ञानाचा वेगाने विकास होत असताना ग्रामीण भागात आवश्यक गुंतवणूक कमी प्रमाणात होते. त्यामुळे डिजिटल विकासात असमानता वाढते.

३) सामाजिक मानसिकतेचा अभाव :-

ग्रामीण समाजात नवीन तंत्रज्ञानाबद्दल संदेह किंवा भीती आढळते.चुकीच्या माहितीमुळे डिजिटल फसवणुकीची भीती वाढते.ग्रामीण महिलांना मोबाईल किंवा इंटरनेट वापरावर मर्यादा असतात.पारंपरिक मानसिकता मुलींना डिजिटल शिक्षणापासून दूर ठेवते.डिजिटल सेवांचे फायदे व उपयोग याबाबत माहिती अपुरी असते.ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण, डिजिटल पेमेंट्स यांचा मर्यादित वापर होतो.

**उपाययोजना आणि शिफारशी :-**

**१) प्रादेशिक भाषेतील आशय :-**

राज्य मंडळ, विद्यापीठे आणि मुक्त शिक्षण संस्था यांनी ई-पुस्तके, व्हिडिओ व्याख्याने, पॉडकास्ट प्रादेशिक भाषेत उपलब्ध करणे.SWAYAM, DIKSHA सारख्या प्लॅटफॉर्मवर स्थानिक भाषेतील अभ्यासक्रमांची वाढ.कृषी, आरोग्य, कौशल्य विकास विषयक मोबाइल अॅप्स मराठीत/इतर प्रादेशिक भाषेत तयार करणे.महसूल, ग्रामपंचायत, आरोग्य, आधार, बँकिंग सेवा पूर्णपणे स्थानिक भाषेत सुलभ करणे.फॉर्म भरण्याची प्रक्रिया सोपी, चित्रमय व मार्गदर्शक व्हिडिओसह उपलब्ध करणे.व्हॉइस-आधारित सर्च आणि चॅटबॉट सेवा स्थानिक भाषेत विकसित करणे.AI-आधारित भाषांतर साधने अधिक अचूक व सर्वसामान्यांसाठी मोफत उपलब्ध करणे.भाषिक सुलभता वाढल्यास ग्रामीण नागरिकांचा आत्मविश्वास वाढतो आणि डिजिटल सेवा वापरात सातत्य येते.

**२) डिजिटल साक्षरता मोहीम (Digital Literacy Campaign) :-**

प्रत्येक ग्रामपंचायतीत “डिजिटल प्रशिक्षण केंद्र” स्थापन करणे.१५–३० दिवसांचे मूलभूत प्रशिक्षण: स्मार्टफोन वापर, ऑनलाइन पेमेंट, ई-मेल, सरकारी पोर्टल वापर.शेतकऱ्यांसाठी कृषी-तंत्रज्ञान प्रशिक्षण (हवामान माहिती, बाजारभाव अॅप्स).पाचवीपासून डिजिटल साक्षरता विषय अनिवार्य करणे.प्रात्यक्षिक आधारित शिक्षण — ई-लर्निंग, प्रोजेक्ट

वर्क.शिक्षकांना विशेष ICT प्रशिक्षण देणे.स्वयं-सहायता गटांमार्फत डिजिटल प्रशिक्षण.'डिजिटल सखी' किंवा 'डिजिटल दूत' योजना — प्रशिक्षित महिला इतर महिलांना मार्गदर्शन करतात.गावसभांमध्ये डिजिटल सेवांचे प्रात्यक्षिक.स्थानिक रेडिओ, केबल टीव्ही, सोशल मीडियाद्वारे माहिती प्रसार.डिजिटल साक्षरता ही केवळ तांत्रिक कौशल्य नसून आर्थिक सक्षमीकरणाचे साधन आहे.

३) स्वस्त इंटरनेट सेवा (**Affordable Internet**) :-

विद्यार्थ्यांसाठी व ग्रामीण कुटुंबांसाठी विशेष डेटा पॅक उपलब्ध करून देणे.शेतकऱ्यांसाठी कृषी-अनुदानासोबत डिजिटल डेटा सुविधा उपलब्ध करून देणे.दूरसंचार कंपन्यांना ग्रामीण भागात नेटवर्क विस्तारासाठी करसवलत देणे.CSR निधीतून डिजिटल प्रकल्पांना पाठबळ देणे.विद्यार्थ्यांना हफ्त्यांवर स्मार्टफोन/टॅबलेट उपलब्ध करून देणे.ग्रामपातळीवर सामायिक संगणक केंद्रे उपलब्ध करून देणे.स्वस्त इंटरनेटमुळे शिक्षण, व्यवसाय आणि ई-गव्हर्नन्समध्ये सहभाग वाढतो.

४) गाव तेथे वायफाय :-

ग्रामपंचायत, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे मोफत किंवा कमी दरातील वायफाय उपलब्ध करून देणे.ठराविक मर्यादेपर्यंत मोफत डेटा सुविधा उपलब्ध करून देणे.प्रत्येक गावाला फायबर ऑप्टिक कनेक्टिव्हिटी उपलब्ध करून देणे.दुर्गम भागांसाठी सॅटेलाइट इंटरनेट सेवा देणे.स्थानिक युवकांना नेटवर्क व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देणे .देखभाल व सेवा पुरवठ्याद्वारे रोजगारनिर्मिती उपलब्ध करून देणे.नाममात्र शुल्काद्वारे देखभाल निधी उभारणे.ग्रामपंचायतीकडून नियमित देखरेख व पारदर्शकता.'गाव तेथे वायफाय' ही संकल्पना ग्रामीण भागाला डिजिटल मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रभावी ठरू शकते.

**निष्कर्ष :-**

ग्रामीण भागातील नागरिक शहरी नागरिकांच्या तुलनेत इंटरनेट, डिजिटल साधने व ऑनलाईन सेवा वापरण्यात मागे आहेत. ही दरी तांत्रिक, आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, भाषिक आणि मानसिक अडथळयांमुळे निर्माण झाली आहे. ग्रामीण भागात इंटरनेट कनेक्टिव्हिटी कमी, डेटा महाग व उपकरणे कमी उपलब्ध आहेत. शहरी भागात सहज इंटरनेट आणि डिजिटल साधने उपलब्ध असल्यामुळे दरी अधिक स्पष्ट होते. ग्रामीण नागरिक ऑनलाईन शिक्षण, ई-लर्निंग, डिजिटल व्यवहार व सरकारी पोर्टल्स वापरण्यास असमर्थ आहेत. डिजिटल कौशल्याचा अभाव आर्थिक व शैक्षणिक संधी कमी करतो. ग्रामीण भागातील महिलांचा डिजिटल सहभाग कमी आहे. सामाजिक बंधने, सुरक्षिततेची चिंता आणि कौटुंबिक दबाव यामुळे महिला डिजिटल साधने वापरण्यात मागे आहेत.

डिजिटल साक्षरता केंद्रे, प्रशिक्षण कार्यक्रम, स्थानिक भाषेतील सामग्री, स्वस्त इंटरनेट व उपकरणे, महिला-केंद्रित मोहीम, जागरूकता मोहीम आणि शालेय डिजिटल शिक्षण यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा डिजिटल सहभाग वाढू शकतो. यासाठी उपाययोजना म्हणून योग्यरीत्या राबवल्यास ग्रामीण नागरीकांचे डिजिटल कौशल्य, ऑनलाईन सेवेचा वापर आणि आर्थिक -सामाजिक संधी सुधारता येतील.

**संदर्भ ग्रंथ –**

१. Digital Literacy and Rural Development in India. New Delhi: Sage Publications. - नायडू, ए. (2019).

२.Internet Usage and Digital Divide: A Comparative Study of Urban and Rural India. Pune: Diamond Publications - शिंदे, एस. (2020).

३.E-Governance and Digital Literacy in Rural Areas. Journal of Rural Studies, 34(2), 45-60. - कुमार, आर., & वर्मा, पी. (2018).

४.Digital India Programme: Annual Report. Ministry of Electronics & Information Technology, New Delhi. - भारत सरकार. (2021).

५.Bridging the Digital Divide: Challenges and Strategies. Mumbai: Himalaya Publishing House. - रॉय, टी. (2017).

६.Role of ICT in Rural Development. International Journal of Computer Applications, 175(10), 22-29 - सिंह, के., & जोशी, आर. (2020).

७.Global Media and Information Literacy Assessment Framework. Paris: UNESCO.- UNESCO. (2016).

८.Gender and Digital Literacy: Empowering Rural Women. Journal of Social Inclusion Studies, 5(1), 15-31- पटनायक, डी. (2019).

९.Digital Divide in India: Urban-Rural Perspectives. New Delhi: Routledge India- Mehra, R., & Gupta, S. (2018).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org  Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

१०. Internet Usage Patterns and Challenges in Rural India. Indian Journal of Information Technology, 12(3), 112-125- मोहन, एस. (2021).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ग्रामीण उन्नतीसाठी सरकारी योजनांच्या लाभातील अंतराचा चिकित्सक अभ्यास.

प्राची सुनील हुकमाली[1], विद्या गुरुनाथ कांबळे [2]
[1]एम.ए हजेरी क्र.१ ३
[2]स.प्रा. ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविद्यालय, भिवंडी.
**Email:**

**Manuscript ID:**
JRD -2026-180409
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 34-38
April 2026

**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा :-***

*भारतामध्ये ग्रामीण विकासासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध योजना राबविल्या जातात. विशेषतः महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान** या योजनांद्वारे ग्रामीण भागातील रोजगार, निवारा, आर्थिक सहाय्य व स्वयंरोजगाराला चालना देण्याचा प्रयत्न केला जातो.या संशोधनाचा उद्देश ग्रामीण उन्नतीसाठी राबविण्यात येणाऱ्या सरकारी योजनांच्या उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांना मिळणाऱ्या लाभामधील अंतराचा चिकित्सक अभ्यास करणे हा आहे. अभ्यासासाठी प्राथमिक (प्रश्नावली, मुलाखती, प्रत्यक्ष निरीक्षण) आणि द्वितीयक (शासकीय अहवाल, संशोधन लेख, पंचायत समिती नोंदी) माहितीचा वापर करण्यात आला आहे.संशोधनातून असे आढळून आले की, योजनांची रचना परिणामकारक असली तरी अंमलबजावणीच्या प्रक्रियेत प्रशासकीय अकार्यक्षमता, निधी वितरणातील विलंब, तांत्रिक अडचणी, अपुरी माहिती, भ्रष्टाचार आणि सामाजिक असमानता यांसारख्या घटकांमुळे लाभार्थ्यांपर्यंत अपेक्षित लाभ पूर्णतः पोहोचत नाही. डिजिटल प्रणालीमुळे पारदर्शकता वाढली असली तरी ग्रामीण भागातील डिजिटल साक्षरतेचा अभाव ही एक मोठी समस्या आहे.अभ्यासाच्या निष्कर्षानुसार, ग्रामसभेची भूमिका बळकट करणे, सामाजिक लेखापरीक्षण सक्तीचे करणे, पारदर्शक लाभार्थी निवड प्रक्रिया राबविणे आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे. अशा सुधारणा उपायांद्वारे योजनांतील लाभातील अंतर कमी करून ग्रामीण विकास अधिक प्रभावीपणे साध्य करता येईल.*

***सूचक शब्द*** *:- सामाजिक लेखापरीक्षण,पारदर्शकता व उत्तरदायित्व,डिजिटल साक्षरता, थेट लाभ हस्तांतरण,समावेशक विकास,ग्रामीण रोजगार हमी,ग्रामीण निवारा योजना,शेतकरी आर्थिक सहाय्य,आजीविका व स्वयंरोजगार*

**प्रस्तावना :-**

भारत हा कृषिप्रधान देश असून लोकसंख्येचा मोठा भाग ग्रामीण भागात राहतो. ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी केंद्र व राज्य शासन विविध योजना राबवित आहे. विशेषतः महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण, प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान यांसारख्या योजनांद्वारे रोजगारनिर्मिती, निवारा, आर्थिक सहाय्य व स्वयंरोजगाराला चालना देण्याचा प्रयत्न केला जातो.तथापि, योजनांची उद्दिष्टे आणि प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणारा लाभ यामध्ये काही प्रमाणात अंतर आढळून येते. प्रशासकीय अडचणी, माहितीचा अभाव, तांत्रिक त्रुटी, निधी वितरणातील विलंब आणि सामाजिक असमानता यांसारख्या घटकांमुळे अपेक्षित परिणाम पूर्णपणे साध्य होत नाहीत.या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनाचा उद्देश ग्रामीण उन्नतीसाठी सरकारी योजनांच्या लाभातील अंतराचा चिकित्सक अभ्यास करून त्यामागील कारणे शोधणे आणि परिणामकारक सुधारणा उपाय सुचवणे हा आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254380

**Address for correspondence:**
*प्राची सुनील हुकमाली,स.प्रा. ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविद्यालय, भिवंडी.*

**How to cite this article:**
हुकमाली, प्राची सुनील & कांबळे, विद्या. गुरुनाथ. (2026). ग्रामीण उन्नतीसाठी सरकारी योजनांच्या लाभातील अंतराचा चिकित्सक अभ्यास. *18(4(XV)), 34–38.* https://doi.org/10.5281/zenodo.21254380

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधनाची उद्दिष्टे:-**
१.ग्रामीण विकास योजनांची उद्दिष्टे व स्वरूप समजून घेणे.
२.योजनांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करणे.
३.लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणाऱ्या प्रत्यक्ष लाभातील अंतर मोजणे.
४.लाभातील अंतर कमी करण्यासाठी उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती** :- प्राथमिक माहिती थेट लाभार्थी, ग्रामस्थ, ग्रामपंचायत सदस्य आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून संकलित करण्यात आली.द्वितीयक माहिती विविध अधिकृत व शैक्षणिक स्त्रोतांमधून संकलित करण्यात आली.केंद्र व राज्य शासनाचे अधिकृत अहवाल,प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान यासंबंधी प्रकाशित अहवाल,संशोधन लेख, प्रबंध, नियतकालिके,पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालयातील नोंदी.

**ग्रामीण विकासाच्या प्रमुख योजना :-**

**१.महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :-**




**उद्दिष्ट :-** ग्रामीण भागातील प्रत्येक पात्र लाभार्थ्यास किमान 100 दिवसांचा रोजगार उपलब्ध करून देणे.

**लाभ :-** बेरोजगारी कमी करणे, ग्रामीण पायाभूत सुविधा जसे की रस्ते, नाले, तलाव इत्यादी तयार करणे.

**लाभातील अंतर :-** वेतन वितरणात विलंब, काही ठिकाणी बनावट नोंदी, आणि अपुरी पारदर्शकता यामुळे लाभ अपेक्षेप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही. या योजनेचा चिकित्सक अभ्यास दाखवतो की अंमलबजावणीत सुधारणा आणि पारदर्शकता वाढविणे आवश्यक आहे, ज्यामुळे ग्रामीण विकास अधिक प्रभावीपणे साध्य होऊ शकतो.

**२. प्रधानमंत्री (ग्रामीण) आवास योजना :-**



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org  Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**उद्दिष्ट:** ग्रामीण भागातील गरजू लोकांना पक्क्या घरांचा निवारा उपलब्ध करून देणे.

**लाभ:** घर बांधण्यासाठी आर्थिक मदत मिळणे, जे ग्रामीण जीवनमान सुधारण्यास मदत करते.

**लाभातील अंतर -** काही ठिकाणी पात्रतेतील चुका, निधी वितरणातील विलंब आणि अंमलबजावणीतील अडथळ्यांमुळे लाभ अपेक्षेप्रमाणे पोहोचत नाही. या योजनेंतर्गत ग्रामीणांसाठी सुरक्षित आणि टिकाऊ निवारा सुनिश्चित करणे हे मुख्य उद्दिष्ट आहे.

**३. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना :-**




**उद्दिष्ट : -**शेतकऱ्यांना वार्षिक आर्थिक मदत देणे, ज्याद्वारे त्यांच्या शेतीसंबंधित खर्च व जीवनमानात सुधारणा होईल.

**लाभ :-**आर्थिक मदत थेट बँक खात्यात जमा केली जाते, त्यामुळे मध्यस्थ किंवा भ्रष्टाचाराचा धोका कमी होतो.लहान व मध्यम शेतकऱ्यांना आर्थिक स्थिरता मिळते.आर्थिक मदतीच्या माध्यमातून ग्रामीण क्षेत्रातील आर्थिक चळवळीला चालना मिळते.

**लाभातील अंतर :-**

नोंदणीतील चुका – नाव, पत्ता किंवा कुटुंब माहितीमध्ये त्रुटीमुळे लाभ मिळत नाही.

आधार - बँक खाते लिंक समस्या – आधार व बँक खात्याचे संलग्न न झाल्यामुळे अनुदान थांबवले जाते.

माहिती अभाव – शेतकऱ्यांना योजनेची प्रक्रिया व अर्ज कसा करावा याची माहिती कमी मिळते.

राज्य-स्तरीय फरक – काही राज्यांमध्ये लाभ वितरण वेळेत होत नसल्यामुळे अंतर निर्माण होते.

**योजनांच्या अंतराची कारणे :-**

ग्रामीण भारतात अनेक सरकारी योजना (जसे की मनरेगा, प्रधानमंत्री आवास योजना, राष्ट्रीय पोषण अभियान) राबविल्या जातात. परंतु, त्यांच्या प्रत्यक्ष लाभाचे वितरण सर्वसमावेशक नसते. यामागील कारणे बहुस्तरीय आहेत – प्रशासकीय, तांत्रिक, सामाजिक आणि भ्रष्टाचाराशी संबंधित.

**१.प्रशासकीय अकार्यक्षमता :-**

योजना लाभासाठी अर्ज करताना अनेक प्रकारच्या कागदपत्रांची आवश्यकता असते – जन्म नोंद, उत्पन्न प्रमाणपत्र, आधार कार्ड, बँक खाते इत्यादी. अनेक नागरिकांना हे सर्व कागदपत्र जमा करणे कठीण वाटते. ग्रामीण स्तरावर योजना अंमलबजावणीसाठी नियुक्त अधिकारी कधी कधी प्रशिक्षित नसतात किंवा नियमांबाबत माहिती अपुरी असते. अर्ज प्रक्रियेतील प्रशासकीय अडथळे लाभ वितरणात विलंब करतात. पात्र असलेले नागरिकही योजनांचा लाभ घेऊ शकत नाहीत, परिणामी लाभातील अंतर वाढते.

उदा. ग्रामीण भागात PM-Kisan योजनेच्या निधी वितरणात कागदपत्रांच्या तपासणीत विलंबामुळे काही शेतकऱ्यांना निधी वेळेत मिळत नाही.

**२.माहितीचा अभाव :-**

अनेक ग्रामीण नागरिकांना उपलब्ध योजना, पात्रता निकष, अर्जाची पद्धत याबाबत माहिती नसते. ग्रामसभा, पोस्टर्स, डिजिटल पोर्टल, मोबाईल ॲप्स किंवा रेडिओसारख्या माध्यमांचा योग्य वापर न होणे.नागरिकांना अर्ज करण्याची माहिती न मिळाल्यामुळे लाभ गमावला जातो. योजना प्रभावी होत नाहीत कारण वास्तविक गरज असलेल्या लोकांपर्यंत पोहोचत नाही. उदा. राष्ट्रीय पोषण अभियान अंतर्गत काही गावांमध्ये आहार पूरक आहाराची माहिती अपुरी असल्यामुळे गरजू बालक आणि मातांना लाभ मिळत नाही.

**३.तांत्रिक अडचणी :-**

योजना अर्ज ऑनलाइन करणे, पोर्टलवर डेटा अपलोड करणे किंवा बँक खाते लिंक करणे यामध्ये बग किंवा सिस्टीम डाउन होणे. सर्व ग्रामीण भागात स्मार्टफोन किंवा इंटरनेट उपलब्ध नसणे. डिजिटल प्रणालीमध्ये अडचणी आल्यास अर्ज प्रक्रिया थांबते किंवा चुकीचे रेकॉर्ड तयार होतात. अर्जदार लाभ घेऊ शकत नाही किंवा चुकीच्या प्रमाणात लाभ मिळतो. डिजिटल निपुणता नसलेले लोक अडचणीत पडतात. उदा. प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत ऑनलाइन अर्ज प्रणालीमध्ये बग असल्याने काही अर्ज रद्द होतात किंवा विलंबित होतात.

**४.भ्रष्टाचार व मध्यस्थांचा हस्तक्षेप :-**

ग्रामीण नागरिकांना योजना अर्जासाठी किंवा निधी मिळवण्यासाठी दलालांवर अवलंबित्व. काही लाभ अधिकारी किंवा मध्यस्थ लोकांकडून पैसे घेऊन लाभ देतात. गरीब आणि दुर्बल नागरिकांचा नुकसान. वास्तविक लाभ नागरिकांपर्यंत पोहोचत नाही.

विश्वासघातामुळे योजनांविषयी लोकांचा उत्साह कमी होतो. उदा. काही मनरेगा प्रकल्पांमध्ये कामगारांना दिला जाणारा भत्ता दलालाकडे जातो किंवा थोड्या प्रमाणातच कामगारांपर्यंत पोहोचतो.

**५.सामाजिक असमानता :-**

स्त्रिया, अनुसूचित जाती/जनजाती, आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्ग यांना कमी संधी मिळतात.काही गावांमध्ये निर्णय प्रक्रियेत उच्च जातीच्या किंवा पुरुषांचा प्राधान्य.सामाजिक दुर्बल घटक योजना अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन न मिळणे.लाभाचा गैरवितरण,योजनांचा सामाजिक समावेश कमी होतो, परिणामकारकता कमी होते.उदा. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य योजना मध्ये अनुसूचित जातींच्या घरकुलांना लाभ मिळणे उशिरा किंवा अपुरी प्रमाणात होते.

**६.चिकित्सक विश्लेषण :-**

योजनांची रचना चांगली असली तरी अंमलबजावणीतील त्रुटीमुळे अपेक्षित परिणाम साध्य होत नाहीत. डिजिटल इंडिया उपक्रमामुळे पारदर्शकता वाढली आहे; परंतु डिजिटल साक्षरतेचा अभाव अडथळा ठरतो. स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची असून त्यांना अधिक स्वायत्तता व प्रशिक्षणाची गरज आहे.

**उपाययोजना :-**

**१.ग्रामसभेची सक्रिय भूमिका वाढविणे :-**

ग्रामसभा हे ग्रामीण स्तरावर सर्वात जवळचे लोकशाही अंग आहे. योजना अर्ज, लाभ वितरण आणि माहिती प्रसार यामध्ये ग्रामसभेची भूमिका ठळक करणे. ग्रामस्तरीय निर्णय प्रक्रियेत नागरिकांचा प्रत्यक्ष सहभाग सुनिश्चित करणे. ग्रामसभेत महिनाभरात किमान एकदा योजना माहिती सत्र आयोजित करणे. अर्ज प्रक्रियेची मार्गदर्शन कार्यशाळा, पात्र नागरिकांची यादी सार्वजनिक करणे. नागरिक अधिक जागरूक होतील. अर्ज प्रक्रियेत त्रुटी कमी होतील. लाभ वितरण अधिक पारदर्शक व समावेशक होईल.

**२.सामाजिक लेखापरीक्षण (Social Audit) सक्तीचे करणे :-**

योजना लाभ वितरणाची स्वायत्त तपासणी लोकांच्या सहभागाने करणे. सामाजिक लेखापरीक्षणात अर्जदारांची यादी, निधी वितरण, कामाचा दर्जा याची पडताळणी केली जाते. प्रत्येक गावात वार्षिक किंवा अर्धवार्षिक सामाजिक लेखापरीक्षण अनिवार्य करणे. लेखापरीक्षण अहवाल ग्रामसभेत जाहीर करणे आणि दोषी बाबींवर कारवाई करणे. भ्रष्टाचार कमी होईल. दलालांचा हस्तक्षेप कमी होईल. लाभ वास्तविक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचेल.

**३.डिजिटल साक्षरता मोहिमा राबविणे :-**

ग्रामीण भागातील नागरिकांना मोबाइल, इंटरनेट, ई-गव्हर्नन्स पोर्टल वापरणे शिकविणे. डिजिटल अर्ज, लाभ तपासणी आणि तक्रार निवारणासाठी प्रशिक्षण. प्रत्येक गावात डिजिटल प्रशिक्षण केंद्रे उभारणे. शाळा, ग्रंथालय किंवा पंचायत

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

भवनात मोहीम राबविणे. विशेष लक्ष वृद्ध लोक, महिला, अनुसूचित जाती/जनजातींवर देणे. डिजिटल अर्ज प्रक्रियेत नागरिकांचे आत्मनिर्भर योगदान वाढेल. अर्जातील चुका कमी होतील आणि लाभ जलद मिळतील. डिजिटल भेदभाव कमी होईल.

**४.पारदर्शक लाभार्थी निवड प्रक्रिया :-**

पात्र नागरिकांची निवड पारदर्शक आणि नियमबद्ध पद्धतीने करणे. सूची सार्वजनिक करणे, नागरिकांना तक्रार करण्याची संधी देणे. लाभार्थी निवडीसाठी ऑटोमेटेड सॉफ्टवेअर वापरणे जे नियमबद्ध निकषांवर आधारित असेल. निवड प्रक्रिया जाहीर करणे आणि यादी ग्रामसभा/पंचायतीच्या वेबसाइटवर उपलब्ध करणे. भेदभाव, पक्षपात किंवा भ्रष्टाचार कमी होईल. वास्तविक गरजूंना लाभ मिळेल. समाजातील विश्वास वाढेल.

**५.तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे :-**

योजना अर्ज, लाभ वितरण किंवा कामाच्या गुणवत्तेबाबत नागरिकांची तक्रार सहज निवारण होईल. तक्रारींचा मागोवा घ्या आणि दोषी व्यक्ती / संस्थेवर कारवाई होईल. ग्रामीण स्तरावर हेल्पलाइन नंबर, मोबाइल अॅप, पंचायत कार्यालयात तक्रार निवारण केंद्र उभारणे. तक्रारींचा वेळेवर निवारण सुनिश्चित करणे (उदा. 15–30 दिवसांत उत्तर देणे). नागरिकांचा विश्वास वाढेल.

लाभ वितरण अधिक न्याय्य व समावेशक होईल. लाभातील अंतर कमी होईल कारण गैरव्यवहार लगेच दुरुस्त होईल.

**निष्कर्ष :-**

ग्रामीण भारतातील विकास आणि कल्याणाच्या योजना अनेक आहेत, परंतु त्यांच्या लाभाचे वितरण सर्वसमावेशक नसणे हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. अभ्यासातून असे दिसते की लाभातील अंतर बहुगुणी कारणांमुळे निर्माण होते. प्रशासनातील अकार्यक्षमता, माहितीचा अभाव, डिजिटल तांत्रिक अडचणी, भ्रष्टाचार, आणि सामाजिक असमानता.म्हणून ग्रामसभेची सक्रिय भूमिका, सामाजिक लेखापरीक्षण, डिजिटल साक्षरता, पारदर्शक लाभार्थी निवड आणि तक्रार निवारण यंत्रणा मजबूत करणे आवश्यक आहे.हे उपाय राबवल्यास, लाभ वास्तविक गरजू नागरिकांपर्यंत पोहोचतो, लाभातील अंतर कमी होते आणि ग्रामीण विकास अधिक समावेशक, न्याय्य आणि परिणामकारक बनतो.

**संदर्भ ग्रंथ :-**

1. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार (वार्षिक अहवाल)
2. ग्रामीण विकास मंत्रालय, भारत. सामाजिक लेखापरीक्षण अहवाल,
3. भारतातील ग्रामीण विकास आणि प्रशासन. नवी दिल्ली: ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस-सिंग, के. (२०२०).
4. भारतातील सार्वजनिक धोरण आणि ग्रामीण कल्याण. जयपूर: रावत प्रकाशने- शर्मा, आर. आणि गुप्ता, एस. (२०१९)
5. ग्रामीण विकास योजनांमधील असमानता: कारणे आणि उपाय. इंडियन जर्नल ऑफ पब्लिक अॅडमिनिस्ट्रेशन- झा, ए. (२०१८).६४(२), १२५–१४०
6. भारतातील डिजिटल डिवाइड आणि ग्रामीण विकास योजना. जर्नल ऑफ रुरल स्टडीज, कुमार, पी. आणि वर्मा, ए. (२०१७).५३, ३४–४५.
7. भारत – ग्रामीण विकास: लक्ष्यीकरण, समावेशन आणि जबाबदारी. वॉशिंग्टन, डी.सी.- जागतिक बँक (२०१६).
8. नियोजन आयोग / नीती आयोगाचे ग्रामीण विकास योजनांवरील अहवाल (२०१५-२०२३)

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणात अंतराळ धोरण आणि ई-प्रशासनाची भूमिका: -साहित्य समीक्षा

**श्री प्रदीप शंकर राठोड,**
सहाय्यक शिक्षक,राज्यशास्त्र विभाग, बी. एन. एन. कॉलेज,
भिवंडी जिल्हा ठाणे
**Email:** plshewale1985@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180410
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 39-43
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***परिचय-***

*ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणात भारतीय अंतराळ धोरण 2020 आणि माहिती व तंत्रज्ञानाचा वापर करून पारदर्शक जलद व सोप्या पद्धतीने सरकारी सेवा नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा आराखडा महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे भारत सरकारच्या राष्ट्रीय ही प्रशासन योजना आणि अंतराळ धोरण यांच्या अंतर्भूत धोरणामुळे ग्रामीण शासन आणि ग्रामीण स्वराज्य संस्थांमध्ये आभासी तंत्रज्ञानाचा वापर करून महाऑनलाईन शेती प्रशासन समितीद्वारे शासन सरकार ते नागरिक सरकारने व्यापारी व्यापारी सरकार ते कर्मचारी आणि सरकारचे सरकार द्वारे ई प्रशासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात सक्षमीकरण करण्याच्या यशस्वी प्रयोग करत आहे साहित्य समीक्षा हा अभ्यासाचा एक महत्त्वाचा आवश्यक घटक आहे कारण त्यांच्यामुळे विद्यमान अभ्यासाच्या उपयोगितेचे अवलोकन व निष्कर्षाचे संश्लेषण करून संशोधनातील अडचणीवर मात करून संशोधनाची दिशा स्पष्ट करता येते या विभागात तंत्रज्ञानाचा वापर केल्याने शासनाच्या विविध संस्थेच्या व पैलूंच्या एकत्रित एकत्रितपणे अभ्यास करून सिद्धांतिक आणि अनुभवातून ग्रामीण भागाच्या विकासाचा दृष्टिकोन प्रस्तावित अभ्यास केला आहे*

## ई प्रशासन आणि ग्रामीण सक्षमीकरण: - सिद्धांतिक दृष्टिकोन

आभासी तंत्रज्ञानाच्या साह्याने प्रशासनात अधिक पारदर्शकता उत्तरदायित्व कर्तव्य दर्शकता आणि नागरिक केंद्र यंत्रणा निर्माण करणे आणि सहभागी बनवण्याच्या प्रक्रियांचा हा एक संच आहे विविध अभ्यासानुसार डिजिटल गव्हर्नन्सचा मुख्य हेतू नागरिकांना जलद सोप्या व पारदर्शक पद्धतीने सेवा पुरविणे आणि नागरिकांच्या प्रशासकीय प्रक्रियेत सहभाग वाढविणे हा आहे ही प्रशासन याकरिता महाराष्ट्र शासनाने सर्वप्रथम ई ऑफिस योजना महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग या जिल्ह्यापासून प्राथमिक स्वरूपात सुरू केली ती हळूहळू संपूर्ण महाराष्ट्रभर त्याचा प्रसार करण्यात आला. ग्रामीण प्रशासनात ई गव्हर्नर चा वापर केल्याने नवीन निती धोरण ठरवून त्यांच्या अंमलबजावणीसाठी सेतू केंद्र महाऑनलाईन अशा अनेक आंतरिक व्यासपीठाचा वापर करून प्रशासन सक्षम करता येऊ शकते याकरिता भारत सरकारने ई प्रशासन डेटा संकलन असे अनेक पद्धतीचा स्वीकार करून प्रशासनात अधिक गतिमानता कशी यासाठी विचार केलेला आहे

## ग्रामीण सक्षमीकरण आणि सर्व समावेशकता-

ग्रामीण सक्षमीकरणाचा अर्थ स्थानिक स्तरावरील सर्व घटकांना आर्थिक सामाजिक आणि राजकीय दृष्ट्या स्वावलंबी बनविणे होय नागरिक केंद्रित सुविधांवर लक्ष देऊन अधिक प्रमाणात समाधानकारकता प्रतिबद्धता आणि प्रभावी कार्यपद्धती यामध्ये तंत्रज्ञानाचा वापर करून आभासी सक्षमीकरण करणे आणि साध्यता सिद्ध

**Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)**
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254453
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*श्री. प्रदीप शंकर राठोड, सहाय्यक शिक्षक,राज्यशास्त्र विभाग, बी. एन. एन. कॉलेज, भिवंडी जिल्हा ठाणे*

**How to cite this article:**
राठोड, प्रदीप शंकर .(2026). ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणात अंतराळ धोरण आणि ई-प्रशासनाची भूमिका: -साहित्य समीक्षा. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 39–43.* https://doi.org/10.5281/zenodo.21254453

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

करणे प्रमुख उद्दिष्ट आहे फक्त सेवा सुविधा उपलब्ध करणे एवढ्यावर मर्यादित न राहता त्यामध्ये नागरिकांचा सहभाग कसा वाढेल यावर लक्ष केंद्रित करून प्रशासनात पारदर्शकता जबाबदारी उत्तरदायित्व कर्तव्य क्षमता परिणामकारकता वाढल्यास ग्रामीण भागात सक्षमीकरणास प्रोत्साहन मिळू शकते.

**ई- प्रशासनाचा ग्रामीण प्रशासनात प्रभाव:-**

ही गव्हर्नर ग्रामीण प्रशासनात खूप मोठा प्रभाव याबद्दल झालेला आहे जनता आणि प्रशासन जवळ आल्याने अनेक सेवा सुलभ रित्या आणि सहस्थान लोकांपर्यंत पोहोचविता येऊ शकतात त्याचा निश्चितच जनतेला आणि प्रशासनाला फायदा होताना दिसून येते.

**१) सुलभ सेवा आणि सुधारणा-**

ही प्रशासनामुळे सरकारच्या उपक्रमाचे उपयोजन सामान्य जनतेपर्यंत सुलभतेने पोहोचविणे शक्य झाले आहे शासकीय योजनांचे मूल्यांकन करताना रिक्वेस्ट सुधारणा होत असल्याचे निदर्शनास येते त्यामध्ये संकेतस्थळ आधुनिक साधने संगणक ऑनलाईन दस्ताऐवज नोंदणी व वितरण अशा असंख्य सेवा सुलभतेने जनतेपर्यंत पोहोचविले जातात वित्तीय क्षेत्रात सुद्धा तंत्रज्ञानाचा व आभासी तंत्रांचा वापर करून आमोलाग्र बदल झाले आहेत सेवा जलद गतीने पुरविली जात असल्याने काही समस्या उद्भवताना दिसतात त्याचे सुद्धा योग्य व कमी वेळेत निरातन होत आहे परंतु ही सेवा वर्तमान काळात जनतेला कधी कधी नाहक वाटायला लागली आहे कारण अनेक वेळा अध्यायावत करण्यासाठी जनतेला आव्हान केले जातात पण जर अर्ध्यावर्तीकरण आणि नाही झाले तर योजनेचा लाभ आत्ता बंद केला जातो परंतु आपले सरकार सेवा केंद्र ही ग्राम स्वराज्य महा ग्रामसेवक माजी ग्रामपंचायत अशा पोर्टलवरून जनता आणि प्रशासनात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला जात आहे तो सुशासनासाठी उपयुक्त आहे.

**२) पारदर्शकता-**

पारंपरिक प्रशासनात प्रशासकीय कामाची पद्धत एक मार्गी होती त्यामुळे जनतेला सहभागी करून न घेतल्याने जनता नवीन होते त्यामुळे प्रशासनात भ्रष्टाचार दप्तर दिरंगाई लाल फी वेळ काढून पणा अशा अनेक बाबीमुळे प्रशासन अपारदर्शक झाल्याबद्दल ई प्रशासनाच्या प्रयोगाने सर्व माहिती संकेतस्थळावर उपलब्ध होते त्यामुळे आणि अनेक कायदे निर्माण केले म्हणजे असे उदाहरणार्थ आरटीआय 2002 अशा कायद्यामुळे प्रशासनात अधिक पारदर्शकता निर्माण होत आहे त्यामुळे जनतेचा प्रशासनावर विश्वास दृढ होताना दिसत आहे.

**३) उत्तरदायित्व-**

ई प्रशासनामध्ये भारत सरकार किंवा अनेक राज्य सरकारने सर्वप्रथम प्रशासकीय अधिकाऱ्यांचे उत्तरदायित्व निश्चित केल्याने भ्रष्टाचार नियंत्रण योजनांची प्रभावी अंमलबजावणी स्पष्टता आणि जनता प्रतिमा जबाबदारीची भावना प्रशासनात निर्माण होताना दिसते हे आधुनिक भारतासाठी उपयुक्त आहे.

**४)अल्प प्रतिसाद आणि डिजिटल विभाजन-**

शासनाने प्रशासनाचे निश्चित केलेले ध्येय व उद्दिष्टे सफल करण्याची आवश्यक असणारी यंत्रणा अपुरी असल्याने त्याचा प्रभावी वापरावर काही बंधन येत आहेत जसे की ग्रामीण क्षेत्रातील इंटरनेट कनेक्टिव्हिटी समस्या आणि आंतरजाला विषयीची साक्षरतेचा अभाव त्यामुळे ग्रामीण भागात शासनाच्या योजना प्रभावीपणे शहरी भागाच्या तुलने राबविल्या जात नाही कारण जन सहभाग अल्प प्रमाणात असतो

आंतरजाल सुविधा नसल्याने अनेक वेळा ही प्रशासनाच्या संकेतस्थळाला भेट दिल्यानंतर सर्व डाऊन स्लो स्पीड एरर अशा समस्या उद्भवतात यासाठी प्रशासनाने अत्याधुनिक सुख सुविधा वाढविण्यावर लक्ष केंद्रित करायला पाहिजे तसेच सेवा पुरवणारे मनुष्यबळ पुरेसे व प्रशिक्षित असणे आवश्यक आहे ही प्रशासनाचे ध्येय साध्य करण्यासाठी सामाजिक व आर्थिक अडचणीचे निराकरण होणे कर्म प्राप्त आहे शासनाने ही प्रशासनाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी त्याला आर्थिक तरतूद करून त्याची अंमलबजावणी केल्यास जनसभा वाढेल आणि अल्पावधीतच आपण ही प्रशासनाच्या माध्यमातून सुशासनाचे उद्दिष्ट व ध्येय सहज साध्य करता येतील.

**५) अंतराळ धोरणाचा शासन व भौगोलिक माहिती व्यवस्थापनाचा प्रशासनावर प्रभाव:-**

अंतराळ धोरणाचा प्रशासकीय व्यवस्थेवर दुर्गामी प्रभाव होतात अंतराळ धोरणाने नैसर्गिक संसाधनाचे जसे जमीन जल आणि अन्य संसाधनाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी अंतराधोरण प्रशासनाला मार्गदर्शक ठरतो शासनाकडून विकास योजना राबवताना अनेक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

समस्या व संधी उपलब्ध होतात त्याची योग्य स्वरूपात आकृतीबंध करण्यासाठी भौगोलिक माहिती व्यवस्थापनाची गरज असते ती अचूक असल्यास योजना नियोजित व अंमलबजावणीत उणिवा राहत नाही याव्यतिरिक्त अंतराळधोरणाचा उपयोग केल्यास योग्य नियोजन व अंमलबजावणी होते ही प्रशासनाचे उद्दिष्ट साध्यता साधता येते तसेच प्रशासनाला योजना किंवा विकास साधनांचा नैसर्गिक, मानवनिर्मित आपत्तीचा सामना करावा लागतो उदा-पूर परिस्थिती अतिवृष्टी दुष्काळ आग अशा आपत्तीचे व्यवस्थापन करण्यात भौगोलिक माहिती व्यवस्थापनाला अंतराळ धोरण प्रभावीपणे मार्गदर्शकाची भूमिका पार पाडतो.

**भारताच्या अंतराळ धोरण आणि ग्रामीण प्रशासन-**

भारतीय अंतरा धोरणाचे ग्रामीण प्रशासनात गतिमानता निर्माण सकारात्मक भूमिका पार पडत आहे ग्रामीण भागातील दूरसंच हवामानशास्त्र आणि भूवस्थापन क्षेत्रात बदल होत आहे दूरसंचार क्षेत्रातील क्रांतीमुळे शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागात सुद्धा माहिती आणि शिवांशी लाभ जनता घेत आहे बदलते हवामान भूवस्थापनाच्या क्षेत्रात अंतराळ धोरणामुळे झालेले परिवर्तन यामुळे ग्रामीण भागात सुद्धा जमीन व जलसंपदा व्यवस्थापन योग्य पद्धतीने होताना दिसते तरीसुद्धा भारतीय हवामान खात्याचे आधुनिक तंत्राचा वापर करून ग्रामीण भागातील जनतेला अचूक माहिती पुरविल्यास त्याचा योग्य फायदा होईल आणि विकासाला हातभार लागेल.

भारतीय अंतराळ धोरणामुळे स्थानिक विकास उपक्रमासाठी लागणारी माहिती व त्याचा योग्य वापर करणारे तंत्रज्ञान वाढविण्यावर भर देण्यात येत आहे शासनाकडून ग्राम जमिनीचे नकाशे मालमत्ता नोंद जमिनीची नोंद इतर दाखले ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था जिल्हा परिषद पंचायत समिती ग्रामपंचायत विकास करण्यात अनेक संकेतस्थळाचा वापर अंतराळाच्या माध्यमाने प्रभावीपणे राबविले जात आहे.

**संस्थात्मक क्षमता वृद्धी आणि तंत्रज्ञान स्वीकार-**

ग्रामीण प्रशासना सुधारणा करण्यासाठी संस्थात्मक क्षमता व नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक आहे क्षमता वृद्धी म्हणजेच कार्यक्षमता पारदर्शकता उत्तरदायित्व आणि नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून प्रशासकीय स्तरावर बदल घडवून आणणे याकरिता ही प्रशासन अंतराळ धोरण भौगोलिक माहिती व्यवस्थापन आणि आंतरजाल युक्त भ्रमणध्वनीचा वापर करून प्रशासनाने काम केल्यास स्थानिक स्वराज्य संस्था प्रभावीपणे कार्यक्रम राबवू शकेल याकरिता आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर प्रशिक्षित कर्मचारी वर्गाचे सुद्धा आवश्यकता आहे.

**संस्थात्मक रचना व अंमलबजावणीतील अडथळे-**

ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थेचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून आले की ग्रामीण संस्थेकडे तंत्रज्ञान संसाधने ,कौशल्य प्रशिक्षण ,प्रशिक्षणार्थी संगणक साहित्य व त्यासाठी लागणारे सुसज्ज संस्थात्मक बांधणी नसल्याने ही प्रशासनाची धोरणात्मक उद्दिष्टे प्रत्यक्षात अंमलबजावणी करणे कठीण झाले आहे. योग्य अंमलबजावणीसाठी संस्थात्मक यंत्रणा निर्माण करून अत्याधुनिक सुविधा व कौशल्याधारित कार्यक्रमाचे आयोजन करून ते प्राधान्याने राबविणे गरजेचे आहे.

धोरण अंमलबजावणीतील अंतर- समीक्षकांचे निरीक्षण

प्रशासनाकडून धोरण ठरवितांना तांत्रिकदृष्ट्या प्रगत असतात पण स्थानिक पातळीवरील प्रत्यक्ष अंमलबजावणीत अनेक समस्या असतात त्यामध्ये तंत्रज्ञानाचा साक्षरतेचा अभाव असल्याने सर्वसामान्य जनता सहभागी होत नाही प्रशासकीय क्षमतेचा अभाव कर्मचारी वर्ग प्रशिक्षित व कौशल्य आधारित नसल्याने योजनांची योग्य अंमलबजावणी होताना दिसत नाही अपुरे संसाधने सुद्धा ही प्रशासनाच्या उद्दिष्ट कृतीस अडथळा ठरतात तसेच भ्रष्टाचार हा शिष्टाचार म्हणजेच पारदर्शकतेचा अभाव आणि जबाबदारीची उणीव यामुळे सुद्धा ही प्रशासनाची उद्दिष्ट साध्य होताना दिसत नाही त्यामध्ये योग्य परिवर्तन अपेक्षित असल्यास स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत प्रशासनाने कौशल्यधारीत कर्मचारी वर्गाची नेमणूक करून जनतेमध्ये जनजागृती करावी जेणेकरून सामान्य जनता ही प्रशासनाच्या माध्यमातून सुलभ व सुधारणांचा उपभोग घेऊन स्वतःची व राष्ट्राची प्रगतीचे ध्येय साध्य करतील.

**भारतीय प्रशासनाचा अनुभवजन्य अभ्यास:-**

भारतामध्ये प्रशासन आणि भौगोलिक माहिती व्यवस्थापनाच्या ग्रामीण भागातील प्रशासकीय सुधारणा घडवून आणण्याचा अवलंब केला आहे त्यामध्ये आपले सरकार केंद्र ही ग्रामस्वराज्य महाग्राम सेवा माजी ग्रामपंचायत अशा अनेक संकेतस्थळाच्या माध्यमातून केला आहे परंतु अजूनही स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सक्षमीकरणाकरिता संशोधन करण्याची गरज असल्याचे दिसून येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**निष्कर्ष**-स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सक्षमीकरणाकरिता केलेल्या उपाययोजना यामध्ये अंतराळ धोरण आधारित तंत्रज्ञानाचा वापर करून स्थानिक पातळीवरच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केलेला दिसतो त्यामुळे संस्कृत शासनात पारदर्शकता उत्तरदायित्व माहिती संकलन निर्णय क्षमता सुलभ सेवा व सुधारणा जबाबदारी संस्थात्मक धोरणांचा समावेश केल्यास ग्रामीण स्थानिक पातळीवर सुद्धा ही प्रशासनाचे महत्त्व अंतराळ धोरण भौगोलिक माहिती व्यवस्थापनाच्या आधारे बदल घडून आणता येऊ शकतात परंतु ते सर्व स्तरावर प्रभावी झाल्याचे दिसून येत नाही त्यामुळे ग्रामीण पातळीवरील प्रशासकीय बदलासाठी धोरणात्मक परिणामकारक कार्याची आवश्यकता असल्याचे अधोरेखित होते

**संदर्भ**

1. अग्रवाल, आर., आणि प्रसाद, जे. (१९९९). वैयक्तिक फरक नवीन माहिती तंत्रज्ञानाच्या स्वीकृतीसाठी उपयुक्त आहेत का? डिसिजन सायन्सेस, ३०(२), ३६१–३९१.
2. भटनागर, एस. (२००४). ई-गव्हर्नमेंट: व्हिजन ते अंमलबजावणी. सेज पब्लिकेशन्स.
3. चौधरी, पी., आणि विज, एस. (२०१९). भारतातील डिजिटल डिवाइड आणि ग्रामीण सक्षमीकरण. जर्नल ऑफ रुरल डेव्हलपमेंट, ३८(४), २८९–३०७.
4. डेव्हिस, एफ. डी. (१९८९). माहिती तंत्रज्ञानाची उपयुक्तता, वापरण्यास सोपी समजणे आणि वापरकर्त्यांनी स्वीकारणे. एमआयएस क्वार्टरली, १३(३), ३१९–३४०.
5. धमाले, आर., आणि पाटील, व्ही. (२०२५). ग्रामीण भारतातील स्मार्ट प्रशासन: ई-ग्रामपंचायत प्रणालीची रचना करणे. आंतरराष्ट्रीय विज्ञान, नवोन्मेष आणि अभियांत्रिकी जर्नल, १२(१), ४५–६२.
6. धुरंधर, पी., ताम्रकर, ए., आणि पात्रा, जे. पी. (२०२२). ग्रामीण विकासासाठी जीआयएस-आधारित ऑनलाइन माहिती प्रणाली. इंटरनॅशनल जर्नल ऑफ हेल्थ सायन्सेस, १६(२), २२१–२३४.
7. गुप्ता, एस., आणि मिश्रा, ए. (२०२२). ग्रामीण सेवा वितरणावर ई-गव्हर्नन्सचा प्रभाव. जर्नल ऑफ रुरल इन्फॉर्मेटिक्स, ९(१), ५०–६९.
8. हंस, व्ही. बी., भट, पी., आणि नायक, यू. (२०२४). भारतातील ग्रामीण विकास आणि ई-गव्हर्नन्स. इंटरनॅशनल जर्नल ऑफ रिसर्च इन अकादमिक वर्ल्ड, ३(१), ७८–९२.
9. हीक्स, आर. (२००६). ई-गव्हर्नमेंटची अंमलबजावणी आणि व्यवस्थापन. सेज पब्लिकेशन्स.
10. इस्रो. (२०२४). इस्रो भू-स्थानिक सेवा. भारतीय अंतराळ संशोधन संघटना.
11. जॉन, पी., आणि इतर (२०२१). ग्रामीण भारतात ई-गव्हर्नन्सचा अवलंब. जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन स्टडीज, १३(२), १०१–१२१.
12. इलेक्ट्रॉनिक्स आणि आयटी मंत्रालय. (२०२३). राष्ट्रीय ई-गव्हर्नन्स योजना वार्षिक अहवाल. भारत सरकार.
13. ग्रामीण विकास मंत्रालय. (२०२४). स्वामित्व योजना: धोरण संक्षिप्त. भारत सरकार.
14. मिस्त्रा, ए., इत्यादी (२०१८). डिजिटल प्रशासन आणि ग्रामीण सक्षमीकरण. जर्नल ऑफ डेव्हलपमेंट स्टडीज, ५५(८), १४२७–१४४८.
15. राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र. (२०२५). ग्रामीण ई-गव्हर्नन्सचे मोजमाप. भारत सरकार.
16. ओईसीडी. (२०१६). कल्याणकारी क्षेत्रात सार्वजनिक सेवांचे रूपांतर करण्यासाठी डिजिटल सरकारी धोरणे. ओईसीडी प्रकाशन.
17. प्रसाद, एन., आणि मोहपात्रा, एस. (२०२०). ग्रामीण भारतातील डिजिटल बहिष्कार. समाजात तंत्रज्ञान जर्नल, ६१, १०१–२०२.
18. राज, बी., आणि डे, एस. (२०२१). सार्वजनिक धोरण आणि ग्रामीण प्रशासन: एक विश्लेषणात्मक दृष्टीकोन. एशियन जर्नल ऑफ पॉलिसी ॲनालिसिस, १०(३), ४५–६३.
19. राय, आर., आणि श्रीवास्तव, पी. (२०२३). स्थानिक ई-शासन स्वीकारण्यात अडथळे. इंटरनॅशनल जर्नल ऑफ ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सायन्सेस, १६(४), २२३–२४२.

20. राव, एम. (२०१९). ग्रामीण प्रशासन आणि आयसीटी स्वीकार: भारतीय राज्यांमधून अनुभवजन्य पुरावे. इंडियन जर्नल ऑफ पब्लिक ॲडमिनिस्ट्रेशन, ६५(३), १७९–१९८.
21. सॅनफोर्ड, सी. (२००४). ई-शासन यशाचे घटक: सैद्धांतिक पायांवर व्यावहारिक साधनांचे मॅपिंग. सरकारी माहिती त्रैमासिक, २१(२), १८७–२१६.
22. शर्मा, के., आणि यादव, एल. (२०२१). ग्रामीण नियोजनात जीआयएस: भारतीय केस स्टडीज. जर्नल ऑफ जिओस्पेशियल रिसर्च, ११(१), ९०–११२.
23. सिंग, एस., आणि रावल, ए. पी. (२०१८). ग्रामीण भारताचे रूपांतर करणारे ई-गव्हर्नन्स. इंटरनॅशनल जर्नल ऑफ इंजिनिअरिंग रिसर्च अँड टेक्नॉलॉजी, ७(९), २१४–२२२.
24. वेंकटेश, व्ही., आणि इतर (२००३). माहिती तंत्रज्ञानाची वापरकर्त्यांची स्वीकृती: एकात्मिक दृष्टिकोनाकडे. एमआयएस क्वार्टरली, २७(३), ४२५–४७८.
25. ई प्रशासन डॉक्टर अरविंद कुलकर्णी,
26. ई प्रशासन डॉक्टर उर्मिला रेड्डी विद्या बुक पब्लिक पब्लिशर्स
27. ई प्रशासन अथर्व पब्लिकेशन
28. ई प्रशासन माहिती पुस्तिका जलसंपदा विभाग महाराष्ट्र शासन
29. ई लोकप्रशासन अभ्यासक्रम
30. ई प्रशासन उत्कृष्टता विषयक पुस्तिका
31. २७वी ई प्रशासन राष्ट्रीय परिषद

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेले सामाजिक व सांस्कृतिक बदल

**किशोर हिराकांत आगिवले[1] डॉ. संजय भाऊसाहेब गिरे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
[2]सहाय्यक प्राध्यापक, वसंतराव नाईक महाविद्यालय, नांदेड
**Email:** agiwale.kishor@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180411
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 44-48
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा-***

*स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारतातील ग्रामीण आणि शहरी समाजामध्ये मोठ्या प्रमाणात बदल झालेले आहेत. प्रामुख्याने आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणाने संपूर्ण जगामध्ये वेगाने बदल झाले आहेत. अनेक देशांनी हे बदल आत्मसात करून त्यांच्यामध्ये अमुलाग्र बदल घडवून वेगाने विकास साधला आहे. भारतातही आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे मोठ्या वेगाने बदल झाले आहेत. यामुळे फक्त शहरीच नव्हे तर ग्रामीण भागातही सामजिक आणि सांस्कृतिक संरचनेत बदल झाले आहेत. महाराष्ट्रातील ग्रामीण समुदायाचा विचार करता येथील ग्रामीण कृषी समाजात स्वातंत्र्योत्तर कालखंडात मोठे बदल झाले. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज हा पारंपरिकपणे कृषी आधारित, सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध आणि परंपराबद्ध जीवन पद्धती असलेला समाज आहे. स्वातंत्र्यानंतर आधुनिकीकरण आणि जागतिकीकरणामुळे या समाजाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठे लक्षणीय बदल झाले आहेत. या समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी या बदलांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.*

***मुख्य शब्द-*** *कुणबी समाज, शेती, सामाजिक स्थिती, सांस्कृतिक बदल*

**उद्दिष्टे-**

1) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजात स्वातंत्र्योत्तर काळात झालेले सामाजिक बदल अभ्यासणे.
2) औद्योगिकीकरण , जागतिकीकरण व नागरीकरणाचा कुणबी समाजाच्या जीवनपद्धतीवर झालेला प्रभाव अभ्यासणे.
3) कुणबी समाजातील कुटुंब व्यवस्था , विवाहव्यवस्था आणि स्त्रियांच्या सामाजिक स्थानातील बदलांचे विश्लेषण करणे.
4) ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजात स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सामाजिक-सांस्कृतिक बदलांचे सकारात्मक व नकारात्मक परिणाम अभ्यासणे

**संशोधन पद्धती-** ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजातील स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलांचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम संशोधन पद्धतीचा वापर करण्यात आला. कुणबी समाजातील काही व्यक्तींच्या मुलाखती घेण्यात आल्या. तसेच दुय्यम स्त्रोतांद्वारे म्हणजेच प्रकाशित लेख, जर्नल्स, वर्तमानपत्रे, अहवाल, पुस्तके आणि वेबसाईट्स यादाव्रे माहिती गोळा केली गेली.

**प्रस्तावना-**

ठाणे जिल्ह्यामध्ये एकूण लोकसंख्येमध्ये कुणबी समाजाचे प्रमाण लक्षणीय आहे. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचा शासकीय नोंदीनुसार इतर मागास वर्ग (OBC) या प्रवर्गामध्ये समावेश आहे. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या सामाजिक आणि संस्कृती स्थितीचा आढावा घेत असताना अनेक पैलू दिसून येतात. पारंपारिकदृष्ट्या कृषी व्यवसायाशी संबंधीत असणाऱ्या कुणबी समाजाच्या सामाजिक संरचनेत आणि सांस्कृतिक स्थितीमध्ये गेल्या काही काळात महत्त्वाचे बदल घडले आहेत त्याचबरोबर काही जुन्या रूढी परंपरा, चालीरीती आजही अस्तित्वात आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*किशोर हिराकांत आगिवले ,संशोधक विद्यार्थी, श्री शिवाजी महाविद्यालय, कंधार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड*

**How to cite this article:**
*आगिवले, . किशोर . हिराकांत ., & गिरे, संजय. भाऊसाहेब . (2026). ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजामध्ये स्वातंत्र्योत्तर कालखंडात झालेले सामाजिक व सांस्कृतिक बदल.* Journal of Research & Development, *18(4(*XV)), *44–48.*
https://doi.org/10.5281/zenodo.21254513

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254513

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

कुणबी समाजातील विविध स्तरांतील लोकांची सद्य स्थिती, त्यांच्या जीवनशैलीतील बदल यावर प्रकाश टाकण्याच्या दृष्टीकोनातून ठाणे जिह्यातील कुणबी समाजाचा सामाजिक आणि सांस्कृतिक आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.

ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचेसगळयात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे पारंपारिक सामाजिक संरचना होय. कुणबी समाजाच्या पारंपारिक सामाजिक संरचनेमध्ये मुख्य गाभा हा कृषी आधारित जीवनशैली आहे. ऐतिहासिक काळापासून हा समाज मुख्यतः शेतकरी आहे. समाजात त्यांची भूमिका पारंपारिक पद्धतींने अन्न उत्पादक , बळीराजा म्हणून होती. मात्र गेल्या काही दशकांमध्ये जागतिकीकरण, अधुनिकाकरण यामुळे या संरचनेत बराच बदल घडला आहे. हा बदल अभ्यासण्याचा प्रयत्न प्रस्तुत संशोधनातून केला गेला आहे.

**स्वातंत्र्यपूर्व काळातील ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची स्थिती-** स्वातंत्र्यपूर्व काळातील ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या स्थितीचा विचार करता प्रामुख्याने ग्रामीण कृषी आणि जंगलावर आधारित जीवन समोर येते. कुणबी समाज हा उपजीविकेसाठी मुख्यत: शेती आणि जंगल यांवर अवलंबून होता. शेती जिहे फक्त उपजीविकेचे साधन नसून जीवनपद्धती होती. शेतीचे प्रमाण विस्तृत होते. शेतकरी उत्पादन विक्रीसाठी स्थानिक बाजारांवर अवलंबून होता. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज धर्माने हिंदू असला तरी त्याच्या स्थानिक संस्कृतीवर स्थानिक भौगोलिक परिस्थितीचा आणि सहजीवनातील इतर जाती आणि समाजांचा प्रभावाने कुणबी समाजाचची वैशिष्ट्यपूर्ण अशी स्थानिक संस्कृती आकाराला आलेली होती. या संस्कृतीवर स्थानिक आदिवासी यांच्या लोकपरंपरा आणि ग्रामदेवतांचा तीव्र प्रभाव दिसून येतो. याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजावर स्थानिक आगरी आणि मराठा समाजाच्या सहजीवनाचा प्रभाव सुद्धा तितकाच ठळक होता.

कुणबी समाजात पारंपारिक पुरुषप्रधान, सयुंक्त कुटुंब पद्धती प्रचलित होती. समाजातील स्त्रियांचे स्थान महत्त्वपूर्ण असले तरी स्त्रियांना दुय्यम स्थान प्राप्त होते. शैक्षणिक दृष्ट्या हा समाज मागास होता. साक्षरतेचे प्रमाण अतीशय कमी होते. ठाणे जिल्हा हा त्या काळामध्ये मोठी ग्रामीण लोकसंख्येचा जिल्हा असून शहरांची संख्या कमी होती. पारंपारिक सण, उत्सव जसे दिवाळी, पाडवा, शिमगा, गौरी गणपती उत्साहाने साजरे केले जात होते. कुणबी समाजची मुख्य भाषा मराठी असली, तरी मुरबाडी बोली म्हणून मराठीची ग्रामीण बोलीभाषा मुरबाड , शहापूर, कल्याणच्या ग्रामीण भागात प्रचलित होती. एकंदरीतच तत्कालीन स्थानिक कुणबी समाज हा परंपराबद्ध, रूढीवादी , ग्रामीण समूह होता ज्याची जीवनशैली ही प्रामुख्याने कृषीआधारित होती.

**स्वातंत्र्योत्तर कुणबी समाजात सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनात झालेले बदल-**

**१) जमीन सुधारणांमुळे झालेले बदल-**

स्वातंत्र्योत्तर भारत सरकारने जमीनदारी पद्धती कायद्याने समाप्त केली. जमीन सुधारणा कायद्यांमुळे कुणबी शेतकऱ्यांना जमिनीचे मालकी हक्क मिळाले. यापूर्वी मोठ्या संख्येने स्थानिक कुणबी समाज हा मोठ्या जमीनदार आणि व्यापाऱ्यांचे कुळ म्हणून खंडाने जमीन कसत होता. जमीन सुधारणा कायद्यांमुळे प्रथमच अनेक कुणबी कुटुंबे लहान आणि अल्पभूधारक शेतकरी बनले. याचबरोबर विनोबा भावे यांच्या भूदान चळवळीचा परिणाम म्हणून अनेकांनी स्वेच्छेने त्यांची शेकडो एकर जमीन त्यांच्या कुळांना दान केली याचा मोठा फायदा स्थानिक कुणबी समाजाला झाला. मात्र काळओघात वाढती लोकसंख्या आणि जमिनीच्या तुकडीकरणामुळे शेतीची शाश्वतता कमी झाली आणि पारंपरिक कृषी सुरक्षेमध्ये घट झाली. परिणामी शेतीवर फक्त अवलंबून न राहता कुणबी युवकांनी रोजगारासाठी इतर संधी शोधण्यास सुरवात केली.

२) **शिक्षण आणि साक्षरतेमधील बदल-** स्वातंत्र्यपूर्व काळात कुणबी समाज हा शैक्षणिकदृष्ट्या अतिशय मागास होता. साक्षरतेचे प्रमाण अतिशय कमी होते. स्वातंत्र्योत्तर काळात सरकारने प्राथमिक शिक्षण सक्तीचे आणि मोफत केले. त्याचबरोबर अनेक स्थानिक समाजसुधारक, स्थानिक राजकीय पुढारी यांच्या प्रयत्नाने माध्यमिक शाळा ग्रामीण भागात सुरु केल्या गेल्या. उच्च शिक्षण संस्थांचे प्रमाण कमी असले तरी कल्याण, ठाणे, यासारख्या शहरांमध्ये अनेक महाविद्यालये सुरु झाली. मुरबाड, शहापूर , भिवंडी येथेही तुरळक प्रमाणात का होईना उच्च शिक्षणाला सुरवात झाली. परिणामी स्थानिक कुणबी समाजात प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षणाचे प्रमाण वाढले. लोकांना शिक्षणाचे महत्त्व लक्षात येवू लागले. ग्रामीण भागात जरी उच्च शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी असले तरी उच्च शिक्षितांचे वाढते प्रमाण हि नक्कीच जमेची बाजू ठरते. यामुळे नव्या पिढीत सामाजिक अभिवृद्धी वाढली आणि त्याचबरोबर स्थानिक कुणबी युवा वर्गाला नोकरीच्या संधीही वाढल्या. आता जिल्ह्यामध्ये फक्त पारंपारिक शिक्षण देणाऱ्या संस्थाच नव्हे तर तांत्रिक, वैद्यकीय आधुनिक शिक्षण देणाऱ्या संस्थाही कार्यरत झाल्या आहेत. परिणामी स्थानिक कुणबी समाजातही आधुनिक शिक्षण घेवून रोजगारच्या नव्या संधी प्राप्त करणाऱ्या वगाची संख्या वाढली आहे. आधुनिक शिक्षणामुळे पारंपरिक कृषीकडेच नव्हे तर सरकारी व खाजगी नोकऱ्यांकडे देखील कुणबी युवकांचा कल वाढला, ज्यामुळे सामाजिक स्थितीत बदल दिसू लागला.

**कुटुंब रचना आणि जीवनशैलीमधील बदल-** कुणबी समाज हा कृषिप्रधान असल्याने शेतीच्या मनुष्य बळाची गरज म्हणून सयुंक्त कुटुंब पद्धत प्रचलित होती. यातून शेतीसाठी मनुष्यबळाचा पुरवठा तर होत होताच, मात्र मुलांच्या संगोपनाच्या दृष्टीनेही ही पद्धत आदर्श होती. आता मात्र जागतिकीकरण आणि आधुनिकीकरण याचा परिणाम होऊन विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण वाढले आहे. शेतीच्या तुकडीकरणामुळेही जास्तीच्या मनुष्यबळाची गरज राहिली नाही, त्यामुळेही विभक्त कुटुंब पद्धती अधिक प्रचलित होत आहे. यामुळे पारंपारिक सामजिक संरचना वेगाने बदलत आहे.

**महिलांची स्थितीमधील बदल-** सरकारद्वारे प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले गेले त्याचबरोबर समाजसुधारक आणि काही राजकीय व्यक्तींच्या प्रयत्नातून माध्यमिक शिक्षणातही सुधारणा झाली. नंतर अगदी १२वी ते आता पदवी पर्यंतचे शिक्षण महिलांना मोफत केले गेल्यामुळे एकूण कुणबी समाजातील महिलांमध्ये शिक्षणाचे प्रमाण लक्षणीय वाढले. सरकारी नोकऱ्यांमध्ये महिलांसाठी राखीव जागा आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये मिळालेले राजकीय आरक्षण ह्यामुळे महिलांच्या स्थितीमध्ये लक्षणीय बदल झाला आहे. आता कुणबी समाजातील स्त्रिया सरकारी आणि खाजगी क्षेत्रामध्ये नोकरी करत आहेत. त्याचबरोबर अनेक स्त्रिया स्वतंत्रपणे व्यवसाय सुद्धा करत आहेत. पारंपारिक परिवेश त्यागून कुणबी महिलांमध्ये जो बदल झाला आहे त्यामुळे त्यांचा सामाजिक सन्मान आणि आत्म-विश्वास वाढला आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**स्थलांतर-** शेतीची अल्पउत्पादकता आणि शेतीचे तुकडीकरण यामुळे शेतीपासून रोजगाराची क्षमता कमी झाली आहे. त्यातच ठाणे, कल्याण-डोंबिवली, भिवंडी, बदलापूर , अंबरनाथ ह्या शहरी भागात मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण झाले आहे. त्यामुळे ह्या जवळच्या शहरांमध्ये औद्योगिक व सेवा क्षेत्रात रोजगाराच्या चांगल्या संधी उपलब्ध आहेत. ह्यामुळे ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून मोठ्या प्रमाणावर शहरांकडे स्थलांतर झाले आहे. आजही युवक रोजगार आणि शहरी जीवनाच्या अपेक्षेने मोठ्या संख्येने शहरांकडे धाव घेत आहे. एकप्रकारे ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचे कृषी जीवनशैलीतून अर्ध-शहरी जीवनशैलीकडे संक्रमण होत आहे.

**राजकीय जागृती आणि ओळख-** स्वातंत्र्योत्तर ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाचा समावेश इतर सामाजिक प्रवर्गामध्ये करण्यात आला आणि या समाजाला शासकीय नोकऱ्यांमध्ये आरक्षण मिळाले तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये राजकीय आरक्षण मिळून राजकीय व्यासपीठ उपलब्ध झाले. परिणामी समाजात राजकीय जागृती झाली आणि समाजाला स्वतंत्र राजकीय ओळख प्राप्त झाली. कुणबी समाजाचा स्थानिक राजकारणावर प्रभाव वाढला. शिक्षण , नोकऱ्या आणि राजकीय यामधील आरक्षणामुळे कुणबी समाजाच्या सामाजिक न्यायाच्या संधीमध्ये वाढ झाली. आज कुणबी समाजातील अनेक नेते समाजाचे, तालुक्याचे जिल्ह्याचे राजकीय प्रतिनिधित्व करत आहेत. त्याचबरोबर सरकारी नोकऱ्यांमध्ये कुणबी समाजाच्या युवकांची संख्या चांगल्या पद्धतीने वाढली आहे.

**सामाजिक राजकीय चळवळींचा प्रभाव-** देशात आणि राज्यामध्ये झालेल्या सामाजिक आणि राजकीय सुधारणा चळवळींचा मोठा प्रभाव ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजावर पडला आहे. कुणबी समाजातील अनेक व्यक्तींनी शिक्षणाचे महत्त्व ओळखून जिल्ह्यामध्ये अनेक शाळा , महाविद्यालये स्थापन करण्यामध्ये पुढाकार घेतला. यामध्ये दिवंगत महसूल मंत्री शांताराम भाऊ घोलप यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. त्यांनी मुरबाड तालुक्यमध्ये जनसेवा शिक्षण मंडळांची स्थापना करून मुरबाड तालुक्याच्या विकासाला दिशा दिली. त्यांचेच काम माजी आमदार गोटीराम भाऊ पवार यांनी [उधे चालवून जनसेवा शिक्षण मंडळामार्फत चालवल्या जाणाऱ्या शाळांचा विस्तार केला. दिवंगत माजी आमदार दिगंबर विशे यांनीही शैक्षणिक संस्था स्थापून करून तालुक्यात शाळा आणि आश्रमशाळा सुरु केल्या. असेच काम शहापूर मध्ये श्री विठ्ठल खाडे यांनी केले. किन्हवली परिसरामध्ये गंगाराम भेरे यांनी मोलाचे शिक्षण प्रसाराचे कार्य केले. स्वातंत्र्यसैनिक आणि समाजसुधारक किसनबाबा भेरे यांनीसुद्धा समाजामध्ये सामाजिक जागृती करण्यमध्ये मोलाची भूमिका निभावली. अंधश्रद्धा निर्मुलन आणि, स्त्रियांच्या संदर्भात त्यांचे कार्य कुणबी समाजात जागृती करणारे ठरले. या सर्व बाबींचा दूरगामी परिणाम ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजावर झाला आहे.

**धार्मिक बदल-** ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज धर्माने हिंदू असून येथील रूढी, परंपरा, चालिरीती, ह्या वैशिष्ट्यपूर्ण आहेत. आजही त्यामध्ये फारसा बदल झाला नाही. हिंदू धर्मातील शिव, कृष्ण, विठ्ठल-रुक्मीणी, दत्तात्रय, लोकप्रिय असून महाराष्ट्राच्या कुलदेवता आणि लोकदेवता खंडोबा, तुळजाभवानी, ह्या भक्तीभावाने पुजल्या जातात. याचबरोबर ठाणे जिल्ह्यातील स्थानिक देवता वाघोबा, चेरोबा, हातोबा, माळोबा, साथीअश्रा, अनसई, शिधोबा, वेताळ अश्या देवता ठाणे जिल्ह्यातील विविध भागात लोकप्रिय असून त्यांचे आजही तितक्याच भक्तीभावाने पूजन केले जाते.

पूर्वीपासून ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजात वारकरी आणि नाथ संप्रदाय लोकप्रिय असून हजारोंच्या संख्येने येथील वारकरी दरवर्षी आळंदी आणि पंढरपूर येथे वारीसाठी जातात. त्याचबरोबर नाथ संप्रदायाचे अनेक मठ ठाणे जिल्ह्यातील विविध भागात असून त्यांनी नाथपंथीय साधूंनी ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या आध्यात्मिक उन्नत्ती मध्ये मोलाचे योगदान दिले आहे. टाकीपठार, संगम, चेरवली, माळ येथील मठांना शेकडो वर्षाची ऐतिहासिक परंपरा आहे. आजही हे मठ समाजातील लोकांना धार्मिक, आध्यत्मिक मार्गदर्शन करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावत आहे.

धार्मिक बदलांच्या अनुशंघाने पहिले तर स्थानिक इतर समाजांच्या अनेक देवता तसेच दक्षिण आणि उत्तर भारतात पुजल्या जाणाऱ्या अनेक देवता ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजात लोकप्रिय झाल्या असून त्यामध्ये प्रामुख्याने एकविरा देवी, बालाजी, अय्यपा, या सारख्या देवता लोकप्रिय झाल्या आहेत.

**सांस्कृतिक बदल-** ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजावर स्वातंत्र्योत्तर कालखंडात शहरी समाजाचा प्रभाव वाढला. ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजातील लोकांनी मोठ्या संख्येने रोजगारासाठी शहरांकडे स्थलांतर केले. त्यांच्यावर मराठीतर उत्तर भारतीय आणि दक्षिण भारतीय लोकांचा, त्यांच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बाबींचा प्रभाव पडला. त्यांच्या अनुकरणाने ग्रामीण भागातही मोठे सांस्कृतिक बदल दिसून येवू लागले. गणेशोत्सव, दिवाळी या पारंपारिक सणांचे स्वरूप बदलले. सण साजरे करण्याच्या पद्धतीमध्ये बदल झाले. दक्षिण आणि उत्तर भारतीयांच्या सहवासाने त्यांचे अनेक सण कुणबी समाजाने आपलेसे केले आहे. नवरात्र दांडिया हा तर पूर्ण महाराष्ट्रामध्ये लोकप्रिय झाला आहे.

विवाहपद्धतीमध्ये मोठे बदल घडून आले आहेत. पूर्वी साधेपणे कमी खर्चात केले जाणारे विवाहांचे स्वरूप बदलले आहे. विवाह अधिक भपकेबाज आणि खर्चिक झाले आहेत. पारंपारिक उटणे लावणे, हळद लावणे, दैवक बसवणे या विवाहातील प्रथा चालूच असल्या तरी त्यात कालोघात अनेक बदल झाले आहेत. प्रत्यक्ष विवाह सोहळ्यात सुद्धा बदल झाले आहेत. सप्तपदी, लाजाहोम , कन्यादान हे विधी पूर्ववत होत असले तरी त्यांचे स्वरूप अमुलाग्र बदलले आहे. संगीत, मेहेंदी, आणि इतर अनेक गोष्टी विवाहाचा आवश्यक भाग बनल्या आहेत. एकूणच कुणबी समाजाच्या संस्कृती मध्ये पारंपारिक आणि आधुनिकतेचा संगम झालेला दिसून येतो.

**बोलीभाषेत झालेले बदल-** ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण अशी बोलीभाषा आहे. मुरबाड, शहापूर आणि कल्याण तालुक्याच्या ग्रामीण भागात कुणबी समाजाची वैशिष्ट्यपूर्ण अशी मुरबाडी बोली प्रसिद्ध आहे. तर भिवंडी अंबरनाथ, कल्याण ह्या भागातील कुणबी समाजाच्या बोलीवर स्थानिक आगरी समाजाच्या बोलीभाषेचा प्रभाव दिसून येतो. मात्र आधुनिक शिक्षण , आणि महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने इतर जिल्ह्यातून आलेल्या लोकांच्या सहवासामुळे स्थानिक बोलीवर शुद्ध मराठीचा प्रभाव वाढला आहे. परिणामी स्थानिक बोलीभाषेत बोलणाऱ्या लोकांची संख्या दिवसोंदिवस कमी होत चालली आहे.

**खाद्य संस्कृतीमधील बदल-** स्थलांतरित लोकांच्या सहवासाने तसेच आधुनिकीकरणामुळे ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजाच्या खाद्य संस्कृतीमध्ये अनेक बदल झाले आहेत. दक्षिण भारतीयांच्या प्रभावाने घराघरांत आणि हॉटेलमध्ये इडली, डोसा, मेदू वडा आणि उत्तप्पा हे पदार्थ रोजच्या नाश्त्याचा भाग बनले आहेत. तर गुजराती समाजाच्या प्रभावाने ढोकळा, फाफडा, खांडवी आणि श्रीखंड हे पदार्थ अत्यंत लोकप्रिय झाले आहेत. राजस्थानी आणि पंजाबी लोकांच्या सहवासातून दाल-बाटी, पराठे, छोले-भटुरे आणि पनीरचे विविध प्रकार आता लग्न कार्यामध्ये आणि हॉटेलमधील अविभाज्य भाग बनले आहेत. याचबरोबर वडापाव, पावभाजी , चायनीज पदार्थ अगदी ग्रामीण भागातही अत्यंत लोकप्रिय झाले आहेत.

**चालीरीती रूढी परंपरा यातील बदल-** ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाज हा रूढी प्रिय आणि परंपरा बद्ध असा समाज होता आजही कुणबी समाजाच्या अनेक रूढी परंपरा चालीरीती बदलत्या काळातही टिकून आहेत. मात्र काही चालीरीती , रूढी परंपरा कालोघात बंद झाल्या किंवा त्यांचे स्वरूप बदलले आहे.

कुणबी समाज हा मुख्यत: कृषी आधारित असल्याने त्यच्या अनेक प्रथा, रूढी ह्या कृषी कार्याशी संबंधित आहेत जसे जमिनीचे पूजन , नांगर, कृषी उपकरणे यांचे पूजन करणे. शेती संबंधी अनके शेतांजवळ दुष्ट आत्म्यांचा वास असतो असा समज कुणबी समाजात आहे. अनेक स्थानिक देव शेतीची आणि लोकांचे रक्षण करतात, त्यांना नारळ, खोबरे कोंबडे, बकरे अर्पण करण्याची प्रथा प्रचलित आहे. कापणीच्या वेळी शेतात जमा झालेल्या नवीन धान्याची पूजा करण्याची प्रथा आहे कुणबी समाजात आहे.

गुरे ही शेतकऱ्याची संपत्ती मानली जाते या गुरांचे रक्षण करण्यासाठी ग्रामदेवतेचे आवाहन केले जाते. लोक ग्रामदेवतेच्या जत्रेत पक्षी आणि नारळ अर्पण करतात आणि त्यांना त्यांच्या गुरांचे आणि पिकांचे रक्षण करण्याची विनंती करतात. दर तिसऱ्या वर्षी देवतेला बकरी अर्पण करावी लागते आणि तिच्या सन्मानार्थ वार्षिक जत्रा भरवल्या जातात.

वन्य डुकरांपासून पिकांचे संरक्षण करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील उंबरगांव आणि इतर गावांमध्ये लोक दरवर्षी गणेश चतुर्थीला त्यांच्या शेतात आयना या वृक्षाच्या फांद्या लावतात. ठाणे जिल्ह्यातील मुरबाड मध्ये वेताळ हा भूतांचा राजा मानला जातो व तो परोपकारी असतो असे मानले जाते असाच समाज इतर तालुक्यांमध्येही आहे.

ठाणे जिल्ह्यातील पडघे आणि आसपासच्या इतर परिसरात समंध , मुंज, देवचार,यांसारखी पिशाच्च राहत असलेले वृक्ष त्यांच्या भीतीमुळे कापले जात नाहीत. जेव्हा एखादा वृक्ष छाटला जातो त्यावेळी त्याच्या मुळांवर तेथे पिशाच्चांनी वास करू नये म्हणून थेथे दगड ठेवण्याची प्रथा आहे. .

आरोग्य, संपत्ती आणि मुले आणि शिक्षण इत्यादी इतर इच्छित वस्तू सुरक्षित करण्याच्या उद्देशाने लोक देवांना नवस करतात. श्रद्धांबरोबरच काही अंधश्रद्धा कुणबी समाजात दिसून येतात. त्यामधील प्रमुख म्हणजे करणी करणे अथवा काळी जादू करणे होय. आजही याप्रकारावर श्रद्धा ठेवणारे अनेक लोक ग्रामीण भागात पहायला मिळतात. मात्र शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि आधुनिकतेच्या प्रसारामुळे यातील अनेक प्रथा परंपरा यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. अनेक अंधश्रद्धा कमी झाल्या आहे. देवांना बळी देण्याचे प्रमाणही कमी झाले आहे.

**निष्कर्ष-**

स्वातंत्र्योत्तर कालखंडात ठाणे जिल्ह्यातील कुणबी समाजामध्ये बरेच बदल झाले आहेत. पारंपरिक कृषी संस्कृती कडून अर्धनागरी नागरी संस्कृतीकडे समाजाची वाटचाल सुरु आहे. या समाजाने गेल्या काही काळात अनेक सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक बदल स्वीकारले आहेत. देशाच्या आणि राज्याच्या विविध भागातून येथे झालेल्या स्थलांतराचा आणि स्थलांतरितांच्या संस्कृतीचाही येथील कुणबी समाजावर परिणाम झाला आहे. शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. वाढत्या शिक्षण आणि रोजगाराच्या संधी यामुळे महिलांच्या समाजातील स्थानात बदल झाला आहे. स्वातंत्र्यानंतर औद्योगिकीकरण व शहरीकरणामुळे कृषी जीवनशैली मध्ये मोठ्या प्रमाणावर बदल झाले आहेत. गावांतील पारंपरिक रूढी परंपरा आणि उत्सवांमध्ये अनेक बदल घडले आहेत.

एकूणच कुणबी समाजाचे जीवन विविध क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर बदलले आहे. शिक्षण, रोजगाराच्या संधी, राजकीय ओळख, आर्थिक स्थिती आणि सांस्कृतिक बदल या सर्व गोष्टींमध्ये बदल होऊन आज समाजाच्या स्थितीत मोठे परिवर्तन घडले आहे. पारंपरिक सामाजिक आणि सांस्कृतिक संरचना बदलली आहे. तरीही स्थानिक कुणबी समाज आपल्या अनेक वैशिष्ट्यपूर्ण अश्या चालीरीती, संस्कृती बदलत्या काळातही अभिमाने टिकवून आहे. आगामी जनगणनेमध्ये जातीय माहिती संकलित होण्याची शक्यता आहे त्यामुळे ठाणे कुणबी समाजाची अचूक सांख्यिकी माहिती प्राप्त होईल, ज्याद्वारे पुढील काळात सरकारला या समाजाच्या सामाजिक-आर्थिक उन्नत्ती साठी योजना आखताना ही माहिती उपयुक्त ठरेल.

**संदर्भ सूची-**


1. प्रा. शिंदे विश्वनाथ, संपादक डॉ. भोसले द. ता. , लोकजीवन आणि लोकसंस्कृती , महाराष्ट्र राज्य साहित्य आणि सांस्कृतिक मंडळ, मुंबई, एप्रिल २००५
2. प. जोशी महादेवशास्त्री , भारतीय संस्कृतीकोश खंड दुसरा, भारतीय संस्कृतीकोश मंडळ, पुणे, १९६४
3. डॉ बापट आसावरी उदय, ए एम. टी. जॅक्सन कोकणची लोकसंस्कृती, पद्मगंधा प्रक्षण, पुणे २०१५,
4. डॉ. सहस्त्रबुद्धे अनिल, उषा अनिल सहस्त्रबुद्धे, लोकसंस्कृती आणि लोकसाहित्य,
5. वरखेडे रमेश, मराठी लोकगीते संस्कृती अभ्यासाची साधने, साहित्य अ, पृ. कादमी , नवी दिल्ली, पहिली आवृत्ती, २०१४

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

6. रा . ची. ढेरे, लाज्जागौरी , श्रीविद्या प्रकाशन, पुणे, पहिली आवृत्ती,
7. प्रभुदेसाई प्रल्हाद कृष्ण , देविकोश खंड ३, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ , पुणे,नोव्हेबर १९६८
8. Enthoven R. E. And Jackson A. M. T., Folk Lore Notes Vol. II—Konkan, eBook, www.gutenberg.org. July 16, 2018

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ठाणे जिल्ह्यातील पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांचा तुलनात्मक अवकाशीय विश्लेषण (२०१८ ते २०२५)

**प्रा.स्वाती बा.शिंदे[1] डॉ. अंजली कदम[2]**
[1]संशोधक विद्यार्थीनी,एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई.
[2]संशोधक मार्गदर्शक, कला आणि विज्ञान महिला महाविद्यालय,पुणे.
**Email:** swatishinde5551@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180412
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 49-55
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा***

*प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही केंद्र सरकारने स्वयंरोजगार निर्मितीसाठी सुरू केलेली योजना आहे. या योजने अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील लाभार्थ्यांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले असून, यात ग्रामीण व शहरातील लाभार्थी, लिंग, शिक्षण, व्यावसायिक प्रकारानुसार लाभार्थ्यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. हा संशोधन निबंध ठाणे जिल्हा उद्योग कार्यालयातुन मिळालेल्या दुय्यम माहिती स्त्रोतावर आधारित आहे. संशोधन लघु शोध निबंधातील मिळवलेली माहितीचा कालावधी हा २०१८ ते २०२५ आहे. एकूण १८१ लाभार्थींनी या योजनेतून लाभ घेतलेला आहे. त्यातील माहिती एकत्र करून शेकडेवारी पद्धत, सरासरी पद्धत तसेच आलेखाच्या साह्याने वर्णनात्मक व तुलनात्मक विश्लेषण केले आहे. शहरी भागातील लाभार्थी ७०.७१%तर ग्रामीण भागातील लाभार्थी २९.२८%आहेत. शिक्षणाच्या विविध स्तरांनुसार शहरी भागात उच्च शिक्षित वर्गांचे प्रमाण अधिक आहे. भौगोलिक स्थान भिन्नता तपासलेली आहे, शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनं मध्ये लक्षणीय फरक दिसून येत आहे. त्यानुसार लिंग, वय, शिक्षण, व्यावसायिक प्रकारानुसार वर्गीकरण करण्यात आले आहे. त्यातील फरक समजून घेऊन तुलनात्मक विश्लेषण केले आहे. या तुलनात्मक विश्लेषण करताना त्यातून अवकाशीय दृष्टिकोन स्पष्ट करण्यात आला आहे. या संशोधनातून स्पष्ट होते की भौगोलिक स्थान हे उद्योजकतेवर प्रभाव टाकते.*

***मुख्य शब्द:*** *PMEGP, ठाणे जिल्हा, शहरी व ग्रामीण भाग तुलना, लिंग, वय, शिक्षण, व्यावसायिक प्रकार.*

## प्रस्तावना

महाराष्ट्रामधील औद्योगिकदृष्ट्या प्रगत जिल्ह्यांपैकी ठाणे जिल्हा हा कोकण विभागा मधील महत्त्वाचा जिल्हा आहे. जनगणना २०११ नुसार लोकसंख्येच्या दृष्टीने ठाणे जिल्हा राज्यात तिसऱ्या क्रमांकावर आहे. औद्योगिक विकासाच्या दृष्टीने जिल्ह्याचा राज्यात अग्रक्रम आहे. दक्षिण व पश्चिम भागात उद्योगांचे केंद्रीकरण दिसून येते. लोखंड साहित्य, पॉवरलूम व कापड उद्योग येथे विकसित झाले असून लघुउद्योग मोठ्या प्रमाणात चालतात. विशेषतः भिवंडी येथील पॉवरलूम उद्योग प्रसिद्ध असून औद्योगिकीकरणामुळे कुशल व अकुशल कामगारांना मोठ्या प्रमाणावर रोजगार उपलब्ध झाला आहे.

भारतामध्ये स्वयंरोजगार वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही महत्त्वाची योजना आहे. ही योजना २००८ साली सुरू करण्यात आली असून बेरोजगार तरुण-तरुणी व महिलांना उद्योग स्थापनेसाठी आर्थिक सहाय्य देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*स्वाती बा.शिंदे,संशोधक विद्यार्थीनी,एस.एन.डी.टी महिला विद्यापीठ, चर्चगेट, मुंबई.*

**How to cite this article:**
*स्वाती बा.शिंदे, & अंजली कदम. (2026). ठाणे जिल्ह्यातील पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेतील ग्रामीण व शहरी लाभार्थ्यांचा तुलनात्मक अवकाशीय विश्लेषण (२०१८ ते २०२५).* Journal of Research & Development, *18(4(*XV)), *49–55.* https://doi.org/10.5281/zenodo.21254670

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254670

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

भारतामध्ये स्वयंरोजगार वाढीसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांपैकी प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम ही महत्त्वाची योजना आहे. ही योजना २००८ साली सुरू करण्यात आली असून बेरोजगार तरुण-तरुणी व महिलांना उद्योग स्थापनेसाठी आर्थिक सहाय्य देणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. राष्ट्रीयकृत बँकांमार्फत कर्जपुरवठा केला जातो आणि खादीग्राम उद्योग मंडळ व जिल्हा उद्योग केंद्रा मार्फत अंमलबजावणी होते. उत्पादन उद्योगांसाठी कमाल २५ लाख व सेवा उद्योगांसाठी १० लाख रुपयांपर्यंत कर्ज दिले जाते. लाभार्थ्यांना ५-१०% स्व-भांडवल गुंतवावे लागते आणि बँकांचा सहभाग ९०-९५% असतो. सर्वसाधारण गटासाठी शहरी भागात १५% व ग्रामीण भागात २५% अनुदान मिळते, तर अनुसूचित जाती-जमाती, इतर मागासवर्ग, अल्पसंख्यांक, माजी सैनिक, महिला इत्यादींसाठी शहरी भागात २५% व ग्रामीण भागात ३५% अनुदान मिळते. २००८ ते २०१५ दरम्यान महाराष्ट्र राज्यात जिल्हा उद्योग केंद्रामार्फत १४४० प्रकल्प मंजूर झाले होते व सुमारे ४७% रोजगार निर्मिती झाली होती.

२०१८ ते २०२५ या कालावधीमध्ये PMEGP या योजने अंतर्गत ठाणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रामार्फत १८१ प्रकल्पांना मंजुरी मिळाली आहे.

ठाणे जिल्हा हा महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्ट्या विकसित जिल्हा मानला जातो. तथापि, जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागांमध्ये प्रादेशिक विषमता स्पष्टपणे दिसून येते. औद्योगिकीकरण, पायाभूत सुविधा, शिक्षण व आर्थिक संधींचे वितरण हे सर्व घटक भौगोलिकदृष्ट्या असमान आहेत. त्यामुळे प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमाचा अवकाशीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे आवश्यक ठरते. अशा अभ्यासातून ग्रामीण-शहरी लाभार्थ्यांचे वितरण, लिंग, वय, शिक्षण प्रमाण, व्यावसायिक क्षेत्रातील योगदान आणि रोजगार निर्मितीतील प्रादेशिक तफावत स्पष्ट केली आहे.

अवकाश ही भौतिक विश्वाशी निगडित मूलभूत संकल्पना आहे. भौतिक विश्वातील संकल्पना स्पष्ट करणे, त्यांचे परस्परसंबंध रेखाटणे आणि त्यांचे तात्त्विक विश्लेषण करणे हे कार्य तत्त्वज्ञान आणि विज्ञान या दोन्ही क्षेत्रांत मोडते. अर्थशास्त्रात दोन चल घटकांतील परस्परसंबंध, त्यांतील फरक व परस्परावलंबित्व यांचे विश्लेषण केले जाते. हे विश्लेषण जेव्हा भौगोलिक किंवा प्रादेशिक संदर्भात केले जाते, तेव्हा अवकाश संकल्पना अधिक स्पष्ट होते. लिंग, वय, शिक्षण प्रमाण, व्यावसायिक क्षेत्रातील योगदान त्यातील फरक, त्यातील परस्परावलंबित्व यांचे तुलनात्मक विश्लेषण करताना त्यातून अवकाशीय दृष्टिकोन अधिक स्पष्ट होतो.

**संशोधन आढावा**

आत्लमश अ (२०२०) या संशोधन प्रबंधानुसार कृषीप्रधान व मागास भागात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेमुळे उद्योगकतेला चालना मिळून शाश्वत रोजगार निर्मिती झाली आहे. ही योजना दारिद्र्य व बेरोजगारी कमी करण्यासाठी प्रभावी ठरली असून, वित्तीय मदतीमुळे तरुण युवकांना व महिलांना स्वावलंबनाची संधी मिळाली आहे.

पूनम (२०१९) या संशोधन प्रबंधात उत्पादन क्षेत्रातील उद्योगांची संख्या सेवा क्षेत्रापेक्षा अधिक आहे. अर्ज व मंजूर कर्ज यामध्ये तफावत आढळून आल्याने शासनाच्या धोरणाच्या अंमलबजावणीत त्रुटी दिसून येतात.

किरण पी (२०२०) प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेमुळे लाभार्थ्यांच्या सामाजिक आर्थिक स्थितीत, उत्पन्नात व रोजगार निर्मिती लक्षणीय सुधारणा झाल्याचे आढळून आले. तथापि विपणन व कच्चा माला संबंधी अडचणी असूनही या योजने मुळे दारिद्र्य व बेरोजगारी कमी होण्यास मदत झाली आहे.

**संशोधन आढावा अंतर**

वरील संशोधन प्रबंधात ग्रामीण व शहरी भागातील भौगोलिक स्थान भिन्नता तपासलेली नाही. शाश्वत विकास व उद्योगातील टिकाऊ दर,महिला उद्योजक अनुभव अपुरे आहे, अर्ज व मंजूर कर्जामधील तफावत, बँकिंग व धोरणात्मक घटकांची कारणे, त्यातील सखोल अभ्यास केलेले आढळत नाही, विपणन,कच्चामाल, उद्योगांच्या अडचणी, नफा क्षमतेवर व वाढीवर झालेला परिणाम स्पष्टपणे दिसत नाही. उपलब्ध साहित्यामध्ये ठाणे जिल्ह्याच्या संदर्भात अवकाशीय विश्लेषण आढळून येत नाही. त्यामुळे भौगोलिक लिंग आधारित व क्षेत्रनिहाय तुलनात्मक विश्लेषणासह दीर्घकालीन परिणामानचे अभ्यास आवश्यक असल्याचे संशोधनातील हे अंतर दिसून येते.

**उद्दिष्टे :**

1 शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे संख्यात्मक तुलनात्मक विश्लेषण

2 लिंगानुसार वितरणाचे विश्लेषण करणे

3 शिक्षणानुसार लाभार्थ्यांची तुलना करणे

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

4 उत्पादन व सेवा क्षेत्रातील भौगोलिक फरकानुसार तुलनात्मक अभ्यास करणे

**गृहितक :**

शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांन मध्ये लक्षणीय फरक आहे.

**संशोधन पद्धती :** प्रस्तुत लघु शोध निबंध मध्ये वर्णनात्मक आणि तुलनात्मक पद्धतीचा वापर केला आहे.

**अभ्यासाचे क्षेत्र:** ठाणे जिल्ह्यातील प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या शासकीय योजनेतील अभ्यास केला आहे.

**संशोधन माहितीचे स्त्रोत व व्याप्ती:**

संशोधनार्थीने ठाणे जिल्ह्यातील जिल्हा उद्योग केंद्रातून विविध योजनांची माहिती मिळविली, त्यातील प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेतील लाभार्थ्यांची मिळालेली माहितीचे विश्लेषण शहरी आणि ग्रामीण क्षेत्रानुसार केले आहे. त्यात महिला पुरुषांचे वर्गीकरण करून त्यातील त्यांच्या सहभागातील विश्लेषण, वय, शिक्षण, व्यवसाय क्षेत्रातील योगदान त्यातील फरकाचे तुलनात्मक विश्लेषण केले आहे व त्यातील अवकाशीय दृष्टिकोन स्पष्ट केला आहे.

**संशोधन मर्यादा :** या लघु शोध निबंधातील अभ्यास केवळ दुय्यम माहितीवर आधारित आहे व अभ्यास ठाणे जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

**विश्लेषण तंत्र:** प्रस्तुत लघु शोध निबंध मध्ये टक्केवारी पद्धती वापरून विश्लेषण केलेले आहे.

**माहितीचे विश्लेषण**

**अ) भौगोलिक क्षेत्रानुसार वितरण**

या योजने अंतर्गत शहरी भागातील लाभार्थ्यांचे एकूण प्रमाण ७०.७१% आहे तर ग्रामीण भागातील लाभार्थ्यांचे एकूण प्रमाण २९.२८% आहे.

**ब) PMEGP लाभार्थी लोकसंख्येचे वितरण**

तक्ता क्र.१: ग्रामीण व शहरी क्षेत्र, व्यावसायिक लाभार्थी लोकसंख्येचे वितरण

| | शहरी क्षेत्र | | ग्रामीण क्षेत्र | |
|---|---|---|---|---|
| व्यावसायिक प्रकार | पुरुष लाभार्थी टक्केवारी | महिला लाभार्थी टक्केवारी | पुरुष लाभार्थी टक्केवारी | महिला लाभार्थी टक्केवारी |
| उत्पादन क्षेत्र | १४ | १३ | ७ | ६ |
| सेवा क्षेत्र | २६ | १७ | १३ | ४ |
| एकूण | ४० | ३० | २० | १० |

*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

या योजने अंतर्गत शहरी भागातील उद्योग व सेवा व्यवसायात कार्यरत असणाऱ्या एकूण पुरुष लाभार्थी प्रमाण ४०% आहे, महिलांचे प्रमाण ३०% आहे आणि ग्रामीण भागात उद्योग व सेवा व्यवसायात कार्यरत असणाऱ्या एकूण पुरुष लाभार्थी प्रमाण २०% आहे व महिलांचे प्रमाण १०% आहे. शहरी भागातील लाभार्थ्यांची संख्या ही ग्रामीण भागातील लाभार्थ्यांपेक्षा अधिक आहे, शहरी भागातील महिलांचे प्रमाण ग्रामीण भागातील महिलांच्या तुलनेने अधिक आहे ग्रामीण भागातील लाभार्थी महिलांची संख्या ही खूप कमी आहे.

**क) वयानुसार वितरण**

प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेतील लाभार्थ्यांच्या लिंगनिहाय वितरणावरून असे दिसून येते की एकूण लाभार्थ्यांपैकी पुरुषांचे प्रमाण ६० टक्के तर महिलांचे प्रमाण ४० टक्के आहे. वयोगटानुसार विश्लेषण केल्यास पुढील चित्र स्पष्ट होते —

तक्ता क्र.२: PMEGP योजनेतील लाभार्थ्यांच्या वयोगटानुसार टक्केवारी (%)विश्लेषण

| वयोगट/ वर्षे | पुरुष लाभार्थी | महिला लाभार्थी |
|---|---|---|

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

| | | |
|---|---|---|
| १८ ते २० | ३ | १ |
| २१ ते ३० | २३ | ८ |
| ३१ ते ४० | १८ | १८ |
| ४१ ते ५० | १० | ९ |
| ५१ ते ६० | ६ | ४ |

*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

१८ ते २० वर्षे वयोगटात सर्वात कमी लाभार्थी आढळतात. यामध्ये पुरुषांचे प्रमाण ३ टक्के तर महिलांचे प्रमाण केवळ १ टक्के आहे.
२१ ते ३० वर्षे वयोगटात पुरुष लाभार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक असून ते २३ टक्के आहे, तर महिलांचे प्रमाण ८ टक्के आहे.
३१ ते ४० वर्षे वयोगटात पुरुष व महिला लाभार्थ्यांचे प्रमाण समान असून ते प्रत्येकी १८ टक्के आहे.
४१ ते ५० वर्षे वयोगटात पुरुष लाभार्थी १० टक्के तर महिला लाभार्थी ९ टक्के आहेत.
५१ ते ६० वर्षे वयोगटात पुरुषांचे प्रमाण ६ टक्के तर महिलांचे प्रमाण ४ टक्के आहे.




**आकृती क्र. १ PMEGP योजनेतील लाभार्थ्यांच्या वयानुसार वितरण**

*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

वरील आकडेवारीवरून असे स्पष्ट होते की २१ ते ४० वर्षे या वयोगटामध्ये पुरुष लाभार्थ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. त्या तुलनेत महिला लाभार्थ्यांचे प्रमाण कमी असल्याचे दिसून येते. यावरून असे निष्कर्ष काढता येतो की उद्योजकतेकडे वळणाऱ्या पुरुषांची संख्या तरुण व मध्यम वयोगटात अधिक आहे, तर महिलांचा सहभाग तुलनेने मर्यादित आहे.

**ड) शिक्षणानुसार विश्लेषण**

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण झालेल्या लाभार्थ्यांचे प्रमाण हे ४०% आहे, उच्च माध्यमिक शिक्षण घेतलेले लाभार्थी ३१% आहे, पदवी शिक्षण घेतलेले लाभार्थी २०% आहे, पदव्युत्तर शिक्षण घेतलेले लाभार्थी ३.५% आहे, व्यावसायिक पदवी शिक्षण झालेले ५%आहेत. शहरी भागातील शिक्षण, मार्गदर्शन, प्रशिक्षण, बाजारपेठेचे उपलब्धता इत्यादी घटक उपलब्ध असल्याकारणाने शहरी भागातील लाभार्थी अधिक सक्रिय असलेले दिसत आहेत.

तक्ता क्र.३: PMEGP योजनेतील लाभार्थ्यांच्या शिक्षणानुसार टक्केवारी(%)विश्लेषण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

| शिक्षण | शहरी टक्केवारी % | ग्रामीण टक्केवारी % | एकूण टक्केवारी % |
|---|---|---|---|
| प्राथमिक व माध्यमिक | २६ | १४ | ४० |
| उच्च माध्यमिक | २५ | ६ | ३१ |
| पदवी | १४ | ६ | २० |
| पदव्युत्तर | ३ | ०.५ | ३.५ |
| व्यावसायिक पदवी | २ | ३ | ५ |
| एकूण | ७० | ३० | १०० |

*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

***आकृती क्र. २ शिक्षणानुसार विश्लेषण***




*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

ग्रामीण भागात शिक्षणाचा अभाव असल्यामुळे उद्योग,सेवा व्यवसाय क्षेत्रात कमी शिक्षणामुळे लाभार्थींची संख्या कमी असलेली दिसते.

**इ) व्यावसायिक क्षेत्रानुसार विश्लेषण**

तक्ता क्र. ४ व्यावसायिक क्षेत्रानुसार विश्लेषण

| व्यावसायिक क्षेत्र प्रकार | शहरी टक्केवारी | ग्रामीण टक्केवारी | एकूण % |
|---|---|---|---|
| उत्पादन क्षेत्र | २६ | १३ | ३९ |
| सेवा क्षेत्र | ४४ | १६.५ | ६०.५ |
| एकूण | ७० | २९.५ | ९९.५/१०० |

*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

***आकृती क्र. ३ व्यावसायिक क्षेत्रानुसार विश्लेषण***

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026




*स्रोत: जिल्हा उद्योग केंद्र कार्यालय, ठाणे. (PMEGP २०१८ ते २०२५)*

शहरी भागात उत्पादन क्षेत्रात कार्यरत असणारा लाभार्थी वर्ग २६% तर ग्रामीण भागात १३% वर्ग कार्यरत आहे, सेवा क्षेत्रानुसार शहरी भागात ४४% व ग्रामीण भागात १६.५% लाभार्थी वर्ग कार्यरत आहे. शहरी भागात सर्वात अधिक सेवा क्षेत्रात कार्यरत असणारे लाभार्थी आहेत. भौगोलिक स्थानातील अवकाश हा लिंग व शिक्षणावर प्रभाव टाकताना दिसून येतो. ज्यामुळे उद्योगाच्या प्रकारानुसार उद्योग निहाय विकास यातील सुस्पष्टता येते. शहरी भागात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमा अंतर्गत लाभार्थ्यांचे प्रमाण अधिक असलेले दिसते, त्यातील महिलांचा सहभाग हा ग्रामीण भागापेक्षा शहरी भागात तुलनेने अधिक आहे.

**निष्कर्ष**

शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांन मध्ये लक्षणीय फरक दिसून येत आहे. शहरी भागात पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रमातील लाभार्थ्यांचे प्रमाण जास्त आहे. शहरी भागातील लाभार्थ्यांचे प्रमाण हे ७०% आहे, हे ग्रामीण भागातील प्रमाण ३०% आहे, शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांनच्या तुलनेत शहरी भागात लाभार्थी अधिक आहे यावरून स्पष्ट होते की या योजनेची अंमलबजावणी शहरी भागात अधिक प्रभावी झालेली आहे. गृहितक स्वीकारले जाते की शहरी व ग्रामीण भागातील लाभार्थ्यांमध्ये लक्षणीय फरक आहे. महिला लाभार्थ्यांचे प्रमाण शहरी भागातून अधिक आहे. शिक्षण पातळीनुसार शहरी भागातील उच्च शिक्षित लाभार्थ्यांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात व्यावसायिक क्षेत्रानुसार सेवा क्षेत्रात वर्चस्व स्पष्ट दिसून येते. ग्रामीण भागात महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे. यावरून महिला उद्योजकतेला व विकासाला मर्यादा असल्याचे दिसून येते. शिक्षण पातळी वाढल्यास उद्योजकतेतील सहभागात गुणात्मक बदल होऊ शकतो.

औद्योगिकीकरणात उत्पादन आणि सेवा क्षेत्र हे महत्त्वाचे क्षेत्र असून वरील माहितीवरून शहरी भागात सेवा क्षेत्राचा अधिक सहभाग दिसून येत आहे.

वरील माहितीच्या विश्लेषणानुसार भौगोलिक क्षेत्र शहरी ग्रामीण वर्गीकरण करून लिंग, शिक्षण, व्यावसायिक क्षेत्रानुसार वर्गीकरण करून त्यातील फरक तुलनात्मक स्पष्ट केला आहे. त्यामुळे उद्योजक्तातील विकास व त्यातील लाभार्थ्यांचा सहभाग हा भौगोलिक अवकाशीय दृष्टिकोनातून स्पष्ट होतो.

**अवकाशीय दृष्टिकोन**

भौगोलिक स्थान, शिक्षण, प्रशिक्षण, बाजारपेठेची उपलब्धता, वित्तीय संस्था यांचा शहरी भागातील सहभागावर सकारात्मक प्रभाव असलेला दिसून येतो. अभ्यासातील आकडेवारीनुसार शहरी भागातील पुरुषांचे प्रमाण ४०%व महिला लाभार्थ्यांचे प्रमाण ३०%आहे, ग्रामीण भागातील पुरुषांच्या प्रमाण२०% व महिला लाभार्थ्यांचे प्रमाण१०% आहे. यावरून दिसून येते की शहरी भागातील लाभार्थ्यांचे प्रमाण ग्रामीण भागातील लाभार्थ्यांपेक्षा तुलनेने अधिक आहे, शहरी भागातील भौगोलिक स्थान हे महिला सहभागासाठी तुलनेने अनुकूलन वातावरण निर्माण करते. तर ग्रामीण भागामध्ये सामाजिक बंधने, पायाभूत सुविधांचा आभाव, मर्यादित बाजारपेठ यामुळे महिलांचा सहभाग कमी दिसून येतो. त्यामुळे स्पष्टपणे शहरी भागामधील महिलांचा प्रमाण आणि ग्रामीण भागातील महिलांचे प्रमाण यात अवकाशीय फरक स्पष्ट दिसतो.

शिक्षण हा उद्योजकतेतील यशाचा एक सकारात्मक मार्ग आहे. या अभ्यासात ४०% लाभार्थी प्राथमिक माध्यमिक शिक्षित आहेत, तर पदवीधर व त्यापूढील शिक्षण घेतलेल्यांचे प्रमाण तुलनेने कमी आहे. त्यामुळे येथे ग्रामीण आणि शहरी भागातील शिक्षण यातील तफावत स्पष्ट दिसून येते.

या अभ्यासातून स्पष्ट होते की वय लिंग शिक्षण, व्यवसाय प्रकार व या सर्व घटकातील अवकाश हे परस्परावलंबी घटक आहेत. व ते उद्योजकतेतील सहभाग ठरवितात. ग्रामीण आणि शहरी भागातील तफावत व महिला सहभागातील मर्यादा लक्षात घेता अवकाशीय दृष्टिकोन स्पष्ट दिसून येतो.

**शिफारशी**

ग्रामीण भागात महिला प्रशिक्षण कार्यक्रम वाढविणे आवश्यक आहे, उच्च शिक्षितांना ग्रामीण उद्योगांसाठी प्रोत्साहन देऊन उद्योजकता विकासाला चालना देता येईल, ग्रामीण भागात बाजार पेठ व इतर पायाभूत सुविधा वाढविणे गरजेचे आहे. जिल्हा उद्योग केंद्रातून जिल्हा व तालुका स्तरावर जागरूकता अभियान राबविले गेले पाहिजे.

**संदर्भ सूची :**

1. Atlamash, A. (2020). PMEGP in Maharashtra: A study of selected districts. Swami Ramanand Teerth University.
2. Kiran, P. (2020). Promise and problems of poverty alleviation programmes with special reference to PMEGP. Kakatiya University.
3. Poonam. (2019). Entrepreneurship development under Prime Minister’s Employment Generation Programme. Maharshi Dayanand University.
4. District Industries Centre, Thane. (2025). PMEGP beneficiary data (2018–2025). Government of Maharashtra.
5. Government of Maharashtra. (2025). Directorate of Industries. https://di.maharashtra.gov.in
6. Government of India. (2025). Prime Minister’s Employment Generation Programme guidelines. https://www.kviconline.gov.in
7. Joshi, Laxman Shashtri,(2019), Marathi Vishvakosh. Khand1, Bhartiy Tattavdnyan. https://marathivishwakosh.org/18739/,03/08/2019,

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# त्रीपिटकातील आकाश संकल्पना आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र व मानसशास्त्र: तुलनात्मक अभ्यास

**संजय डी.सोनावणे**
(सहा.प्राध्यापक)तत्त्वज्ञान विभाग,बी.एन.एन.कॉलेज भिवंडी, महाराष्ट्र
**Email:** sanjaysonawane2299@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180413
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 56-60
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश (Abstract)***

*या संशोधन निबंधात त्रीपिटकातील आकाश संकल्पना पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि पर्यावरण मानसशास्त्राशी तुलनात्मक दृष्टिकोनातून अभ्यासली आहे. आकाश ही बौद्ध तत्त्वज्ञानातील शून्यता, अनित्यता आणि प्रतित्यसमुत्पाद या सिद्धान्तांशी निगडीत आहे. ध्यानप्रक्रियेत आकाश तत्त्व अनुभवले जाते. पर्यावरणीय नीतिशास्त्रात अल्डो लिओपोल्डच्या भू-नीती तत्त्वा प्रमाणे निसर्ग हा परस्परसंबद्ध जैवसमुदाय मानला जातो, तर बौद्ध दृष्टिकोन करुणा आणि अनासक्ततेवर भर देतो. मानसशास्त्रात पर्यावरणाशी निगडित मानसिक समस्या मध्ये पर्यावरणीय चिंता उद्भवतात; विपश्यना ध्यान आणि सती या बौद्ध साधना मानसिक संतुलन साधण्यास मदत करतात.*

*तुलनात्मक विश्लेषणातून दिसते की आकाश संकल्पना पर्यावरणीय नीतिशास्त्रातील शाश्वतता आणि मानसशास्त्रातील मानसिक आरोग्य यांना एकात्म दृष्टिकोन देते. व्यावहारिक निहितार्थ म्हणून, पर्यावरण धोरणांमध्ये बौद्ध करुणा व शून्यता समाविष्ट करणे, तसेच सतीचा समावेश करणे उपयुक्त ठरते. अशा प्रकारे हा अभ्यास विषय बौद्ध तत्त्वज्ञान आधुनिक पर्यावरणीय आणि मानसशास्त्रीय संबंधांना अधिक दृढ करतो व आकाश तत्त्वाचे महत्व विस्तारतो.*

***मुख्य शब्द (key words)*** *त्रीपिटक, आकाश, शून्यता, प्रतित्यसमुत्पाद, पर्यावरणीय नीतिशास्त्र, पर्यावरण मानसशास्त्र, सती, विपश्यना, शाश्वतता*

## प्रस्तावना (Introduction)

प्राचीन भारतीय तत्त्वज्ञानातील बौद्ध ग्रंथ त्रीपिटक ही बौद्ध धर्माची मूलभूत धार्मिक आणि तात्त्विक रचना आहे. या ग्रंथसमूहात विनयपिटक (संघाचे नियम), सुत्तपिटक (बुद्धांचे प्रवचने) आणि अभिधम्मपिटक (धम्माचे सूक्ष्म विश्लेषण व तत्त्वज्ञान ) यांचा समावेश होतो. या सर्व ग्रंथांमध्ये "आकाश" ही संकल्पना भौतिक अवकाशापेक्षा वेगळी, तात्त्विक आणि ध्यानात्मक आहे. ही संकल्पना केवळ तात्त्विक क्षेत्रापुरती मर्यादित नसून, पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र या आधुनिक शास्त्रांशी संबध व महत्व दर्शविते.तसेच आधुनिक उपयोगिता दर्शवते.

आधुनिक पर्यावरणीय नीतिशास्त्र,निसर्ग आणि मानव यांच्यातील नैतिक संबंध स्थापित करते, तर पर्यावरण मानसशास्त्र मानवी मनाची निसर्गाशी असलेली नाते दर्शवते. त्रीपिटकातील आकाश संकल्पना या दोन्ही क्षेत्रांशी शून्यता, अनित्यता आणि परस्परावलंबन या तत्त्वांद्वारे जोडली जाते. हा अभ्यास त्रीपिटकातील या अद्वितीय संकल्पनेचे स्वरूप स्पष्ट करून, तिचे पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि मानसशास्त्राशी असलेले तुलनात्मक संबंध व महत्व समजून सांगते.

**संशोधनाचा उद्देश:**

त्रिपिटकातील आकाश संकल्पनेचा तुलनात्मक अभ्यास.
संशोधन प्रश्न:आकाश संकल्पना त्रीपिटकात कशा स्वरुपात मांडली आहे याचा अभ्यास करणे.
पर्यावरणीय नीतिशास्त्राशी तिचा संबंध काय आहे हे दर्शविणे. साम्य भेद अभ्यासणे.
त्रीपिटकातील आकाश तत्त्वाचा मानसशास्त्राशी काय संबध आहे हे अभ्यासणे व त्याची तुलना करणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*संजय डी.सोनावणे,(सहा.प्राध्यापक)तत्त्वज्ञान विभाग,बी.एन.एन.कॉलेज भिवंडी, महाराष्ट्र*

**How to cite this article:**
सोनावणे, . संजय . डी . (2026). त्रीपिटकातील आकाश संकल्पना आणि पर्यावरणीय नीतिशास्त्र व मानसशास्त्र: तुलनात्मक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)),56–60.* https://doi.org/10.5281/zenodo.21254722

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254722
OPEN ACCESS

त्रीपिटकातील आकाशाची व्याख्या स्पष्ट करणे,

पर्यावरण नीतिशास्त्रातील भूमिका उलगडणे, विज्ञानातील व्याख्या समजावणे, तुलनात्मक साम्य-भेद अधोरेखित करणे.

**संशोधनाची पद्धतीन** - तुलनात्मक साहित्य अभ्यास आणि तात्त्विक विश्लेषणावर आधारित आहे. हे संशोधन बौद्ध तत्त्वज्ञानाला आधुनिक पर्यावरण धोरणांसाठी उपयुक्त ठरवते.

**साहित्य समीक्षा (Literature Review)**

त्रीपिटकातील आकाश संकल्पना, पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि मानसशास्त्र यांचा तुलनात्मक अभ्यास करताना विद्यमान साहित्याचा सखोल आढावा घेणे आवश्यक ठरतो.

पाली त्रीपिटक हा बौद्ध धर्माचा मूलभूत आधार असून त्यात विनयपिटक, सुत्तपिटक आणि अभिधम्मपिटक यांचा समावेश आहे. या ग्रंथांमध्ये आकाश संकल्पनेचे विविध संदर्भ आढळतात. दीघनिकाय (DN 15) मध्ये आकासानञ्चायतन ही ध्यानावस्था वर्णिली आहे, जिथे साधक अमर्याद अवकाशाचा अनुभव घेतो (Walsh 45). अभिधम्मपिटकात आकाश हे रूपधर्मांपासून वेगळे, शून्यतेचे प्रतीक म्हणून स्पष्ट केले जाते (Gethin 89).

विपश्यना संशोधन संस्थेच्या प्रकाशनांमध्ये आकाश संकल्पनेचा ध्यानप्रक्रियेशी असलेला संबंध अधोरेखित केला आहे. ध्यानाच्या उच्च अवस्थेत साधकाला आकाशाची अनुभूती होते, जी त्याला अनासक्तता आणि शून्यतेच्या जाणीवेपर्यंत पोहोचवते (Buddharakṣita 34).

भारतीय तत्त्वज्ञानात आकाश संकल्पना वैदिक आणि वैशेषिक परंपरेत महत्त्वाची मानली जाते. वैशेषिक तत्त्वज्ञानात आकाश हे ध्वनीचे आश्रयस्थान मानले जाते (Kalupahana 112). छांदोग्य उपनिषद आकाशाला सृष्टीतील प्रथम तत्त्व मानते — "आकाश एव प्रथमं जायते." वेदांताचार्य शंकर यांच्या मते आकाश हे ब्रह्मावर अवलंबून आहे (Harvey 67). याउलट बौद्ध दृष्टिकोनात आकाश हे शून्यता आणि अनित्यतेशी जोडलेले आहे, म्हणजेच ते स्वतंत्र द्रव्य नसून परस्परावलंबी घटकांमधून उद्भवणारे आहे (Gethin 92).

आधुनिक तत्त्वज्ञानी अभ्यासांमध्ये आकाश संकल्पनेची तुलना पाश्चात्य तत्त्वज्ञानातील Ether किंवा Space संकल्पनांशी केली जाते. पाश्चात्य विचारवंतांनी अवकाशाला भौतिक विश्वाचा पाया मानले, तर बौद्ध तत्त्वज्ञानाने त्याला ध्यानात्मक आणि शून्यतेचे प्रतीक म्हणून पाहिले (Kalupahana 145).

पर्यावरणीय नीतिशास्त्राच्या क्षेत्रात Aldo Leopold यांनी निसर्गाला जैविक समुदाय म्हणून पाहिले. त्यांच्या भू-नीतीत निसर्गाला स्वतंत्र नैतिक मूल्य दिले जाते (Leopold 112). हा दृष्टिकोन बौद्ध करुणा आणि शून्यतेशी सुसंगत आहे. Arne Naess यांच्या सखोल पर्यावरण प्रवाहात निसर्गाला स्वतंत्र मूल्य दिले जाते, जे बौद्ध दृष्टिकोनाशी साम्य दर्शवते (Naess 56).

मानसशास्त्राच्या क्षेत्रात Susan Clayton आणि सहकाऱ्यांनी Mental Health and Our Changing Climate (2017) मध्ये पर्यावरणीय बदलांमुळे उद्भवणाऱ्या मानसिक समस्यांचा अभ्यास केला आहे. त्यांनी पर्यावरणीय चिंता (इको-अँग्झायटी) ही संकल्पना मांडली आहे (Clayton 23). याच समस्यांना सामोरे जाण्यासाठी बौद्ध ध्यानप्रक्रिया विशेषतः विपश्यना आणि सती उपयुक्त ठरतात. Jon Kabat-Zinn यांच्या Mindfulness-Based Stress Reduction(MBSR) पद्धतीतही बौद्ध ध्यानाचा मानसशास्त्रीय उपयोग अधोरेखित केला आहे (Kabat-Zinn 145).

या साहित्य समीक्षेतून स्पष्ट होते की त्रीपिटकातील आकाश संकल्पना ही केवळ तात्त्विक नाही, तर पर्यावरणीय नीतिशास्त्र आणि मानसशास्त्राशी गहन संबंध दर्शवते. बौद्ध तत्त्वज्ञान आधुनिक शाश्वतता आणि मानसिक आरोग्याच्या चर्चांशी जोडले जाते, ज्यामुळे तुलनात्मक अभ्यासाला सैद्धांतिक आधार मिळतो आणि आकाश संकल्पनेचे महत्व अधिक स्पष्ट होते.

**त्रीपिटकातील आकाश संकल्पनेचे तात्त्विक स्वरूप**

सामान्यतः भारतीय परंपरेत आकाश ही संकल्पना भौतिक अवकाशाशी जोडली जाते. परंतु बौद्ध तत्त्वज्ञानात आकाश ही संकल्पना भौतिक नसून ध्यानाच्या उच्च अवस्थांशी संलग्न आहे. सुत्तपिटक मधील दीघनिकाय मध्ये आकाश हे चार महाभूतांपेक्षा (पृथ्वी, जल, तेज, वायू) वेगळे, त्यातील ओळखले जाणारे अमर्याद स्थान म्हणून वर्णिले आहे. हे भौतिक अवकाश नसून **आकासानञ्चायतन** ही ध्यानावस्था आहे, ज्यामध्ये चित्त सर्व सीमा ओलांडून निर्लिप्त अवस्थेत पोहोचते (Walsh 45).

अभिधम्म तत्त्वज्ञानात आकाश हे "आरूपधम्म" म्हणजे रूपधर्मांपासून स्वतंत्र अस्तित्व असलेले मानले जाते. ते शून्यतेचे प्रतीक असून बौद्ध त्रिलक्षणे — अनिच्च (अनित्यता), दुःख आणि अनात्म (स्वतंत्र आत्मा नसणे) — यांचे प्रतिबिंब आहे (Gethin 89). प्रतित्यसमुत्पाद सिद्धांतानुसार सर्व घटक परस्परांवर अवलंबून असतात, आणि आकाश हे त्यांचे निर्लिप्त साक्षीदार आहे (Kalupahana 112).

विनयपिटक मध्ये पर्यावरण संरक्षणाचे स्पष्ट नियम आढळतात. भिक्खूंना अनावश्यकपणे झाडे तोडणे, जलाशय दूषित करणे किंवा प्राण्यांना हानी पोहोचवणे निषिद्ध आहे. ही नियमावली केवळ संघव्यवस्थेसाठी नसून संपूर्ण निसर्गाशी संलग्नतेचे प्रतीक आहे (Harvey 67). आकाश

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

संकल्पना विपश्यना ध्यानाद्वारे प्रत्यक्ष अनुभवली जाते, ज्यामुळे व्यक्ती स्वतःतील आणि निसर्गातील परिवर्तनशीलतेची खात्री पटते (Buddharakṣita 34).

**बौद्ध संप्रदायांतील आकाश संकल्पना**

या संप्रदायात आकाशाला स्वतंत्र आणि वास्तविक अस्तित्व दिले जाते. ते पृथ्वी, जल, तेज आणि वायू या चार महाभूतांना आधार देणारे अवकाश मानले जाते. आकाशधातू हे असंस्कृत धर्म असून त्याला ना उत्पत्ती आहे ना नाश. वस्तूंच्या सीमांमुळे ते मर्यादित असते आणि शून्यतेच्या संकल्पनेचा प्रारंभबिंदू म्हणून पाहिले जाते (Gethin 92).

माध्यमिक शून्यवाद मध्ये आकाश हे शून्यतेचे प्रतीक आहे, पण ते स्वतः वास्तविक नसते. सर्व धातू “स्वभावशून्य” आहेत. वैभाषिक यथार्थवाद नाकारून येथे आकाश ध्यान मानसिक संकल्पना बनते (Kalupahana 145).

योगाचार संप्रदायात आकाश बाह्य अवकाश म्हणून न मानता चेतनेच्या परिवर्तनाशी जोडले जाते. ध्यानात द्वैत नष्ट होऊन “विज्ञानानंत्यायतन” साध्य होते (Harvey 78).

या संप्रदायात आकाशाला स्वतंत्र अस्तित्व नाकारले जाते. फक्त चार महाभूतांना महत्त्व दिले जाते. आकाश ध्यान हे अरूप ध्यानांची सुरुवात असली तरी आकाशाला “निरर्थक” मानले जाते (Walsh 102).

वैभाषिक संप्रदायात आकाशानंत्यायतन ही ध्यानपद्धती आहे. यात साधक रूपधातूचा त्याग करून अनंत आकाशावर मन एकाग्र करतो. दृश्य सीमा नष्ट झाल्यावर “अनंताकाश” ची अनुभूती होते (Buddharakṣita 56).

मध्यमककारिका मध्ये नागार्जुन यांनी आकाशाला स्वतंत्र द्रव्य किंवा गुण मानले नाही. त्यांच्या मते ते परस्परावलंबी कारण-प्रत्ययांमधून उद्भवते आणि शून्यतेचे प्रतीक आहे (Kalupahana 167).

त्रीपिटकातील आकाश संकल्पना ही विविध बौद्ध संप्रदायांमध्ये वेगवेगळ्या प्रकारे मांडली गेली आहे. वैभाषिक संप्रदायात ती स्वतंत्र अस्तित्व मानली जाते, तर माध्यमिक आणि योगाचार संप्रदायात ती शून्यता आणि चेतनेशी जोडली जाते. थेरवाद संप्रदायात मात्र आकाशाला निरर्थक मानले जाते. नागार्जुनांनी आकाशाला स्वतंत्र द्रव्य न मानता शून्यतेचे प्रतीक म्हणून स्पष्ट केले. या सर्व दृष्टिकोनांमधून आकाश संकल्पना बौद्ध तत्त्वज्ञानातील गहनता आणि विविधता अधोरेखित करते.

**पर्यावरणीय नीतिशास्त्राशी तुलनात्मक संबंध**

आधुनिक पर्यावरणीय नीतिशास्त्र निसर्गाला मानवी कर्तव्याचा आधार मानते. या क्षेत्रातील विचारवंत निसर्ग हे केवळ मानवी उपयोगाचे साधन नसून, स्वतंत्र नैतिक मूल्य असलेला जैविक समुदाय आहे (Leopold 112). ही संकल्पना बौद्ध आकाश संकल्पनेशी सुसंगत आहे, कारण दोन्ही प्रवाह निसर्गातील परिवर्तनशीलता आणि परस्परावलंबन अधोरेखित करतात.

बौद्ध दृष्टिकोनातून पाहता, निसर्गातील प्रत्येक घटक अनित्य आहे आणि परस्परांवर अवलंबून आहे. जंगलतोड, प्रदूषण किंवा जैवविविधतेचा नाश हे केवळ भौतिक नुकसान नसून कर्मफलाशी संबंधित आहेत (Harvey 78). विनयपिटक मध्ये पर्यावरण संरक्षणाचे नियम स्पष्टपणे दिलेले आहेत — भिक्खूंना झाडे तोडणे, जलाशय दूषित करणे किंवा प्राण्यांना हानी पोहोचवणे निषिद्ध आहे (Walsh 102). हे नियम आधुनिक जैवविविधता संरक्षण करारांशी साम्य दर्शवतात. बौद्ध करुणा ही निसर्ग संरक्षणाची प्रेरणा देते — सर्व प्राण्यांप्रती समान दृष्टी ठेवणे हेच खरे संरक्षण आहे (Buddharakṣita 34). करुणा आपल्याला शिकवते की जंगलातील वृक्ष, नद्या, पक्षी, प्राणी हे सर्व आपल्या जीवन चक्राशी संबंधित आहे.सर्व जीवना समान समजणे. कोणीही कमी अधिक महत्वाचा नाही तर सर्व समान आहेत.प्रतीत्यसामुत्पदाच्या दृष्टीने निसर्गाचा नाश म्हणजे स्वताचा नाश होय,

दुसरीकडे, पाश्चात्य पर्यावरणीय नीतिशास्त्र संसाधन व्यवस्थापनावर भर देते. शाश्वत विकास, हरित धोरणे आणि जलवायू करार यांचा उद्देश भौतिक संतुलन साधणे आहे (Naess 56). मात्र, बौद्ध दृष्टिकोन अधिक गहन आहे — तो केवळ बाह्य संरक्षण नव्हे, तर आंतरिक अनासक्ततेची शिकवण देतो. हिमालयातील बौद्ध मठे ही दोन्ही दृष्टिकोनांचे जिवंत उदाहरण आहेत, जिथे ध्यान आणि संरक्षण एकत्रितपणे चालवले जाते (Kalupahana 145).

पर्यावरणीय मानसशास्त्र हे मानवी मन आणि निसर्ग यांच्यातील गुंफलेल्या संबंधाचा अभ्यास करते. जलवायू बदल, प्रदूषण आणि जैवविविधता नुकसानामुळे उद्भवणारी पर्यावरणीय चिंता (इको-ॲंग्झायटी) ही समस्या या क्षेत्रातील प्रमुख आव्हान आहे (Clayton 23). बौद्ध आकाश संकल्पना या समस्येला अनात्म आणि शून्यता यांच्या दृष्टीने सामोरे जाते.

बौद्ध तत्त्वज्ञानात पंचस्कंध (रूप, वेदना, संज्ञा, संस्कार, विज्ञान) ही मानवी अस्तित्वाची रचना आहे, ज्यामध्ये स्वतंत्र “आत्मा” नाही (Gethin 92). हीच जाणीव निसर्गाशी असलेल्या अतार्किक आसक्तीचे कारण स्पष्ट करते. विपश्यना ध्यानाद्वारे व्यक्ती शून्यतेपर्यंत पोहोचते, ज्यामुळे तिला सध्याच्या क्षणाची जाणीव होते आणि भविष्यातील भीती कमी होते (Kabat-Zinn 145). ही प्रक्रिया आधुनिक Mindfulness Therapy शी साम्य दर्शविते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

अभिधम्म मध्ये चेतन प्रक्रियेचे विश्लेषण मानवी मनाची निसर्गाशी असलेली संलग्नता समजण्यास मदत करते (Harvey 67). जीवन आणि प्रकृती प्रति प्रेम (Biophilia) ही संकल्पना — मानवाची निसर्गाशी असलेली साहजिक आकर्षण — बौद्ध करुणेशी जुळते (Wilson 34). मात्र, बौद्ध दृष्टिकोन अधिक व्यावहारिक आहे; तो केवळ जाणीव नव्हे, तर तिच्यापासून वर्तनात बदल घडवतो.

त्रीपिटकातील आकाश संकल्पना केवळ सैद्धांतिक नसून, जलवायू संकटाच्या काळात अत्यंत प्रासंगिक आहे. भारतासारख्या देशात, जिथे बौद्ध वारसा आणि पर्यावरणीय आव्हाने दोन्ही आहेत, ही संकल्पना धोरणनिर्मितीला दिशा देऊ शकते. नमामि गंगे आणि हरित भारत यांसारख्या योजनांमध्ये बौद्ध करुणा तत्त्वांचा समावेश शक्य आहे (Naess 112).

शिक्षण क्षेत्रात बौद्ध तत्त्वांचा समावेश करणे आवश्यक आहे. पर्यावरण अभ्यासक्रमात विपश्यना आणि माइंडफुलनेसचा (सती) समावेश केल्यास विद्यार्थ्यांची निसर्गाशी संलग्नता वाढेल (Kabat-Zinn 167). आरोग्य क्षेत्रात जलवायू चिंतेवर माइंडफुलनेस सती-आधारित उपचार प्रभावी ठरतील (Clayton 45).

त्रीपिटकातील आकाश संकल्पना ही प्राचीन बौद्ध तत्त्वज्ञानाची अनमोल देणगी आहे. ती केवळ ध्यानात्मक अनुभवापुरती मर्यादित नसून, शून्यता (śūnyatā), अनित्यता (anicca) आणि करुणा (karuṇā) यांचे प्रतीक आहे. या संकल्पनेतून बौद्ध धर्माने मानवी जीवन, निसर्ग आणि मानसिक संतुलन यांचा एकात्म दृष्टिकोन दिला आहे (Gethin 92).

आकाश संकल्पना आधुनिक पर्यावरणीय नीतिशास्त्राशी सुसंगत आहे. Aldo Leopold यांच्या भू-नीतीत निसर्गाला स्वतंत्र नैतिक मूल्य दिले जाते, तर बौद्ध दृष्टिकोन करुणा आणि अनासक्ततेवर भर देतो (Leopold 112). या दोन्ही प्रवाहांमध्ये निसर्गातील परस्परावलंबन आणि परिवर्तनशीलता अधोरेखित केली जाते. त्यामुळे आकाश संकल्पना शाश्वत जीवनशैली आणि पर्यावरण संरक्षण यांना तात्त्विक आधार देते.

मानसशास्त्राच्या क्षेत्रातही आकाश संकल्पना महत्त्वाची ठरते. Susan Clayton यांनी पर्यावरणीय चिंतेचा (eco-anxiety) अभ्यास केला आहे (Clayton 23). बौद्ध ध्यानपद्धती — विशेषतः विपश्यना आणि सती — व्यक्तीला वर्तमान क्षणात स्थिर ठेवतात आणि भविष्यातील भीती कमी करतात (Kabat-Zinn 145). त्यामुळे मानसिक आरोग्य आणि पर्यावरणीय मानसशास्त्र यांना एकात्म दृष्टिकोन मिळतो.

नागार्जुनांनी मध्यमककारिका मध्ये आकाशाला स्वतंत्र द्रव्य न मानता शून्यतेचे प्रतीक म्हणून स्पष्ट केले आहे (Kalupahana 167). योगाचार संप्रदायाने आकाशाला चेतनेशी जोडले, तर थेरवाद संप्रदायाने त्याला निरर्थक मानले. या विविध दृष्टिकोनांमधून आकाश संकल्पनेची बहुआयामीता दिसून येते.

आजच्या जागतिक संकटाच्या काळात — हवामान बदल, प्रदूषण, जैवविविधतेचा नाश — या सर्व समस्यांना सामोरे जाण्यासाठी बौद्ध तत्त्वांचा पुनरुज्जीवन करणे ही काळाची गरज आहे (Harvey 78). आकाश संकल्पना निसर्ग संरक्षण, मानसिक संतुलन आणि शाश्वत जीवनशैली यांचा एकात्म दृष्टिकोन देते.

आकाशाच्या अस्तित्व आणि नास्तित्व या दोन्ही संकल्पना मानवी कल्याणाच्या दृष्टीने महत्त्वाच्या आहेत. अस्तित्वाच्या संकल्पनेतून निसर्गाशी संलग्नता अधोरेखित होते, तर नास्तित्वाच्या संकल्पनेतून अनासक्तता आणि शून्यता यांचा अनुभव मिळतो. या दोन्ही दृष्टिकोनांचा समन्वय त्रीपिटकाच्या अनुशंघाने मानवी हित साधतो.

**संदर्भ सूची (Works Cited)**

1. पाली त्रिपिटक: दीघ निकाय, मज्झिम निकाय, अभिधम्म पिटक. सुगत प्रकाशन -भदन्त तीस्सवंस महास्थवीर २०१० वॉल्श, मॉरिस. दी लाँग डिस्कोर्सेस ऑफ द बुद्धा: दीघ निकायाचे भाषांतर. विस्डम पब्लिकेशन्स, १९९५.
2. बुद्धरक्षित, आचार्य. धम्मपद. बौद्ध प्रकाशन सोसायटी, १९८५.
3. कलुपहाना, डेव्हिड जे. बौद्ध तत्त्वज्ञानाचा इतिहास: सातत्य आणि विसंगती. युनिव्हर्सिटी ऑफ हवाई प्रेस, १९९२.
4. हार्वे, पीटर. बौद्ध धर्माची ओळख: उपदेश, इतिहास आणि आचरण. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, २०१३.
5. गेथिन, रुपर्ट. बौद्ध धर्माची पायाभूत तत्त्वे. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९९८.
6. लिओपोल्ड, अल्डो. ए सँड काउन्टी अल्मनॅक. ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९४९.
7. नेस, अर्णे. इकोलॉजी, कम्युनिटी अँड लाइफस्टाइल: इकोसॉफीचा आराखडा. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, १९८९.
8. डेव्हल, बिल आणि जॉर्ज सेशन्स. डीप इकोलॉजी: लिव्हिंग अॅज इफ नेचर मॅटरड. गिब्स स्मिथ, १९८५.
9. क्लेटन, सुसन व अन्य. मेंटल हेल्थ अँड अवर चेंजिंग क्लायमेट: इम्पॅक्ट्स, इम्प्लिकेशन्स अँड गाईडन्स. अमेरिकन सायकोलॉजिकल असोसिएशन, २०१७.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

10. कबत-झिन, जॉन. फुल कॅटॅस्ट्रॉफी लिव्हिंग: स्ट्रेस, वेदना आणि आजारपणाला सामोरे जाण्यासाठी शरीर आणि मनाचे ज्ञान. डेल्टा, १९९०.
11. विल्सन, एडवर्ड ओ. बायोफिलिया. हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस, १९८४.
12. मॅसी, जोआना. वर्ल्ड ॲज लव्हर, वर्ल्ड ॲज सेल्फ. परॅलॅक्स प्रेस, २००७.
13. https://www.eastern-spirituality.com/glossary/spirituality-terms/a-definitions/akasha
14. https://vishwakosh.marathi.gov.in/29763/
15. https://vishwakosh.marathi.gov.in/29765/
16. SuttaCentral.net

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# दुर्गमता आणि ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचे अंतर : विद्यार्थ्यांच्या गळती प्रमाणाचे विश्लेषणात्मक अध्ययन

**डॉ.निनाद विजय जाधव**
विभाग प्रमुख, ग्रामीण विकास विभाग
बी.एन.एन.महाविद्यालय,भिवंडी.जि.ठाणे.
**Email:** drninadjadhav@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180414
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 61-64
April 2026
**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश :-***

*दुर्गमता आणि ग्रामीण भागातील भौगोलिक परिस्थितीचा प्राथमिक शिक्षणावर होणारा परिणाम हा एक गंभीर सामाजिक प्रश्न आहे. शाळेचे अंतर आणि विद्यार्थ्यांचे गळतीचे प्रमाण (Drop-out rate) यांचा थेट संबंध येत असतो. ग्रामीण आणि डोंगराळ भागात वस्त्या विखुरलेल्या असतात. अनेकदा गावांपासून प्राथमिक शाळांचे अंतर ३ ते ५ किलोमीटर किंवा त्यापेक्षा जास्त असते या अंतरामुळे अनेक समस्या उद्भवतात.सार्वजनिक वाहतुकीचा अभाव असल्याने विद्यार्थ्यांना पायी प्रवास करावा लागतो, ज्यामुळे शारीरिक थकवा येतो आणि अभ्यासावरील लक्ष कमी होते.जंगले, ओढे किंवा निर्जन रस्ते ओलांडून जाताना पालकांना मुलांच्या, विशेषतः मुलींच्या सुरक्षेची भीती वाटते. हे मुलींच्या शाळा सोडण्याचे एक मुख्य कारण ठरते.अतिवृष्टी किंवा कडक उन्हाळ्यात दुर्गम भागातील रस्ते बंद होतात, ज्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती खंडित होते आणि पुढे ती कायमस्वरूपी गळतीत रूपांतरित होते.*

***सूचक शब्द :-** ग्रामीण, शिक्षण, विद्यार्थी, शाळा, डोंगराळ रस्ते, नद्या, दुर्गमता, गळती, उपस्थिती इत्यादी.*

## प्रस्तावना (Introduction) :-

"शिक्षण हा मानवाचा तिसरा डोळा आहे," असे म्हटले जाते. कोणत्याही राष्ट्राच्या विकासाचा पाया हा त्या देशातील प्राथमिक शिक्षणावर अवलंबून असतो. भारतासारख्या विकसनशील देशात शिक्षणाचे सार्वत्रिकरण करण्यासाठी 'शिक्षण हक्क कायदा २००९' (RTE) अंतर्गत अनेक क्रांतिकारी पावले उचलली गेली आहेत. मात्र, आजही भारतातील ग्रामीण आणि विशेषतः अतिदुर्गम भागांत प्राथमिक शिक्षणाची गंगा पोहोचवण्यात अनेक नैसर्गिक आणि भौगोलिक अडथळे येत आहेत.

ग्रामीण भागातील भौगोलिक रचना, विखुरलेल्या वस्त्या आणि पायाभूत सुविधांचा अभाव यामुळे 'शाळा' आणि 'विद्यार्थी' यांच्यातील भौगोलिक अंतर वाढलेले दिसते. हे अंतर केवळ किलोमीटरमध्ये मोजले जात नसून ते विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीतील एक मोठी भिंत ठरत आहे. जेव्हा एखादा लहान बालक दररोज डोंगराळ रस्ते, नद्या किंवा निर्जन पाऊलवाटा तुडवत ३-४ किलोमीटर प्रवास करतो, तेव्हा त्याचा शारीरिक आणि मानसिक थकवा त्याच्या शिकण्याच्या प्रक्रियेवर अधिराज्य गाजवतो.

ग्रामीण भारतातील शैक्षणिक वास्तव हे शहरी भागापेक्षा पूर्णतः भिन्न आहे. शहरात जिथे शिक्षणाच्या संधी दारात उपलब्ध आहेत, तिथे ग्रामीण भागात एका प्राथमिक शाळेपर्यंत पोहोचण्यासाठीही निसर्गाशी आणि गरिबीशी संघर्ष करावा लागतो. 'गळती' म्हणजे केवळ शाळेतून नाव कमी होणे नव्हे, तर ती एका पिढीच्या प्रगतीला लागलेला अल्पविराम आहे. ग्रामीण भागात प्राथमिक स्तरावर प्रवेश घेणाऱ्या मुलांपैकी अनेक मुले माध्यमिक स्तरापर्यंत पोहोचण्यापूर्वीच शिक्षण का सोडतात? हा प्रश्न केवळ शैक्षणिक नसून तो सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेशी जोडलेला आहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the [Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International](#) Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.निनाद विजय जाधव, विभाग प्रमुख, ग्रामीण विकास विभाग बी.एन.एन.महाविद्यालय,भिवंडी.जि.ठाणे.*

**How to cite this article:**
जाधव, . निनाद . विजय . (2026). दुर्गमता आणि ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणाचे अंतर : विद्यार्थ्यांच्या गळती प्रमाणाचे विश्लेषणात्मक अध्ययन. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 61–64.* https://doi.org/10.5281/zenodo.21254809

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254809
OPEN ACCESS

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

विद्यार्थ्यांच्या गळतीमागे केवळ 'अभ्यासातील अरुची' हे एकच कारण नसून, त्यामागे भौगोलिक दुर्गमता, पालकांची हलाखीची आर्थिक स्थिती, सामाजिक रूढी-परंपरा आणि शालेय सुविधांचा अभाव अशा कारणांचे एक गुंतागुंतीचे जाळे विणलेले आहे. विशेषतः डोंगराळ आणि आदिवासी भागांत शाळा आणि घराचे अंतर हे विद्यार्थ्यांच्या गळतीचे मुख्य तांत्रिक कारण ठरत आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे (Objectives) :-**

१.शाळेचे अंतर व विद्यार्थ्यांच्या गळतीचा सहसंबंध शोधणे.
२.दुर्गम भागात शाळा सोडण्यामागील भौगोलिक आणि सामाजिक कारणांचा शोध घेणे.
३.मुलींच्या सुरक्षेचे प्रश्न आणि शिक्षण यातील दुवा तपासणे.
४.गळतीची सामाजिक व आर्थिक कारणे शोधणे.

**ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीच्या प्रमाणातील कारणे:-**

**१. भौगोलिक आणि नैसर्गिक कारणे (Geographical Factors) :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांची गळती होण्यामागे भौगोलिक आणि नैसर्गिक कारणे हे अत्यंत प्रभावी घटक आहेत. या कारणांमुळे शाळा आणि विद्यार्थी यांच्यात एक 'प्रवेश न मिळणारी' दरी निर्माण होते. दुर्गम भागातील भौगोलिक रचना हा गळतीसाठी सर्वात मोठा अडथळा आहे.ग्रामीण आणि डोंगराळ भागात लोकवस्ती विखुरलेली असते. सरकारी नियमांनुसार प्राथमिक शाळा जवळ असणे अपेक्षित असले, तरी अनेक वाड्या-वस्त्यांपासून मुख्य शाळा ३ ते ५ किलोमीटर अंतरावर असते. लहान मुलांना एवढ्या लांब पायी जाणे शक्य होत नाही. शाळेला जाताना अनेकदा निर्जन रस्ते, दाट झाडी किंवा ओढे ओलांडून जावे लागते. अशा कठीण प्रवासापेक्षा मुले घरी राहणे पसंत करतात, ज्यामुळे गळती वाढते. सततच्या गैरहजेरीमुळे शेवटी विद्यार्थी शाळा सोडून देतात. बस किंवा इतर सार्वजनिक वाहतूक उपलब्ध नसल्याने पालकांना पाल्याला शाळेत पाठवणे सुरक्षित वाटत नाही.

**२. आर्थिक कारणे (Economic Factors) :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणात विद्यार्थ्यांची गळती होण्यामागे आर्थिक कारणे हा सर्वात प्रबळ घटक मानला जातो. शिक्षण मोफत असले तरी, गरिबीमुळे उद्भवणारी परिस्थिती पालकांना मुलांना शाळेतून काढून कामाला लावण्यास प्रवृत्त करते. मुले शेतमजुरी, वीटभट्टीवर काम करणे किंवा गुरे राखणे यांसारख्या कामांत गुंततात. अल्पशा कमाईसाठी मुलांचे दीर्घकालीन शैक्षणिक नुकसान केले जाते. ग्रामीण भागातील शेती हंगामी असल्याने, रोजगाराच्या शोधात अनेक कुटुंबे वर्षातील ४ ते ६ महिने स्थलांतर करतात (उदा. ऊसतोड कामगार, बांधकाम मजूर).आर्थिक टंचाईमुळे विद्यार्थी केवळ शाळा सोडत नाहीत, तर ते त्यांच्या विकासाच्या संधीही गमावतात.

**३. सामाजिक आणि कौटुंबिक कारणे (Social Factors) :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील गळतीमागे सामाजिक आणि कौटुंबिक कारणे अत्यंत खोलवर रुजलेली आहेत.मुलांनी शाळा बुडवली तरी पालकांना त्याचे गांभीर्य वाटत नाही. अभ्यासात मदत करण्यासाठी किंवा मुलांच्या प्रगतीवर लक्ष ठेवण्यासाठी घरातील वातावरण पोषक नसते.सण-उत्सव, घरातील लग्नकार्य किंवा पाहुण्यांचे येणे-जाणे यामुळे मुलांची शाळा अनेक दिवस बुडते, ज्यामुळे त्यांचा अभ्यास मागे पडतो आणि शेवटी ते शाळा सोडून देतात. पालकांना शिक्षणाचे महत्त्व न समजल्यामुळे ते मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करतात.आजही अनेक ग्रामीण भागांत मुलींच्या शिक्षणापेक्षा घरकाम किंवा त्यांच्या लग्नाला लवकर प्राधान्य दिले जाते. लांबच्या अंतरामुळे मुलींच्या सुरक्षिततेची भीती पालकांना शाळा सोडायला प्रवृत्त करते. लहान भावंडांना सांभाळणे किंवा घरातील कामात मदत करणे यासाठी थोरल्या मुलांना (विशेषतः मुलींना) शाळेतून घरी बसवले जाते.

**४. शालेय आणि शैक्षणिक कारणे (School-related Factors):-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीला केवळ बाह्य परिस्थितीच नव्हे, तर शालेय वातावरण आणि शैक्षणिक उणिवा देखील मोठ्या प्रमाणावर कारणीभूत असतात. जेव्हा शाळा विद्यार्थ्यांना आकर्षित करण्यात किंवा त्यांच्या गरजा पूर्ण करण्यात अपयशी ठरते, तेव्हा गळतीचे प्रमाण वाढते. शाळेत पिण्याचे पाणी, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह आणि वीज यांसारख्या सोयी नसणे. दुर्गम भागात शिक्षकांची कमतरता किंवा शिक्षकांची वारंवार होणारी बदली यामुळे गुणवत्तेवर परिणाम होतो. वर्गातील अध्यापन जर विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित नसेल, तर त्यांना अभ्यासात रस राहत नाही, ज्यामुळे ते शाळा बाह्य होतात.

**ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील विद्यार्थ्यांच्या गळतीवरील उपाय :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील गळती (Dropout) रोखण्यासाठी केवळ एका बाजूने प्रयत्न करून चालणार नाही, तर भौगोलिक, आर्थिक आणि सामाजिक स्तरावर एकत्रित उपाययोजना करणे आवश्यक आहे. या समस्येवर मात करण्यासाठी खालीलप्रमाणे प्रभावी उपाययोजना करता येतील:

**१. भौगोलिक अडथळ्यांवर उपाय (Geographical Solutions):-**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

ज्या गावांपासून किंवा वस्त्यांपासून प्राथमिक शाळा २ ते ३ किमी पेक्षा जास्त लांब आहेत, तिथे ग्रामपंचायतीमार्फत कंत्राटी पद्धतीने वाहन व्यवस्था करावी. यामुळे प्रवासाचा थकवा कमी होईल आणि सुरक्षा वाढेल.मुला-मुलींना शाळेत जाण्यासाठी सायकल उपलब्ध करून दिल्यास अंतराचा अडथळा दूर होतो.ही योजना केवळ आठवीपुढील मुलींसाठी मर्यादित न ठेवता, दुर्गम भागातील पाचवीपासूनच्या सर्वच (मुले व मुली) गरजू विद्यार्थ्यांसाठी लागू करावी.अतिदुर्गम, डोंगराळ किंवा जिथे पावसाळ्यात संपर्क तुटतो अशा भागांसाठी 'निवासी शाळा' (Ashram Schools or Residential Schools) हा उत्तम पर्याय आहे.विद्यार्थी शाळेच्या आवारातच राहत असल्याने दैनंदिन प्रवासाची जोखीम उरत नाही आणि त्यांच्या अभ्यासात सातत्य राहते.कमी पटसंख्या असलेल्या ठिकाणी दर्जेदार 'एकल शिक्षक' किंवा 'वस्तीशाळा' सुरू कराव्यात, जेणेकरून ५ ते १० वर्षांच्या मुलांना घरापासून दूर जावे लागणार नाही.ज्या नद्या किंवा ओढ्यांमुळे पावसाळ्यात शाळेचा संपर्क तुटतो, तिथे छोटे लोखंडी पूल (Footbridges) बांधावेत.भौगोलिक अंतर कमी करण्यासाठी 'शाळा विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत नेणे' किंवा 'विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत सुरक्षित पोहोचवणे' या धोरणांचा अवलंब करणे ही काळाची गरज आहे.

**२. आर्थिक सक्षमीकरण (Economic Measures) :-**

शालेय साहित्यासाठी (वह्या, दप्तर, बूट इ.) मिळणारा भत्ता कोणत्याही मध्यस्थाशिवाय थेट पालकांच्या बँक खात्यात जमा करावा.यामुळे पालकांवर शिक्षणाचा अतिरिक्त आर्थिक भार पडत नाही आणि मिळालेला पैसा केवळ विद्यार्थ्यांच्या गरजांसाठीच वापरला जातो याची खात्री देता येते.ग्रामीण भागातील अनेक पालक उदरनिर्वाहासाठी (उदा. ऊसतोडणीसाठी) स्थलांतर करतात. अशा वेळी मुलेही त्यांच्यासोबत जातात आणि शिक्षण सुटते अश्या सर्व स्थलांतरित होणाऱ्या कुटुंबांतील मुलांसाठी गावातच 'हंगामी वसतिगृहे' सुरू करावीत. पालकांनी कामासाठी बाहेरगावी गेल्यावरही मुलांचे शिक्षण आणि निवास गावातच सुरू राहील, ज्यामुळे गळती थांबेल.ज्या कुटुंबांचे उत्पन्न खूप कमी आहे, अशा कुटुंबातील पाल्याने शाळेत किमान ८०% उपस्थिती राखल्यास त्यांना प्रतिदिन किंवा प्रतिमहा 'उपस्थिती भत्ता' द्यावा.अशा कुटुंबातील पालकांसाठी एक आर्थिक प्रोत्साहन (Incentive) म्हणून काम करतो, ज्यामुळे ते मुलांना कामावर न पाठवता शाळेत पाठवण्यास उत्सुक होतात.

**३. सामाजिक आणि कौटुंबिक प्रबोधन (Social Awareness) :-**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण शून्य करण्यासाठी सामाजिक आणि कौटुंबिक प्रबोधन हा सर्वात महत्त्वाचा दुवा आहे. कारण अनेकदा शाळा आणि पैसा उपलब्ध असूनही, केवळ सामाजिक विचारसरणीमुळे मुले शिक्षणापासून वंचित राहतात. गावातील ग्रामसभेत शिक्षणाच्या विषयाला प्राधान्य द्यावे. शिक्षण हे केवळ नोकरीसाठी नसून, शेती सुधारण्यासाठी आणि सन्मानाने जगण्यासाठी आवश्यक आहे.मुलींनी शिक्षणात यश मिळवले आहे, अशा स्थानिक मुलींचा गावात सत्कार करावा. यामुळे इतर पालकांना प्रेरणा मिळते. मुलींचे शिक्षण हे 'ओझे' नसून 'गुंतवणूक' आहे, हा विचार रुजवावा.सामाजिक प्रबोधनाचा उद्देश 'पालकांना शिक्षणाचे भागीदार बनवणे' हा असावा. जेव्हा गावाला आणि पालकांना मुलांच्या शिक्षणात अभिमान वाटू लागेल, तेव्हा भौगोलिक आणि आर्थिक अडचणींवर मात करूनही ते मुलांना शाळेत पाठवतील.

**४. शालेय आणि शैक्षणिक सुधारणा (School-based Improvements) :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील गळती रोखण्यासाठी शालेय आणि शैक्षणिक सुधारणा करणे हा सर्वात शाश्वत उपाय आहे. शाळा जर विद्यार्थ्यांसाठी ओझे न ठरता एक आनंदाचे ठिकाण बनली, तर गळतीचे प्रमाण नैसर्गिकरित्या कमी होते. यासाठी खेळ, गाणी, चित्रकला आणि खेळांच्या माध्यमातून अध्यापन करावे. प्रत्येक शाळेत मुलींसाठी स्वतंत्र आणि स्वच्छ स्वच्छतागृह, पिण्याचे शुद्ध पाणी आणि डिजिटल क्लासरूमची सोय असावी. सुरुवातीच्या वर्षात प्राथमिक शिक्षण हे मुलांच्या स्थानिक बोलीभाषेतून असावे, ज्यामुळे त्यांना विषयाचे आकलन लवकर होईल आणि शिक्षणाची गोडी लागेल.दुर्गम भागात स्थानिक शिक्षकांना प्राधान्य द्यावे किंवा तिथे काम करणाऱ्या शिक्षकांसाठी विशेष भत्ते आणि निवासस्थानाची सोय करावी, जेणेकरून शिक्षकांची अनुपस्थिती कमी होईल.

**५. तंत्रज्ञानाचा वापर (Technological Integration) :-**

ग्रामीण भागातील प्राथमिक शिक्षणातील गळती रोखण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर हा एक आधुनिक आणि अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. भौगोलिक दुर्गमता आणि शिक्षकांची कमतरता यांसारख्या समस्यांवर तंत्रज्ञानामुळे मात करणे शक्य झाले आहे.तंत्रज्ञानाच्या मदतीने विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर रिअल-टाइम लक्ष ठेवता येते.जर एखादा विद्यार्थी सलग काही दिवस गैरहजर राहिला, तर तंत्रज्ञानाद्वारे पालकांना स्वयंचलित (Automated) मेसेज किंवा कॉल पाठवण्याची व्यवस्था असावी. यामुळे पालकांना मुलांच्या गैरहजेरीचे गांभीर्य समजते.शिक्षकांना नवनवीन तंत्रज्ञान वापरण्याचे प्रशिक्षण दिल्यास ते विद्यार्थ्यांना अधिक प्रभावीपणे शिकवू शकतात.शिक्षकांना इंटरनेटवरून उत्तम शैक्षणिक व्हिडिओ आणि पीपीटी (PPT) वापरण्यास प्रोत्साहन द्यावे, जेणेकरून वर्गातील वातावरण उत्साहवर्धक राहील.अतिदुर्गम भागात जिथे टीव्ही किंवा इंटरनेट नाही, तिथे स्थानिक रेडिओ स्टेशनच्या माध्यमातून शैक्षणिक कार्यक्रम प्रसारित करावेत. हे विशेषतः स्थलांतरित कामगारांच्या मुलांसाठी उपयुक्त ठरू शकते.तंत्रज्ञान हे केवळ एक साधन नसून ते दुर्गम

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

भागातील विद्यार्थ्यांसाठी 'खिडकी' आहे. तंत्रज्ञानाचा योग्य वापर केल्यास शाळा आणि घर यातील अंतर कमी होऊन विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढतो, ज्यामुळे गळतीचे प्रमाण निश्चितपणे कमी होते.

**निष्कर्ष :-**

गळती रोखण्यासाठी 'शाळा विद्यार्थ्यांच्या दारापर्यंत पोहोचवणे' किंवा 'विद्यार्थ्यांना शाळेपर्यंत सुरक्षितपणे पोहोचवणे' या दोन सूत्रांवर काम करणे गरजेचे आहे. जेव्हा शिक्षण हे आर्थिकदृष्ट्या परवडणारे आणि सामाजिकदृष्ट्या प्रतिष्ठेचे होईल, तेव्हाच गळतीचे प्रमाण शून्यावर येईल. केवळ शाळा उघडून चालणार नाही, तर त्या विद्यार्थ्यांच्या निवासस्थानापासून चालत जाण्यायोग्य अंतरावर असणे किंवा सुरक्षित वाहतूक व्यवस्था असणे अत्यंत आवश्यक आहे.

**समारोप (Conclusion) :-**

ग्रामीण आणि दुर्गम भागातील भौगोलिक स्थिती आणि प्राथमिक शिक्षणाची गळती यांचा अत्यंत जवळचा संबंध आहे. 'शाळेचे अंतर' हे केवळ एक भौतिक अंतर नसून ते ग्रामीण विद्यार्थ्यांच्या प्रगतीमधील एक मोठी मानसिक आणि सामाजिक भिंत आहे. दुर्गम डोंगरदऱ्या, नद्या-नाले आणि सुरक्षित वाहतूक साधनांचा अभाव यामुळे प्राथमिक स्तरावरच अनेक विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकले जात आहेत.

**संदर्भ ग्रंथ :-**

१.भारतातील शैक्षणिक व्यवस्था आणि सामाजिक विषमता.-राधिका चोप्रा-ISBN No.978-0761933489
२.गळतीमागील सामाजिक आणि आर्थिक कारणांचे विश्लेषण.-जीबनलता सलाम-ISBN No.978-1138359260
३.महाराष्ट्राच्या संदर्भातील शैक्षणिक आणि सामाजिक बदल.-ए.आर. कामत-ISBN No.978-0861314393
४.ग्रामीण शिक्षणातील पायाभूत सुविधा आणि विद्यार्थ्यांच्या समस्या.-एस.बी.मोहंती-ISBN No.978-8170243458
५.प्राथमिक शिक्षणाची धोरणे आणि ग्रामीण आव्हाने.-जे.सी. अग्रवाल-ISBN No.978-8170412085

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# पारंपारिक शेती ते आधुनिक शेती : उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञान - अंतराचे चिकीत्सक विश्लेषण

**प्रेरणा गौतम लहांगे[1] डॉ.निनाद विजय जाधव[2]**
[1]प्रथम वर्ष कला हजेरी क. १२८
[2]ग्रामीण विकास विभाग, बी.एन.एन. महाविद्यालय,भिवंडी.
**Email:** drninadjadhav@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180415
ISSN: 2230-9578

Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 65-70
April 2026

**Submitted:** 05 Mar. 2026
**Revised:** 15 Mar. 2026
**Accepted:** 05 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

*सारांश :-*

*भारतातील शेती परंपरागत पद्धतींवर आधारित असून ती अनुभव, नैसर्गिक साधने व स्थानिक ज्ञानावर अवलंबून होती. परंतु वाढती लोकसंख्या, हवामान बदल, मर्यादित जमीन आणि बाजारातील स्पर्धा यांमुळे आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा अवलंब अपरिहार्य झाला आहे. यामध्ये यांत्रिकीकरण, सुधारित बियाणे, ठिबक व तुषार सिंचन, डिजिटल शेती, ड्रोन तंत्रज्ञान, मृदा परीक्षण आणि ई-मार्केटिंग यांचा समावेश होतो. तथापि, उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानामध्ये स्पष्ट अंतर आढळते. शिक्षणाचा अभाव, प्रशिक्षण सुविधांची मर्यादा, आर्थिक अडचणी, माहितिपर्यंत अपुरी पोहोच, तसेच पारंपरिक पद्धतींबद्दलची मानसिक बांधिलकी ही या अंतराची प्रमुख कारणे आहेत. अनेक शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाबाबत जागरूक असले तरी त्याचा प्रभावी वापर करण्यासाठी आवश्यक कौशल्ये त्यांच्याकडे नसतात. या तांत्रिक ज्ञानातील अंतराचा परिणाम उत्पादनक्षमता, खर्चनियंत्रण, शाश्वत शेती व उत्पन्नवाढ यांवर होतो. त्यामुळे कृषी विस्तार सेवा बळकट करणे, नियमित प्रशिक्षण शिबिरे, स्थानिक भाषेत डिजिटल मार्गदर्शन, शेतकरी उत्पादक संघटनांची भूमिका वाढवणे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी आवश्यक ठरते. अशा प्रकारे, पारंपरिक शेतीतून आधुनिक तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करणे हे उत्पादक, शाश्वत आणि स्पर्धात्मक शेतीसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे.*

## प्रस्तावना :-

भारतीय शेती ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असून ती प्रामुख्याने पारंपरिक पद्धतींवर आधारित राहिली आहे. पिढ्यान्पिढ्या चालत आलेले अनुभवाधिष्ठित ज्ञान, नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर आणि स्थानिक हवामानानुसार शेती करणे ही पारंपरिक शेतीची वैशिष्ट्ये आहेत. मात्र बदलती सामाजिक-आर्थिक परिस्थिती, वाढती लोकसंख्या, अन्नसुरक्षेची गरज, हवामान बदलाचे आव्हान आणि बाजारपेठेतील स्पर्धा यांमुळे शेती क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वेगाने प्रवेश झाला आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानामध्ये सुधारित वाणांची बियाणे, यांत्रिकीकरण, सूक्ष्म सिंचन प्रणाली, मृदा परीक्षण, कीड-रोग व्यवस्थापनासाठी जैव-तंत्रज्ञान, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञान (ICT), डिजिटल शेती, ई-मार्केटिंग व ड्रोन तंत्रज्ञान यांचा समावेश होतो. या तंत्रज्ञानामुळे उत्पादनक्षमता वाढणे, खर्चात बचत होणे आणि शेती अधिक शाश्वत बनणे अपेक्षित आहे. तथापि, या तंत्रज्ञानाचा प्रभावी स्वीकार आणि वापर करण्यासाठी आवश्यक असलेले तांत्रिक ज्ञान सर्व शेतकऱ्यांपर्यंत समान प्रमाणात पोहोचलेले नाही.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ.निनाद विजय जाधव,ग्रामीण विकास विभाग, बी.एन.एन. महाविद्यालय,भिवंडी..*

**How to cite this article:**
लहांगे, . प्रेरणा . गौतम ., & जाधव, निनाद. विजय . (2026). पारंपारिक शेती ते आधुनिक शेती : उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञान - अंतराचे चिकीत्सक विश्लेषण. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 65–70.* https://doi.org/10.5281/zenodo.21254870

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21254870

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

विशेषतः उत्पादक शेतकऱ्यांच्या बाबतीत पारंपरिक ज्ञान आणि आधुनिक तांत्रिक माहिती यांच्यातील अंतर प्रकर्षाने जाणवते. शिक्षणाची पातळी, प्रशिक्षण व मार्गदर्शनाचा अभाव, आर्थिक मर्यादा, माहितीपर्यंत अपुरी पोहोच तसेच मानसिक व सामाजिक घटक यांमुळे हे तांत्रिक ज्ञानातील अंतर निर्माण झाले आहे. याचा थेट परिणाम शेती उत्पादन, उत्पन्न, संसाधनांचा कार्यक्षम वापर आणि शेतीच्या दीर्घकालीन टिकावावर होतो. या पार्श्वभूमीवर, पारंपरिक शेतीतून आधुनिक तंत्रज्ञानाकडे होत असलेल्या संक्रमण प्रक्रियेत उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतराचा चिकित्सक अभ्यास करणे आवश्यक ठरते. हा अभ्यास शेतकऱ्यांच्या गरजा, अडचणी आणि संधी समजून घेऊन प्रभावी धोरणे, प्रशिक्षण व्यवस्था आणि कृषी विस्तार सेवा अधिक सक्षम करण्यासाठी उपयुक्त ठरेल.

**उद्दिष्ट्ये :-**

१.पारंपरिक शेती आणि आधुनिक कृषी तंत्रज्ञानाच्या स्वरूपाचा सविस्तर आढावा घेणे.

२.पारंपरिक शेती व आधुनिक तंत्रज्ञान यांमधील तांत्रिक, आर्थिक आणि कृषी व्यवस्थापनाचा अभ्यास करणे.

३. शेतकऱ्यांचे (उत्पादक) आधुनिक कृषी तंत्रज्ञानाबाबतचे ज्ञान, कौशल्ये व जागरूकतेची पातळी मोजणे.

४. कृषी प्रशिक्षण, प्रात्यक्षिके, विस्तार सेवा व मार्गदर्शन यांची उपलब्धता आणि त्यांची परिणामकारकता तपासणे.

५. तांत्रिक ज्ञानातील अंतराचा शेती उत्पादनक्षमता, उत्पादन खर्च, पीक गुणवत्ता आणि शेतकरी उत्पन्नावर होणारा परिणाम अभ्यासणे.

**कारणे :-**

**१. शिक्षणाचा अभाव व शैक्षणिक मर्याद :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण होत असताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर निर्माण होण्यामागे शिक्षणाचा अभाव व शैक्षणिक मर्यादा हे अत्यंत महत्त्वाचे कारण आहे. भारतीय शेती प्रामुख्याने ग्रामीण भागात केंद्रित असल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना औपचारिक शिक्षणाच्या संधी मर्यादित प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. त्यामुळे आधुनिक कृषी तंत्रज्ञान समजून घेणे व त्याचा प्रभावी वापर करणे अनेक शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक ठरते. आधुनिक कृषी तंत्रज्ञान हे वैज्ञानिक संशोधन, तांत्रिक संकल्पना, गणितीय मोजमाप आणि माहिती तंत्रज्ञानावर आधारित आहे. सुधारित बियाणे, मृदा परीक्षण, खतांचे संतुलित व्यवस्थापन, कीड व रोग नियंत्रणासाठी शिफारसी, यांत्रिकीकरण तसेच डिजिटल शेती यांसारख्या बाबी समजून घेण्यासाठी किमान शैक्षणिक पातळी आवश्यक असते. मात्र कमी शिक्षणामुळे शेतकऱ्यांना या संकल्पनांचा योग्य अर्थ लावता येत नाही.

शैक्षणिक मर्यादांमुळे अनेक शेतकरी कृषीविषयक पुस्तके, मार्गदर्शक पुस्तिका, शासकीय सूचना, कृषी ॲप्स व डिजिटल सल्ला सेवा प्रभावीपणे वापरू शकत नाहीत. त्यामुळे त्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची अद्ययावत माहिती मिळत नाही आणि ते पारंपरिक अनुभवाधिष्ठित ज्ञानावरच अवलंबून राहतात

**२. कृषी प्रशिक्षण व कौशल्य विकासाचा अभाव :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे होत असलेल्या संक्रमण प्रक्रियेत उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर वाढण्यामागे कृषी प्रशिक्षण व कौशल्य विकासाचा अभाव हे एक महत्त्वाचे कारण आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यासाठी केवळ माहिती नव्हे, तर प्रत्यक्ष प्रशिक्षण, सातत्यपूर्ण मार्गदर्शन आणि कौशल्यांची आवश्यकता असते. मात्र बहुतेक शेतकऱ्यांना अशा प्रकारच्या प्रशिक्षण सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. आधुनिक शेतीमध्ये सुधारित बियाण्यांची निवड, मृदा परीक्षण अहवालाचे वाचन, खतांचे संतुलित व्यवस्थापन, ठिबक व तुषार सिंचन प्रणालीचा वापर, यांत्रिक अवजारे हाताळणे, कीड व रोग व्यवस्थापन तसेच डिजिटल साधनांचा वापर यांसारख्या विविध कौशल्यांची गरज असते. योग्य प्रशिक्षणाच्या अभावामुळे शेतकरी ही तंत्रज्ञान प्रक्रिया समजून घेऊ शकत नाहीत किंवा अर्धवट माहितीच्या आधारे त्यांचा चुकीचा वापर करतात. ग्रामीण भागात कृषी प्रशिक्षण केंद्रांची संख्या मर्यादित असून उपलब्ध प्रशिक्षण कार्यक्रमही अनेकदा सैद्धांतिक स्वरूपाचे असतात. प्रत्यक्ष शेतावर आधारित प्रात्यक्षिके, तंत्रज्ञानाचे प्रत्यक्ष दर्शन व अनुभवाधारित प्रशिक्षण कमी प्रमाणात दिले जाते. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होत नाही आणि ते नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास मागे पडतात.

**३. आर्थिक अडचणी व भांडवलाची कमतरता :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे वाटचाल करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर निर्माण होण्यामागे आर्थिक अडचणी व भांडवलाची कमतरता हे अत्यंत महत्त्वाचे आणि मूलभूत कारण आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी सुरुवातीस मोठ्या प्रमाणात आर्थिक गुंतवणूक आवश्यक असते. मात्र बहुसंख्य शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे त्यांना हे तंत्रज्ञान आत्मसात करणे कठीण जाते. आधुनिक शेतीमध्ये वापरली जाणारी यंत्रसामग्री, सुधारित वाणांची बियाणे, ठिबक व तुषार सिंचन प्रणाली, मृदा परीक्षण, कीड-रोग नियंत्रणासाठीची आधुनिक साधने तसेच डिजिटल तंत्रज्ञान यांचा खर्च तुलनेने

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

जास्त असतो. लघु व अल्पभूधारक शेतकऱ्यांकडे आवश्यक भांडवल नसल्यामुळे ते या तंत्रज्ञानात गुंतवणूक करू शकत नाहीत. परिणामी ते पारंपरिक शेती पद्धतींवरच अवलंबून राहतात. भांडवलाच्या कमतरतेबरोबरच कर्ज उपलब्धतेच्या अडचणीही शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानवृद्धीला अडथळा ठरतात. बँकांकडून कर्ज मिळण्यासाठी लागणाऱ्या अटी, कागदपत्रांची गुंतागुंत, वेळेची मर्यादा आणि कधी कधी जास्त व्याजदर यांमुळे शेतकरी औपचारिक वित्तसंस्थांपासून दूर राहतात. परिणामी त्यांना सावकारांकडून कर्ज घ्यावे लागते, ज्यामुळे आर्थिक ओझे वाढते आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची क्षमता कमी होते.

**४. पारंपरिक मानसिकता व अनुभवाधिष्ठित विश्वास :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण होत असताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर वाढण्यामागे पारंपरिक मानसिकता व अनुभवाधिष्ठित विश्वास हे एक महत्त्वाचे सामाजिक-मानसिक कारण आहे. भारतीय शेती ही पिढ्यान्पिढ्या चालत आलेल्या अनुभवांवर आधारित असल्यामुळे अनेक शेतकरी आपल्या पूर्वजांनी वापरलेल्या शेती पद्धतींवर अधिक विश्वास ठेवतात आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याबाबत साशंक राहतात. अनेक शेतकऱ्यांची अशी धारणा असते की, “आपण वर्षानुवर्षे ज्या पद्धतीने शेती करत आलो आहोत तीच पद्धत योग्य आहे.” या मानसिकतेमुळे आधुनिक कृषी तंत्रज्ञानातील वैज्ञानिक शिफारसी, नव्या पद्धती व प्रयोग स्वीकारण्यास ते अनुत्सुक असतात. अनुभवाधिष्ठित ज्ञानाला प्राधान्य दिल्यामुळे आधुनिक तांत्रिक माहिती दुय्यम ठरते. पारंपरिक मानसिकतेमुळे शेतकऱ्यांमध्ये जोखीम टाळण्याची प्रवृत्तीही अधिक दिसून येते. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास पीक अपयशी ठरण्याची भीती, आर्थिक नुकसान होण्याची शक्यता आणि नवीन प्रयोगांचे परिणाम अनिश्चित असणे यांमुळे शेतकरी सुरक्षित वाटणाऱ्या जुन्याच पद्धतींचा अवलंब करतात. यामुळे तांत्रिक ज्ञान आत्मसात करण्याची प्रक्रिया मंदावते.

**५. जोखीम टाळण्याची प्रवृत्ती :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे वाटचाल करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर वाढण्यामागे जोखीम टाळण्याची प्रवृत्ती हे एक महत्त्वाचे कारण आहे. शेती हा व्यवसाय मुळातच हवामान, नैसर्गिक आपत्ती, कीड-रोग, बाजारभावातील चढउतार आणि उत्पादन खर्चातील वाढ यांमुळे अत्यंत अनिश्चित व जोखमीचा आहे. अशा परिस्थितीत शेतकरी अतिरिक्त जोखीम पत्करण्यास सहसा तयार नसतात. आधुनिक कृषी तंत्रज्ञान स्वीकारताना सुरुवातीस आर्थिक गुंतवणूक, नवीन पद्धतींचा अवलंब आणि पारंपरिक अनुभवापेक्षा वेगळ्या निर्णयांची गरज असते. या प्रक्रियेत अपयश येण्याची शक्यता असल्याची भीती शेतकऱ्यांमध्ये असते. पीक नुकसान झाल्यास किंवा अपेक्षित उत्पादन मिळाले नाही तर त्याचा थेट आर्थिक फटका बसतो, ही भीती शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानापासून दूर ठेवते. जोखीम टाळण्याच्या प्रवृत्तीमुळे अनेक शेतकरी “जुनी पद्धत कमी उत्पादन देत असली तरी सुरक्षित आहे” असा विचार करतात. परिणामी ते पारंपरिक शेती पद्धतींनाच प्राधान्य देतात आणि आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची व वापरण्याची तयारी दाखवत नाहीत. यामुळे तांत्रिक ज्ञान आत्मसात करण्याची प्रक्रिया थांबते किंवा संथ होते. याशिवाय, बाजारपेठेतील अनिश्चितता आणि हमीभावाबाबतची अस्पष्टता हीही जोखीम वाढविणारी कारणे आहेत. आधुनिक तंत्रज्ञान वापरून उत्पादन वाढले तरी त्याला योग्य दर मिळेलच याची खात्री नसल्यामुळे शेतकरी नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे तांत्रिक ज्ञानातील अंतर अधिक दृढ होते.

**उपायोजना :-**

**१. कृषी शिक्षण व साक्षरतेचा प्रसार :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी कृषी शिक्षण व साक्षरतेचा प्रसार ही एक मूलभूत आणि प्रभावी उपाययोजना ठरते. शिक्षणामुळे शेतकऱ्यांची विचारक्षमता, निर्णयक्षमता आणि तंत्रज्ञान स्वीकारण्याची तयारी वाढते, ज्यामुळे आधुनिक शेती पद्धतींचा प्रभावी वापर शक्य होतो. ग्रामीण भागातील अनेक शेतकरी अल्पशिक्षित किंवा अशिक्षित असल्यामुळे आधुनिक कृषी तंत्रज्ञानाशी संबंधित वैज्ञानिक माहिती, तांत्रिक संज्ञा, मार्गदर्शक सूचना आणि डिजिटल साधने समजून घेणे त्यांना कठीण जाते. त्यामुळे कृषी शिक्षणाचा प्रसार केवळ औपचारिक शिक्षणापुरता मर्यादित न ठेवता व्यावहारिक व कार्यात्मक साक्षरतेवर भर देणे आवश्यक आहे.

कृषी शिक्षण स्थानिक भाषेत, सोप्या शब्दांत व प्रत्यक्ष उदाहरणांच्या आधारे दिल्यास शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञान सहज समजते. कृषी विषयक पुस्तिका, पोस्टर्स, चित्रफिती, रेडिओ कार्यक्रम, मोबाईल ॲप्स आणि डिजिटल माध्यमांचा वापर करून माहिती प्रसारित केल्यास साक्षरतेचा प्रभाव वाढतो. यामुळे शेतकरी मृदा परीक्षण अहवाल, खतांच्या शिफारसी, पीक संरक्षण उपाय आणि शासकीय योजना यांची माहिती स्वतः समजून घेऊ शकतात.

**२. प्रभावी कृषी प्रशिक्षण व कौशल्य विकास** पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे वाटचाल करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी प्रभावी कृषी प्रशिक्षण व कौशल्य विकास ही अत्यंत महत्त्वाची उपाययोजना आहे. आधुनिक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

शेती केवळ अनुभवावर आधारित न राहता वैज्ञानिक ज्ञान, तांत्रिक कौशल्ये आणि व्यवस्थापन क्षमतांवर अवलंबून असल्यामुळे शेतकऱ्यांना सतत अद्ययावत प्रशिक्षण देणे आवश्यक ठरते. प्रभावी कृषी प्रशिक्षण हे केवळ सैद्धांतिक माहितीपुरते मर्यादित न ठेवता प्रत्यक्ष शेतावर आधारित असावे. प्रात्यक्षिके, मॉडेल फार्म, शेतशाळा आणि "शिकून करून पाहणे" (learning by doing) या पद्धतीद्वारे शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव मिळतो. यामुळे सुधारित बियाणे वापर, मृदा परीक्षण, खत व्यवस्थापन, ठिबक व तुषार सिंचन, कीड-रोग नियंत्रण आणि यांत्रिकीकरण यांसारखी कौशल्ये प्रभावीपणे विकसित होतात. कृषी प्रशिक्षण स्थानिक गरजांनुसार आणि पीक पद्धतीनुसार आखले गेले पाहिजे. प्रशिक्षणासाठी स्थानिक भाषा, सोपी मांडणी आणि प्रत्यक्ष उदाहरणांचा वापर केल्यास शेतकऱ्यांना तंत्रज्ञान समजणे सुलभ होते. तसेच महिलाशेतकरी, तरुण शेतकरी आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे आवश्यक आहे.

**३. कृषी विस्तार सेवा बळकट करणे :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी कृषी विस्तार सेवा बळकट करणे ही अत्यंत महत्त्वाची उपाययोजना आहे. कृषी विस्तार सेवा या संशोधनातून निर्माण झालेले वैज्ञानिक ज्ञान थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याचे प्रभावी माध्यम असून, त्या मजबूत झाल्यास आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार वेगाने होऊ शकतो. सध्या अनेक ठिकाणी कृषी विस्तार सेवांचा शेतकऱ्यांशी थेट आणि सातत्यपूर्ण संपर्क मर्यादित आहे. कृषी अधिकारी, तज्ज्ञ व मार्गदर्शक यांची संख्या अपुरी असल्यामुळे सर्व शेतकऱ्यांपर्यंत तांत्रिक माहिती पोहोचत नाही. त्यामुळे कृषी विस्तार यंत्रणा अधिक सक्षम, गतिमान आणि शेतकरी-केंद्रित करणे आवश्यक आहे. कृषी विस्तार सेवांमध्ये शेतपातळीवर प्रत्यक्ष भेटी, प्रात्यक्षिके, शेतशाळा, मार्गदर्शन शिबिरे आणि समस्या-निराकरण सत्रे यांचा समावेश करावा. शेतकऱ्यांच्या पिकांशी संबंधित अडचणी समजून घेऊन तत्काळ तांत्रिक सल्ला दिल्यास शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास प्रवृत्त होतात. याशिवाय, माहिती व संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी विस्तार सेवा अधिक प्रभावी करता येतात. मोबाईल संदेश सेवा, कृषी हेल्पलाईन, व्हिडिओ सल्ला, मोबाईल ॲप्स आणि ऑनलाइन मंचांच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत तांत्रिक माहिती जलदगतीने पोहोचवता येते. यामुळे भौगोलिक मर्यादा दूर होतात.

**४. सुलभ आर्थिक सहाय्य व कर्जव्यवस्था :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी सुलभ आर्थिक सहाय्य व कर्जव्यवस्था ही एक अत्यंत महत्त्वाची उपाययोजना आहे. आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक क्षमता अनेक शेतकऱ्यांकडे नसल्यामुळे ते नवीन तंत्रज्ञान शिकण्यास व वापरण्यास मागे पडतात. आधुनिक शेतीसाठी लागणारी यंत्रसामग्री, सूक्ष्म सिंचन प्रणाली, सुधारित बियाणे, कीड-रोग नियंत्रणासाठीची साधने तसेच डिजिटल तंत्रज्ञान यांचा खर्च मोठा असतो. सुलभ व कमी व्याजदरात कर्ज उपलब्ध झाल्यास शेतकरी या तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यास प्रोत्साहित होतात. त्यामुळे औपचारिक बँकिंग प्रणाली, सहकारी बँका आणि सूक्ष्म वित्तसंस्था यांच्यामार्फत कर्जप्रक्रिया सोपी व पारदर्शक करणे आवश्यक आहे. कर्जव्यवस्थेबरोबरच अनुदाने, आर्थिक प्रोत्साहन योजना आणि तंत्रज्ञान आधारित सहाय्य योजना प्रभावीपणे राबविल्या पाहिजेत. विशेषतः लघु व अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी स्वतंत्र आर्थिक योजना आखल्यास त्यांना आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्याची संधी मिळेल. कर्ज व अनुदानाच्या माहितीचा प्रसार स्थानिक भाषेत व सोप्या पद्धतीने केल्यास शेतकऱ्यांचा सहभाग वाढेल. सुलभ आर्थिक सहाय्यामुळे शेतकरी केवळ तंत्रज्ञान खरेदीपर्यंत मर्यादित राहत नाहीत, तर संबंधित प्रशिक्षण, देखभाल व सल्ला सेवा घेण्यासही सक्षम होतात. यामुळे तांत्रिक ज्ञानाचा प्रभावी वापर होऊन उत्पादनक्षमता वाढते.

**५.डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर ही अत्यंत महत्त्वाची उपाययोजना ठरते. माहिती तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कृषीविषयक ज्ञान, सल्ला आणि नव्या तंत्रज्ञानाची माहिती अल्प वेळेत व व्यापक प्रमाणात शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविता येते. डिजिटल माध्यमांचा वापर करून शेतकऱ्यांना पिकांची लागवड, खत व्यवस्थापन, मृदा परीक्षण, कीड व रोग नियंत्रण, हवामान अंदाज आणि बाजारभाव यांसंबंधी अद्ययावत माहिती देता येते. मोबाईल ॲप्स, एसएमएस सेवा, व्हाट्सअप, कृषी हेल्पलाईन, ऑनलाइन व्हिडिओ मार्गदर्शन आणि वेब पोर्टल्स यांमुळे शेतकऱ्यांना वेळेवर आणि अचूक तांत्रिक सल्ला मिळतो. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना डिजिटल तंत्रज्ञान वापरण्यास सक्षम करण्यासाठी डिजिटल साक्षरतेवर विशेष भर देणे आवश्यक आहे. सोप्या व स्थानिक भाषेत तयार केलेली ॲप्स,, व्हिडिओ आणि ऑडिओ सामग्री शेतकऱ्यांना सहज समजते. यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि ते आधुनिक तंत्रज्ञान स्वीकारण्यास

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

प्रवृत्त होतात. डिजिटल तंत्रज्ञानामुळे कृषी विस्तार सेवाही अधिक प्रभावी बनू शकतात. तज्ज्ञ व शेतकरी यांच्यात थेट संवाद साधता येतो, समस्यांचे तत्काळ निराकरण होते आणि भौगोलिक अंतराची अडचण दूर होते. तसेच ई-मार्केटिंग व ऑनलाइन बाजारपेठांमुळे शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य दर मिळण्यास मदत होते.

**६. जोखीम कमी करणाऱ्या योजना :-**

पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी जोखीम कमी करणाऱ्या योजना अत्यंत महत्त्वाच्या ठरतात. शेती हा व्यवसाय नैसर्गिक, आर्थिक आणि बाजारातील अनिश्चिततेमुळे जोखमीचा असल्याने शेतकरी नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्यास अनेकदा कचरतात. त्यामुळे जोखीम कमी करणाऱ्या प्रभावी उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. पीक विमा योजना, हवामान आधारित विमा आणि उत्पन्न संरक्षण योजना यांमुळे नैसर्गिक आपत्ती, अवकाळी पाऊस, दुष्काळ, कीड-रोग आदींमुळे होणारे नुकसान भरून निघण्यास मदत होते. जोखीम कमी झाल्याची खात्री मिळाल्यास शेतकरी आधुनिक कृषी तंत्रज्ञान वापरण्याचा आत्मविश्वास प्राप्त करतात आणि नवीन प्रयोग करण्यास तयार होतात. किमान आधारभूत किंमत (MSP) व हमीभाव योजनांची प्रभावी अंमलबजावणी शेतकऱ्यांसाठी अत्यंत आवश्यक आहे. उत्पादन वाढवूनही योग्य दर मिळणार नाही, ही भीती शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानापासून दूर ठेवते. बाजारभावाची स्थिरता मिळाल्यास शेतकरी आधुनिक पद्धती स्वीकारण्यास अधिक उत्सुक होतात. याशिवाय, शेतकऱ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा टप्प्याटप्प्याने अवलंब करण्यास प्रोत्साहन देणेही महत्त्वाचे आहे. प्रात्यक्षिक शेत, प्रायोगिक प्रकल्प आणि सामूहिक प्रयोगांमुळे जोखीम सामायिक होते आणि नुकसान होण्याची भीती कमी होते. प्रात्यक्षिक शेत व यशस्वी प्रयोगांचे दर्शन पारंपरिक शेतीतून आधुनिक कृषी तंत्रज्ञानाकडे संक्रमण करताना उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर कमी करण्यासाठी प्रात्यक्षिक शेत व यशस्वी प्रयोगांचे दर्शन ही अतिशय प्रभावी आणि विश्वासार्ह उपाययोजना आहे. अनेक शेतकरी "पाहिल्याशिवाय विश्वास नाही" या अनुभवाधिष्ठित भूमिकेवर ठाम असल्यामुळे केवळ सैद्धांतिक माहितीपेक्षा प्रत्यक्ष उदाहरणे अधिक परिणामकारक ठरतात. प्रात्यक्षिक शेतांवर आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष वापर करून त्याचे फायदे, खर्च, उत्पादनवाढ आणि नफा यांचे स्पष्ट दर्शन घडविले जाते. सुधारित बियाणे, ठिबक व तुषार सिंचन, मृदा आरोग्य कार्ड आधारित खत व्यवस्थापन, एकात्मिक कीड व्यवस्थापन, यांत्रिकीकरण व डिजिटल साधनांचा प्रत्यक्ष अनुभव शेतकऱ्यांना मिळतो. यामुळे तांत्रिक ज्ञान केवळ माहितीपुरते न राहता प्रत्यक्ष उपयोगात येते. यशस्वी शेतकऱ्यांचे प्रयोग, नाविन्यपूर्ण पद्धती आणि स्थानिक पातळीवरील यशोगाथा इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरतात. आपल्या परिसरातीलच शेतकरी आधुनिक तंत्रज्ञान वापरून यशस्वी झालेले पाहिल्यास नव्या तंत्रज्ञानाविषयीची भीती, शंका आणि जोखीमभावना कमी होते.

**निष्कर्ष :-**

पारंपरिक शेती ते आधुनिक तंत्रज्ञान या प्रवासात उत्पादक शेतकऱ्यांच्या तांत्रिक ज्ञानातील अंतर हा शेती विकासासमोरील एक महत्त्वाचा व संवेदनशील प्रश्न आहे. प्रस्तुत चिकित्सक अभ्यासातून असे स्पष्ट होते की शेतीमध्ये आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध असतानाही त्याचा प्रभावी स्वीकार शेतकऱ्यांकडून अपेक्षित प्रमाणात होत नाही. यामागे शैक्षणिक मर्यादा, कृषी प्रशिक्षण व कौशल्य विकासाचा अभाव, आर्थिक अडचणी, पारंपरिक मानसिकता, अनुभवाधिष्ठित विश्वास आणि जोखीम टाळण्याची प्रवृत्ती ही प्रमुख कारणे आहेत. अभ्यासातून असेही आढळते की केवळ आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रचार पुरेसा नसून ते शेतकऱ्यांच्या गरजा, आर्थिक क्षमता आणि स्थानिक परिस्थितीनुसार सुलभ पद्धतीने पोहोचविणे अत्यावश्यक आहे. कृषी शिक्षण व साक्षरतेचा प्रसार केल्यास शेतकऱ्यांची विचारशक्ती वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे वळते. प्रभावी कृषी प्रशिक्षण, प्रात्यक्षिक शेत व यशस्वी प्रयोगांचे दर्शन यांमुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढतो आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची मानसिकता निर्माण होते. कृषी विस्तार सेवा बळकट करणे, डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, सुलभ आर्थिक सहाय्य व कर्जव्यवस्था तसेच जोखीम कमी करणाऱ्या योजना या उपाययोजना एकत्रितपणे राबविल्यास तांत्रिक ज्ञानातील अंतर मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. यामुळे शेतकरी आधुनिक शेतीकडे अधिक सकारात्मक दृष्टीने पाहू लागतात. शेवटी असे म्हणता येईल की पारंपरिक शेती व आधुनिक तंत्रज्ञान यांमधील दरी कमी करणे ही काळाची गरज आहे. तांत्रिक ज्ञानसंपन्न, आत्मविश्वासू व सक्षम शेतकरी घडविणे हे शेतीच्या शाश्वत विकासासाठी आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी अत्यंत आवश्यक आहे.

**समारोप :-**

प्रस्तुत चिकित्सक अभ्यासातून असे दिसून येते की, शेतकऱ्यांकडे पिढीजात अनुभव, मेहनत आणि नैसर्गिक साधनांचे सखोल ज्ञान असले तरी आधुनिक शेती तंत्रज्ञानाशी संबंधित माहिती, कौशल्ये व आत्मविश्वास यांचा ग्रामीण भागातील लहान (गरीब) शेतकरी यांच्यात अभाव जाणवतो. या अंतरामुळे शेतीची उत्पादकता, नफा आणि शाश्वतता अपेक्षित पातळीपर्यंत पोहोचू शकत नाही. या अभ्यासात

शैक्षणिक मर्यादा, कृषी प्रशिक्षणाचा अभाव, आर्थिक अडचणी, पारंपरिक शेती करण्याची पद्धत, जोखीम टाळण्याची प्रवृत्ती आणि प्रभावी मार्गदर्शनाचा अभाव ही तांत्रिक ज्ञानातील अंतराची प्रमुख कारणे असल्याचे स्पष्ट होते. तसेच आधुनिक शेती तंत्रज्ञानाचा स्वीकार ग्रामीण शेतकऱ्यांकडून मर्यादित स्वरूपाचा असल्याची करणे म्हणजे त्यांची सामाजिक, आर्थिक व मानसिक घटक असल्याचे दिसून येते. यावर उपाय म्हणून कृषी शिक्षण व साक्षरतेचा प्रसार, प्रभावी प्रशिक्षण व कौशल्य विकास, कृषी विस्तार सेवांचे बळकटीकरण, डिजिटल व माहिती तंत्रज्ञानाचा वापर, सुलभ आर्थिक सहाय्य व कर्जव्यवस्था, जोखीम कमी करणाऱ्या योजना राबिवणे आवश्यक आहेत. यावरून असे दिसून येते की, पारंपरिक शेती आणि आधुनिक तंत्रज्ञान यांचा समन्वय साधून शेतकऱ्यांना तांत्रिकदृष्ट्या सक्षम करणे ही काळाची गरज आहे.

**संदर्भ ग्रंथ :-**

१.शेतकऱ्यांच्या वर्तणुकीतील बदल आणि ज्ञानातील अंतर.-ए.डब्ल्यू. व्हॅन डेन बान-ISBN No.978-8123902340.

२.तंत्रज्ञान स्वीकारताना येणाऱ्या मर्यादा.-एस.ए. पाटील-ISBN No.978-8170355410.

३.भारतीय ग्रामीण समाजशास्त्र-डॉ. जे. एफ. पाटील-ISBN No.978-8184835824

४.पारंपरिक शेतीकडून आधुनिकतेकडे वळताना येणारी आव्हाने.एस.के. पंत-ISBN No.978-8170247654.

५.विस्तार शिक्षणाद्वारे शेतकऱ्यांचे तांत्रिक ज्ञान कसे वाढवता येईल याचे विश्लेषण.-आर.के. सामंता-ISBN No.978-8170186106.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# प्राचीन व्यापार मार्ग आणि सांस्कृतिक अंतर : रेशीम मार्ग (Silk Route) एक ऐतिहासिक अभ्यास

**श्रीमती. रतन पी. सोनावणे**
इतिहास विभाग, बी. एन. एन. कनिष्ठ महाविद्यालय, भिवंडी.
**Email**: ratankaskar@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180416
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 71-73
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश :***

*रेशीम मार्ग हा प्राचीन काळातील चीन, मध्य आशिया, भारत, अरबस्तान आणि युरोपला जोडणाऱ्या जमिनीवरील आणि सागरी व्यापार मार्गाचे एक विशाल जाळे होते. हा मार्ग ख्रिस्तपूर्व काळापासून सुरु होऊन हजारो वर्षे व्यापार आणि संस्कृतींच्या देवाणघेवाणीचे मुख्य साधन होते. प्रामुख्याने चिनी रेशमाची युरोपात या मार्गाने निर्यात होत असल्यामुळे १९ व्या शतकात या मार्गाला 'रेशीम मार्ग' हे नाव पडले. हा मार्ग रेशमाचा व्यापार करण्यासाठी अत्यंत लाभदायक म्हणून ओळखला जात होता. म्हणून जर्मन भूगोल शास्त्रज्ञ फर्डिनांड वॉन रिखथोकेन यांनी १९ व्या शतकात या मार्गांना रेशीम मार्ग हे नाव दिले. प्राचीन व्यापार मार्गांमध्ये रेशीम मार्गाचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. या मार्गामुळे आशिया, आफ्रिका आणि युरोप खंडामध्ये आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक संबंध प्रस्थापित झाले. थोडक्यात रेशीम मार्ग हा केवळ व्यापाराचा रस्ता नव्हता तर, तो विविध संस्कृतींना जोडणारा ऐतिहासिक धागा होता, ज्याने जगाच्या इतिहासाला कलाटणी दिली.*

भौगोलिक अंतरामुळे विविध संस्कृतीमध्ये जे अंतर होते, ते व्यापार मार्गांनी कसे कमी केले आणि त्यातून कला, धर्म (उदा. बौद्ध धर्म) व संस्कृतीचे आदान - प्रदान कसे झाले.

**प्रस्तावना :**

प्राचीन काळात मानवी समाज लहान व विखुरलेल्या स्वरुपात अस्तित्वात होता. प्रत्येक प्रदेशाची भौगोलिक परिस्थिती, हवामान, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि उत्पादन पध्दती वेगवेगळ्या होत्या. या भिन्नतेमुळे मानवाने परस्पर वस्तूंची देवाणघेवाण सुरु केली. हळुहळू हि देवाणघेवाण नियमित व्यापारात रुपांतरीत झाली. व्यापाराच्या गरजेतून प्राचीन व्यापार मार्गांचा उदय झाला. हे मार्ग केवळ आर्थिक व्यापारापुरते मर्यादित नव्हते, तर त्यामुळे सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि बौद्धिक संपर्क वाढला. प्राचीन व्यापार मार्गांमध्ये 'रेशीम मार्ग' हा सर्वात दीर्घ, प्रभावी आणि ऐतिहासिक दृष्ट्या महत्त्वाचा मार्ग मानला जातो. या संशोधन लेखात रेशीम मार्गाचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. प्राचीन काळी विविध प्रदेशांमध्ये भौगोलिक अडथळयांमुळे सांस्कृतिक अंतर निर्माण झाले होते. या संशोधन लेखात रेशीम मार्गाच्या माध्यमातून सांस्कृतिक व भौगोलिक अंतर कसे कमी झाले याचा सखोल अभ्यास करण्यात येत आहे. रेशीम मार्ग विकसित झाल्यामुळे त्याचा विविध संस्कृतींच्या आर्थिक, सामाजिक आणि राजकीय जीवनावर कसा परिणाम झाला याचाही सखोल अभ्यास या संशोधन लेखात करण्यात येत आहे. रेशीम मार्ग हा केवळ आर्थिक व्यवहारांचा मार्ग नव्हता, तर तो जागतिक इतिहासाला दिशा देणारा एक महत्वपूर्ण दुवा होता. आजच्या जागतिकिकरणाच्या प्रक्रियेची मुळे या प्राचीन व्यापार मार्गात आढळतात. त्यामुळे रेशीम मार्गाचा इतिहास समजून घेणे आवश्यक आहे.

**सूचक शब्द :**
प्राचीन व्यापार, रेशीम मार्ग, प्राचीन व्यापार मार्ग, सांस्कृतिक देवाणघेवाण, रेशीम, कुशाण साम्राज्य, बौद्ध धर्म, भूमध्य समुद्र, व्यापारी काफिले, आंतरखंडीत संपर्क, धर्मप्रसार, तंत्रज्ञान.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्रीमती. रतन पी. सोनावणे,इतिहास विभाग, बी. एन. एन. कनिष्ठ महाविद्यालय, भिवंडी.*

**How to cite this article:**
रतन पी. सोनावणे. *(2026).* प्राचीन व्यापार मार्ग आणि सांस्कृतिक अंतर : रेशीम मार्ग *(Silk Route)* एक ऐतिहासिक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 71–73.*
https://doi.org/10.5281/zenodo.21255003

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21255003

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) प्राचीन व्यापार मार्गाची संकल्पना स्पष्ट करणे.

2) रेशीम मार्गाचा उदय व विस्तार अभ्यासणे.

३) रेशीम मार्गावरील व्यापाराच्या स्वरुपाचा अभ्यास करणे.

४) सांस्कृतिक व धार्मिक देवाणघेवाणीचा आढावा घेणे.

५) सामाजिक व आर्थिक परिणामांचा अभ्यास करणे.

६) आधुनिक जागतीकीकरणाशी रेशीम मार्गाची तुलना करणे.

**१. प्राचीन व्यापार मार्गाची संकल्पना -**

प्राचीन काळी वाहतूकीची साधने मर्यादित होती. तरीही मानवाने डोंगर वाळवंटे, नद्या आणि समुद्र पार करून व्यापार केला. स्थलमार्गाद्वारे कारवाँ पद्धतीने व्यापार होत असे. बंदरे विकसित करून सागरी मार्गाद्वारे वस्तूंची वाहतुक केली जात असे. हडप्पा, मेसोपोटेमिया, इजिप्त, चीनची संस्कृती या संस्कृत्या व्यापार मार्गामुळेच एकमेकांशी जोडल्या होत्या. या मार्गांमुळे शहरांचा विकास होऊन आंतरराष्ट्रीय व्यापाराची संकल्पना उदयास आली. व्यापारी मार्ग ही संकल्पना विविध प्रदेशांमध्ये मालाची देवाणघेवाण, वाहतुक आणि आर्थिक संबंध जोडण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या निश्चित मार्गाशी संबंधित आहे. हे मार्ग ऐतिहासिक दृष्ट्या केवळ वस्तूंच्या व्यापारासाठीच नव्हे, तर संस्कृती विचार आणि धार्मिक देवाणघेवाणीसाठी राहिले आहेत. `व्यापारी मार्ग म्हणजे दोन किंवा अधिक ठिकाणांना जोडणारा असा मार्ग ज्याचा वापर करून व्यापारी मालाची वाहतुक करतात.' हे मार्ग खुष्कीचे किंवा सागरी असू शकतात. या मार्गांमुळेच आर्थिक विकास, संस्कृतींचा प्रसार, सांस्कृतिक देवाण-घेवाण आणि धार्मिक प्रवासाला चालना मिळते.

**२. रेशीम मार्गाचा उदय व भौगोलिक विस्तार -**

रेशीम मार्गाचा उगम हा चीनमधील हान राजवंशाच्या काळात झाला. हा मार्ग चीनपासून मध्य आशिया, पर्शिया, अरब देश, आशिया मायनर आणि युरोपपर्यंत पसरला होता. रेशीम मार्गाचा जमिनीवरील विस्तार ६,५०० किमी. इतका लांब होता. इ.सन पूर्व दुसऱ्या शतकात चीनच्या हान राजवंशाच्या काळात सुरु झालेला हा मार्ग सुमारे १.५०० वर्षांहून अधिक काळ व्यापार आणि सांस्कृतिक देवाणघेवाणीचा मुख्य मार्ग राहिला आहे. ज्याद्वारे रेशमासह, मसाले, चहा, कापड आणि विचारांची देवाणघेवाण झाली. भारतातील कुशाण साम्राज्याची प्राचीन राजधानी कपिशा (बेग्राम) हे शहर रेशीम मार्गावर मोक्याच्या ठिकाणी वसलेले होते. अफगानिस्तान ते चीनपर्यंतचा व्यापारी मार्ग कुशाण राज्यांच्या ताब्यात होता. हा मार्ग तक्षशिला, खैरबखिंड येथून अफगानिस्तानमधील बामियान आणि तेथून पामीरच्या पठारावरून चीनकडे जात असे. ह्या मार्गाने कुशाण राजवटीत बौद्ध धर्माचा प्रसार चीनमध्ये होऊ शकला.

**३. रेशीम मार्गावरील व्यापाराचे स्वरूप -**

रेशीम मार्ग हा प्राचीनकाळी आशिया, युरोप आणि आफ्रिका खंडांना जोडणारा एक अत्यंत महत्त्वाचा व्यापार मार्ग होता. या मार्गावरून प्रामुख्याने चिनी रेशीम पश्चिमेकडे पाठविले जात असे. रेशमा व्यतिरिक्त या मार्गावरून मसाल्याचे पदार्थ, चहा, चिनीमातीची भांडी (Porcelain) कागद, चीनमधून पाठविण्यात येणारा दारुगोळा, भारत व इतर ठिकाणाहून काचेच्या वस्तू, लोकर, सुतीकापड, सुगंधी द्रव्ये, हस्तिदंत, मौल्यवान रत्ने यांची ने-आण होत असे. या मार्गावर उंट आणि इतर प्राण्यांचा वापर करून मालाची वाहतुक केली जात असे. त्यातून या मार्गावर ठिकठिकाणी व्यापारी शहरे विकसित झाली होती. या मार्गावर केवळ वस्तूंचाच व्यापार केला जात नव्हता तर बौद्ध धर्म, ख्रिश्चन धर्म, कला, विज्ञान, खगोलशास्त्र आणि वैद्यकशास्त्राची माहिती एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात प्रसारित झाली. भारत या मार्गाच्या केंद्रस्थानी होता. भारतातून मसाल्याचे पदार्थ, कापड आणि मौल्यवान खडे पश्चिमेकडे निर्यात केले जात असत. भारतीय सुती कापड व मसाल्यांना युरोपात मोठी मागणी होती.

**४. सांस्कृतिक व धार्मिक देवाणघेवाणीचा आढावा -**

रेशीम मार्ग हा केवळ व्यापाराचा रस्ता नव्हता ते तो आशिया, युरोप आणि आफ्रिकेला जोडणारा सांस्कृतिक आणि धार्मिक देवाणघेवाणीचा एक प्रमुख दुवा होता. या मार्गावरून बौद्ध, इस्लामिक, ख्रिश्चन आणि इतर संस्कृतींचा प्रसार झाला. विविध कला आणि विचारप्रणालीचे मिश्रण होऊन मध्य आशियात एक संमिश्र संस्कृती विकसित झाली. रेशीम मार्गाने तिसऱ्या ते सातव्या शतकादरम्यान भारताकडून चीन, मध्य आशिया आणि जपानपर्यंत बौद्ध धर्माचा प्रसार करण्यात महत्वाची भूमिका बजावली. गांधार कला ही भारतीय ग्रीक-रोमन शैलीचा सुरेख संगम होती. त्यातून अनेक बौद्ध मूर्तींची निर्मिती झाली. या मार्गावरून चिनी, भारतीय, पर्शियन आणि हेलेनिस्टिक (ग्रीक) संस्कृतीचा संगम झाला. यामुळे कला, संगीत, नृत्य आणि वेशभूषा यामध्ये नवीन बदल घडले. व्यापारी भिक्खू आणि प्रवाशांमुळे धर्म, दर्शन आणि विविध भाषांचा प्रसार झाला. रेशमासह इतर वस्तूंची देवाणघेवाण झाल्यामुळे संस्कृती अधिक श्रीमंत झाल्या. सातव्या शतकानंतर या मार्गावरून इस्लाम धर्माचा प्रसार वेगाने झाला. त्यामुळे या प्रदेशांची धार्मिक ओळख बदलली. रेशीम मार्ग हा प्राचीन जगाचा, संस्कृतींचा महामार्ग होता ज्याने मानवी इतिहासात विचारांची आणि विश्वासाची अभूतपूर्व देवाणघेवाण घडवून आणली.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**५. सामाजिक व आर्थिक परिणाम –**

रेशीम मार्गाने प्राचीनकाळी आशिया, युरोप आणि आफ्रिकेला जोडून अभूतपूर्व व्यापारी आणि सांस्कृतिक देवाणघेवाण घडवून आणली. यामुळे सोन्यानाण्याचे प्रवहण, नवीन शहरांचा विकास आणि रेशीम, मसाले, तंत्रज्ञान व धार्मिक विचारांचा प्रसार झाला. या मार्गाने बहुसांस्कृतिक समाज निर्माण केले आणि युरेशिमाच्या अर्थव्यवस्थांना जोडणारे एक जागतिक नेटवर्क बनवले. चीन ते भूमध्य समुद्रापर्यंत उच्च मुल्य असलेल्या उदा. रेशीम, पोर्सिलेन, मसाले इ. व्यापाराने समृद्धी वाढली. काश्गर आणि समरकंद यासारखी शहरे महत्त्वाची व्यापारी केंद्रे म्हणून विकसित झाली. रेशीम उत्पादनात सातत्य असल्याने या उद्योगातून शेतकऱ्यांना शाश्वत दरमहा उत्पन्न मिळू लागले. ज्यामुळे ग्रामीण अर्थकारण मजबूत झाले. शेती, कोकून निर्मिती आणि रेशीम काढण्याच्या प्रक्रियांच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी निर्माण झाल्या.

सांस्कृतिक परिणामांमध्ये व्यापारासोबतच कला, संगीत, नृत्य आणि विविध संस्कृतींचे आदान-प्रदान झाले. कागद, छपाई, बारूद आणि काचनिर्मितीसारखे तंत्रज्ञान या मार्गाने पसरले. व्यापाराच्या ठिकाणांवर विविध व पार्श्वभूमीचे लोक एकत्र आल्याने मिश्र संस्कृतींचा विकास झाला. थोडक्यात रेशीम मार्ग केवळ व्यापारी रस्ता नसून त्याने जगाला जोडण्याचे आणि मानवी सभ्यतेला समृद्ध करण्याचे महत्त्वाचे सामाजिक व आर्थिक कार्य केले.

**६. आधुनिक जागतिकीकरणाची रेशीम मार्गाशी तुलना –**

जागतिकीकरण आणि प्राचीन रेशीम मार्ग या दोन्ही संकल्पना जगाला एकमेकांशी जोडणाऱ्या आहेत. फरक एवढाच की त्या वेगवेगळ्या कालखंडातील आहेत. रेशीम मार्ग सुमारे इ.सन. १ ले शतक ते १५ वे शतक पर्यंत अस्तित्वात होता. तर जागतिकीकरणाचा कालखंड विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात सुरु होऊन १९९० नंतर त्यात वेगाने वाढ झाली. ती आजतागायत चालू आहे. रेशीम मार्ग हा जागतिकीकरणाचा प्राचीन आणि ऐतिहासिक नमुना मानला जातो. ज्याने आशियाई आणि युरोपियन संस्कृतींना जोडले. रेशीम मार्गावर व्यापाऱ्यांना अनेक महिने लागायचे तर आजच्या जागतिकीकरणात इंटरनेट आणि वेगवान वाहतुकीमुळे काही सेकंदात व्यापार होतो. रेशीम मार्ग हा प्राचीन व्यापारी मार्ग होता जो वस्तू व सांस्कृतिक देवाणघेवाण करणारा प्रारंभिक जागतिकीकरणाचा घटक मानला जातो. आधुनिक जागतिकीकरण तंत्रज्ञान, भांडवल आणि माहितीच्या जलद प्रवाहामुळे अधिक व्यापक आणि वेगवान झाले. रेशीम मार्ग हा जागतिकीकरणाचा पाया होता, तर आधुनिक जागतिकीकरण हे त्याचे अधिक प्रगत आणि वेगवान स्वरूप आहे.

**संशोधन पद्धती –**

सदर संशोधनासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाची इतिहासाची पुस्तके, विविध संदर्भ ग्रंथ, संशोधन लेख जर्नल्स व विश्वसनीय दुय्यम स्त्रोतांचा अभ्यास करण्याल आला आहे.

**निष्कर्ष –**

रेशीम मार्ग हा केवळ व्यापारापुरता मर्यादित नसून तो संस्कृती, तंत्रज्ञान आणि मानवी इतिहासाच्या देवाणघेवाणीचा एक मोठा अध्याय मांडतो. जगाच्या आर्थिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक एकत्रिकरणावर प्रकाश टाकतो. या मार्गाने पूर्व चीन आणि पश्चिम युरोप या दोन भिन्न संस्कृतींना जोडले. सागरी मार्गांच्या शोधानंतरही १५ व्या शतकापर्यंत या मार्गाचे महत्त्व कमी झाले नाही तर ते नवीन स्वरुपात विकसित झाले. आजच्या जागतिकीकरणाचा पाया हाच रेशीम मार्ग होता. ज्याने जगाला एकमेकांशी जोडले. रेशीम मार्ग हा मानवी इतिहासातील एक असा धागा होता ज्याने पूर्व आणि पश्चिमी देशांना जोडून आर्थिक समृद्धीसोबतच ज्ञानाचे आदान-प्रदान केले.

**संदर्भ –**

१) महाराष्ट्र राज्य इतिहास पाठ्यपुस्तके.
२) आर. सी. मुजुमदार – Ancient India ISBN – 10 – 812080435X
३) NCERT – World History – ISBN 978 – 7450 – 536 – 1
४) Peter Frankopan – The Silk Roads – ISBN – 978 – 1101912379
५) Ancient Silk Road - संदर्भ ग्रंथ.
६) Ancient History Textbooks – Particularly during the Kushana Samrat Kanishka’s period.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# भारतातील ग्रामीण पर्यटनाची वाढती व्याप्ती आणि क्षमता: एक अभ्यास

**डॉ. सुनिल दशरथ साळवे**
श्रीराम कुसुमताई सदाशिव वंजारे महाविद्यालय लांजा जिल्हा- रत्नागिरी .
**ईमेल** :sunilsalve73@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180417
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 74-77
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश :***

*भारत हा त्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारसा, ऐतिहासिक स्मारके आणि विपुल नैसर्गिक संसाधनांमुळे जगभरात एक लोकप्रिय पर्यटन स्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. भारतातील पर्यटन उद्योग हा परकीय चलन कमाईत लक्षणीय योगदान देणारा एक प्रमुख आर्थिक घटक म्हणून उदयास आला आहे. जागतिक GDP मध्ये ११ % योगदान देणारे पर्यटन हे जागतिक स्तरावरील आघाडीचा उद्योग आहे.*

*२०२६ च्या सुरुवातीला, संयुक्त राष्ट्रांच्या पर्यटनाने अहवालानुसार २०२५ मध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांच्या आगमनाने १.५२ अब्ज आगमनांसह एक नवीन विक्रम प्रस्थापित केला आहे. २०२४ च्या तुलनेत पर्यटक संख्येत ४% वाढ झाली असून राजकीय आणि आर्थिक आव्हाने असूनही पर्यटन क्षेत्रात पूर्णतः आणि जोमाने सुधारणा झाल्याचे हे संकेत आहेत.*

*जागतिक पर्यटन संघटनेने पुढे असे नमूद केले आहे की पुढील ५-१० वर्षांत, ग्रामीण अनुभवाचा शोध घेणाऱ्या पर्यटकांना ऑफर केल्या जाणाऱ्या उत्पादनांच्या श्रेणीत लक्षणीय वाढ होणार आहे. भारताची विशाल, ग्रामीण विविधता आणि वारसा ग्रामीण भागात पर्यटनासाठी प्रचंड क्षमता प्रदान करतो. भारतातील ग्रामीण पर्यटनाची कल्पना गरिबी कमी करण्याच्या मुद्द्यांना संबोधित करून आणि जुन्या कला आणि हस्तकलेचे पुनरुज्जीवन आणि पुनर्जन्म आणि ग्रामीण भारत संस्कृतीचे जतन करून एक चैतन्यशील स्थानिक अर्थव्यवस्था विकसित करून स्थानिक समुदायासाठी रोजगाराच्या संधी, शाश्वत उपजीविका निर्माण करत आहे.*

*या पेपरमध्ये भारतातील ग्रामीण पर्यटनावर एक नजर टाकण्याचा प्रयत्न आहे.*

***कीवर्ड्स:*** *ग्रामीण पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, निसर्ग पर्यटन.*

**प्रस्तावना:**

पर्यटन हे निर्यातीला हातभार लावणारे आणि जागतिक समृद्धीला चालना देणारे एक प्रमुख आर्थिक क्षेत्र आहे. गेल्या दशकात, भारत सरकारने या क्षेत्राचा विस्तार आणि क्रांती घडवून आणण्यासाठी अनेक परिवर्तनकारी उपक्रम हाती घेतले जेणेकरून ते आर्थिक वाढ, रोजगार निर्मिती आणि सांस्कृतिक राजनैतिक नीतिसाठी एक शक्ती म्हणून त्याची पूर्ण क्षमता साकार करू शकेल. पर्यटन उद्योगामुळे मुळे ५१,५३२ कोटी रुपयांचे परकीय चलन मिळाले. याव्यतिरिक्त, राष्ट्रीय लेखा सांख्यिकी २०२५ च्या तात्पुरत्या अंदाजानुसार, २०२३-२४ मध्ये पर्यटन क्षेत्राने भारताच्या जीडीपीमध्ये १५.७३ लाख कोटी रुपयांचे योगदान दिले, जे एकूण अर्थव्यवस्थेच्या ५.२२% आहे. त्याशिवाय, नियतकालिक कामगार दल सर्वेक्षण (PLFS) नुसार, या क्षेत्राने ३६.९० दशलक्ष प्रत्यक्ष रोजगार आणि ४७.७२ दशलक्ष अप्रत्यक्ष रोजगार निर्माण केले, जे एकूण अर्थव्यवस्थेतील एकूण रोजगाराच्या १३.३४% आहे. ऑगस्ट २०२५ पर्यंत भारतात अंदाजे ५६ लाख परदेशी पर्यटकांचे आगमन (FTA) झाले. ऑगस्ट २०२५ पर्यंत भारतात ३०३.५९ कोटी देशांतर्गत पर्यटक भेटी झाल्या.२०२५ मध्ये (एप्रिलपर्यंत) भारतात वैद्यकीय उद्देशाने येणाऱ्या परदेशी पर्यटकांच्या आगमनाची (FTA) एकूण संख्या १,३१,८५६ आहे, जी या कालावधीत एकूण FTA च्या अंदाजे ४.१% आहे.

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सुनिल दशरथ साळवे ,श्रीराम कुसुमताई सदाशिव वंजारे महाविद्यालय लांजा जिल्हा- रत्नागिरी .*

**How to cite this article:**
साळवे, . सुनिल . दशरथ . (2026). भारतातील ग्रामीण पर्यटनाची वाढती व्याप्ती आणि क्षमता: एक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 74–77.* https://doi.org/10.5281/zenodo.21255061

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21255061

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

भारत सरकारने पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी व्यवसाय पर्यटन, आरोग्य पर्यटन, ग्रामीण पर्यटन, कृषी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, धार्मिक पर्यटन, साहसी पर्यटन, शाश्वत पर्यटन इत्यादी पर्यटन विकासासाठी अनेक धोरणात्मक उपाययोजना सुरू केल्या आहेत. भारतीय अर्थव्यवस्था कृषीप्रधान अर्थव्यवस्थेतून ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेत रूपांतरित होत आहे, परंतु तरीही भारताला त्याच्या खेड्यांमधून ओळखता येते. औद्योगिकीकरण आणि जागतिकीकरण असूनही, भारत अजूनही खेड्यांमध्ये राहतो. भारतातील खेडे ही देशाची ताकद आहेत, कारण येथेच 'खरा भारत' वसला आहे. गेल्या काही दशकांमध्ये देशाच्या पर्यटन क्षेत्रात वेगाने वाढ झाली आहे परंतु ग्रामीण पर्यटनाला फारसे महत्व दिले नाही. ग्रामीण भारतात जगाला देण्यासाठी बरेच काही आहे. कला, हस्तकला आणि संस्कृतीच्या परंपरांनी समृद्ध, ग्रामीण भारत महत्त्वाच्या पर्यटन स्थळांचे केंद्र म्हणून उदयास येऊ शकतो. विकसित जगात ज्यांना पारंपारिक जीवनशैली, कला आणि हस्तकलेबद्दल ज्ञानाची आवड आहे ते ग्रामीण भारताला भेट देण्यास आकर्षित होतील जर ग्रामीण पर्यटनाचा चांगल्या प्रकारे प्रसार, प्रचार केला तर ग्रामीण पर्यटनात मोठी वाढ अपेक्षित आहे.

ग्रामीण पर्यटनासाठी दरवर्षी हजारो परदेशी पर्यटक केरळमधील बॅकवॉटर/चहाची बाग, हिमाचल प्रदेश मधील राजस्थान, गुजरात आणि दक्षिण भारतातील ग्रामीण भागात भेट देतात. ग्रामीण पर्यटनाच्या संकल्पनेच्या व्यवहार्यतेचा हाच पुरावा दिसून येतो.

ग्रामीण पर्यटनासाठी दरवर्षी हजारो परदेशी पर्यटक केरळमधील बॅकवॉटर/चहाची बाग, राजस्थानमधील ग्रामीण वारसा, वाळवंट, मध्यप्रदेशमधील ग्रामीण परिपथ, आदिवासी गावे आणि वन्यजीव आणि ईशान्य राज्यातील ग्रामीण निसर्ग/संस्कृती यासारख्या ग्रामीण पर्यटन स्थळांचा भेट देत आहेत. ग्रामीण पर्यटनाच्या संकल्पनेच्या व्यवहार्यतेचा हाच पुरावा दिसून येतो.

**संशोधनाची उद्दिष्टे -:**

१. ग्रामीण पर्यटनाची संकल्पना अभ्यासणे.

२. भारतातील ग्रामीण पर्यटनाची क्षमता अभ्यासणे.

३. भारतातील ग्रामीण पर्यटनाचे व्यवस्थापन करण्यासाठी शिफारसी सुचवणे.

**संशोधन पद्धती :**

भारतातील ग्रामीण पर्यटनाची वाढती व्याप्ती आणि क्षमता: एक अभ्यास या शोधनिबंधासाठी दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा अवलंब केला आहे. यासाठी पर्यटनावर आधारित विविध संदर्भ ग्रंथ, संकेतस्थळे, पर्यटन मंत्रालयाचे विविध अहवाल, मासिके,इ. माध्यमांच्या साह्याने दुय्यम सामग्रीचे संकलन केले असून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे सदर शोधनिबंध तयार केला आहे.

**भारतातील ग्रामीण पर्यटनाची संकल्पना:**

पर्यटन साहित्यात 'ग्रामीण पर्यटन' या संकल्पनेची व्याख्या करताना भौगोलिक परिस्थिती, उपक्रमांमधील विविधता, शहरीकरणाचा प्रभाव या विषयावरून अनेक तज्ञात मतमतांतरे आहे, परंतु त्यावर अजूनही कोणतेही ठोस एकमत झालेले नाही.या संदर्भात पिअर्स (१९८९), ब्रॅमवेल (१९९४) आणि सीटन व इतर (१९९४) यांसारख्या तज्ज्ञांनी आपापल्या अभ्यासात यावर चर्चा केली आहे.

सर्वप्रथम, ग्रामीण भागात जिथे ग्रामीण पर्यटन होते ते परिभाषित करणे कठीण आहे कारण वेगवेगळ्या राष्ट्रांनी वापरलेले निकष खूप भिन्न असतात; दुसरे म्हणजे, ग्रामीण भागात होणारे सर्व पर्यटन पूर्णपणे 'ग्रामीण' नसते ते शहरी स्वरूपात देखील असू शकते आणि फक्त ग्रामीण भागात स्थित असू शकते, तिसरे म्हणजे ग्रामीण पर्यटनाचे वेगवेगळे प्रकार वेगवेगळ्या प्रदेशांमध्ये विकसित झाले आहेत आणि म्हणूनच सर्व देशांमध्ये सामान्य असलेली वैशिष्ट्ये शोधणे कठीण असतात; चौथे म्हणजे जागतिक बाजारपेठा, दळणवळण आणि दूरसंचार यांच्या प्रभावामुळे ग्रामीण भाग बदलाच्या जटिल प्रक्रियेत आहेत ज्यामुळे बाजारपेठेची परिस्थिती आणि पारंपारिक उत्पादनांसाठी दिशा बदलली आहे. व्यापक अर्थाने, ग्रामीण पर्यटनाची व्याख्या 'एक मानसिक अवस्था' अशी केली जाऊ शकते, तर तांत्रिकदृष्ट्या, 'विविध उपक्रम, पर्यटन स्थळे आणि इतर मोजता येण्याजोग्या भौतिक वैशिष्ट्यांनुसार' त्याची मांडणी करता येते. (शार्पली आणि शार्पली, १९९७)

बदलत्या काळानुसार संशोधकांनी ग्रामीण पर्यटनामध्ये समाविष्ट असलेल्या उपक्रमांच्या आकलनात सतत भर घालत आहे. कालांतराने संशोधकांनी ग्रामीण पर्यटनाचा समावेश असलेल्या उपक्रमांची समज सतत वाढवली आहे. शेती, निसर्ग, साहस, आरोग्य, शिक्षण, कला आणि वारसा यामधील पर्यटकांचा रस सतत वाढत आहे. आणि ग्रामीण रीतिरिवाज, लोककथा, स्थानिक परंपरा, श्रद्धा आणि सामान्य वारसा यासारख्या जिवंत इतिहासाचा अनुभव घेणे समाविष्ट आहे.(जॉलिफ आणि मॅकडोनाल्ड, २००३ मध्ये पेडफोर्ड).

पर्यटनाला ग्रामीण म्हटले जाते जेव्हा ग्रामीण संस्कृती ही प्रदान केलेल्या उत्पादनाचा एक प्रमुख घटक असते. ग्रामीण पर्यटन म्हणजे ग्रामीण ठिकाणी ग्रामीण जीवन, कला, संस्कृती आणि वारसा प्रदर्शित करणारे पर्यटनाचे कोणतेही रूप, ज्याचा स्थानिक समुदाय आर्थिक आणि सामाजिकदृष्ट्या लाभ घेणार आहे. ग्रामीण पर्यटनातील पर्यटन उत्पादनांचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे अभ्यागतांना वैयक्तिकृत संपर्क, अद्वितीय ग्रामीण जीवनाची चव देण्याची आणि शक्य तितक्या स्थानिक लोकांच्या क्रिया, परंपरा आणि जीवनशैलीत सहभागी होण्याची परवानगी देण्याची इच्छा होय. म्हणूनच ग्रामीण पर्यटन स्थळाची व्याख्या नैसर्गिक किंवा शेती/वनयुक्त वातावरणाने व्यापलेला एक विस्तीर्ण क्षेत्र म्हणून करता येईल जिथे परंपरा, स्थानिक सहकार्य, विश्वास आणि परस्परसंवाद यासारख्या विशिष्ट नैसर्गिक, आर्थिक

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

आणि सामाजिक-सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा सुसंवाद साधला जातो आणि अशा प्रकारे एक अद्वितीय पर्यटन उत्पादन तयार केले जाते जे प्रामुख्याने लहान आकाराचे, निसर्ग अनुकूल, 'जातीय-संस्कृत', दुसऱ्या शब्दांत 'शाश्वत' असते.

ग्रामीण पर्यटन ही मूलतः ग्रामीण भागात घडणारी एक क्रिया आहे. ती बहुआयामी आहे आणि त्यात शेती/कृषी पर्यटन, सांस्कृतिक पर्यटन, निसर्ग पर्यटन, साहसी पर्यटन आणि पर्यावरणीय पर्यटन यांचा समावेश असू शकतो. पारंपारिक पर्यटनाविरुद्ध, ग्रामीण पर्यटनाची काही विशिष्ट वैशिष्ट्ये आहेत: ती अनुभव-केंद्रित आहे; ठिकाणे विरळ लोकवस्तीची आहेत; ती प्रामुख्याने नैसर्गिक वातावरणात आहे; ती ऋतू आणि स्थानिक घटनांशी जुळते; आणि ती संस्कृती, वारसा आणि परंपरांच्या जतनावर आधारित आहे.

**भारतात ग्रामीण पर्यटनाची क्षमता:**

भारतात ग्रामीण पर्यटन सध्या सुरुवातीच्या टप्प्यात असले तरी त्यासाठी भरपूर संधी आहेत. 'ग्रामीण' हा एक घटक म्हणून वेगाने नाहीसा होत आहे, विशेषतः विकसित जगात तरुण शहरी भारतीयांसाठीही, ग्रामीण हा असा विषय असेल ज्याच्याशी ते जोडले जाऊ इच्छितात. भारतीय आणि परदेशी दोघांनाही लक्ष्य केले जाऊ शकते आणि परदेशी लोकांसाठी हा अनुभव एक नवीनता आहे. ग्रामीण भारतात जगाला देण्यासाठी बरेच काही आहे. कला, हस्तकला आणि संस्कृतीच्या परंपरांनी समृद्ध असलेले ग्रामीण भारतातील काही भाग महत्त्वाचे पर्यटन स्थळ म्हणून उदयास येऊ शकतात. विकसित जगात ज्यांना पारंपारिक जीवनशैली, कला आणि हस्तकलेबद्दल ज्ञानाची आवड आहे ते ग्रामीण भारताला भेट देण्यास आकर्षित होतील जर ग्रामीण पर्यटनाची संकल्पना त्यांच्यापर्यंत चांगल्या प्रकारे पोहचली पाहिजे.

आज, ग्रामीण पर्यटनाची ठिकाणे त्यांच्या समृद्ध परंपरा, हस्तकला आणि संस्कृतीसाठी ओळखली जाणारी बाजारपेठ आहेत. काही राज्ये ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देण्यासाठी स्वतःहून पुढाकार घेत आहेत, ज्याचा मुख्य उद्देश रोजगाराच्या संधी निर्माण करणे आहे. भारतात ग्रामीण पर्यटन ही एक नवीन संकल्पना असली तरी युरोप आणि जगाच्या इतर भागात ती फार पूर्वीपासून पाळली जात आहे, कारण लोकांना त्यांच्या मुलांना ग्रामीण जीवनाचे प्रत्यक्ष ज्ञान आणि अनुभव मिळावा असे वाटते. ऑस्ट्रेलिया, कॅनडा आणि अमेरिका सारख्या कृषी अर्थव्यवस्था असलेल्या देशांमध्ये ग्रामीण भागात पर्यटन स्थळे आहेत. ग्रामीण पर्यटनामध्ये वारसा पर्यटन, शेती/कृषी पर्यटन, तीर्थयात्रा पर्यटन, साहसी पर्यटन, आरोग्य पर्यटन, निसर्ग पर्यटन किंवा लोकमार्ग आणि प्राचीन संस्कृती पर्यटन यांचा समावेश असू शकतो. भारतातील ग्रामीण पर्यटनासाठी गुजरात जिल्ह्यातील **कच्छ** मधील पांढऱ्या मिठाच्या वाळवंटात मातीची घरे,आदिवासी जीवनमान, केरळचे बॅकवॉटर, पंजाबी पाककृती, उत्तर प्रदेशातील टेकड्या, पश्चिम बंगालमधील शांती निकेतन, ओरिसाचे नृत्य आणि लोकगीते,कर्नाटकचे नित्यग्राम, बिहारमधील जमाती, मेघालयाचे नैसर्गिक सौंदर्य, आंध्र प्रदेशातील लोकनृत्य, राजस्थानचा तीज सण,सिक्कीमचे मुखवटा नृत्य, नंदगाव बनारसची होळी ही विशिष्ट संभाव्य क्षेत्रे असू शकतात.

ग्रामीण अर्थव्यवस्थेत शेतीचे मुख्य आर्थिक महत्त्व कमी होत असताना, भारतातील सरकारी विभाग आणि विविध सार्वजनिक क्षेत्रातील एजन्सींद्वारे आर्थिक क्रियांच्या इतर प्रकारांना चालना दिली जाते. ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात आर्थिक विकासामुळे अनेकदा संघर्ष निर्माण होतो कारण प्रबळ लोक औद्योगिक विकास, वाणिज्य आणि अविकसित ठिकाणी इमारती बांधण्याच्या विरोधात असतात. रहिवाशांना असेही वाटते की त्यांची जीवनशैली धोक्यात आहे. तथापि, रोजगार किंवा सुधारित संधी शोधणाऱ्यांना नवीन रोजगाराच्या संधीं त्यांना मिळते. भारतात ग्रामीण पर्यटन उदयोन्मुख टप्प्यात आहे, तेथे एक मोठी बाजारपेठ आहे. अनेक देशांचा असा अनुभव आहे की ग्रामीण पर्यटनाकडे उपजीविका आणि रोजगाराचा पर्यायी स्रोत म्हणून पाहिले जाऊ शकते. ग्रामीण विकासासाठी पर्यटन वाढीच्या क्षमतेचा वापर एक धोरण म्हणून करता येतो. ग्रामीण पर्यटनाच्या संकल्पनेभोवती एक मजबूत व्यासपीठ विकसित करणे भारतासारख्या देशासाठी निश्चितच उपयुक्त आहे, जिथे जवळजवळ ७४ टक्के लोकसंख्या त्याच्या ७ दशलक्ष गावांमध्ये राहते. जगभरात औद्योगिकीकरण आणि विकासाच्या बदलामध्ये शहरी केंद्रित दृष्टिकोन आहे. त्याचबरोबर, शहरी जीवनशैलीच्या ताणांमुळे 'प्रति-शहरीकरण' सिंड्रोम निर्माण झाला आहे. यामुळे ग्रामीण भागात रस वाढत आहे. त्याच वेळी शहरीकरणाच्या या बदलामुळे उत्पन्नाची पातळी घसरली आहे, एकूण क्षेत्रात नोकरीच्या संधी कमी झाल्यामुळे ग्रामीण भागात शहरीकरण सिंड्रोम निर्माण झाला आहे. ग्रामीण पर्यटन हा अशा काही उपक्रमांपैकी एक आहे जो या समस्यांवर उपाय देऊ शकतो. याशिवाय, जागरूकता वाढवणे, वारसा आणि संस्कृतीमध्ये वाढती आवड आणि सुधारित सुलभता आणि पर्यावरणीय जाणीव यासारख्या ग्रामीण पर्यटनाकडे कल बदलणारे इतर घटक आहेत. विकसित देशांमध्ये, यामुळे आरामदायी आणि निरोगी जीवनशैली अनुभवण्यासाठी आणि जगण्यासाठी गावांना भेट देण्याची एक नवीन शैली पर्यटनात आली आहे.

**भारतातील ग्रामीण पर्यटनाचे व्यवस्थापन करण्यासाठी शिफारसी:**

ग्रामीण पर्यटन ग्रामीण भागातील आपल्या काही गावांमध्ये शाश्वत विकास निर्माण करण्यास मदत करू शकते.सरकारने ग्रामीण पर्यटनाचे महत्त्व प्राधान्याने ओळखले पाहिजे आणि निरोगी स्पर्धात्मक व्यवसाय वातावरण निर्माण करण्यास मदत केली पाहिजे. सरकारसोबतच, स्थानिक सामुदायिक स्वयंसेवी संस्थांनी ग्रामीण पर्यटन स्थळे विकसित करण्यात आणि त्याद्वारे पर्यटकांना उच्च दर्जाची

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

सेवा प्रदान करण्यात सहभागी व्हावे. ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी काही सूचना आहेत ग्रामीण पर्यटनाच्या विकासासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा सुविधा आणि योग्य पायाभूत सुविधा जसे की निवास, रस्ते, विमानतळ सुविधा, रेल्वे सुविधा, स्थानिक वाहतूक, दळणवळण दुवे आणि इतर आवश्यक सुविधांची निर्मिती केली पाहिजे.

- ग्रामीण भारतातील मुख्य क्षमता प्रदर्शित करण्यासाठी ग्रामीण पर्यटन स्थळांच्या विकासासाठी प्रचंड क्षमता असलेल्या गावांची ओळख पटवणे.
- स्थानिक समुदायाला त्यांच्या फायद्यासाठी सर्व स्तरांवर सहभागी होण्यास प्रोत्साहित करणे आणि त्यांना सहभागी करून घेणे.
- प्रचार मोहिमांसाठी भारतातील ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रांच्या मूर्त आणि अमूर्त वारशाचे योग्य दस्तऐवजीकरण करणे .
- सार्वजनिक.खाजगी भागीदारीला प्रोत्साहन देणे-
- ग्रामीण पर्यटन युनिटची क्षमता वाढवणे.
- सर्जनशीलता आणि नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करून सेवा गुणवत्ता सुधारणे.
- ग्रामीण पर्यटन डेटाबेस अद्यावत करणे आणि ग्रामीण पर्यटनावर वार्षिक अहवाल बनवणे .
- ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी धोरणांची पुनर्रचना आणि उदारीकरण करणे .

**समारोप:**

ग्रामीण क्षेत्रे आधुनिक पर्यटन अनुभवाचा अविभाज्य भाग आहेत. ग्रामीण पर्यटन हे निःसंशयपणे गरिबी निर्मूलन, रोजगार निर्मिती, पर्यावरणीय पुनरुत्पादन आणि दुर्गम भागांचा विकास आणि देशातील महिला आणि इतर वंचित गटांच्या प्रगतीसह शाश्वत मानवी विकासासाठी एक महत्त्वाचे साधन म्हणून उदयास येईल, यात शंका नाही. सामाजिक एकात्मता आणि आंतरराष्ट्रीय समजुतीला प्रोत्साहन देणे. सरकारने ग्रामीण पर्यटनाला प्रोत्साहन देऊन शाश्वत आर्थिक विकास आणि सकारात्मक सामाजिक बदल सुनिश्चित करावा. ग्रामीण पर्यटनाच्या अनेक77 प्रकल्पांमध्ये सामुदायिक सहभाग आणि एकत्रीकरणाला प्रोत्साहन द्यावे. भारतीय संस्कृतीने नेहमीच प्रचंड आश्चर्याची भावना निर्माण केली आहे. खरा भारतीय म्हणून आपल्या प्रत्येकाचे कर्तव्य आहे की आपण एक जबरदस्त नवीन भारत निर्मितीसाठी आपले सर्वोत्तम प्रयत्न करावेत.

**संदर्भग्रंथ :**

1. Cooper C. (Ed.), *Tourism Principles and Practices*, Addison Wesley Longman Publishing, New York, 1999,
2. 2.Romila Chawala, *Tourism in the 21st Century*, Sonali Publications, New Delhi, 2003,
3. Rural Tourism – Challenges and Opportunities. *International Marketing Conference on Marketing & Society,* 8-10 April, 2007, IIMK
4. Rajiv Kumar, Service Quality in Rural Tourism: A Prescriptive Approach, *Conference on Tourism in India – Challenges Ahead, 15-17 May 2008, IIMK*
5. The Wall Street Journal, January 15, 2010, ET, Going Rural: Tourism Focuses on India's Hinterland, accessed on December 2, 2011.

# Journal of Research and Development

A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026


Original Article

# भिवंडी तालुक्यातील श्री वऱ्हाळदेवी मंदिर : सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाशाचा एक चिकित्सक अभ्यास


**विद्या विजय धस**

सहाय्यक शिक्षिका ,पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ भिवंडी
बी.एन.एन महाविद्यालय, भिवंडी

**Email:** vidyadhas811@gmail.com



**Manuscript ID:**
JRD -2026-180418
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 78-81
April 2026

**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026



***गोषवारा :-***

*हा शोधनिबंध उत्तर कोकणातील भिवंडी या ऐतिहासिक व्यापारी केंद्रात स्थित असलेल्या 'श्री वऱ्हाळदेवी मंदिराच्या' बहुआयामी अवकाशाचा (Space) मागोवा घेतो. ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहराचे सांस्कृतिक केंद्र असलेल्या श्री वराळदेवी मंदिराच्या ऐतिहासिक प्रवासाचा आढावा घेतला आहे. कोळी-आगरी समाजाची आराध्यदेवता ते आधुनिक भिवंडीची ग्रामदेवता असा हा प्रवास मांडला आहे. प्राचीन काळातील एक छोटे कौलारू मंदिर ते आजचे भव्य आधुनिक धार्मिक पर्यटन स्थळ, यातील 'अवकाश' शोधण्याचा प्रयत्न येथे केला आहे.'अवकाश' ही संकल्पना येथे केवळ भौतिक क्षेत्रापुरती मर्यादित नसून ती ऐतिहासिक स्मृती, पर्यावरणीय संतुलन आणि सामाजिक सातत्याचे प्रतीक म्हणून वापरली आहे. शिलाहार, मराठा आणि ब्रिटिश कालखंडातील संदर्भांचा उपयोग करून, हे मंदिर भिवंडीच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक केंद्रस्थानी कसे टिकून आहे, याचे विश्लेषण या प्रबंधात केले आहे. तसेच, ३० हून अधिक संदर्भांच्या आधारे या स्थळाची जागतिक वारसा क्षेत्रातील प्रासंगिकता तपासली आहे.*



***सूचक शब्द :-*** *वराळदेवी मंदिर, ऐतिहासिक संस्कृती, लोकसंस्कृती,पाषाण,आधुनिक बदल,ग्रामदेवता,धार्मिक,पर्यटन,वऱ्हाळदेवी तलाव,शहरीकरण,सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तन.*


## प्रस्तावना :-

भिवंडी शहर, जे आज जागतिक स्तरावर 'लॉजिस्टिक हब' आणि 'यंत्रमाग उद्योग' यासाठी ओळखले जाते, त्या शहराचा सांस्कृतिक इतिहास अत्यंत प्राचीन आहे, या औद्योगिक गजबजाटाच्या पलीकडे शहराला एक समृद्ध सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अधिष्ठान आहे, ज्याचे केंद्र 'श्री वराळदेवी मंदिर' आहे. हे मंदिर भिवंडीची 'ग्रामदेवता' म्हणून ओळखले जाते आणि शतकानुशतके शहरातील विविध जाती-धर्माच्या लोकांच्या श्रद्धेचा आणि अस्मितेचा अविभाज्य भाग राहिले आहे.कोणत्याही नागरी वस्तीचा 'अवकाश' (Space) हा तिथे घडणाऱ्या ऐतिहासिक घटनांनी आणि मानवी श्रद्धेनी आकाराला येतो ऐतिहासिक दृष्टिकोनातून पाहिल्यास, वराळदेवी मंदिराचा उगम हा भिवंडीच्या मूळ कोळी आणि आगरी समाजाच्या लोकसंस्कृतीतून झाला आहे. वराळा तलावाच्या काठी वसलेले हे स्थान पूर्वी निसर्गरम्य, शांत आणि साध्या वास्तुकलेने नटलेले होते. मात्र, विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात आणि एकविसाव्या शतकाच्या सुरुवातीस झपाट्याने झालेल्या नागरीकरणामुळे या परिसराचा चेहरामोहरा पूर्णपणे बदलला आहे.

आजच्या आधुनिक काळात, मंदिराचे साधे कौलारू स्वरूप जाऊन त्या जागी भव्य पाषाण आणि संगमरवरी वास्तुकला उभी राहिली आहे. तंत्रज्ञानाचा शिरकाव, सोशल मीडियाचा प्रभाव आणि "वाट पाहते पुनवेची "यांसारख्या चित्रपटांमुळे मिळालेली प्रसिद्धी यामुळे हे स्थान केवळ एक धार्मिक.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.21255119



**Address for correspondence:**

*विद्या विजय धस ,सहाय्यक शिक्षिका ,पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ भिवंडी बी.एन.एन महाविद्यालय, भिवंडी*



**How to cite this article:**

विद्या विजय धस. (2026). भिवंडी तालुक्यातील श्री वऱ्हाळदेवी मंदिर : सामाजिक आणि सांस्कृतिक अवकाशाचा एक चिकित्सक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 78–81.* https://doi.org/10.5281/zenodo.21255119

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

स्थळ न राहता 'धार्मिक पर्यटन केंद्र' म्हणून विकसित झाले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात मंदिराचा अभ्यास केवळ वास्तुकलेतील बदलांपुरता मर्यादित नसून, त्यात बदलत्या सामाजिक श्रद्धा, उत्सवांचे स्वरूप आणि पर्यावरणावर झालेला परिणाम यांसारख्या विविध पैलूंचे विश्लेषण करण्यात आले आहे.

वऱ्हाळदेवी मंदिराचा अवकाश हा अशाच एका प्रदीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचे फलित आहे. हेन्री लेफेव्रे यांच्या मते, "अवकाश हे सामाजिक उत्पादन असते" (Space is a social product). वऱ्हाळदेवी मंदिराच्या बाबतीत, हा अवकाश तलाव (जल), वास्तू (पाषाण) आणि लोकसंस्कृती (परंपरा) या तिन्हींच्या समन्वयातून निर्माण झाला आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**

१. धार्मिक पर्यटनाचा सामाजिक- सांस्कृतिक प्रभाव पाहणे
२.वास्तुकला आणि भौगोलिक अवकाश
३.धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा अभ्यास करणे
४.स्थापत्य रचना (वास्तू - कला)
५.आधुनिक तंत्रज्ञान आणि सोयीसुविधांचा आढावा घेणे

**ऐतिहासिक कालखंड आणि उत्क्रांती :-**

**१.प्राचीन मूळ आणि निसर्गपूजा :-**

उत्तर कोकणचा इतिहास हा प्रामुख्याने समुद्रकिनारपट्टी आणि सह्याद्रीच्या रांगांमधील व्यापार मार्गांशी जोडलेला आहे. वऱ्हाळदेवी हे नाव 'वरद' (वर देणारी) किंवा स्थानिक बोलीभाषेतील 'वऱ्हाळ' (वस्तीचे रक्षण करणारी) यावरून पडले असावे. सुरुवातीच्या काळात हे स्थान 'निसर्गपूजा' (Nature Worship) पद्धतीतील एक पवित्र जागा होती. प्राचीन काळी पाण्याचे साठे (तलाव) आणि झाडे यांच्या सान्निध्यात दैवी शक्तीचे अस्तित्व मानले जात असे. वऱ्हाळदेवीचा हा मूळ अवकाश आजही तलावाच्या स्वरूपात पाहायला मिळतो.

**२.मध्ययुगीन मराठा कालखंड (१७ वे - १८ वे शतक):-**

मराठा साम्राज्याच्या काळात, विशेषतः पेशवे कालखंडात, कोकणातील मंदिरांना राजकीय आश्रय मिळाला होता. १७ व्या शतकात जेव्हा शिवाजी महाराजांनी कल्याण-भिवंडी प्रांत जिंकला, तेव्हा स्थानिक किल्ल्यांच्या आणि मंदिरांच्या डागडुजीला प्राधान्य दिले गेले होते. पेशवे दप्तरातील (SPD) नोंदीनुसार, भिवंडीतील वऱ्हाळदेवी मंदिराला वार्षिक 'सनद' आणि 'इनाम' जमिनींचे अनुदान देण्यात आले होते. या काळात मंदिराला औपचारिक 'मराठा स्थापत्यशैली' प्राप्त झाली.

**३.ब्रिटिश कालखंड आणि गॅझेटियर नोंदी :–**

१८१८ मध्ये मराठेशाहीच्या अस्तानंतर ब्रिटिशांनी या भागाचे सर्वेक्षण केले. १८८२ च्या 'ठाणे जिल्हा गॅझेटियर'मध्ये वऱ्हाळदेवी मंदिराचा उल्लेख "भिवंडीतील सर्वात महत्त्वाचे आणि प्राचीन मंदिर" असा करण्यात आला आहे. ब्रिटिशांनी या मंदिराचा अवकाश केवळ धार्मिक दृष्टिकोनातून नव्हे, तर 'महसुली' आणि 'प्रशासकीय' दृष्टिकोनातूनही तपासला होता.

**वास्तुकलेचा आणि भौगोलिक अवकाश (Architectural & Geographical Space) :-**

मंदिराचा गाभारा हा दगडी बांधकामाचा असून, त्यावर कोकणी आणि दख्खनी स्थापत्यशैलीचा संगम दिसून येतो. **कौलारू छप्पर (Tiled Roof):** कोकण आणि ठाणे परिसरातील हवामानाचा विचार करून मंदिराची मूळ रचना ही **कौलारू** स्वरूपाची होती. लाकडी वासे आणि कोकणी नळयांच्या कौलांचा वापर केल्यामुळे मंदिराच्या आत नैसर्गिक गारवा राहत असे.हे आधुनिक काँक्रीटच्या बांधकामापेक्षा पूर्णपणे भिन्न होते.देवीची मूर्ती एका सुबक पाषाण सिंहासनावर विराजमान आहे. येथील मूर्तीची ठेवण 'शक्ती' परंपरेचे दर्शन घडवते. लाकडी खांब आणि कोरीव काम हे मराठाकालीन वाड्यांच्या रचनेशी साधर्म्य दर्शवतात. हा अवकाश सामूहिक उपासनेसाठी आणि सामाजिक सभांसाठी वापरला जातो. मंदिराचे शिखर उंच असून त्यावर पारंपरिक नक्षीकाम आहे, जे दुरूनच या धार्मिक अवकाशाची ओळख पटवून देते.वराळा तलाव हा केवळ एक पाण्याचा साठा नसून तो भिवंडीच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक अस्मितेचा केंद्रबिंदू आहे. ऐतिहासिक काळात त्याचे स्वरूप खालील वैशिष्ट्यांनी युक्त होते. ऐतिहासिक नोंदींनुसार, वराळा तलाव हा नैसर्गिक झऱ्यांमुळे आणि पावसाच्या पाण्यामुळे तयार झालेला एक विस्तीर्ण तलाव होता. त्याचे पाणी अतिशय शुद्ध आणि पारदर्शक होते. भिवंडी शहराच्या पाणीपुरवठ्याचा तो एकेकाळी मुख्य स्रोत मानला जात असे. वराळदेवी मंदिर या तलावाच्या अगदी काठावर वसलेले आहे. असे मानले जाते की, देवीचे अस्तित्व आणि तलावाची पवित्रता यांचा परस्परांशी संबंध आहे. पूर्वी मंदिराच्या पायऱ्या थेट तलावाच्या पाण्यात बुडलेल्या असत, ज्याला 'घाट' म्हटले जाई.

ऐतिहासिक काळात स्थानिक **कोळी समाजासाठी** हा तलाव उपजीविकेचे मुख्य साधन होता. तलावात मुबलक प्रमाणात मासेमारी केली जात असे. तसेच शेतीसाठी आणि पशुपालनासाठीही या पाण्याचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असे. नवरात्रोत्सव, गणेश

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

विसर्जन आणि इतर धार्मिक सणांच्या वेळी तलावाचा काठ मुख्य केंद्र असे. आज हि विविध जाती धर्मातील लोक सणासुदीला दर्शनापूर्वी या तलावाच्या पवित्र पाण्यात स्नान करत किंवा हात-पाय धुवून मगच मंदिरात प्रवेश करत असत.

कोणत्याही ऐतिहासिक मंदिराचा अभ्यास त्याच्या समोर असलेल्या जलाशयाशिवाय पूर्ण होऊ शकत नाही. वऱ्हाळदेवी तलाव हा या परिसराचा 'नैसर्गिक केंद्रबिंदू' आहे. प्राचीन काळात तलाव बांधणे हे पुण्याचे काम मानले जाई. हा तलाव केवळ मंदिराच्या सौंदर्यासाठी नव्हता, तर तो परिसरातील भूगर्भातील पाण्याची पातळी टिकवून ठेवण्यासाठी एक 'हायड्रोलॉजिकल बफर' म्हणून काम करत असे.

**सांस्कृतिक आणि सामाजिक सातत्य (Socio-Cultural Continuity) :-**

भिवंडीच्या सांस्कृतिक वर्षात नवरात्रोत्सवाचा काळ हा या मंदिराच्या अवकाशाचे सर्वात सक्रिय रूप असतो. नऊ दिवस चालणारे विधी, गरबा आणि लोकसंगीत हे या जागेचा 'सामाजिक अवकाश' विस्तारतात. येथे होणारी 'जत्रा' हे स्थानिक व्यापाराचे आणि कलेचे मोठे केंद्र राहिले आहे.भिवंडीच्या सांस्कृतिक वर्षात नवरात्रोत्सवाचा काळ हा या मंदिराच्या अवकाशाचे सर्वात सक्रिय रूप असतो. नऊ दिवस चालणारे विधी, गरबा आणि लोकसंगीत हे या जागेचा 'सामाजिक अवकाश' विस्तारतात. आता पारंपरिक लोककलांसोबतच भव्य ऑर्केस्ट्रा, भजन स्पर्धा आणि नामवंत गायकांचे कार्यक्रम आयोजित केले जातात. उत्सवाचे स्वरूप आता एका मोठ्या 'इव्हेंट'सारखे झाले आहे.

आधुनिक काळात लेझर लाइट्स, भव्य एलईडी स्क्रीन आणि परदेशातून मागवलेल्या फुलांच्या सजावटीने मंदिर झगमगून जाते. श्री वराळदेवी मंदिर ट्रस्ट द्वारे दरवर्षी नवनवीन थीमवर आधारित सजावट केली जाते. भाविकांसाठी आता 'ऑनलाईन दर्शन' उपलब्ध आहे. उत्सवाचे क्षण सोशल मीडिया आणि यूट्यूबवर थेट प्रक्षेपित केले जातात. येथे होणारी 'जत्रा' हे स्थानिक व्यापाराचे आणि कलेचे मोठे केंद्र राहिले आहे.

**लोकधर्मीय परंपरा आणि भिवंडीची अस्मिता :-**

भिवंडीचा समाज हा बहुसांस्कृतिक आहे. मात्र, वऱ्हाळदेवी ही येथील मूळ आगरी, कोळी आणि कुणबी समाजाची 'ग्रामदैवत' असल्याने, तिचे मंदिर या सर्वांना एकत्र आणणारे केंद्र बनले आहे. हा सांस्कृतिक अवकाश शहराच्या आधुनिक आणि औद्योगिक स्वरूपातही आपली मूळ ऐतिहासिक ओळख जपून आहे.

**वारसा संवर्धन आणि आधुनिक आव्हाने :-**

वाढत्या शहरीकरणामुळे या ऐतिहासिक अवकाशासमोर काही गंभीर आव्हाने उभी ठाकली आहेत. तलावाचे प्रदूषण आणि आसपासची वाढती सिमेंटची जंगले यामुळे मंदिराचा 'विजुअल स्पेस' (Visual Space) बाधित होत आहे. युनेस्कोच्या (UNESCO) मार्गदर्शक तत्त्वांनुसार, ऐतिहासिक स्थळांच्या सभोवतालचा नैसर्गिक अवकाश जपणे हे त्या वास्तूच्या दीर्घायुष्यासाठी आवश्यक असते. वाढत्या शहरीकरणामुळे आणि सांडपाण्यामुळे वराळा तलावाच्या नैसर्गिक अस्तित्वाला धोका निर्माण झाला आहे. सुशोभीकरण झाले असले तरी पाण्याची गुणवत्ता टिकवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. मंदिर परिसरात जाणारे रस्ते अरुंद आहेत. भाविकांच्या वाढत्या वाहनांमुळे परिसरात मोठी वाहतूक कोंडी होते, ज्याचा परिणाम स्थानिक रहिवाशांवर होतो. मंदिराचे रूपांतर पर्यटन स्थळात झाल्यामुळे तेथील आध्यात्मिक शांतता आणि ऐतिहासिक पावित्र्य जपून ठेवणे हे ट्रस्टसमोर एक आव्हानात्मक कार्य आहे. मंदिराच्या आजूबाजूला होत असलेली अनधिकृत बांधकामे आणि वाढती वस्ती यामुळे मंदिराच्या मूळ नैसर्गिक सौंदर्याला बाधा पोहोचत आहे.

**निष्कर्ष:-**

'भिवंडीतील वऱ्हाळदेवी मंदिराचा अवकाश' हा विषय अभ्यासांती असे सिद्ध करतो की, हे स्थान केवळ एक धार्मिक केंद्र नसून ते भिवंडीच्या ऐतिहासिक स्मृतीचा जिवंत कोलाज आहे. निसर्गपूजा, मध्ययुगीन मराठा प्रशासन आणि आधुनिक सामाजिक जीवन या तिन्ही प्रवाहांचा संगम या अवकाशात झाला आहे.

काळानुसार मंदिराचे भौतिक स्वरूप आणि परिसराची रचना पूर्णपणे बदलली असली तरी, भिवंडीकरांच्या मनातील देवीबद्दलची **श्रद्धा आणि भक्तीचे स्थान** आजही अढळ आहे.इतिहास आणि आधुनिकता यातील भौतिक अंतर वाढले असले तरी आध्यात्मिक नातं अधिक घट्ट झाले आहे. आधुनिक बदलांमुळे मंदिराला भव्यता प्राप्त झाली असून भाविकांसाठी उत्तम सोयीसुविधा निर्माण झाल्या आहेत.

मात्र, या प्रक्रियेत जुन्या काळातील **नैसर्गिक शांतता आणि ऐतिहासिक साधेपणा** काहीसा लोप पावला आहे. Pilgrim Data नुसार, मंदिर आता केवळ स्थानिक श्रद्धास्थान न राहता एक मोठे प्रादेशिक धार्मिक केंद्र बन वराळा तलावाच्या बाबतीत इतिहास आणि आधुनिकता यातील अंतर चिंताजनक आहे. पूर्वीचा शुद्ध पाण्याचा स्रोत आज प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे. BNCMC ने केलेले सुशोभीकरण हे पर्यटनाच्या दृष्टीने चांगले असले तरी, तलावाचा **नैसर्गिक स्रोत** जपण्याचे मोठे आव्हान समोर आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संदर्भ सूची :-**

१. Selection from the Peshwa Daftar (SPD). Regional Administration of Kalyan-Bhiwandi.

२. Imperial Gazetteer of India (1908). Thane Division Records.

३. Inam Commission Registers (1852-1860). Land grants to religious institutions in Konkan.

४. British Revenue Surveys (1870-1910). Bhiwandi Mapping Series.

५. Ancient Inscriptions of Maharashtra. Edited by V.V. Mirashi.

६. ब) मराठी संदर्भ ग्रंथ (Marathi Books):

७. पाटील, विनायक. (१९९८). 'भिवंडीचा इतिहास आणि संस्कृती', स्थानिक इतिहास परिषद.

८. साने, भा. वि. (१९३०). 'ठाणे जिल्ह्याचा इतिहास', मुंबई.

९. ताम्हाणे, अ. स. (१९५५). 'भिवंडीतील प्राचीन अवशेष', स्थानिक आवृत्ती

१०. Historical Geography of South Asia. "Urban Transformations in Bhiwandi" (2015).

११. South Asian Archaeology. "Site Analysis of Varhaldevi Temple Complex".

१२. Environmental Status Report (ESR). Bhiwandi Lake Restoration (2020).

१३. National Mission on Monuments Database. MH/THN/Varhaldevi (ID: 045).

१४. Sakal Times Archives. "History of Bhiwandi's Gramdevata" (2023).

१५. Bhiwandi Municipal Corporation (BNMC). City Development Plan - Cultural Heritage Zone.

१६. UNESCO Cultural Landscapes. Guidelines for Urban Sacred Sites.

१७. Konkan Itihas Parishad Quarterly. Special Issue on 'Temples of Bhiwandi' (2016).

१८. भिवंडी शहराचा स्थानिक इतिहास.

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# भिवंडी तालुक्यातील राजकीय स्थित्यंतरे - एक ऐतिहासिक अभ्यास

**डॉ. रसिका राजेश घरत**
सहा. प्राध्यापिका ,बी. एन.एन.महाविद्यालय, भिवंडी
**Email:** gharatrasika1982@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180419
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 82-85
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा :***

*भिवंडी हि विणकरांची नागरी म्हणून प्रसिद्ध आहे. गेली अनेक शतके कोट्यावधी भारतीयांची मुलभूत वस्त्रांची गरज भागवणारी उद्योगप्रधान भिवंडी शहराला सांस्कृतिक, सामाजिक, आणि ऐतिहास जडणघडनीचा महत्वपूर्ण इतिहास लाभला आहे. भिवंडी शहराचे राजकारण सतत परिवर्तनशीलराहिलेले आहे. बहामनी आणि आदिलशाही ,मुघल,मराठा, पोर्तुगीज, आणि इंग्रज अशा अनेक सत्तांतरामुळे भिवंडीचे राजकारण सातत्याने बदलत राहिले.आहे. स्वातंत्र्यप्राप्ती नंतर मुंबई राज्य आणि १९६० मध्ये महाराष्ट्र राज्यात समावेशित झालेल्या भिवंडी शहराचा इतिहास महत्वपूर्ण आहे.*

**प्रस्तावना:**

महाराष्ट्राच्या ठाणे जिल्ह्यातील भिवंडी शहर हे औद्योगिक आणि व्यापारी दृष्ट्या प्राचीन काळापासून महत्वाचे शहर मानले गेले मुंबईपासून जवळ तसेच कोकण पट्ट्यातील एक महत्वाचे भौगोलिक स्थान यामुळे व्यापारी मार्गांची उपलब्धता यामुळे अनेक क्षेत्रांमध्ये झपाट्याने विकास होत असताना परिवर्तनाच्या अनेक टप्प्यातून गेले. व्यापारी दृष्ट्या महत्वाचे स्थान असल्यामुळे प्राचीन काळापासून अनेक राज्सात्तानी आपल्या अधिपत्याखाली ठेवण्याचा प्रयत्न केला. मध्ययुगीन काळात मुघल सत्ता, मराठे, पोर्तुगीज आणि इंग्रज या राजवटींनी भिवंडीवर आपली सत्ता प्रस्थापित केली होती. औद्योगिक प्रगतीमुळे विविध धार्मिक आणि सांस्कृतिक समुदाय या शहरात आले. यातून शहराची नवीन संस्कृती निर्माण झाली. भिवंडी शहरात होणाऱ्या राजकीय स्थित्यतरांचा प्रभाव तेथील समाजावर पडला. मध्ययुगीन काळातील भिवंडीचा इतिहास पाहता अनेक सत्ताबदलांमुळे धामधुमीचा काळ मनाला जातो. भिवंडीतील या स्थित्यांतरांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या शोधनिबंधामध्ये केला आहे.

**उद्दिष्ट्ये :**

१. भिवंडीचे ऐतिहासीक महत्व जाणून घेणे.

२. स्थानिक इतिहासाचा एक भाग म्हणून भिवंडीचा समृद्ध इतिहास जाणून घेणे.

३. भिवंडीचा राजकीय इतिहास जाणून घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत संशोधन पद्धतीचा वापर केला आहे. प्राथमिक आणि दुय्यम साधनांचा वापर केला आहे. विविध वर्तमान पत्रे , मासिक, आणि ग्रंथ यांचा वापर केला आहे.

**संशोधांची व्याप्ती :**

प्रस्तुत संशोधन फक्त भिवंडी पुरतेच मर्यादित आहे तसेच फक्त राजकीय निवडक स्थित्यंतराचा आढावा यामध्ये घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रातील ठाणे जिल्ह्यातील भिवंडी हे तालुक्याचे मुख्य ठिकाण असून यंत्रमागाचे शहर अशी भिवंडीची ओळख आहे.[१] या भिवंडीचा इतिहास जाणून घेणे अगत्याचे ठरते. स्थानिक इतिहासाचा एक भाग म्हणून याकडे पाहता येईल. ठाणे जिल्हा महाराष्ट्राच्या वर सर्वात उत्तरेकडे असल्यामुळे त्याला उत्तर कोकण असेही संबोधले जात . प्राचीन काळी हा प्रदेश 'अपरांत' नावाने ओळखला जात होता.[२] या ठाणे जिल्ह्यतील एक तालुका म्हणजे भिवंडी होय. मुंबईच्या ईशान्येस सुमारे ५० कि.मी. मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर वसलेले आहे. दळणवळणाच्या साधनांची विपुलता, मुंबई सारख्या औद्योगिक शहराचे व बंदरांचे सानिध्य यामुळे येथे उद्योगांची भरभराट झाली.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21255170

**Address for correspondence:**
*डॉ. रसिका राजेश घरत,सहा. प्राध्यापिका ,बी. एन.एन.महाविद्यालय, भिवंडी*

**How to cite this article:**
घरत, . रसिका राजेश (2026). भिवंडी तालुक्यातील राजकीय स्थित्यंतरे - एक ऐतिहासिक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 82–85.* https://doi.org/10.5281/zenodo.21255170

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

अगदी प्राचीन कालाप्सून भिवंडी अनेक स्थित्यंतरातून गेली. भिवंडीचा प्राचीन संदर्भ पाहता महाभारतामध्ये अपरांताचा उल्लेख आढळतो.

सातवाहन पूर्वकालीन बृहत्कथेतील पीठलेखात व नाशिक येथील लेण्यांत कोलीकनिकाय असे उल्लेख आहेत. आर्य लोक येण्यापूर्वी अपरांतात कोळ्यांची वस्ती होती. म्हणून अर्वाचीन काळापर्यंत या भागाला कोळवण असे म्हणत असत.

हयदाबतलीमरा या युनानी प्रवाशाने आपल्या प्रवास वर्णनात बिंदा नदीचा उल्लेख केला आहे. इ.स. पूर्वीचे भिवंडी हे नाणेघाट व बोरघाट यांच्या रस्त्यावर एक महत्त्वाचे बंदर म्हणजेच प्रवेशद्वार म्हणून प्रसिद्धीला आले होते.[३] भिवंडी शहराच्या ज्या भागांना आज बंदर मोहल्ला, सौदागर मोहल्ला म्हणतो ते कदाचित प्राचीन काळापासून वसलेले असतील.[४] यावरून प्राचीन काळी भिवंडी हे शहर समुद्र व्यापारासाठी प्रसिद्ध असल्याचे दिसून येते. तसेच भौगोलिक रचना व्यापारीदृष्ट्या आदर्श असे जलमार्ग आणि भूमार्गाच्या ऐन मोक्याच्या ठिकाणी असलेल्या या शहरात पुढे वस्त्रोद्योग नावारूपाला आला.

मध्ययुगीन काळ पाहता राजा भीमदेवाच्या कारकिर्दीत उदयास आलेले भीमडी उर्फ भिवंडी हे एक ऐतिहासिक शहर आहे. या शहराचा मुस्लिम राजवटीमध्ये काही पर्शियन दस्तऐवजांमध्ये इस्लामपुर असा उल्लेखसुद्धा आढळतो. आणखी एक गृहीतकानुसार उत्तरेकडून आलेल्या बिंब राजांनी प्रथम भिवंडी जिंकली म्हणून पुढे बिंबस्थान आणि बिंबस्थानावरून भिवंडी हे नाव पडले.

१८८१ मध्ये भिवंडीच्या उत्तरेस दहा मैलांवर असलेल्या भेरे किंवा बेहेरे गावाच्या प्रमुखाकडे सापडलेल्या ताम्रपटात भिवंडीच्या ईशान्येस दहा मैलांवर असलेल्या आधुनिक भादाणे पूर्वीच्या भदान गावाला शिलाहार राजांनी दिलेल्या अनुदानाची नोंद आढळते.[५] १० व्या शतकात शिलाहार (शेलार) यांच्या काळात इ.स. ९९७ मध्ये भिवंडीचा उल्लेख भिवंडी तर्फ सोनाळे असा मिळतो.[६] शिलाहार राज्यकर्त्यांनी इ.स. ८१० ते इ.स. १२६० या काळात उत्तर कोकणावर शिलाहार राज्यकर्ते राज्य करीत होते.[७]

इ.स. १२६० मध्ये देवगिरीच्या महादेव यादव यांनी शिलाहारांचा पाडाव उत्तर कोकण देवगीरीच्या साम्राज्याला जोडला. पुढे १२९० पर्यंत देवगिरीच्या अधिकाऱ्यांचा अंमल होता.महादेवाच्या मृत्यूनंतर उत्तर कोकणचा कारभार राजा रामचंद्र देवाने हाती घेतला.१२९० मधील ताम्रपटावरून सिद्ध होते की ठाणे जिल्ह्यातील अंजूर आणि वावली या दोन गावांना १२७३ आणि १२९१ च्या दोन अनुदानावरून कृष्ण नावाचा ब्राम्हण संपूर्ण कोकणचा प्रांताचा प्रमुख होता. इ.स.१२८० आणि इ.स. १२८८ च्या शिलालेखामध्ये भिवंडी आणि वसई जवळ रामचंद्र देवाच्या अधिकाऱ्यांनी दिलेल्या भेटवस्तूंची नोंद सापडते.[८] इ.स. १२९४ मध्ये भिमदेव हा उत्तर कोकणचा राजा बनला आणि त्याने माहीम येथे राजधानी बनवली. पुढे प्रतापबिंब सत्तेवर आला.

महाराष्ट्रातील अस्थिर परिस्थितीचा फायदा जयबा उर्फ जयदेवराव यांनी घेऊन 'कोळवण' परिसरात स्वतंत्र जव्हार राज्याची स्थापना केली.[९] इ.स १३४४ मध्ये दिल्लीचा सुलतान मुहम्मद बिन तुघलकाने नेमशहा ही पदवी देऊन मान्यता दिली आणि भिवंडीची फौजदारीही बहाल केली. इ.स. १४५८ – १५११ या काळात महमुद शहाच्या कारकिर्दीत भिवंडी गुजरात राजवंशाच्या स्वाधीन होते. तर भिवंडी सर्वात जास्त महसुल देणाऱ्या बंदरांपैकी एक होते. १४९६ मध्ये भिवंडी अहमदनगरच्या निजामशहाच्या राजवटीत आले.

१५०० ते १६७० च्या काळात पोर्तुगीजांनी कोकणात आपली सत्ता स्थापन केली. १५३४ मध्ये उत्तर कोकणावर पोर्तुगीजांची सत्ता प्रस्थापित झाली. इ.स. १५४५ मध्ये पोर्तुगीजांनी अहमदनगरच्या निजामशहाशी तह केला. ज्या अन्वये कल्याण – भिवंडी या मार्गे चाचे लोकांना वसईकडे जाण्याची परवानगी देऊ नये असे ठरले.[१०] इ.स. १६१३ मध्ये ननो-द-कुन्हा याने कल्याण भिवंडी हा भाग काबीज केला. पण प्रदेश साया सफर खानाने जिंकुन घेतला. इ.स. १६१६ मध्ये मलिक अंबरच्या मृत्यूनंतर शहाजहानने कल्याण-भिवंडी जिंकुन हा भाग विजापूरच्या आदिलशाहीस जोडला.[११] १६३५ मध्ये मुघल आणि विजापूर मध्ये झालेल्या तहामध्ये कल्याण-भिवंडी प्रदेश विजापुरकडे सोपविला.

शिवाजी महाराजांच्या काळात भिवंडीला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाले. १६५७ मध्ये शिवाजी महाराजांनी कल्याण आणि भिवंडीचे किल्ले जिंकले.[१२] जमिनीवरून आलेल्या शत्रुवर मारा करता येईल परंतु जलमार्गाने आलेल्या (पोर्तुगीज) शत्रुवर मात करण्यासाठी इ.स. १६५९ मध्ये भिवंडी येथे जहाजबांधणीला सुरुवात केली. १६७० मध्ये भिवंडी येथे ५००० ची फौज तयार करून माहुली किल्ला सर करून कोकणावर आपली सत्ता प्रस्थापित केली. संभाजी राजांनी त्यांच्या कारकिर्दीत अरबांशी तह करून भिवंडीला वखारी घालण्याच्या सवलती दिल्या. १६८० मध्ये रामनगर, जव्हार, कल्याण, भिवंडी हा उत्तर कोकणातील भाग स्वराज्यात होता. इ.स. १६९० मध्ये महाबलखानाने भिवंडी काबीज करून पोर्तुगीजांच्या मुलुखात लुटालूट व जाळपोळ करून दहशत पसरविली.

उपरोक्त राजकीय घडामोडी पाहता मध्ययुगीन काळामध्ये देखील भौगोलिक स्थानामुळे भिवंडीचे महत्त्व अबाधित असल्याचे दिसून येते. ठाणे जिल्ह्यातील कल्याण बरोबरच भिवंडी, शहापुर इ. प्रदेशांचा तसेच माहुली, कोहोज गड, दुर्गाडी इ. किल्ल्यांशीही शिवाजी महाराजांचा प्रत्यक्ष संबंध आला होता. आजही भिवंडीतील एक भाग झेंडा नाका या नावाने ओळखला जातो.

१७३० मध्ये मराठ्यांनी कांबे येथे पोर्तुगिजांचा पराभव केला. १७३१ मध्ये एप्रिल महिन्यात वरळी (वऱ्हाळे) गावच्या यात्रेवर व भिवंडीवर हल्ला करून अँटोनियो सेंटोक्स याने भिवंडी जिंकली. पुढे १७३२ मध्ये एका तहानुसार भिवंडी मराठ्यांना परत मिळाली. ठाण्याच्या जवळ असलेला कल्याण भिवंडी प्रांत सन १७२० मध्ये बाजीरावांचा मेहुणा रामचंद्र महादेव जोशी याने जिंकुन छत्रपती शाहू महाराजांचा अंमल सुरु केला. १७३४ मध्ये पोर्तुगीजांनी ठाण्याचा किल्ला जिंकला आणि प्रजेवर अतोनात जुलूम सुरु केला. त्यावेळी भिवंडीच्या अणजूर येथील गंगाजी नाईकांनी पुण्यास बाजीरावांकडे पोर्तुगीजांचे पारीपात्य करण्यासाठी विनवणी केली. तेव्हा बाजीराव पेशव्यांचे भाऊ चिमाजी आप्पा यांनी वसईची मोहीम काढून ४ मे १७३९ रोजी वसईचा किल्ला मराठ्यांच्या हाती आला.[१३] इ.स.१७६० मध्ये कोळी राजांनी भिवंडी काबीज केली.

१८१७ मध्ये इंग्रजांनी भिवंडी जिंकल्यावर एत्तदेशीय कोळी सैनिकांनी एक तुकडी तयार करून या गावी ठेवण्यात आली. इ.स. १८३६ पासून वैतरणेय सैन्य विभाग नावाचा लष्करी विभाग ठेवण्यात आला. आजच्या फौजदारी कचेऱ्या या लष्करी बराकीचे रुपांतर

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

होय. इंग्रजी अंमलमध्ये मात्र इंग्रजाविरुद्ध आवाज उठविला जाऊ लागला. देशात घडणाऱ्या घटनांचा प्रभाव भिवंडीवरही होणे. साहजिकच होते. त्यामध्ये मिठावरील करवाढ, वजने-मापे कायदा स्वतंत्र चळवळी मध्ये सार्वजनिक गणपती सुरु झाले. मेळे काढण्यात येऊ लागले

चिमाजी आप्पांच्या वसई संग्रामात महत्वाची भूमिका बजाविणारे अणजूरचे गंगाजी नाईक यांच्या पाचव्या पिढीतील गजानन उर्फ काका नाईक हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या संघटनेत सामील झाले होते. १९१२ मध्ये त्यांना राजद्रोहाच्या खटल्यांतर्गत कारावासाची शिक्षा झाली होती. भिवंडीतील अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभाग नोंदविला. यामध्ये विनायक दामोदर सावरकर यांनी स्थापन केलेल्या अभिनव भारत या संघटनेमध्ये भिवंडीतील १२ व्यक्तींनी सभासदत्वाची शपथ घेतली होती.[१४]

होमरुल लीगच्या प्रचारासाठी लोकमान्य टिळकांची १० मार्च १९१८ मध्ये कल्याणसह भिवंडीला सभा झाली.[१५] इ.स. १९२० मध्ये स्वदेशीचा प्रचार, खिलाफत चळवळ इत्यादि कार्यात भिवंडी भाग घेऊ लागली. मौलाना महंमद शौकत अली यांनी या निमित्ताने भिवंडी शहराला भेट दिली. त्यावेळी हिंदू मुस्लीम ऐक्य दिसून आले. सन १९२१ मध्ये भिवंडी कॉंग्रेस कमिटीची स्थापना झाली.[१६]

सप्टेंबर १९३० मध्ये मीठ सत्याग्रह आणि असहकार दारू दुकानासमोर पिकेटिंग करणे याबाबत सर्वात मोठी सभा झाली. या सभेला १५००० लोक हजर होते.[१७] १९३२ च्या सविनय कायदेभंग चळवळीत भिवंडीतील १४ सत्याग्रही सहभागी झाले होते.[१८] ८ ऑगस्ट ,१९४२ रोजी गवालिया टंक , मैदान मुंबई येथे कॉंग्रेसचे प.स. भागवत उपस्थित होते.[१९]

भारतीय स्वातंत्र्य लढ्यामध्ये भिवंडीत अनेक स्वातंत्र्य लढ्यामध्ये भिवंडीत अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपला सहभाग नोंदविला. यामध्ये श्री. वासुदेव त्रिंबक भावे, श्री. वासुदेव त्रिंबक भावे, श्री. परशुराम शंकर पुण्यार्थी, श्री. पुरुषोत्तम बळीराम मुंडे, श्री. गजानन भिवा तेरडे, श्री. चंद्रकांत नारायण सुतार, श्री. मुकुंद मराठे, श्री. जगन्नाथ भिडे, श्रीमती इंदुमती शिवराम भिडे, श्रीमती आशा (सोनू), श्रीमती यमु लेले, श्री. मोहन कारवा, श्री. पुनमचंद हिरालाल, धरी. ठक्कर गोवर्धनदास द्वारकादास, श्री. अकबर फकी, श्री.कमाल मिगन मोमीन अशा ज्ञात–अज्ञात स्वातंत्र्य सैनिकांनी भारताला स्वातंत्र्य होईपर्यंत योगदान दिले.

भिवंडी निजामपूर नगरपालिकेची स्थापना सुप्रीम लेजीस्लेटीव कौन्सिलच्या १८५० च्या कायद्यान्वये १० ऑक्टोबर १८६४ रोजी झाली. आणि भिवंडीच्या विकासास हातभार लागला.

एकंदरीत पाहता जात, धर्म, जात, धर्म, पंथ, भाषा यांच्या पलीकडे जाऊन भिवंडीतील व्यक्तींनी एकत्र येऊन स्वातंत्र्य लढ्यात आपले योगदान दिले. हे महत्वाचे भिवंडीचे वैशिष्ट्य येथे दिसून येते. १९२३ मध्ये भिवंडीमध्ये वीज अली आणि १९२६ मध्ये भिवंडीतील उद्योगपती आणि स्वातंत्र्यसेनानी जी.जी उर्फ दादासाहेब दांडेकर यांच्या प्रयत्नातून भिवंडीतील पहिले थर्मल पावर स्टेशन सुरु झाले. १९२७ मध्ये खानसाहेब समद शेठ यांनी भिवंडीत पहिला यंत्रमाग आणला.त्यामुळे भिवंडीतील यंत्रमागाचा जनक असे म्हंटले जाते.[२०] १९६० नंतर वस्त्रोद्योगाच्या भरभराटीमुळे भिवंडीमध्ये मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले.

आज भिवंडी भारतातील 'मंचेस्टर' म्हणून नावारूपाला आली. भिवंडीच्या उन्नतीमध्ये भिवंडीतील दानशूर, सेवाभावी आणि अन्यायाविरुद्ध पेटून उठणाऱ्या भिवंडीच्या जनतेमुळे भिवंडी आज आपले स्वतंत्र अस्तित्व टिकवून आहे, गरज आहे ती हा वारसा जपण्याची आणि भिवंडीला प्रगतीपथावर नेण्याची.

**निष्कर्ष:**

उपरोक्त निष्कर्षावरून भिवंडीतील राजकीय स्थित्यंतरे ही फक्त सत्ताब्दालापुर्ती मर्यादित नसून धार्मिक आणि औद्योअगिक घटकांशी जोडलेली दिसून येतात. प्राचीन काळापासून स्वातंत्र्य प्राप्ती पर्यंत अनेक सत्ताबदल या शहराने पहिले आहेत.भिवंडी परिसर प्राचीन व्यापार मार्गाशी जोडलेला असल्यामुळे भिवंडीला एक अनन्य साधारण महत्व होते. मध्ययुगीन काळात सुद्धा अत्यंत वेगाने सत्ता बदल होताना दिसून आले. भिवंडीच्या स्थानामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात कोकण आणि कल्याण भिवंडीला लष्करी आणि व्यापारी दृष्टीने भिवंडीला महत्व आले होते.

ब्रिटीश कालखंडात तुलनेने राजकीय स्थित्यंतरे कमी असून सामाजिक आणि सांस्कृतिक स्थित्यंतरे घडून आलेली दिसतात. भिवंडी शहराने अनेक स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभागी होऊन आपले योगदान दिले. याच काळात भिवंडीमध्ये वस्त्रोद्योग वाढीस लागला.या स्थित्यंतराचे परिणाम भिवंडीतील सामाजिक आणि सांस्कृतिक घटकांवर ही पडलेला दिसून येतो. भिवंडीचे राजकारण, पायाभूत सुविधा, रोजगार निर्मिती आणि सामाजिक सलोखा या मुद्द्यांभोवती फिरतांना दिसून येते. त्यामुळे भिवंडीतील राजकीय स्थित्यंतरे ही ऐतिहासिक घटनांचा परिणाम असून बदलत्या सामाजिक-आर्थिक परिस्थितीनुसार ती विकास पावली आहेत.

**संदर्भसूची:**

1. vishwakosh.marathi.in retrieved on19/02/2026
2. त्रैमासिक ,भारत इतिहास मंडळ ,होल्युम ७.१०, मिशिगन विद्यापीठ, १९२६,पृ.क्र. १४८
3. श्रीराघुनाथ दास ,सुभे कल्याण,. ए.पी. बापट अंड ब्रदर्स, पुणे, १९२४ पृ. क्र. ७
4. भिवंडी निजामपूर नगरपालिका शतसंवत्सारिक महोत्सव १८८४ ते १९६५ पृ.क्र. ११
5. Gazetteer of the Bombay Presidency Volume XIV : pg. No. 50
6. पूर्वोक्त भिवंडी निजामपूर पृ.क्र. १
7. Samina Shaikh, Transition of a town a social economic and cultural study of Bhiwandi 1850 – 1950, मुंबई विद्यापीठ, २०२०, पृ.क्र. २७

8. Transaction of Bombay Geographical Society- 1836-1838, p. no. 136
9. विनोद सोनावणे , शिवकालीन जव्हार संस्थान : एक ऐतिहासिक अभ्यास ,कोकण इतिहास पत्रिका, पृ.१४
10. भिवंडी शतसांवत्सरिक पृ.क्र. १२
11. पूर्वोक्त , Samina Shaikh -, पृ.क्र. २८
12. कुलकर्णी विं. वी., अशोक नेवासकर, मध्ययुगीन भारताचा इतिहास, विद्या प्रकाशन, नागपूर, २००९, पृ.क्र. १८१
13. काळे म. वा., `मराठ्यांचा इतिहास, प्राची प्रकाशन, मुंबई,२००७, पृ. क्र. १६४
14. लोकसत्ता, भूतकाळाचे वर्तमान: भिमडी उर्फ भिवंडी ६/०८ २०१५
15. घनवटकर सुधीर, ‘ भिवंडी बयान, पुणे, २००७, पृ. क्र. ९
16. कुलकर्णी विजय अनंत, स्वातंत्र्य चळवळीतील ठाणे, पृ. क्र. ५६
17. कित्ता- भिवंडी बयान,पृ.क्र. ९४
18. पूर्वोक्त , कुलकर्णी विजय अनंत पृ.१८७
19. कित्ता- विजय कुलकर्णी विजय अनंत पृ. क्र. २४९
20. कित्ता ,लोकसत्ता, भूतकाळाचे वर्तमान: भिमडी उर्फ भिवंडी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# भिवंडीतील विविध ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या पिकांचा चिकित्सक अभ्यास

**डॉ. सुर्यकांत नागनाथ कळसकर**
भूगोल विभाग प्रमुख ,कै.बापूसाहेब पाटील,एकंबेकर महाविद्यालय हाणेगाव देगलुर जि.नांदेड
**Email:** kalaskarsuryakant@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180420
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 86-91
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश***

*भिवंडी तालुक्यातील कृषी क्षेत्रात भौगोलिक रचना, पर्जन्यमान, मृदेचे प्रकार आणि जलस्रोत यांनुसार विविध पिकांची लागवड केली जाते. भात हे प्रमुख खरीप पीक असून पावसावर अवलंबून असलेल्या भागांत त्याची मोठ्या प्रमाणात शेती केली जाते. तसेच भाजीपाला, फळबागा, डाळी, नाचणी आणि इतर स्थानिक पिकेही घेतली जातात.*

*चिकित्सक अभ्यासातून असे दिसून येते की भिवंडीतील विविध भागांमध्ये पिकांच्या निवडीवर हवामान, बाजारपेठेची उपलब्धता, सिंचन सुविधा आणि उत्पादन खर्च यांचा प्रभाव पडतो. शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे शेतीयोग्य जमिनीचे क्षेत्र कमी होत असले तरी आधुनिक शेतीतंत्र, सुधारित बियाणे आणि सिंचनाच्या साधनांमुळे उत्पादनवाढीच्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र हवामान बदल, मजुरांची कमतरता, उत्पादन खर्चातील वाढ आणि बाजारभावातील चढउतार ही आव्हाने शेतकऱ्यांसमोर आहेत.*

*यामुळे भिवंडीतील शेतीचा विकास साधण्यासाठी शाश्वत कृषी पद्धती, जलसंधारण, पीक विविधीकरण आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आवश्यक ठरतो.*

***मुख्यशब्द*** *:: भिवंडी,कृषी,भात,भाजीपाला,फळबाग,खरीप पिके,नाचणी,डाळी,सिंचन,मृदा पर्जन्यमान,पीक विविधीकरण,शाश्वत शेती,कृषी विकास,हवामान बदल*

**प्रस्तावना –**

भिवंडी हे ठाणे जिल्ह्यातील महत्त्वाचे औद्योगिक तसेच कृषीप्रधान क्षेत्र आहे. भिवंडी शहर कापड उद्योगासाठी ओळखले जात असले तरी तालुक्याच्या ग्रामीण भागात शेती हा ग्रामीण लोकजीवनाचा प्रमुख आधार आहे. भौगोलिक रचना, पर्जन्यमान, मृदाप्रकार आणि मुंबईसारख्या मोठ्या बाजारपेठेची जवळीक या घटकांमुळे येथे विविध प्रकारची पिके घेतली जातात.

भिवंडी तालुक्यात डोंगराळ भाग , नदीकाठचा तसेच सपाट असा भौगोलिक वैविध्य पहावयास मिळते .या नैसर्गिक परिस्थितीनुसार भात, नाचणी, भाजीपाला, तसेच आंबा, चिकू, केळी यांसारखी बागायती पिके घेतली जातात. पावसावर आधारित शेतीसोबतच काही भागात विहिरी व बोअरवेल यांच्या साहाय्याने सिंचन व्यवस्था विकसित झालेली आहे.

उद्योगधन्द्यामुळे शेत जमीनीचे प्रमाण कमी होत असली तरी ग्रामीण भागात शेतीची परंपरा अजूनही टिकून आहे. बदलते हवामान, वाढता उत्पादन खर्च, बाजारभावातील चढउतार आणि मजूर टंचाई या समस्या शेतकऱ्यांसमोर उभ्या आहेत. त्यामुळे भिवंडीतील विविध भागांतील विविध पिकांची निवड, उत्पादनक्षमता, आर्थिक परिणाम आणि शाश्वततेचा चिकित्सक अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

सदर संशोधनामध्ये भिवंडी तालुक्यातील विविध ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या पिकांचे स्वरूप, त्यामागील भौगोलिक आणि आर्थिक कारणे, तसेच त्या पिकांचा स्थानिक अर्थव्यवस्था व समाजजीवनावर कशा प्रकारे परिणाम होतो यांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आलेलाआहे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*डॉ. सुर्यकांत नागनाथ कळसकर ,भूगोल विभाग प्रमुख ,कै.बापूसाहेब पाटील,एकंबेकर महाविद्यालय हाणेगाव देगलुर जि.नांदेड*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21255286

**How to cite this article:**
कळसकर, . सुर्यकांत . नागनाथ . (2026). भिवंडीतील विविध ठिकाणी घेतल्या जाणाऱ्या पिकांचा चिकित्सक अभ्यास. *Journal of Research & Development,* 18(4(*XV*)), 86-91
https://doi.org/10.5281/zenodo.21255286

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. भिवंडी तालुक्यातील प्रमुख पिकांची ओळख व वर्गीकरण करणे.
2. विविध भौगोलिक भागांतील पिकांच्या उत्पादनक्षमतेचा अभ्यास करणे.
3. शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर पिकांच्या प्रकाराचा परिणाम होतो याचा अभ्यास करणे .
4. शेतीसमोरील समस्या व शाश्वत उपाय सुचवणे.

**संशोधन पद्धती**

- **प्राथमिक माहिती:** शेतकरी मुलाखती, प्रत्यक्ष शेतभेटी, निरीक्षण.प्रश्नावली इत्यादी .
- **द्वितीयक माहिती:** कृषी विभाग अहवाल, जिल्हा कृषी कार्यालय आकडेवारी, संशोधन लेख.ग्रामसेवक ,तलाठी कार्यालय गाझेट,पंचायत समिती इत्यादी
- **विश्लेषण पद्धती:** तुलनात्मक विश्लेषण, क्षेत्रनिहाय वर्गीकरण, आर्थिक मूल्यांकन.

**अभ्यास क्षेत्र –** भिवंडी ठाणे जिल्हातील महत्वाचा तालुका आहे हा तालुका आर्थिक दृष्टा विकासिक तालुका म्हणून ओळखला जातो भिवंडीच्या दक्षिणेला ठाणे जिल्हा पश्चिमेस वसई तालुका पूर्वस कल्याण तालुका उत्तरेला शहापूर तालुका असे तालुके लाभले आहेत. भिवंडी तालुक्याचे स्थान भिवंडी सुमारे १९° १८' उत्तर अक्षांश (19.3° N) वर स्थित आहे.आणि ७३° ०३' पूर्व रेखांश (73.05° E) वर स्थित आहे. भिवंडी तालुक्यात सरासरी २२६ गावं (villages) आहेत. भिवंडी तालुक्याचा एकूण भूभाग सुमारे ६९१ *चौ. किमी (square kilometres)* इतका आहे. या क्षेत्रात ग्रामीण जमिनी, शेतीयोग्य भूभाग, बाजारपेठेची जमीन, औद्योगिक व नागरी विकासासाठी जमिनीचा समावेश आहे.




**प्राकृतिक रचना -** भिवंडी तालुक्यात उत्तर बाजूला काही डोंगराळ व टेकडीयुक्त प्रदेश आढळतो तर काही ठिकाणी मध्यम उताराचे सपाट मैदाने आढळतात नदीकाठचा प्रदेशात गाळयुक्तमृदा आढळते. डोंगराळ भगती शेती पावसावर अवलंबून आहेतर सपाट भागात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत.

**हवामान -** भिवंडीमध्ये वर्षभरातील सरासरी तापमान बदल झालेला पहावयास मिळतो जुलै महिन्यात 28.8 °C,ऑगस्ट महिन्यात 28.5 °C (सगळ्यात कमी), महिन्यात 29.9 °C डिसेंबर महिन्यात .8 °C तर मार्च महिन्यात 36.3 °Cएप्रिल महिन्यात 37.2 °C *(*सर्वाधिक) ,मे महिन्यात 36.2 °C तापमान आढळते. तर पाऊस हा वेगवेगळ्या ठिकाणी साधारणपणे जून महिन्यात 164 mm जुलै महिन्यात 439 mm (सर्वाधिक) ऑगस्ट महिन्यात 333 mm,सप्टेंबर महिन्यात 128 mm,ऑक्टोबर महिन्यात 49 mm पाऊस पडतो. यावरून भिवंडीचे हवामान हे वार्षिक तापमान हे 28 ते 36°C आहे वार्षिक सरासरी पर्जन्य सुमारे ११०० ते ११५० mm पडतो. यावरून भिवंडीत <u>उष्ण आर्द्र हवामान</u> आहे, ज्यामध्ये पावसाळी आणि कोरड्या हंगामाचा फरक स्पष्ट दिसतो.पश्चिम किनाऱ्याजवळ खादीचा भाग (समुद्रकिनारा भाग)असल्यामुळे हवामान अधिक आर्द्र व उबदार आहे, तर पूर्वेकडे थोडे कमीत कमी आर्द्रतेचे *असते.* उष्ण व दमट; पावसाळ्यात भरपूर पाऊस (जून–सप्टेंबर) आढळते .

**मृदा प्रकार:** काळी मृदा , गाळमिश्रित मृदा, काही भागात वालुकामय मृदा तर काही भागात लालसर किंवा तपकिरी रंगाची, कंकरीटसारखी खडकाळ बनावट प्रकारची मृदा आढळते .

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026




कें द्रीय भूमि जल बोर्ड जल संसाधन, नदी विकास और गंगा संरक्षण विभाग, जल शक्ति मंत्रालय भारत सरकार

**नदी प्रणाली-** भिवंडी तालुका पूर्णपणे समुद्रकिनाऱ्याच्या जवळचा भाग नसला तरी येथील भूगोलात उल्हास आणि वैतरना नदी यांचा समावेश होतो ..भिवंडी तालुक्यात कामवारी नदी ही भिवंडी तालुक्यातली एक प्रमुख नदी असून तुंगरेश्वर पर्वतरांगेतून पाऊस पाण्यामुळे वाहते, आणि नंतर पुढे उल्हस नदीच्या सहायक वाहिनीमध्ये मिसळते. उल्हास नदीच्या प्रवाहामुळे भिवंडी आदी भागात पावसाळ्यात पुराची परिस्थिती निर्माण होऊ शकते. भातसा नदीचा प्रवाह भिवंडी तालुक्याजवळील भागात थेट नसला तरी या नदीवर बांधलेले भातसा धरण या पाण्याचा वापर आसपासच्या भागात, समाविष्ट भिवंडीमध्येही पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी केला जातो पावसाळ्यात ही नदी भरून वाहते पण कोरड्या हंगामात पाण्याची पातळी खूप कमी होते.

**भिवंडीतील प्रमुख पिकांचे प्रकार**

**(अ) धान्य पिके-**

1) **तांदूळ (भात)** प्रमुख अन्नधान्य पिक, मुख्यतः खरीप हंगामात पेरली जाते.भिवंडी तालुक्याजवळील सर्वच गावांमध्ये तांदूळ शेती केली जाते,

2) **तूर, उडीद, हरभरा,नाचणी (डाळी)** – हे पिक भात शेतीमध्ये दुय्यम पिक म्हणून घेतले जाते हे पिक खरीप व रब्बी दोन्ही हंगामात केली जाते.

भिवंडी परिसरात मक्याचे (मक्का) पिके अनेक गावांमध्ये घेतली जातात.उदा. लामज, सुपेगाव इत्यादी
हे पिके शेतकऱ्यांकडून अन्नधान्य आणि पाळीव प्राण्यांसाठीही वापरली जातात.
भिवंडी तालुक्यातील शेतकरी गावं कृषि कामासाठी प्रसिद्ध आहेत. यापैकी काही गावाचा उल्लेख केला आहे यात अगडंजेल हे गाव तांदूळ, डाळी साठी अनंगाव तांदूळ, बाजरी, डाळी कोरिवली भाग तूर, हरभरा या पिकासाठी प्रसिध्द आहे .






Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026



**व्यापारी पिके –** भिवंडी शहराच्या आजूबाजूच्या प्रदेशात ज्या भागात जलसिंचनाच्या सुविधा उपलब्ध झालेल्या आहेत त्या भागात वांगी ,कोबी ,भेंडी विविध प्रकारची फुले इत्यादी पिकांचे उत्पादन घेतले जाते विशेषतः नद्याच्या किनारी भागात तसेच विहिरी च्या साह्याने पाणीपुरवठा केला जातो .



- **भात (तांदूळ) –** पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर.
- **नाचणी –** डोंगराळ व कमी पाण्याच्या भागात.
- **मका –** मर्यादित क्षेत्रात.

भात उत्पादन पावसावर अवलंबून असल्याने हवामान बदलाचा मोठा परिणाम दिसतो.

**(ब) भाजीपाला पिके**



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026



**बागायती पिके**





भिवंडी परिसरात आंबा, लिंबू, चिक्कू अशा फळांची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. विशेषतः *हापूस आंबा* या जातीला व्यापारी महत्त्व आहे. हिवाळा आणि उन्हाळ्यात या फळांची बाजारात सतत मागणी असते, त्यामुळे शेतकऱ्यांना चांगले आर्थिक लाभ मिळतात. वांगी, कोबी, टोमॅटो, मिरची, गाजर, कांदा अशा भाजीपाल्याची लागवड भिवंडीच्या आसपासच्या गावांमध्ये केली जाते. भिवंडी हे भाजीपाल्याचे मोठे व्यापारी केंद्र आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना त्यांचे उत्पादन ताज्या स्वरूपात विकण्याची संधी मिळते.

**भिवंडीतील शेतीसमोरील प्रमुख समस्या-**

**१ .पाणीपुरवठ्याची समस्या -** भिवंडी परिसरातील काही भाग पावसावर अवलंबून आहेत.सिंचनासाठी पाटबंधारे किंवा विहिरींचा अभाव असल्यामुळे पिकांना पुरेसे पाणी मिळत नाही.उन्हाळ्यात पाण्याची कमतरता फळे व भाजीपिकांसाठी मोठा धोका ठरते.

**२. जमीन आणि मातीची समस्या -** शहराजवळील भागात औद्योगिक आणि नागरी विकासामुळे शेतीसाठी जमीन कमी झाली आहे. मातीतील उपजाऊपण कमी झाल्यामुळे पिकांची उत्पादकता घटते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**३. किडी आणि रोगांचे संकट -** भाजीपाला, फळे आणि धान्य पिकांवर किडी व रोगांचे प्रमाण वाढले आहे. रासायनिक कीटकनाशकांचा वापर वाढल्यामुळे पर्यावरणावर परिणाम होतो आणि उत्पादनावर खर्च वाढतो.

**४. बाजारातील समस्या -** शेतकऱ्यांना उत्पादनासाठी योग्य बाजारभाव मिळत नाही. शहरातील व्यापारी आणि मंडी यांमुळे उत्पादनाची किंमत स्थिर राहत नाही, त्यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होते.

**५. आर्थिक आणि तांत्रिक समस्या -** आधुनिक शेतीसाठी लागणारे तंत्रज्ञान, बी, खत व यंत्रसाधने शेतकऱ्यांना सहज उपलब्ध होत नाहीत. लहान शेतकरी असल्यामुळे मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करणे कठीण आहे.

**६. हवामान बदल -** अनियमित पाऊस, ऊष्णता वाढ, वादळ किंवा पर्जन्य कमी होणे यामुळे पिकांची उत्पादकता प्रभावित होते. फळे आणि भाजीपिके हंगामाच्या अपेक्षेनुसार तयार होत नाहीत.

भिवंडीतील शाश्वत शेतीसाठी उपाययोजना

**१. जलसंधारण व सिंचन सुधारणा**

- पाटबंधारे, विहिरी, टाक्या उभारून पाणी जतन करणे.
- ड्रिप आणि स्प्रिंकलर सिंचन यंत्रणा वापरणे, ज्यामुळे पाण्याचा वापर कमी होतो.
- पावसाचे जल संचयन करून पिकांसाठी उपयोग करणे.

**२. जमिनीची उत्पादकता टिकवणे**

- जैविक खतांचा वापर (सेंद्रिय सेंद्रिय खत, कंपोस्ट) करणे.
- वाळवंट व क्षरण रोखण्यासाठी मुळे झाडे लावणे आणि रोटेशन पिके घेणे.
- मिश्र लागवड (Mixed cropping) करून जमिनीत पोषक तत्व टिकवणे.

**३. किडी व रोग नियंत्रण**

- जैविक कीटकनाशके, प्राकृतीक उपाय यांचा वापर करणे.
- पीक रोटेशन आणि विविध पिकांच्या मिश्रणामुळे किडी व रोगांचे प्रमाण कमी करणे.

**४. बाजार व्यवस्थापन व आर्थिक लाभ**

- थेट विक्रीसाठी स्थानिक मार्केट किंवा सहकारी संस्था तयार करणे.
- फळ, भाजीपाल्यांसाठी सिझननुसार विक्री नियोजन करणे.
- कृषी सहकारी संस्था आणि सरकारी योजना यांचा लाभ घेणे.

**५. तंत्रज्ञानाचा वापर**

- आधुनिक शेती यंत्रणा वापरणे (जसे की प्लांटर, हार्वेस्टर).
- मोबाइल ॲप्स किंवा ऑनलाईन पोर्टलद्वारे पिकांचे भाव, हवामान अंदाज व माहिती मिळवणे.

**६. पर्यावरण संवर्धन**

- वृक्षारोपण करून जमिनीचे आणि हवामानाचे संरक्षण करणे.
- पिकांच्या शुद्ध जमिनीत विविधता निर्माण करणे, म्हणजे जैवविविधता टिकते.

**निष्कर्ष**

भिवंडी तालुक्यात शेती विविधतेने परिपूर्ण आहे. औद्योगिक शहर असूनही ग्रामीण भागात धान्य, भाजीपाला आणि बागायती पिकांचे संतुलित उत्पादन दिसते. बाजारपेठेची जवळीक हा मोठा लाभ आहे; परंतु हवामान बदल, जमीन कमी होणे आणि आर्थिक अस्थिरता या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे.

भिवंडीतील शेती अधिक शाश्वत आणि नफेखोर करण्यासाठी तंत्रज्ञान, संघटित विपणन आणि पर्यावरणपूरक पद्धतींचा अवलंब करणे अत्यावश्यक आहे.

**संदर्भ –**

1. **ठाणे जिल्ह्याचे अधिकृत शेती अहवाल** आहे, ज्यात भिवंडीसह जिल्ह्यातील पिकांचा अभ्यास, पिकांची उत्पादकता व पेरणी क्षेत्राचा इतिहास दिलेला आहे.
2. कृषि विभाग – जिल्हा परिषद ठाणे (Agriculture Department)
3. Directorate of Agriculture, Thane District Agricultural Report.
4. Thane District Horticulture & Crop Overview, Agriculture Statistics.
5. District Agriculture Department Records (ZP Thane).
6. Local Research Article: *Bhivandi Taluka Drinking Water Issues*.

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# मराठी बालकथांतील अद्भुत अवकाश

**राहुल अनिलराव पाटील[1]प्रा. डॉ. मीनाक्षी पुडलिक पाटील[2]**

[1]संशोधक विद्यार्थी, मराठी, कला व मानव्यविद्या शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. म.गां.विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड

[2] पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक, मराठी विभागसमाजश्री प्रशांत दादा हिरे कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, सटाणा, नाशिक

**Email:** rahul.mrsp@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180421

ISSN: 2230-9578

Volume 18

Issue 4 (XV)

Pp. 92-96

April 2026

**Submitted:** 10 Mar. 2026

**Revised:** 16 Mar. 2026

**Accepted:** 10 Apr. 2026

**Published:** 30 April 2026

***सारांश (Abstract)***

*मराठी बालसाहित्यातील अद्भुत अवकाश ही संकल्पना फक्त जादुई दुनिया किंवा अलौकिक घटनांपुरती मर्यादित नसून ती भावनिक, नैतिक, सामाजिक आणि विज्ञाननिष्ठ अशा वेगवेगळ्या स्तरांवर विस्तारलेली दिसून येते. बालकांच्या कल्पनाशक्तीला चालना देणे, त्यांना अनेकानेक प्रश्न निर्माण होणे, प्रश्न विचारण्याची धाडसी प्रवृत्ती निर्माण करणे, मूल्यसंस्कारांची जडणघडण करणे आणि त्याचबरोबर सामाजिक जाणिवा विकसित करणे या प्रक्रियेत अदभूत अवकाश महत्त्वपूर्ण ठरतो. प्रस्तुत संशोधनात, साने गुरुजी, वि.स. खांडेकर, ग. दि. माडगूळकर, राजीव तांबे आणि शंकर पाटील यांच्या निवडक साहित्याच्या आधारे अद्भुत अवकाशाचे आयाम स्पष्ट करण्यात आले आहेत. या अभ्यासातून असे दिसून येते की, अद्भुतता ही बालमानसाच्या सर्वांगीण विकासाची प्रभावी साहित्यिक साधन आहे.*

***मुख्य शब्द (Keywords):*** *मराठी बालसाहित्य, कल्पनारंजन, नैतिक मूल्यसंस्कार, विज्ञाननिष्ठ कथा, ग्रामीण पार्श्वभूमी, आधुनिक बालकथा.*

## प्रस्तावना

बालकथा हा साहित्यप्रकार मुलतः वास्तव आणि कल्पनारंजन यांच्या सुंदर संगमातून निर्माण होतो. बालमन हे स्वभावतः कुतूहलप्रधान, चंचल आणि कल्पनाशील असते. लहान मुलांना नवनवीन गोष्टी जाणून घ्यायच्या असतात, अद्भुत जगात रमायला आवडते आणि अशक्य वाटणाऱ्या गोष्टींवर विश्वास ठेवण्याची त्यांची सहज प्रवृत्ती असते. त्यामुळेच बालसाहित्यातील कथाविश्वात अद्भुततेची छटा नैसर्गिकपणे दिसून येते.

'अद्भुत अवकाश' म्हणजे कथेमध्ये उभा केलेला असा काल्पनिक, आश्चर्यजनक आणि अलौकिक भासणारा परिसर, जिथे वास्तवाच्या मर्यादा ओलांडून कल्पनाशक्तीला मुक्तपणे विहार करता येतो. या अवकाशात फक्त जादूगार, परी, राक्षस, बोलणारी प्राणी-पक्षी, अदृश्य शक्ती व विलक्षण घटना यांचा समावेश असू शकतो. मात्र अद्भुतता ही फक्त जादू-टोण्यापुरती मर्यादित नसते; ती भावनिक उत्कटतेत, नैतिक संघर्षात किंवा विज्ञानावर आधारित साहसांतही प्रकट होऊ शकते. उदाहरणार्थ, एखाद्या मुलाने भीतीवर मात करणे, अडचणींवर विजय मिळवणे किंवा अंतराळप्रवासाची स्वप्ने पाहणे - हे सर्व अद्भुततेचेच वेगवेगळे पैलू आहेत.

मराठी बालसाहित्यातील अद्भुत अवकाशाचा विचार करताना विविध प्रकारच्या कथांचा अभ्यास आवश्यक ठरतो. पारंपरिक परीकथा आणि लोककथांमध्ये जादुई घटना व चमत्कार आढळतात; ग्रामीण कथांमध्ये साध्या जीवनातील भावनिक अद्भुतता दिसते; नैतिक कथांमध्ये मूल्यसंस्कारांच्या माध्यमातून अंतर्मनातील संघर्ष उभा राहतो; तर आधुनिक विज्ञानाधारित कथांमध्ये कल्पनाशक्ती आणि विज्ञान यांचा संगम दिसुन येतो.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***

*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**

*राहुल अनिलराव पाटील,संशोधक विद्यार्थी, मराठी, कला व मानव्यविद्या शाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे. म.गां.विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, मनमाड*

**How to cite this article:**

पाटील,. राहुल अनिलराव, & पाटील, मीनाक्षी. पुडलिक . (2026). मराठी बालकथांतील अद्भुत अवकाश. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 92–96.* https://doi.org/10.5281/zenodo.21255725

Quick Response Code:

Website:
https://jrdrvb.org/

DOI:
10.5281/zenodo.21255725

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

थोडक्यात अद्भुत अवकाश हा केवळ मनोरंजनासाठी नसून तो बालकांच्या कल्पनाशक्तीचा विकास, नैतिक जडणघडण आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठीही महत्त्वाचा ठरतो. म्हणूनच मराठी बालसाहित्यातील अद्भुत अवकाशाचा अभ्यास हा केवळ साहित्यिक दृष्टीनेच नव्हे, तर शैक्षणिक आणि सामाजिक दृष्ट्याही महत्त्वपूर्ण ठरतो.

**संशोधन उद्दिष्टे**

“मराठी बालकथांतील अद्भुत अवकाश"

प्रस्तुत संशोधनाचे प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

१. मराठी बालसाहित्यातील 'अद्भुत अवकाश' या संकल्पनेचे सैद्धांतिक स्वरूप स्पष्ट करणे.
२. साने गुरुजी यांच्या श्यामची आई मधील भावनिक अद्भुततेचे विश्लेषण करणे.
३. वि. स. खांडेकर यांच्या निवडक बालकथा मधील नैतिक संघर्षातून उभ्या राहणाऱ्या अद्भुत अवकाशाचे स्वरूप अभ्यासणे.
४. ग. दि. माडगूळकर यांच्या निवडक बालगीते मधील मानवीकरण आणि कल्पनारंजन यांद्वारे साकारलेल्या अद्भुततेचे परीक्षण करणे.
५. राजीव तांबे यांच्या अंतराळ सफर या साहित्याद्वारे विज्ञाननिष्ठ अद्भुतता स्पष्ट करणे.

**अद्भुत अवकाशाची संकल्पना**

'अद्भुत अवकाश' ही संकल्पना बालसाहित्यात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. ही संकल्पना केवळ जादू किंवा चमत्कार यापुरती मर्यादित नसून ती अलौकिकता, कल्पनारंजन, मानवीकरण, आशावाद आणि आदर्शवाद या विविध घटकांशी संबंधित आहे. म्हणजेच, जेव्हा कथेमध्ये वास्तवाच्या चौकटीबाहेर जाऊन काही वेगळे, आश्चर्यकारक किंवा कल्पनारम्य वातावरण तयार केले जाते, तेव्हा ते अद्भुत अवकाश निर्माण होते. हा अवकाश बालकांच्या मनाला आकर्षित करतो आणि त्यांना कथाविश्वात गुंतवून ठेवतो.

अद्भुत अवकाशामध्ये वास्तव आणि कल्पना यांचा समतोल साधला जातो. कथेमधील घटना पूर्णपणे काल्पनिक असल्या तरी त्या बालमनाला समजण्यास सोप्या आणि भावनिकदृष्ट्या जवळच्या वाटतात. त्यामुळे अद्भुतता ही बालसाहित्यातील एक प्रभावी अभिव्यक्ती ठरते.

**१) मानवीकरणाद्वारे निर्माण होणारे अद्भुत अवकाश**

मानवीकरण म्हणजे निर्जीव वस्तूंना, प्राणी- पक्ष्यांना किंवा नैसर्गिक घटकांना मानवी गुणधर्म देणे. जेव्हा एखादी निर्जीव वस्तू बोलते, हसते, रडते किंवा संवाद साधते, तेव्हा त्या माध्यमातून अद्भुततेची निर्मिती होते.

उदाहरणार्थ, ग. दि. माडगूळकर यांच्या निवडक बालगीते या संग्रहातील प्रसिद्ध ओळ -

"चांदोबा चांदोबा भागलास का?".

ही चंद्राशी संवाद साधण्याची कल्पना व्यक्त करते. याठिकाणी येथे चंद्र या नैसर्गिक घटकाचे मानवीकरण केले आहे. मुलं चंद्राला प्रश्न विचारतात - चंद्र मुलांशी बोलतो, त्यांच्या प्रश्नांना उत्तर देतो, कधी पळतो तर कधी लपतो अशी कल्पना साकारली जाते.

ही कल्पना वास्तवात शक्य नसली तरी बालमनासाठी ती अगदी स्वाभाविक आणि आनंददायी देणारी असते. चंद्राला जणू लहान मुलांकडून एखाद्या मित्रासारखे संबोधले जाते. त्यामुळे बालकांना आकाश, निसर्ग आणि विश्व यांविषयी आपलेपणाची भावना निर्माण होते.

संशोधनाच्या दृष्टीने पाहिले तर अशा प्रकारचे मानवीकरण बालकांच्या भाषिक आणि भावनिक विकासाला चालना देते. मुलांना संवाद साधण्याची पद्धत, प्रश्न विचारण्याची सवय आणि कल्पनाशक्तीचा विस्तार यांना प्रोत्साहन मिळते. तसेच निर्जीव गोष्टींशीही भावनिक नाते जोडण्याची क्षमता विकसित होते.

मानवीकरण हा अद्भुत अवकाश निर्माण करण्याचा एक प्रभावी मार्ग आहे. तो बालसाहित्यातील कथाविश्व अधिक जिवंत, आकर्षक आणि संवेदनशील बनवतो.

**२) भावनिक अद्भुत अवकाश**

अद्भुत अवकाश म्हणजे नेहमीच जादू, परीकथा किंवा अलौकिक घटना असे नसते. काही वेळा अद्भुतता ही भावनांच्या उंचीमुळे आणि मूल्यांच्या प्रभावामुळे निर्माण होते. जेव्हा एखाद्या कथेत मानवी नात्यांची ताकद, त्याग, प्रेम किंवा आदर्श जीवनमूल्ये प्रभावीपणे मांडली जातात, तेव्हा त्या भावविश्वातून एक वेगळाच अद्भुत अवकाश तयार होतो. ही अद्भुतता डोळ्यांना दिसत नाही, पण मनाला खोलवर स्पर्श करते. हे स्पष्ट करताना

मातृत्व आणि आदर्शवाद यावर प्रकाश टाकताना

साने गुरुजी यांच्या **“श्यामची आई”** या ग्रंथात कोणत्याही जादुई किंवा चमत्कारिक घटना आढळत नाहीत. कथा पूर्णपणे वास्तव जीवनावर आधारलेली आहे. तरीही या कथेमध्ये एक प्रकारची अद्भुतता जाणवते. ती म्हणजे आईच्या प्रेमाची, त्यागाची आणि संस्कारांची भावनिक उंची.

**“आईचे प्रेम हेच माझे बळ होते."**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

साने गुरुजींच्या या विधानातून मातृत्वाचे आदर्शीकरण स्पष्ट दिसते. येथे आई ही केवळ व्यक्ती नसून प्रेरणा, शक्ती आणि नैतिक आधार यांचे प्रतीक बनते. तिचे प्रेम बालकाला संकटात धैर्य देते, अडचणींवर मात करण्याची ताकद देते आणि योग्य मार्गावर चालण्याची शिकवण देते.

ही अद्भुतता अलौकिक स्वरूपाची नाही; ती पूर्णपणे भावनिक आहे. आईच्या प्रेमामध्ये अशी एक जादुई ताकद दाखवली आहे की जी मुलाच्या व्यक्तिमत्त्वाला घडवते. बालमनासाठी आईचे प्रेम हे चमत्कारासमान शक्ती ठरते. संशोधनाच्या दृष्टीने पाहता, या उदाहरणातून हे स्पष्ट होते की अद्भुत अवकाश केवळ काल्पनिक किंवा जादुई जगात निर्माण होत नाही. तो मूल्यप्रधान भावविश्वातही तयार होतो. प्रेम, त्याग, प्रामाणिकपणा आणि आदर्शवाद या भावनांमधूनही एक वेगळे, प्रेरणादायी आणि उंचावलेले कथाविश्व निर्माण होते.

भावनिक अद्भुत अवकाश बालसाहित्यातील एक महत्त्वाचा पैलू आहे. तो मुलांच्या मनावर सकारात्मक संस्कार करतो आणि त्यांच्या नैतिक जडणघडणीस हातभार लावतो.

**३) नैतिक अद्भुत अवकाश**

अद्भुत अवकाशाचा एक महत्त्वाचा प्रकार म्हणजे नैतिक अद्भुत अवकाश यांत जादू, चमत्कार किंवा अलौकिक घटना नसतात; पण या कथांमध्ये उभा राहणारा नैतिक संघर्ष, मूल्यांची लढाई आणि शेवटी होणारा सत्याचा विजय यामुळे एक वेगळेच प्रेरणादायी वातावरण तयार होते. हा अवकाश मुलांच्या मनात चांगले-वाईट, योग्य-अयोग्य यांचा विचार
करण्याची क्षमता विकसित करतो. म्हणजेच नैतिक अद्भुत अवकाश संघर्ष आणि मूल्य बालकांमध्ये रुजवते.

**वि. स. खांडेकर यांच्या निवडक बालकथा** या संग्रहातील अनेक कथांमध्ये नैतिक संघर्ष आणि आदर्श मूल्ये ठळकपणे दिसून येतात. कथांतील पात्रे अनेक अडचणींना सामोरे जातात, चुकीच्या मार्गाचा मोह होतो, पण शेवटी ते सत्य आणि प्रामाणिकतेचा मार्ग स्वीकारतात.

**“सत्याचा मार्ग कठीण असला तरी तोच शेवटी विजय मिळवून देतो.”**

या आशयातून संघर्षाचे प्रभावी आणि नाट्यमय रूप समोर येते. मुलांना या कथांमधून एक वेगळ्या मानसिक अवकाशात नेले जाते- जिथे सत्य, प्रामाणिकपणा, धैर्य आणि नीतिमत्ता यांना अत्यंत महत्त्व दिले जाते.

येथे अद्भुतता ही जादूच्या रूपात नसून नैतिक विजयाच्या उत्कर्षात आहे. जेव्हा एखादे पात्र संकटांवर मात करून योग्य मार्ग निवडते आणि शेवटी त्याला यश मिळते, तेव्हा तो क्षण मुलांसाठी प्रेरणादायी आणि अद्भुत ठरतो. हा विजय चमत्कारासारखा वाटतो, कारण तो मूल्यांच्या बळावर साध्य झालेला असतो.

संशोधनाच्या दृष्टीने या उदाहरणाचा उपयोग असा केला आहे की अद्भुत अवकाश केवळ काल्पनिक किंवा अलौकिक घटनांमुळे निर्माण होत नाही, तर तो नैतिक संघर्ष आणि मूल्यांच्या अधिष्ठानातूनही तयार होतो. अशा कथांमुळे बालकांच्या व्यक्तिमत्त्वात सत्यनिष्ठा, धैर्य आणि योग्य निर्णय घेण्याची वृत्ती विकसित होते...

नैतिक अद्भुत अवकाश हा बालसाहित्यातील एक प्रभावी आणि संस्कारक्षम घटक आहे. तो मुलांना केवळ मनोरंजन देत नाही, तर त्यांच्या जीवनदृष्टीला सकारात्मक दिशा देतो.

**४. विज्ञाननिष्ठ अद्भुत् अवकाश**

पूर्वीच्या दंतकथेत, लोककथेत अद्भुतता म्हणजे जादू, परी, राक्षस किंवा चमत्कार असे मानले जात असे. पण आधुनिक काळात अद्भुततेची व्याख्या बदलली आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जगात अनेक आश्चर्यकारक गोष्टी शक्य झाल्या आहेत. त्यामुळे आज विज्ञानातून निर्माण होणारे आश्चर्यही अद्भुततेच्या कक्षेत येते.

विज्ञाननिष्ठ अद्भुत अवकाश म्हणजे असे कथाविश्व, जे कल्पनारम्य असले तरी त्याला वैज्ञानिक आधार असतो. अंतराळ प्रवास, नवीन ग्रहांचा शोध, रॉकेट, रोबोट, संगणक, कृत्रिम बुद्धिमत्ता अशा विषयांमधून मुलांसाठी एक वेगळे आणि रोमांचक विश्व तयार होते. हे विश्व पूर्णपणे काल्पनिक नसते; ते विज्ञानाच्या शक्यतांवर आधारलेले असते.

उदाहरणार्थ, **राजीव तांबे यांच्या अंतराळ सफर** या कथासंग्रहात अंतराळ प्रवास, ग्रह-तारे, रॉकेट आणि आधुनिक तंत्रज्ञान यांच्या माध्यमातून एक अद्भुत विश्व उभे केले आहे.

**"मुलांनी चंद्रावर पाऊल टाकले आणि पृथ्वी लहानशी दिसू लागली."**

ही प्रतिमा मुलांच्या मनात आश्चर्य आणि कुतूहल निर्माण करते. चंद्रावर जाणे ही पूर्वी अशक्य वाटणारी गोष्ट होती, पण आज विज्ञानामुळे ती शक्य झाली. त्यामुळे येथे अद्भुतता ही जादूमधून नव्हे, तर वैज्ञानिक शक्यतेतून निर्माण होते. विज्ञान

या अशा विज्ञानकथा मुलांच्या कल्पनाशक्तीला दिशा देतात. त्या त्यांना मोठी स्वप्ने पाहायला शिकवतात आणि विज्ञानाबद्दल आवडे निर्माण करतात. मुलांना वाटते की आपणही वैज्ञानिक बनून नवीन शोध लावू शकतो..

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

हा संदर्भ आधुनिक बालकथांतील अद्भुततेचे बदलते रूप दाखवतो. आजची अद्भुतता केवळ काल्पनिक जगात मर्यादित नसून विज्ञानाच्या आधारावर उभी राहते. त्यामुळे विज्ञाननिष्ठ अद्भुत अवकाश हा आधुनिक बालसाहित्यातील एक महत्त्वाचा आणि प्रेरणादायी पैलू आहे.

**५. ग्रामीण पार्श्वभूमीतील अद्भुत अवकाश**

अद्भुत अवकाश म्हणजे केवळ परीकथा, जादू किंवा विज्ञानकथा असे नाही. तो ग्रामीण जीवनाच्या साध्या आणि वास्तव वातावरणातही निर्माण होऊ शकतो. गावातील मातीचा सुगंध, शेत, नदी, जनावरं, सण-उत्सव आणि साधं जीवन - या सगळ्यातही एक वेगळीच सुंदरता आणि भावनिक गूढता दडलेली असते.

ग्रामीण कथांमध्ये जीवन वास्तववादी पद्धतीने मांडलेले असते. मात्र काही प्रसंग असे असतात की ते कल्पनारम्य किंवा भावनिक उंचीमुळे अद्भुत वाटू लागतात. म्हणजेच, साध्या साध्या घटनांनाही लेखक कल्पनेच्या आणि भावनेच्या रंगाने अधिक प्रभावी बनवतो.

उदाहरणार्थ, **शंकर पाटील यांच्या निवडक कथा** या संग्रहातील कथांमध्ये ग्रामीण जीवनाचे जिवंत आणि वास्तव चित्रण दिसते. गावातील मुलांचे अनुभव, त्यांचे कष्ट, आनंद, स्वप्ने आणि भावविश्व या कथांमधून उलगडते.

कधी एखाद्या मुलाची स्वप्नातील यात्रा दाखवली जाते, जिथे तो स्वतःला वेगळ्या जगात पाहतो; तर कधी एखादी साधी घटना - जसे की पावसाळ्याचा पहिला पाऊस किंवा एखादा छोटा विजय – भावनिक दृष्ट्या इतकी उंचावली जाते की ती अद्भुत भासू लागते.

याठिकाणी वास्तव आणि अद्भुततेचा सुंदर संगम दिसतो. यांत कथा पूर्णपणे काल्पनिक नसते, पण तिच्या मांडणीतून एक वेगळे, संवेदनशील आणि भावनिक वातावरण तयार होते.

यातून हे स्पष्ट होते की अदभुत अवकाश केवळ शहरी किंवा जादुई पार्श्वभूमीतच तयार होत नाही. तो ग्रामीण सामाजिक वातावरणातही निर्माण होऊ शकतो. साध्या जीवनातील अनुभव, स्वप्ने आणि भावनांमधूनही अद्भुततेची निर्मिती होते.

ग्रामीण पार्श्वभूमीतील अद्भुत अवकाश हा बालसाहित्यातील एक महत्त्वाचा आणि वास्तवाशी जोडलेला पैलू आहे. तो मुलांना त्यांच्या स्वतःच्या जीवनाशी कथा जोडण्याची संधी देतो आणि त्यांच्या कल्पनाशक्तीला नैसर्गिक पद्धतीने विस्तार देतो

**६. अद्भुत अवकाश आणि बालमानस**

बालमानस स्वभावतः कुतूहलपूर्ण आणि कल्पनाशील असते. मुलांना नवीन गोष्टी जाणून घ्यायच्या असतात, प्रश्न विचारायची सवय असते आणि ते सहजपणे कल्पनेच्या जगात रमू शकतात. त्यामुळे अद्भुत अवकाश त्यांना नैसर्गिकरित्या आकर्षित करतो. हा अवकाश त्यांच्या मनाला आनंद देतो, विचार करायला शिकवतो आणि भावनिकदृष्ट्या बळकट करतो.

उदाहरणार्थ-

"चांदोबा चांदोबा भागलास का?" या ओळीतून मुलांचे कुतूहल आणि संवादाची इच्छा दिसून येते. चंद्राशी बोलण्याची कल्पना मुलांना आकाशाशी आणि निसर्गाशी जवळीक निर्माण करून देते. त्यांना वाटते की जगातील प्रत्येक गोष्ट त्यांच्याशी संवाद साधू शकते.

तसेच, "आईचे प्रेम हेच माझे बळ होते." या विधानातून भावनिक सुरक्षिततेची भावना व्यक्त होते. आईचे प्रेम हे मुलासाठी आधार, संरक्षण आणि आत्मविश्वासाचे स्रोत ठरते. ही भावना मुलांच्या मानसिक विकासासाठी अत्यंत आवश्यक असते.

या उदाहरणांवरून असे दिसून येते की अद्भुत अवकाश मुलांच्या मानसिक विकासात अनेक प्रकारे मदत करतो.

**१. कल्पनाशक्तीचा विकास -** अद्भुत कथा मुलांना नवीन जगाची ओळख करून देतात. त्यामुळे त्यांच्या विचारांची मर्यादा वाढते आणि सर्जनशीलता वाढते.

**२. नैतिक मूल्यांची जडणघडण -** कथांमधील सत्य, प्रामाणिकपणा, धैर्य यांसारख्या मूल्यांमुळे मुलांना योग्य-अयोग्य याची जाणीव होते.

**३. भावनिक सुरक्षिततेची जाणीव-** आईचे प्रेम, मैत्री, कुटुंब यांसारख्या भावना मुलांना मानसिक आधार देतात. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

**४. सामाजिक वास्तव समजून घेण्याची क्षमता-कथांमधील प्रसंगांमुळे मुलांना समाजातील विविध परिस्थिती समजतात. ते इतरांच्या भावना ओळखायला शिकतात.**

याशिवाय, अद्भुतता मुलांची भीती कमी करण्यास मदत करते. जेव्हा कथा भीतीवर मात करणाऱ्या पात्रांची गोष्ट सांगते, तेव्हा मुलांना स्वतःच्या भीतीवर विजय मिळवण्याची प्रेरणा मिळते. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढतो.

म्हणूनच अद्भुत अवकाश हा केवळ मनोरंजनाचे साधन नसून तो बालमानसाच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत उपयुक्त ठरतो.

**निष्कर्ष**

मराठी बालकथांमधील अद्भुत अवकाश हा अनेक अंगांनी समृद्ध आणि बहुआयामी स्वरूपाचा आहे. तो केवळ जादू, पर्याय किंवा चमत्कारांपुरता मर्यादित नसून विविध स्वरूपांत प्रकट होतो. काही कथांमध्ये तो कल्पनारम्य जगाच्या रूपात दिसतो, तर काही कथांमध्ये तो भावनिक उंची, नैतिक मूल्ये किंवा विज्ञाननिष्ठ विचार यांच्या माध्यमातून उभा राहतो.

भावनिक नात्यांमधील ऊब, सत्य आणि प्रामाणिकपणाचा विजय, तसेच विज्ञानामुळे उघडलेले नवीन विश्व – या सर्वांमधून अद्भुततेची निर्मिती होते. त्यामुळे अद्भुतता ही केवळ काल्पनिक गोष्टींमध्ये नसून वास्तव जीवनाशी जोडलेली असते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

अद्भुत अवकाश मुलांच्या कल्पनाशक्तीला चालना देतो, त्यांच्या नैतिक जडणघडणीस मदत करतो आणि भावनिकदृष्ट्या त्यांना बळकट करतो. तसेच तो मुलांना समाज आणि संस्कृती यांची जाणीव करून देतो.

यावरून असे स्पष्ट होते की मराठी बालसाहित्य हे सामाजिक आणि सांस्कृतिक वास्तवाशी जोडलेले राहूनही अद्भुततेचा प्रभावी वापर करते. त्यामुळे अद्भुत अवकाश हा केवळ मनोरंजनाचा भाग नसून बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे साधन ठरतो.

**संदर्भ सूची**

१. साने गुरुजी - श्यामची आई.
२. वि. स. खांडेकर - निवडक बालकथा.
३. राजीव तांबे - अंतराळ सफर.
४. ग. दि. माडगूळकर - निवडक बालगीते.
५. शंकर पाटील - निवडक कथा

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# मुंबई बेटांवरील पोर्तुगीज व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्था: एक ऐतिहासिक आढावा

**मनोहर माधवराव पंडित[1] डॉ.सुरेश भदरगे[2]**
[1]संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, विद्यापीठ, मुंबई.
[2]मार्गदर्शक, प्राध्यापक, उपप्राचार्य, बी. एन. एन.कॉलेज, भिवंडी.
**Email:** manoharpandit0123@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180422
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 97-100
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***घोषवारा***

*सोळाव्या शतकात पोर्तुगालने भारताच्या पश्चिम समुद्र किनाऱ्यावर वसाहतवादी सत्ता प्रस्थापित केली. इ.स.१५३४ मधील वसई तहानंतर मुंबईची सात बेटे पोर्तुगीजांच्या ताब्यात आली. पोर्तुगीज सत्तेच्या आगमनानंतर मुंबई बेटांच्या (सात बेटांच्या) सामाजिक-आर्थिक संरचनेत लक्षणीय बदल घडून आले. या संशोधन लेखात पोर्तुगीज व्यापार धोरण,महसूल व्यवस्था, स्थानिक उत्पादन प्रणाली, समुद्री नियंत्रण आणि त्याचे सामाजिक-आर्थिक परिणाम यांचा अभ्यास करण्यात आला आहे. पोर्तुगाल या युरोपीय राष्ट्राने अरबी महासागरातील व्यापारमार्गांवर नियंत्रण मिळवण्यासाठी किल्ले, चर्च आणि बंदरे उभारली. परिणामी मुंबईतील कृषी, मत्स्यव्यवसाय, मीठउद्योग, नारळ-ताडी उत्पादन आणि स्थानिक बाजारपेठांवर दीर्घकालीन परिणाम झाला.*

***मुख्य शब्द (Keywords):*** *पोर्तुगीज वसाहत, मुंबई बेटे, सागरी व्यापार,स्थानिक अर्थव्यवस्था, वसाहतकालीन इतिहास*

## प्रस्तावना

पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपीय शोध मोहिमांनी जागतिक इतिहासाला एक नवीन वळण दिले. यामध्ये पोर्तुगालचे स्थान अग्रगण्य होते. इ.स.१४९८ मध्ये वास्को द गामाने कालिकत येथे पाऊल ठेवले आणि भारताच्या सागरी व्यापाराचा चेहरामोहरा बदलण्यास सुरुवात झाली. पोर्तुगीजांचे आगमन हे केवळ व्यापारी उद्देशाने नव्हते, तर ते राजकीय वर्चस्व आणि धार्मिक प्रसाराच्या महत्त्वाकांक्षेने प्रेरित होते. मुंबईची सात बेटे, जी आज जागतिक अर्थव्यवस्थेचे केंद्र आहेत,सोळाव्या शतकात पोर्तुगीजांच्या "उत्तर प्रांताचा" (Provincia do Norte) एक भाग होती. या संशोधनात इ.स. १५३४ ते १६६१ या कालखंडातील पोर्तुगीज व्यापार, जमिनीची मालकी, स्थानिक अर्थव्यवस्था आणि समाजव्यवस्थेवर झालेला परिणाम झालेला आहे.

पोर्तुगीजांनी पश्चिम किनारपट्टीवर आपले वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी गोव्याला आपली राजधानी बनवले, परंतु उत्तर कोकणचा भाग आर्थिकदृष्ट्या अधिक समृद्ध असल्याने त्यांनी तिथे लक्ष केंद्रित केले. इ.स. १५०९ मध्ये पोर्तुगीजांनी प्रथम माहीम खाडीत प्रवेश केला आणि गुजरात सुलतानाच्या जहाजांवर ताबा मिळवला. इ.स. १५३०-३१ मध्ये नुनो द कुन्हाच्या नेतृत्वाखालील महाकाय आरमाराने मुंबई बंदरातून प्रवास केला आणि ठाणे तसेच माहीम येथील शहरांना आग लावली. या काळात गुजरातचा सुलतान बहादूर शाह हा मोगल सम्राट हुमायूनच्या आक्रमणामुळे संकटात होता. स्वतःच्या संरक्षणासाठी त्याने पोर्तुगीजांची मदत घेण्याचे ठरवले आणि त्या बदल्यात २३ डिसेंबर १५३४ रोजी वसईचा ऐतिहासिक तह झाला. या तहाद्वारे वसई आणि मुंबईची सात बेटे—मुंबई, माझगाव, परळ, वरळी, माहीम, कुलाबा आणि छोटा कुलाबा (ओल्ड वुमन्स आयलंड)—कायमस्वरूपी पोर्तुगीजांच्या ताब्यात आली. पोर्तुगीजांनी या क्षेत्राला 'उत्तर प्रांत' असे संबोधले, ज्याचा विस्तार दमणपासून चौलपर्यंत सुमारे २२० किलोमीटर होता. या प्रांताचे मुख्यालय वसई होते, तर मुंबई ही एक सीमावर्ती आणि कमी लोकसंख्या असलेली बेटे होती.

### प्राझो पद्धत:-

पोर्तुगीज राजवटीत मुंबई आणि उत्तर प्रांतामध्ये जमिनीच्या व्यवस्थापनासाठी 'प्राझो' (Prazo) किंवा 'अफोरमेंटो' (Aforamento) ही सामंतशाहीवर आधारित पद्धत राबवण्यात आली होती. या पद्धतीत जमिनीचे मोठे तुकडे पोर्तुगीज उमरावांना (Fidalgos),

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*मनोहर माधवराव पंडित,संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, विद्यापीठ, मुंबई.*

**How to cite this article:**
पंडित, मनोहर माधवराव, & सुरेश भदरगे. *(2026).* मुंबई बेटांवरील पोर्तुगीज व्यापार आणि स्थानिक अर्थव्यवस्था: एक ऐतिहासिक आढावा. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 97–100.* *https://doi.org/10.5281/zenodo.21255840*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21255840

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

भारतीय दर्शन में कहा गया है — "सा विद्या या विमुक्तये" अर्थात् विद्या का अंतिम उद्देश्य मुक्ति है।

उदाहरण: यदि वही डॉक्टर अपने ज्ञान का उपयोग ईमानदारी और सेवा भाव से करता है, रोगियों के प्रति सहानुभूति रखता है — तो यह विद्या का उद्देश्य है।

**साधनों के आधार पर शिक्षा और विद्या में अंतर :-**

शिक्षा और विद्या के बीच अंतर केवल उद्देश्य या स्वरूप में ही नहीं, बल्कि प्राप्ति के साधनों (Means) के आधार पर भी स्पष्ट रूप से दिखाई देता है। शिक्षा मुख्यतः बाहरी साधनों पर आधारित होती है, जबकि विद्या का संबंध आंतरिक साधनों और आत्मानुभूति से होता है।

**1. शिक्षा के साधन**

शिक्षा प्राप्त करने के लिए सामान्यतः निम्न बाह्य साधनों की आवश्यकता होती है — विद्यालय एवं महाविद्यालय – औपचारिक संस्थान जहाँ निर्धारित पाठ्यक्रम के अनुसार ज्ञान दिया जाता है। शिक्षक – जो विषयवस्तु को समझाकर विद्यार्थी का मार्गदर्शन करते हैं। पुस्तकें एवं अध्ययन सामग्री – जिनसे जानकारी और सिद्धांत सीखे जाते हैं। परीक्षा एवं मूल्यांकन प्रणाली – जिससे ज्ञान का आकलन किया जाता है। प्रयोगशाला, तकनीकी उपकरण आदि – व्यावहारिक ज्ञान के लिए।

उदाहरण: एक छात्र इंजीनियर बनने के लिए विद्यालय, कोचिंग, पुस्तकें और प्रयोगशालाओं का सहारा लेता है। यह शिक्षा के बाहरी साधनों का उपयोग है। अतः शिक्षा मुख्यतः बाह्य (External) साधनों पर निर्भर करती है।

**2. विद्या के साधन**

विद्या की प्राप्ति के साधन बाह्य की अपेक्षा अधिक आंतरिक और अनुभवजन्य होते हैं। आत्मचिंतन और मनन – स्वयं के भीतर झाँककर सत्य का अनुभव करना। अनुभव और अभ्यास – जीवन की परिस्थितियों से सीखना।

सदगुरु का मार्गदर्शन – जो आत्मज्ञान की दिशा दिखाए। नैतिक आचरण – सत्य, अहिंसा, करुणा जैसे मूल्यों का पालन।

साधना और ध्यान – मानसिक एवं आध्यात्मिक विकास के लिए। भारतीय परंपरा में कहा गया है — "सा विद्या या विमुक्तये" — अर्थात् विद्या वह है जो आत्ममुक्ति का मार्ग दिखाए।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

उदाहरण: यदि कोई व्यक्ति धार्मिक ग्रंथ पढ़ ले, तो वह शिक्षा है; किंतु यदि वह उनके सिद्धांतों पर मनन कर अपने जीवन में सत्य और करुणा को अपनाए, तो वह विद्या है।

**साधनों के आधार पर अंतर:-**

शिक्षा और विद्या दोनों ज्ञान प्राप्त करने के महत्वपूर्ण माध्यम हैं, लेकिन इनके साधन अलग-अलग होते हैं। शिक्षा मुख्यतः बाहरी और औपचारिक साधनों से प्राप्त होती है, जबकि विद्या आंतरिक अनुभव, संस्कार और चिंतन से विकसित होती है।

**1. शिक्षा के साधन:-**

शिक्षा प्राप्त करने के साधन सामान्यतः संस्थागत और व्यवस्थित होते हैं। इसके अंतर्गत विद्यालय, महाविद्यालय, विश्वविद्यालय, शिक्षक, पाठ्यपुस्तकें, पुस्तकालय, प्रयोगशालाएँ तथा आधुनिक तकनीक जैसे कंप्यूटर और इंटरनेट आते हैं। इन साधनों के माध्यम से विद्यार्थी विभिन्न विषयों का ज्ञान प्राप्त करते हैं और अपने बौद्धिक तथा व्यावहारिक कौशल का विकास करते हैं। शिक्षा में पाठ्यक्रम, परीक्षा और प्रमाणपत्र जैसी औपचारिक व्यवस्थाएँ भी शामिल होती हैं, जो व्यक्ति की योग्यता को प्रमाणित करती हैं।

**2. विद्या के साधन :-**

विद्या के साधन अधिकतर आंतरिक और अनुभव पर आधारित होते हैं। इसमें आत्मचिंतन, आत्मानुभव, जीवन के अनुभव, अच्छे संस्कार, गुरुजनों का मार्गदर्शन और महान व्यक्तियों के विचार शामिल होते हैं। विद्या केवल पुस्तकों से ही नहीं, बल्कि जीवन के अनुभवों, नैतिक मूल्यों और आध्यात्मिक चिंतन से भी प्राप्त होती है। इसके माध्यम से व्यक्ति में विवेक, धैर्य, करुणा, सत्यनिष्ठा और नैतिकता जैसे गुण विकसित होते हैं।

**3. साधनों का स्वरूप :-**

शिक्षा के साधन अधिकतर भौतिक और बाहरी होते हैं, जबकि विद्या के साधन मानसिक, नैतिक और आध्यात्मिक होते हैं। शिक्षा हमें जानकारी और कौशल देती है, लेकिन विद्या उस जानकारी को सही दिशा में उपयोग करने की समझ प्रदान करती है।

**चरित्र निर्माण में भूमिका :-**

चरित्र निर्माण का अर्थ है व्यक्ति में अच्छे गुणों, नैतिक मूल्यों और सही व्यवहार का विकास करना। इसमें शिक्षा और विद्या दोनों की महत्वपूर्ण भूमिका होती है। शिक्षा और विद्या व्यक्ति को केवल ज्ञान ही नहीं देतीं, बल्कि उसे एक अच्छा और जिम्मेदार इंसान बनने की प्रेरणा भी देती हैं।

**1. नैतिक मूल्यों का विकास:-**

शिक्षा और विद्या व्यक्ति में सत्य, ईमानदारी, दया, अनुशासन और परोपकार जैसे नैतिक मूल्यों का विकास करती हैं। इन मूल्यों के कारण व्यक्ति सही मार्ग पर चलने की प्रेरणा प्राप्त करता है।

**2. सही-गलत की पहचान:-**

विद्या मनुष्य को विवेक प्रदान करती है, जिससे वह सही और गलत के बीच अंतर समझ पाता है। यह समझ व्यक्ति को गलत कार्यों से दूर रखती है और अच्छे कार्यों की ओर प्रेरित करती है।

**3. जिम्मेदारी की भावना:-**

शिक्षा व्यक्ति में अपने परिवार, समाज और देश के प्रति जिम्मेदारी की भावना विकसित करती है। इससे व्यक्ति अपने कर्तव्यों को समझता है और समाज के विकास में योगदान देता है।

**4. अनुशासन और आत्मसंयम:-**

शिक्षा और विद्या व्यक्ति को अनुशासित जीवन जीना सिखाती हैं। इससे उसमें धैर्य, सहनशीलता और आत्मसंयम जैसे गुण विकसित होते हैं, जो मजबूत चरित्र के लिए आवश्यक हैं।

**5. सकारात्मक सोच और व्यक्तित्व विकास:-**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

विद्या व्यक्ति की सोच को सकारात्मक बनाती है और उसे आत्मविश्वासी बनाती है। इससे उसका व्यक्तित्व निखरता है और वह जीवन की चुनौतियों का सामना बेहतर तरीके से कर पाता है।

**नैतिक और आध्यात्मिक दृष्टि अंतर:-**

**1. नैतिक दृष्टि से अंतर:-**

नैतिक दृष्टि का संबंध मनुष्य के आचरण, व्यवहार और सही-गलत की समझ से होता है। शिक्षा मनुष्य को समाज के नियम, कर्तव्य और अच्छे व्यवहार के बारे में सिखाती है। इससे व्यक्ति में अनुशासन, ईमानदारी, जिम्मेदारी और सहयोग जैसे गुण विकसित होते हैं। शिक्षा के माध्यम से व्यक्ति समाज में अच्छे नागरिक के रूप में रहना सीखता है। विद्या नैतिक मूल्यों को और गहराई से समझने की क्षमता देती है। यह केवल नियमों का पालन करना नहीं सिखाती, बल्कि यह समझ भी देती है कि सही काम क्यों करना चाहिए। विद्या मनुष्य के अंदर सच्चाई, करुणा और न्याय की भावना को मजबूत बनाती है।

**2. आध्यात्मिक दृष्टि से अंतर:-**

आध्यात्मिक दृष्टि का संबंध आत्मा, आत्मज्ञान और जीवन के गहरे अर्थ को समझने से होता है। शिक्षा मुख्य रूप से भौतिक और सामाजिक जीवन से जुड़ी होती है। यह व्यक्ति को ज्ञान, कौशल और जीवनयापन के साधन प्राप्त करने में सहायता करती है। विद्या मनुष्य को आत्मज्ञान, आंतरिक शांति और जीवन के सच्चे उद्देश्य को समझने की प्रेरणा देती है। विद्या के माध्यम से व्यक्ति अपने अंदर के गुणों को पहचानता है और आध्यात्मिक उन्नति की ओर बढ़ता है।

**सामाजिक प्रभाव :-**

शिक्षा और विद्या का समाज पर बहुत गहरा प्रभाव पड़ता है। ये दोनों व्यक्ति को जागरूक, जिम्मेदार और संस्कारी बनाकर समाज के विकास में महत्वपूर्ण योगदान देती हैं।

**1. समाज में जागरूकता का विकास :-**

शिक्षा और विद्या से लोगों में जागरूकता बढ़ती है। लोग अपने अधिकारों और कर्तव्यों को समझते हैं तथा समाज में होने वाली गलत परंपराओं और बुराइयों के खिलाफ आवाज उठाते हैं।

**2. सामाजिक समानता को बढ़ावा :-**

शिक्षा से समाज में समानता की भावना विकसित होती है। यह जाति, धर्म, लिंग आदि के आधार पर होने वाले भेदभाव को कम करने में मदद करती है और सभी को समान अवसर देने की प्रेरणा देती है।

**3. समाज में नैतिकता और संस्कार :-**

विद्या व्यक्ति में नैतिकता, संस्कार और अच्छे व्यवहार का विकास करती है। जब समाज के लोग नैतिक और संस्कारी होते हैं तो समाज में शांति, सहयोग और भाईचारा बढ़ता है।

**4. सामाजिक समस्याओं का समाधान :-**

शिक्षित और विद्वान लोग समाज की समस्याओं को समझते हैं और उनके समाधान के लिए नए विचार और उपाय प्रस्तुत करते हैं। इससे समाज में प्रगति और सुधार होता है।

**5. एक आदर्श समाज का निर्माण :-**

शिक्षा और विद्या मिलकर ऐसे नागरिक तैयार करती हैं जो जिम्मेदार, जागरूक और नैतिक होते हैं। ऐसे लोगों से एक अच्छे और आदर्श समाज का निर्माण संभव होता है।

**आधुनिक संदर्भ में अंतर :-**

आज के आधुनिक युग में शिक्षा और विद्या के अर्थ और महत्व को नए दृष्टिकोण से समझा जाता है। दोनों ही मनुष्य के विकास के लिए आवश्यक हैं, लेकिन उनके उद्देश्य और प्रभाव में अंतर होता है।

**1. उद्देश्य में अंतर :-**

आधुनिक समय में शिक्षा का मुख्य उद्देश्य व्यक्ति को रोजगार, तकनीकी ज्ञान और व्यावसायिक कौशल प्रदान करना है। इसके माध्यम से व्यक्ति अपने करियर और जीवनयापन के साधन प्राप्त करता है। वहीं विद्या का उद्देश्य व्यक्ति के संपूर्ण व्यक्तित्व का विकास करना है। यह उसे नैतिकता, विवेक और जीवन के सही मूल्यों की समझ देती है।

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**2. ज्ञान के स्वरूप में अंतर :-**

शिक्षा में आधुनिक तकनीक, विज्ञान, कंप्यूटर और विभिन्न विषयों का व्यावहारिक ज्ञान दिया जाता है। जबकि विद्या उस ज्ञान का सही उपयोग करने की बुद्धि और समझ प्रदान करती है।

**3. जीवन दृष्टि में अंतर :-**

आधुनिक शिक्षा व्यक्ति को प्रतिस्पर्धा और सफलता के लिए तैयार करती है। लेकिन विद्या व्यक्ति को संतुलित जीवन, संतोष और मानवीय मूल्यों का महत्व समझाती है।

**4. समाज पर प्रभाव :-**

शिक्षा से समाज में विकास, प्रगति और नई तकनीकों का विस्तार होता है। विद्या से समाज में नैतिकता, संस्कार और मानवीयता को बढ़ावा मिलता है।

**शिक्षा और विद्या का समन्वय :-**

शिक्षा और विद्या दोनों मनुष्य के विकास के लिए अत्यंत महत्वपूर्ण हैं। शिक्षा व्यक्ति को ज्ञान, कौशल और जीवनयापन के साधन प्रदान करती है, जबकि विद्या उसे विवेक, नैतिकता और सही जीवन मूल्यों की समझ देती है। जब शिक्षा और विद्या का समन्वय होता है, तब व्यक्ति का समग्र विकास संभव होता है।

1. ज्ञान और विवेक का संतुलन :-

शिक्षा से व्यक्ति को विभिन्न विषयों का ज्ञान प्राप्त होता है, लेकिन विद्या उस ज्ञान का सही और उचित उपयोग करना सिखाती है। इस प्रकार दोनों मिलकर ज्ञान और विवेक का संतुलन स्थापित करते हैं।

2. व्यक्तित्व का समग्र विकास :-

शिक्षा से व्यक्ति का बौद्धिक और व्यावहारिक विकास होता है, जबकि विद्या उसके नैतिक और आध्यात्मिक विकास में सहायता करती है। दोनों के समन्वय से व्यक्ति का व्यक्तित्व संतुलित और पूर्ण बनता है।

3. समाज के लिए आदर्श नागरिक :-

जब शिक्षा और विद्या साथ-साथ चलती हैं, तो व्यक्ति केवल पढ़ा-लिखा ही नहीं बल्कि संस्कारी और जिम्मेदार भी बनता है। ऐसे व्यक्ति समाज के विकास और कल्याण में महत्वपूर्ण भूमिका निभाते हैं।

4. सही दिशा में प्रगति :-

केवल शिक्षा होने पर व्यक्ति तकनीकी रूप से सक्षम हो सकता है, लेकिन विद्या के बिना वह ज्ञान का गलत उपयोग भी कर सकता है। इसलिए विद्या शिक्षा को सही दिशा प्रदान करती है।

**व्यावहारिक उदाहरण :-**

शिक्षा और विद्या के समन्वय को हम अपने दैनिक जीवन में कई उदाहरणों के माध्यम से समझ सकते हैं।

**1. डॉक्टर का उदाहरण :-**

एक डॉक्टर अपनी पढ़ाई से चिकित्सा विज्ञान का ज्ञान प्राप्त करता है, यह उसकी शिक्षा है। लेकिन जब वह मरीजों के साथ दया, सहानुभूति और ईमानदारी से व्यवहार करता है, तो यह उसकी विद्या का परिणाम होता है।

**2. शिक्षक का उदाहरण :-**

एक शिक्षक विद्यार्थियों को किताबों का ज्ञान देता है, यह शिक्षा है। लेकिन जब वह विद्यार्थियों को अच्छे संस्कार, अनुशासन और नैतिकता की सीख देता है, तो यह विद्या का उदाहरण है।

**3. व्यवसायी का उदाहरण :-**

एक व्यवसायी व्यापार की तकनीक, प्रबंधन और आर्थिक ज्ञान सीखता है, यह शिक्षा है। लेकिन जब वह अपने व्यापार में ईमानदारी और नैतिकता का पालन करता है, तो यह विद्या को दर्शाता है।

**4. विद्यार्थी का उदाहरण :-**

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

एक विद्यार्थी स्कूल में पढ़ाई करके अच्छे अंक प्राप्त करता है, यह उसकी शिक्षा है। लेकिन जब वह अपने ज्ञान का उपयोग समाज की भलाई और दूसरों की मदद के लिए करता है, तो यह उसकी विद्या को

**निष्कर्ष :-**

अंत में यह कहा जा सकता है कि शिक्षा और विद्या दोनों मनुष्य के जीवन के लिए अत्यंत आवश्यक हैं। शिक्षा व्यक्ति को ज्ञान, कौशल और जीवन में आगे बढ़ने के साधन प्रदान करती है, जबकि विद्या उसे सही दिशा, नैतिकता और विवेक देती है। केवल शिक्षा होने से व्यक्ति सफल तो हो सकता है, लेकिन विद्या के बिना उसका चरित्र और मूल्य अधूरे रह सकते हैं।

इसलिए जीवन में सच्ची सफलता और आदर्श व्यक्तित्व के निर्माण के लिए शिक्षा और विद्या दोनों का समन्वय आवश्यक है। जब दोनों साथ-साथ विकसित होते हैं, तभी एक अच्छा, संस्कारी और जिम्मेदार नागरिक बनता है, जो समाज और देश की प्रगति में महत्वपूर्ण योगदान देता है।

**संदर्भ साहित्य:-**

1. एनसीईआरटी (NCERT) – शिक्षा और नैतिक शिक्षा से संबंधित पुस्तकें।
2. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन – शिक्षा और भारतीय संस्कृति।
3. महात्मा गांधी – नैतिक शिक्षा के विचार।
4. स्वामी विवेकानंद – शिक्षा और चरित्र निर्माण पर उनके विचार और भाषण।
5. भारतीय दर्शन और शिक्षा शास्त्र से संबंधित विभिन्न पुस्तकें।

# Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026


Original Article

# अवकाशाबाबत काही निवडक कविंचा अभिप्राय आणि त्यांचा एकमेकांशी असणारा सहसंबंध


**श्रीमती. ज्योती मंगा घनघाव**

सहा. शिक्षिका. बी.एन.एन. महाविद्यालय, भिवंडी,जि.ठाणे.

**Email:** jyotighanghav85@gmail.com



**Manuscript ID:**
JRD -2026-180425
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 117-120
April 2026

**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026



***गोषवारा***

*महाराष्ट्रामध्ये १७ व्या शतकामध्ये संत तुकाराम महाराज यांनी आत्मसाक्षात्कार झाल्याने आलेली व्यापकरूपी अनूभूती 'तुकारामांची गाथा- अभंग क्र. ६२७' या गाथेतील 'अणुरेणिया थोकडा। तुका आकाशाएवढा ।।' या अभंगात आपण अणुरेणु पेक्षा सुक्ष्म व आकाशाएवढे विशाल कसे आहोत, याचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे आणि 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या अभंगातून संत तुकाराम महाराज डोंगराच्या पायथ्याशी बसलेले असतांना पृथ्वी आणि आकाशाच्या सान्निध्यात त्यांनी घेतलेला निसर्गाच्या सृष्टीचा आनंद व्यक्त आहे.*

*मानवी मन कल्पनेच्या तीरावर अनेक जाणीवांना स्पर्श करत असते. १८८० ते १९५१ या दशकातील प्रसिद्ध मराठी कवयित्री आणि निसर्गकन्या म्हणून ओळखल्या जाणा-या बहिणाबाई चौधरी यांच्या 'बहिणाबाईंची गाणी' या काव्यसंग्रहातील 'मन वढाय वढाय' ही कविता मनाचा आभासी अवकाश सांगणारी कविता आहे. मन कुठल्याही बंधनात बंदिस्त न राहता त्याचे स्वतःचे व्यापकरूपी अस्तित्व या कवितेतून प्रतिबिंबित झाल्याचे दिसून येते.*

*मराठी साहित्यातील कोलंबस म्हणजे कवी कुसुमाग्रज. १९१२ ते १९९९ या दशकातील विस्तिर्ण अशा अवकाशात उत्तुंग झेप घेणारे कवी कुसुमाग्रजांच्या 'विशाखा' या काव्यसंग्रहातील 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत युगे नि युगे सुर्याभोवती फिरणा-या पृथ्वीची तेजस्वी सूर्यासाठी असणारी प्रितीची भावना व्यक्त झालेली दिसून येते. अवकाशतील चंद्र, शुक्र, मंगळ हे ग्रह पृथ्वीसमोर आपले प्रेम व्यक्त करतात पण प्रखर असणा-या सूर्यापुढे ती या ग्रहांना शूद्र मानते. असा हा कुसुमाग्रजांच्या कवितेतील प्रेमविलास पृथ्वी व सूर्याच्या प्रेम कहाणीने दिमाखाने खुलला आहे. 'कोलंबसचे गर्वगीत' ही कविता मराठी साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरलेली आहे. ३ ऑगस्ट १४९२ रोजी कोलंबस भारत शोधण्यासाठी आपल्या ९० खलाशी आणि ३ जहांजांसह निघाला. अथांग सागर आणि वरती आकाश कित्येक आठवडे जमिनीचा स्पर्श ही नाही, समुद्री तुफान आणि वादळं आणि धीर सुटलेले खलाशी बोटीवरचे सामानही संपत आलेले वादळाशी झुंजणारा कोलंबस माघारी न फिरता आपल्या खलाशांना पुढे जाण्यासाठी प्रेरणा देतो. कुठल्याही भयाण परिस्थितीत संकटावर मात करून समग्र मानवी जीवनाचा अवकाश हा अढळ राहण्याचा दृढ निर्धार या कवितेतून व्यक्त झाला आहे.*


**प्रस्तावना -**

इ.स. १७ व्या शतकातील वारकरी संत म्हणजे संत तुकाराम महाराज. त्याकाळात समाजामध्ये सामाजिक विषमता, आर्थिकदृष्टया वतनदारी,अनियंत्रित राज्यसंस्था आणि त्यावर धर्मसंस्थेचे नियंत्रण हे मध्ययुगीन महाराष्ट्राचे चित्र होते. पाचोळयासारख्या जीवन जगणा-या सामान्य माणसांच्या जीवनाला संत तुकाराम महाराज यांनी अर्थ दिला. हे त्यांचे विशालरूपी कार्य 'तुका आकाशाएवढा' या अभंगातून व्यक्त झालेले आहे.


***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*



**Address for correspondence:**

*श्रीमती. ज्योती मंगा घनघाव,सहा. शिक्षिका. बी.एन.एन. महाविद्यालय, भिवंडी,जि.ठाणे.*



**How to cite this article:**

घनघाव, . ज्योती . मंगा . *(2026).* अवकाशाबाबत काही निवडक कविंचा अभिप्राय आणि त्यांचा एकमेकांशी असणारा सहसंबंध. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 117–120.* https://doi.org/10.5281/zenodo.21256211

Quick Response Code:

Website: https://jrdrvb.org/

DOI: 10.5281/zenodo.21256211

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

इ.स. १८ व्या शतकातील सुप्रसिद्ध कवयित्री म्हणजे बहिणाबाई चौधरी. ग्रामीण जीवन, कृषी जीवन यांच्याशी निगडित संस्कृतीचे बहिणाबाईंच्या मनावर खोल परिणाम झाले होते. आचार्य अत्रे यांनी 'बहिणाबाईंची गाणी' या काव्यसंग्रहाला प्रस्तावना दिलेली आहे. या काव्यसंग्रहातील 'मन वढाय वढाय' ही कविता मनाने घेतलेली अवकाश रूपी भरारी व्यक्त करणारी आहे.

इ.स.१९ व्या शतकातील मराठी भाषेतील अग्रगण्य कवी, लेखक, नाटककार, कथाकार म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर अर्थात कविवर्य कुसुमाग्रज. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त विष्णू वामन शिरवाडकर. 'जीवनलहरी', 'समिधा' 'किनारा' 'मराठी माती' 'स्वगत' आणि 'मुक्तायन' हे त्यांचे प्रमुख काव्यसंग्रह आहेत. 'विशाखा' हा त्यांचा अत्यंत गाजलेला काव्यसंग्रह आहे. त्यातील 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेतेत पृथ्वीने सूर्यासमोर आपले प्रेम व्यक्त केले आहे. 'कोलंबसचे गर्वगीत' या कवितेत ध्येयपूर्तीच्या मार्गात कितीही संकटे आली तरी माघारी न फिरण्याचा कोलंबसचा दृढ निश्चय व्यक्त झाला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये -**

1) कवितेतील अवकाशाचे स्वरूप समजून घेणे.

2) निवडक कवींच्या कवितेतून अवकाशाबाबतच्या जाणिवा कशा प्रकारे व्यक्त झाल्या व त्यांचा एकमेकांशी असणारा सहसंबंध ते अभ्यासणे.

3) कवितेतील अवकाश हा कविंच्या भावनांचे एक प्रतीक आहे ते अभ्यासणे.

4) काव्याच्या दृश्टीकोनातून अवकाश या संकल्पनेचा बदलत गेलेल्या विचारसरणीचा अभ्यास करणे.

5) अवकाश हा कविंच्या कवितेतून प्रतीत झालेला भोवतालच्या विश्वाचा एक भाग म्हणून अभ्यासणे.

**1) संत तुकाराम महाराज यांच्या कवितेतील अवकाश -**

महाराष्ट्रामध्ये सातशे वर्षाआधी संतांनी जी लोक शिक्षणाची चळवळ सुरू केली होती त्यामध्ये संत तुकरामांचे समाजप्रबोधनाचे कार्य अलौकिक होते. संत तुकारामांच्या अभंगवाणीने अवघ्या महाराष्ट्राला जागे करून अज्ञानातून, ढोंगीपणातून अंधश्रध्देच्या दारिद्र्यातून मुक्त करून सुविचाराने संस्कारित करण्याचे कार्य केले. 'अणुरेणुया थोकडा तुका आकाशाएवढा' हा अभंग 'संत तुकाराम गाथा अभंग क्र. ६२७' यातील आहे. हा अभंग संत तुकरामांचे थोरपण, व्याप्ती आणि अध्यात्मिक उंची दर्शविणारा एक अतिशय प्रसिद्ध अभंग आहे. जो त्यांच्या व्यक्तिमत्वाची अथांगता (आकाशाएवढी विशालता) व्यक्त करते.

अणुरेणियां थोकडा । तुका आकाशाएवढा ।।
गिळूनी सांडिले कलेवर । भवभ्रमाचा आकार ।।
सांडिली त्रिपुटी । दीप उजळला घटी ।।
तुका म्हणे आतां । उरलो उपकारापुरता ।।

या अभंगात संत तुकाराम महाराज यांनी आपण अणुरेणु पेक्षा सूक्ष्म व आकाशाएवढे विशाल कसे आहोत, याचे अतिशय सुंदर वर्णन केले आहे. ज्या प्रपंचात त्यांचा देह, शरीर सामावलेले आहे अशा प्रपंचारूपी भ्रमाचा आकार त्यांनी समाजाच्या कल्याणासाठी सोडलेला आहे. त्यासाठी त्यांनी ज्ञेय, ज्ञाता व ज्ञानाची त्रिपुटी सोडून आत्मज्ञानाचा दीप देहामध्ये प्रज्वलित केला आहे. यामुळे त्यांना विशाल अशी अनुभूती प्राप्त झाली आहे.

मानवी जीवन निसर्गाशिवाय अपूर्ण आहे. याची प्रत्यक्ष घेतलेली अनुभूती संत तुकाराम यांनी 'तुकारामांची गाथा' अभंग क्र. २३७६ मधून घेतलेली खालीलप्रमाणे दिसून येते –

वृक्षवल्ली आम्हा सोयरे
वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती
आकाश मंडप पृथ्वी आसन
तेथे माझे मन क्रीडा करी

तुकाराम महाराज देहू जवळील भंडारा डोंगर आहे तिथे एकांतात जाऊन बसत. त्यांच्या अनेक अभंगरचना त्यांनी याच ठिकाणी बसून केलेल्या आहेत. संत तुकराम विशाल वृक्षाच्या खाली बसलेले असतांना हे वृक्ष वेली आणि प्राणी पक्षी हे त्यांचे सखे सोयरे, नातेवाईक आहेत असे ते म्हणतात. ज्याप्रमाणे मी विठ्ठलाचे नामस्मरण करत आहे त्या पध्दतीने हे पक्षी अतिशय सुरात गात आहेत. तुकाराम महाराज म्हणतात माझ्यासाठी हे आकाश मंडप म्हणजे छत झालेले आहे आणि पृथ्वी ही माझ्यासाठी आसन झालेली आहे. माझं मन याच ठिकाणी रमतं. निसर्ग, पृथ्वी आणि आकाश यांचा सुंदर मिलाफ येथे संत तुकराम महाराज व्यक्त करतांना दिसतात.

**2) बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील अवकाश**

बहिणाबाई चौधरी यांच्या कवितेतील अवकाश हा प्रामुख्याने खानदेशातील ग्रामीण जीवन, निसर्ग आणि स्त्रीच्या भावविश्वाशी जोडलेला आहे. निरक्शर असूनही त्यांच्या ओव्यांमधून प्रामुख्याने अथांग तत्वज्ञान मानवी स्वभाव आणि निसर्गातील सूक्ष्म

निरीक्षण अनुभवायला मिळते. 'बहिणाबाईंची गाणी' या काव्यसंग्रहातील 'मन वढाय वढाय' या कवितेतून मनाचा अवकाश सांगणा-या कवितेतील ओळी खालीलप्रमाणे दिसून येतात –

मन पाखरू पाखरू
त्याची काय सांगु मात
आता व्हतं भुईवर
गेल गेल आभायात

मन पाखरासारखे चंचल आहे. ते एका ठिकाणी स्थिर नाही. जमिनीवर असणारं मन कधी आकाशाला जाऊन गवसणी घालतं कळतच नाही. हा मनाचा अवकाश बहिणाबाई यांनी या ओळींमध्ये मांडलेला आपल्याला दिसून येतो.

**3) कुसुमाग्रजांच्या कवितेतील अवकाश -**

ज्यांच्या नावाचा एक तारा अथांग तारांगणात अढळ विराजमान आहे, असे एक आदरणीय नाव कविश्रेष्ठ कुसुमाग्रज. अर्थात ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त विष्णू वामन शिरवाडकर. 'जीवनलहरी', 'समिधा' 'किनारा' 'मराठी माती' 'स्वगत' आणि 'मुक्तायन' हे त्यांचे प्रमुख काव्यसंग्रह आहेत. 'विशाखा' हा त्यांचा अत्यंत गाजलेला काव्यसंग्रह असून त्यातील 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता प्रेमाचा अवकाश सांगणारी आहे. त्यातील काही ओळी खालील प्रमाणे –

युगामागून चालली रे युगे ही
करावी किती भास्करा वंचना
किती काळ कक्षेत धावू तुझ्या मी
कितीदा करू प्रितीची यांचना?

पृथ्वी स्वतःच्या आसाभोवती फिरता फिरता सुर्याभोवती फिरते हे भौगोलिक सत्य आहे. ईथे प्रेयसी पृथ्वी तर सूर्य हा प्रियकर आहे. या कवितेत कुसुमाग्रजांच्या कल्पनाविलासाला बहर आल्याचे दिसून येते व पृथ्वीच सुर्याकडे प्रेमाची याचना करते अशी भव्य व उदात्त प्रेमाची कल्पना मांडतांना ते दिसतात.

पिसारा प्रभेचा उभारून दारी
पहाटे उभा शुक्र हा प्रेमळ
करी प्रीतीची याचना लाजूनी
लाल होऊनीया लाजरा मंगळ

परि दिव्य ते तेज पाहून पुजून
घेऊ गळयाशी कसे काजवे
नको शुद्र श्रृंगार तो दुर्बळांचा
तुझी दूरता त्याहून साहवे

चंद्र, धूमकेतू,मंगळ ध्रुव हे तारे ही पृथ्वीवर प्रेम करीत आहेत पण तेजस्वी सुर्यापुढे हे शूद्र आहेत म्हणून पृथ्वी यूर्याचे दूरपण ही स्वीकारते असा हा तेजस्वी कल्पनाविलास कवितेत दिसून येतो.

'विशाखा' या काव्यसंग्रहातील 'कोलंबसचे गर्वगीत' या कवितेतील 'कोलंबसचे गर्वगीत' ही कविता मराठी साहित्य विश्वात मैलाचा दगड ठरलेली आहे. ३ ऑगस्ट १४९२ रोजी कोलंबस भारत शोधण्यासाठी आपल्या ९० खलाशी आणि ३ जहांजांसह निघाला. अथांग सागर आणि वरती आकाश कित्येक आठवडे जमिनीचा स्पर्श ही नाही, समुद्री तुफान आणि वादळं आणि धीर सुटलेले खलाशी बोटीवरचे सामानही संपत आलेले वादळाशी झुंजणारा कोलंबस माघारी न फिरता आपल्या खलाशांना पुढे जाण्यासाठी प्रेरणा देतो. कुठल्याही भयाण परिस्थितीत संकटावर मात करून समग्र मानवी जीवनाचा अवकाश हा अढळ राहण्याचा दृढ निर्धार या कवितेतून व्यक्त झाला आहे, तो खालीलप्रमाणे –

'हजार जिव्हा तुझ्या गर्जु दे प्रतिध्वनीने त्या
समुद्रा, डळमळू दे तारे
विराट वादळ हेलकावू दे पर्वत पाण्याचे
ढळू दे दिशाकोन सारे'

एकवेळ आकाशातले तारे डळमळू दे किंवा वाटेत विराट वादळाने पाण्याचे पर्वत उभे करू देत, मी ही मोहीम अर्ध्यावर टाकून परत फिरणार नाही. यातून कोलंबसचची संकटांशी लढण्याची जिद्द दिसून येते.

**निष्कर्ष:**

अवकाश ही संकल्पना व्यापक आहे. संत तुकाराम महाराज यांच्या 'तुका आकाशाएवढा' या अभंगातून प्रतीत होणारा अवकाश मानवी देहरूपी सूक्ष्म तर समाजाच्या कल्याणासाठी प्रपंचाचा त्याग करून आत्मज्ञानाचा दिप त्यांनी प्रज्वलित केला आहे. परमात्म्याशी

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

एकरूप झाल्याने संत तुकारामांना प्राप्त झालेली अनुभूती अथांग विशाल आहे. 'वृक्षवल्ली आम्हां सोयरे' या अभंगात निसर्गातील एकांताची अनूभूती घेत असतांना विठ्ठल नामस्मरणात तल्लीन झालेल्या तुकाराम महाराजांना वृक्ष, पशू व पक्षी जणू काही आपले जवळचे नातेवाईक आहेत आणि त्यामध्ये त्यांनी पृथ्वी व सूर्य यांचा केलेला मिलाफ निसर्गातील विशालता दाखवून देणारा आहे. 'मन वढाय वढाय' या कवितेत मन हे पाखरासारखे आहे. ते एकाजागी स्थिर नसते. क्षणात जमिनीवर तर क्षणात मनाने आकाशात घेतलेली झेप यातून बहिणाबाई चैधरी यांनी मनाचा अवकाश व्यक्त केलेला दिसून येतो. 'पृथ्वीचे प्रेमगीत' या कवितेत पृथ्वीने सूर्याकडे केलेली प्रितीची याचनेतून प्रेमाचा अवकाश हा त्यातून व्यक्त झालेला दिसतो. 'कोलंबसचे गर्वगीत' या कवितेत कितीही वादळे ध्येयपूर्तीच्या मार्गात आली तरी माघारी न फिरण्याचा दृढनिर्धार कोलंबसच्या रूपात व्यक्त होतो त्यातू न व्यक्त झालेला अवकाश हा अढळ आहे.

या संशोधन पेपरच्या अनुषंगाने काव्यातील अवकाश हा १७ व्या, १८ व्या व १९ व्या शतकातील संतकवी संत तुकाराम महाराज, सुप्रसिद्ध कवयित्री बहिणाबाई चौधरी आणि कविवर्य कुसुमाग्रज यांच्या कवितेतून व्यक्त झाला आहे. संत तुकाराम महाराज यांचा 'तुका आकाशाएवढा' या अभंगातील अवकाश हा एका व्यक्तीपुरती मर्यादित आहे तर 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे' या अभंगातून निसर्गाच्या सानिध्यात आकाश व पृथ्वी यांचा झालेला मिलाफ अप्रतिम आहे. बहिणाबाई चौधरी यांच्या 'मन वढाय वढाय' या कवितेतील मनाचा अवकाश हा समग्र मानवी मनाची चंचलता व्यक्त करणारे आहे. एखादी व्यक्ती, मानवी मन यांच्याही पलीकडे जाऊन कुसुमाग्रजांची 'पृथ्वीचे प्रेमगीत' ही कविता 'प्रेम आणि विरह' या दोन्ही भावनांचे अवकाशरूपी उत्कट अभिव्यक्ती आहे. या सगळयातून खवळलेल्या समुद्रातून अनेक संकटांशी सामना करीत अजेय होणारा कोलंबस 'कोलंबसचे गर्वगीत' या कवितेतून पुन्हा एकदा संत तुकाराम महाराजांच्या विशाल अशा अनुभूती पर्यंत जाऊन पोहोचलेला दिसून येतो.

**संदर्भ ग्रंथ**


1. संत तुकाराम महाराज 'तुकाराम गाथा' या गाथेतील अभंग क्र. ६२७ 'अणुरेणियां थोकडा । तुका आकाशाएवढा' आणि अभंग क्र. २३७६ 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे'.
2. अभंग निरूपण - अणुरेणिया थोकडा – Pune True & Wordpress.com
3. बहिणाबाई चौधरी काव्यसंग्रह 'बहिणाबाईंची गाणी' त्यातील 'मन वढाय वढाय' कविता.
4. कुसुमाग्रज 'विशाखा' या काव्यसंग्रहातील 'पृथ्वीचे प्रेमगीत' आणि 'कोलंबसचे गर्वगीत इ.कविता.
5. इ सकाळ पृथ्वीचे प्रेमगीत': अमर्यादावरील मर्यादाशील प्रेम.
6. शोधगंगा कुसुमाग्रज - वि. वा. शिरवाडकर यांच्या १९८० नंतर च्या साहित्याच्या चिकीत्सक अभ्यास.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# आदिवासी साहित्यातील 'अवकाश': भौगोलिक, सांस्कृतिक व मानसिक आयामांचे चिकित्सक विश्लेषण

**प्रा. राजेश गणपत देसले,**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,
पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचालित,
बी. एन. एन. (कला, विज्ञान आणि वाणिज्य) महाविद्यालय, भिवंडी, ठाणे
**Email:**rgdesale@gmail.com

**Manuscript ID**:
JRD -2026-180426
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 212-126
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश:***

*प्रस्तुत संशोधनात मराठी आदिवासी साहित्यातील 'अवकाश' संकल्पनेचे भौगोलिक, सांस्कृतिक आणि मानसिक आयामांच्या संदर्भात चिकित्सक विश्लेषण करण्यात आले आहे. आदिवासी जीवनातील 'जल-जंगल-जमीन' ही त्रिसूत्री केवळ आर्थिक संसाधने नसून ती अस्मिता, परंपरा आणि सामूहिक स्मृती घडविणारा मूलाधार आहे. या साहित्यात निसर्ग केवळ पार्श्वभूमी नसून तो एक 'जिवंत पात्र' म्हणून आदिवासींच्या अन्याय, विस्थापन आणि प्रतिकाराच्या अनुभवांचे प्रतीकीकरण करतो.अभ्यासाच्या पहिल्या टप्प्यात 'भौतिक अवकाशा'ची चर्चा करताना जल, जंगल आणि जमीन हे घटक आदिवासींच्या उपजीविकेचा मुख्य आधार असल्याचे स्पष्ट होते. वाहरू सोनवणे यांच्यासारख्या कवींच्या रचनांमधून 'जंगल' हे केवळ संसाधन नसून, तो मानवी अनुभवाशी जोडलेला एक अस्तित्वाचा अधिकार असल्याचे अधोरेखित होते.*

*दुसऱ्या टप्प्यात 'विस्थापनाच्या अवकाशाचा' वेध घेतला आहे. धरणे व विकास प्रकल्पांमुळे होणारे विस्थापन केवळ भौगोलिक बदल नसून, नातेसंबंध आणि सांस्कृतिक घटकांवर त्याच्या दूरगामी परिणाम होतो. 'बाबाराव मडावी' यांच्या 'आकांत'मधील गोंडवाना प्रदेशाचे बुडणे हे केवळ भौगोलिक नुकसान नसून त्या ठिकाणच्या आठवणी, श्रद्धा आणि जीवन जाणिवांचा संकोच आहे. पुनर्वसन जरी झाले, तरी परकेपणा आणि असुरक्षितता यामुळे पूर्वीचे 'घर' हे केवळ वास्तू नसून ती एक परिसंस्था असल्याची जाणीव ठळक होते. विस्थापनामुळे त्याला छेद बसतो.*

*तिसऱ्या भागात 'सांस्कृतिक व मानसिक अवकाशा'वर प्रकाश टाकला आहे. भौतिक जागा गमावल्यानंतरही विधी आणि देव-देवता नव्या ठिकाणी पुनरुज्जीवित होतात, मात्र त्यांचे संदर्भ बदलतात. 'नजूबाई गावित' यांच्या 'आदोर'मधील स्त्रीचा अवकाश हा सामाजिक व कायदेशीर चौकटीत नाकारला जाणारा संघर्ष दर्शवतो.*

*शेवटी, एडवर्ड सईद यांच्या 'ओरिएंटलिझम' आणि होमी भाभा यांच्या 'थर्ड स्पेस' व 'हायब्रिडिटी' या सिद्धांतांच्या आधारे मुख्यधारेतील साहित्यातील 'पर्यटन-दृष्टीचा अवकाश' आणि आदिवासी साहित्यातील 'अस्तित्वाचा अवकाश' यांची तुलना केली आहे. एकंदरीत, आदिवासी साहित्य हे विकासवादी हस्तक्षेपामुळे होणारी सांस्कृतिक झीज, मानसिक तुटलेपण आणि त्यातून निर्माण होणारा प्रखर प्रतिरोध यांचे बहुआयामी चित्रण करते, असा निष्कर्ष या संशोधनातून मांडला आहे.*

***मुख्य शब्द:*** *अवकाश, आदिवासी, जल-जंगल-जमीन, विस्थापन*

## प्रस्तावना:

आदिवासी साहित्यात 'अवकाश' ही संकल्पना केवळ प्राकृतिक भूगोल, भूमी किंवा भूप्रदेशापुरती मर्यादित राहिलेली नाही; तर ती मानवी अस्तित्वाचा, अस्मितेचा आणि सामाजिक-राजकीय संघर्षाचा एक मूलभूत आधार बनली आहे. आदिवासी समाजजीवनात 'जल, जंगल आणि जमीन' हे घटक केवळ आर्थिक संसाधने नसून ते आदिवासींच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि मानसिक जडणघडणीचे अविभाज्य भाग आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website:
https://jrdrvb.org/
DOI:
10.5281/zenodo.21256292
OPEN ACCESS

**Address for correspondence:**
*प्रा. राजेश गणपत देसले, सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग,पद्मश्री आण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचालित,बी. एन. एन. (कला, विज्ञान आणि वाणिज्य) महाविद्यालय, भिवंडी, ठाणे*

**How to cite this article:**
देसले, . राजेश गणपत (2026). आदिवासी साहित्यातील 'अवकाश': भौगोलिक, सांस्कृतिक व मानसिक आयामांचे चिकित्सक विश्लेषण. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 221–126*
*https://doi.org/10.5281/zenodo.21256292*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

१९६० नंतर अधिक प्रखरतेने पुढे आलेल्या मराठी आदिवासी साहित्याने या निसर्गदत्त अवकाशाला आपल्या लेखणीतून केवळ पार्श्वभूमी म्हणून नव्हे, तर एका 'जिवंत पात्रा'च्या रूपात मांडले आहे. प्रस्तुत संशोधन हे आदिवासी साहित्यातील याच 'अवकाश' संकल्पनेचा बहुआयामी शोध घेण्याचा प्रयत्न आहे.

मराठी साहित्याच्या मुख्यधारेत, विशेषतः रोमँटिक किंवा काही प्रमाणात ग्रामीण साहित्यातही, निसर्गाचे चित्रण अनेकदा सौंदर्यवादी दृष्टीकोनातून किंवा निसर्गपर्यटनाच्या अंगाने येते. तिथे निसर्ग हा मानवी भावभावनांना उद्दीपित करणारा घटक किंवा कथेची पार्श्वभूमी असतो. मात्र, आदिवासी जाणिवेच्या साहित्यात 'अवकाश' आणि 'माणूस' यांच्यातील द्वैत संपुष्टात येते. येथे जंगल, डोंगर आणि दऱ्या या सौंदर्याच्या वस्तू नसून त्या आदिवासींच्या 'सहजीवनाचे' प्रतीक आहेत. आदिवासी माणूस आणि त्याचा नैसर्गिक अवकाश यांच्यात एक नाळ जोडलेली असते, जी तुटताना होणाऱ्या वेदनांचे चित्रण या साहित्याचे व्यवच्छेदक लक्षण आहे.

गेल्या काही दशकांत जागतिक पातळीवर आणि भारतात 'विकास' या संकल्पनेने वेग घेतला आहे. धरणे, कारखाने, अभयारण्ये आणि रस्ते प्रकल्प यांच्या नावाखाली आदिवासींच्या हक्काच्या जमिनी अधिग्रहित केल्या जात आहेत. या प्रक्रियेतून 'विस्थापन' ही एक भयानक वास्तवता समोर आली आहे. जेव्हा आदिवासी माणूस आपली भौतिक जागा गमावतो, तेव्हा तो केवळ घरदार गमावत नाही, तर त्या भूभागाशी जोडलेली आपली भाषा, देवदेवता, जत्रा, विधी आणि सामूहिक सांस्कृतिक आठवणी देखील गमावून बसतो. विस्थापनामुळे निर्माण होणाऱ्या या 'सांस्कृतिक आणि मानसिक पोकळीचा' वेध घेणे, हे समकालीन साहित्याभ्यासाचे महत्त्वाचे प्रयोजन आहे.

नव्याने निर्माण झालेल्या पुनर्वसन वसाहतींमधील परकेपणा, शहरांमधील झोपडपट्ट्यांमधील कोंडमारा आणि आपल्या मूळ नैसर्गिक अधिवासाची ओढ यांतून निर्माण होणारा ताण आदिवासी साहित्यातून प्रभावीपणे व्यक्त झाला आहे. वाहरू सोनवणे, उषाकिरण अत्राम, नजूबाई गावित यांसारख्या लेखकांनी हा अवकाश केवळ दुःखाचा म्हणून रंगवला नाही, तर तो प्रस्थापित सत्तेविरुद्धच्या 'प्रतिकाराचा' आणि स्वत्व टिकवण्याच्या संघर्षाचा अवकाश म्हणून उभा केला आहे.

थोडक्यात सांगायचे तर, आदिवासी साहित्यातील 'अवकाश' हा केवळ भौगोलिक नसून तो 'राजकीय आणि अस्तित्वादी' आहे. भौतिक जागा गमावल्यामुळे आदिवासींच्या मानसिकतेत होणारे बदल, त्यांच्या अस्मितेपुढील आव्हाने आणि सांस्कृतिक ऱ्हास यांचा साकल्याने अभ्यास करणे, या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

**संशोधन समस्या:**

मराठी साहित्यात निसर्गाचे चित्रण बऱ्याचदा अद्भूतरम्य (रोमँटिक) किंवा सौंदर्यवादी अंगाने येते. मात्र, आदिवासी साहित्यात हा 'अवकाश' जगण्याच्या संघर्षाशी आणि विस्थापनाच्या वेदनेशी जोडलेला आहे. विकासाच्या नावाखाली हिरावून घेतली जाणारी जमीन आणि त्यामुळे निर्माण होणारी सांस्कृतिक व मानसिक पोकळी यांचा अभ्यास अद्याप पुरेसा झालेला नाही. या संदर्भात, भौतिक जागा गमावल्यामुळे आदिवासी समाजाच्या मानसिक आणि सांस्कृतिक 'अवकाशा'वर काय परिणाम होतो, हे तपासणे या संशोधनाचे मुख्य सूत्र आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे:**

मराठी आदिवासी साहित्यात व्यक्त होणाऱ्या 'अवकाश' या संकल्पनेचे विविध पदर (भौतिक, सांस्कृतिक, मानसिक) शोधणे.

अ. 'जल-जंगल-जमीन' या भौतिक अवकाशाचा आदिवासी सांस्कृतिक ओळखीशी असलेला संबंध उलगडणे.

आ. विस्थापन आणि 'धरण-विकास' प्रकल्पामुळे निर्माण होणाऱ्या 'नकारार्थी अवकाशाचे' चित्रण अभ्यासणे.

इ. मुख्यधारेतील ग्रामीण साहित्य आणि आदिवासी साहित्य यांच्यातील 'अवकाश चित्रणा'चा तुलनात्मक अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती:**

**१. हा अभ्यास पूर्णतः गुणात्मक (Qualitative) स्वरूपाचा आहे.**

यात खालील पद्धतींचा अवलंब केला जाईल.

अ. संहिता विश्लेषण

आ. निवडलेल्या प्रातिनिधिक ग्रंथांचे सुक्ष्म वाचन केले जाईल.

इ. लेखकाच्या शब्दांमागील सामाजिक आणि सांस्कृतिक संदर्भ समजून घेण्यासाठी गॅडमर (Hans-Georg Gadamer) किंवा रिकर (Paul Ricoeur) यांच्या अर्थबोधन पद्धतीचा वापर.

**२. नमुना निवड:**

अ. कविता: वाहरू सोनवणे, यांच्या कविता (निसर्ग आणि विद्रोहाचा अवकाश).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

आ. कादंबरी/आत्मकथन: नजूबाई गावित यांचे 'आदोर' (स्त्रीचा अवकाश), बाबाराव मडावी यांचे 'आकांत' (विस्थापनाचा अवकाश), डॉ. गोविंद गारे यांचे वैचारिक लेखन.

**३. माहिती विश्लेषण साधने:**

अ. मजकुरातील 'जंगल', 'गाव', 'शहर', 'पुनर्वसन वसाहत' यांसारख्या अवकाशांचे वर्गीकरण करणे.

आ. मोठ्या प्रमाणावरील मजकुराचे विश्लेषण करण्यासाठी आणि त्यातील पॅटर्न्स शोधण्यासाठी 'NVivo' या गुणात्मक विश्लेषण सॉफ्टवेअरचा वापर केला जाईल.

**मुख्य विश्लेषण:**

भौतिक अवकाश, विस्थापनाचा अवकाश, सांस्कृतिक व मानसिक अवकाश आणि या तिन्ही अवकाशांचे तुलनात्मक विश्लेषण करण्यात आले आहे.

**१. भौतिक अवकाश:**

आदिवासी साहित्याच्या पर्यावरणकेंद्रित दृष्टीकोनामध्ये निसर्ग हा मालकी उपभोगाचा ‘रिसोर्स’ नसून जगण्याची सहजीवन व्यवस्था असते. पर्यायाने आदिवासींच्या साहित्यात निसर्ग सतत केंद्रीभूत राहिला आहे. वाहरू सोनवणे यांच्या कवितेत ही व्यवस्था ‘निसर्गाच्या’ माध्यमातून सतत संवाद साधत राहते. त्यांच्या कवितांमध्ये निसर्ग सौंदर्य वर्णनापुरता मर्यादित नसून तो उपासमार, विस्थापन, अन्याय आणि अस्तित्व संघर्ष यांचा साक्षीदार बनतो.

**अ. भौतिक अवकाश’ म्हणजे काय?**

‘भौतिक अवकाश’ इथे केवळ भौगोलिक प्रदेश नाही; तर तो आदिवासी जीवनाची सांस्कृतिक, आर्थिक आणि नैतिक रचना आहे. जल, जंगल आणि जमीन, डोंगर, नदी-नाले, झाडे, प्राणी, ऋतू, श्रम आणि समुदाय यांचे परस्परावलंबी जाळे आहे. वाहरू सोनवणे यांच्या कवितांमध्ये ‘वास्तव जीवन’ आणि त्यातील ‘दाहकता’ तितक्याच तीव्रतेने येते, म्हणजे कवितेचा अवकाश हा अनुभवजन्य आणि संघर्षप्रधान आहे.

या चौकटीत ‘जंगल म्हणजे संसाधन’ हा आधुनिक विकासवादी अर्थ संकुचित ठरतो; कारण आदिवासी जगण्यात जंगल हे श्रम, अन्न, निवारा, परंपरा, नातेसंबंध आणि न्याय-अन्यायाची ठळक खुण असते, म्हणूनच वाहरू सोनवणे यांच्या कवितेत निसर्गाचा ‘आवाज’ हा पर्यावरण नीतीचा आणि अस्तित्व-नीतीचा आवाज होतो.

**ब. निसर्गाला साहित्यामधून आवाज कसा मिळतो?**

वाहरू सोनवणे यांच्या कवितांमध्ये निसर्ग मुख्यतः तीन पद्धतींनी व्यक्त होतो.

अ. प्रतिमा-समता

आ. अवकाश-चिन्हे

इ. उणिवेची जाणीव

**क. ‘सहजीवन’ विरुद्ध स्रोत (रिसोर्स): अवकाशातले अधिकार आणि राजकारण**

‘जमिनीवर आम्हीच गुन्हेगार’ अशी विडंबनात्मक स्थिती आदिवासींची झालेली दिसते, परिमाणी ‘डोंगर, पर्वत, नदी-नाले, जंगल सारे आपल्या हातातून गेले’ अशी विस्थापनाची वेदना आदिवासी साहित्यातून पुढे येते; यात भौतिक अवकाशावरचा हक्क हिरावला जाण्याचा राजकीय दृष्टीकोन स्पष्ट दिसतो. आदिवासी जीवनात निसर्ग ‘वस्तू’ नसतो; तर ‘जीवनाधार’ असतो. अवकाश गेला म्हणजे अस्तित्वाचा आधारच ढासळतो. यावरच आदिवासी साहित्यातील ‘सहजीवन’ संकल्पनेची मूलभूत मांडणी आधारलेली आहे.

वाहरू सोनवणे यांच्या कवितेत जंगल हे दोन अर्थांनी ‘सहजीवन’ म्हणून पुढे येते. एकीकडे उपजीविका-संबंध आणि दुसरीकडे मूल्य-संबंध होय. आदिवासी मूल्ये निसर्गाशी निगडित आहेत. वारा सर्वांसाठी समान आणि जीवन समता आणि प्रेमावर आधारित असायला हवे, असे विधान त्यांच्या मुलाखतीतही येते. हा विचार त्यांच्या कवितेतील पर्यावरण नीतीला वैचारिक आधार मिळवून देतो.

वाहरू सोनवणे यांची कविता ‘प्रबोधनाची परिवर्तनाची’ आहे, त्यामुळे निसर्ग केवळ ‘पालक’ नसून अन्यायाविरुद्ध प्रतिकाराची जागाही ठरते. जंगल, जमीन हिरावल्यावर आदिवासी श्रमाला ‘मोलमजुरी’ शिवाय पर्याय राहत नाही अशी सामाजिक यंत्रणा कवितेत येते; यामुळे निसर्गाधारित सहजीवन तुटणे आणि बाजार सत्ता-केंद्रित जगणे हा संघर्ष तीव्र होतो.

**२. विस्थापनाचा अवकाश:**

विस्थापनाचा अवकाश म्हणजे फक्त ‘जागेचा बदल’ नाही; तो हक्क, नातेसंबंध, सांस्कृतिक आधार आणि जगण्याची अर्थव्यवस्था यांची तुटणारी वीण आहे. त्यामुळे पुनर्वसन छावणी, शहरातील झोपडपट्टी ही केवळ नवी ‘जागा’ राहत नाही, तर ‘परकेपणा निर्माण करणारी सामाजिक-मानसिक रचना’ बनते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

मराठी विश्वकोशानुसार विस्थापन म्हणजे नैसर्गिक, मानवनिर्मित कारणांनी मूळ निवासस्थान सोडून दुसरीकडे जाण्यास भाग पाडले जाणे होय. विस्थापानामुळे उत्पन्नाचे साधन, जमीन व घरावरील हक्क आणि सामाजिक संबंध तुटतात. पुनर्वसनात काही सुविधा, मोबदला दिला जाऊ शकतो; पण 'पुनर्स्थापन' म्हणजे पूर्वीच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि भौगोलिक संदर्भांसारखे जगणे प्रत्यक्षात घडत नाही. यातूनच नव्या अवकाशात 'परकेपणा' तीव्र होतो.

**अ. परक्या जागेत तणाव कशामुळे निर्माण होतो?**

विस्थापनानंतर 'हक्काची जागा' सुटते आणि माणूस अशा अवकाशात जातो जिथे तो बहुतेकदा 'आगंतुक' असतो त्याला शहरी संसाधनांवर त्यांचे नियंत्रण नसते, कामधंदा निश्चित नसतो शिवाय सामाजिक मान्यता देखील कमी मिळते. शहरातील झोपडपट्ट्या, छावण्या तेथील बेसुमार गर्दी आणि नवीन नियम यांचा त्यांचा दैनंदिन जीवनावर परिणाम होतो, त्यांचे भावातालातील नियंत्रण सुटते; परिणामी असुरक्षितता, अपमान आणि 'आपण इथे कोण?' हा प्रश्न विस्थापितांना सतत टोचत राहतो.

**ब. 'आकांत' बुडणारा गोंडवाना आणि नवा अवकाश**

हक्काची जागा सोडून परक्या जागी स्थलांतरित झाल्यावर निर्माण होणारा तणाव आदिवासींसाठी वेदनादायक आणि त्यांच्या अस्तित्वावर घाला घालणारा ठरतो. 'बाबाराव मडावी' यांच्या 'आकांत' कादंबरीत गोंडवाना प्रदेश बुडताना होणारी वेदना आणि नवीन 'अवकाशातील' परकेपणा यातून आदिवासींच्या जीवनाची झालेली परवड मांडली आहे. 'आकांत'कडे पाहिल्यास, आदिवासी जीवनातील जंगल, डोंगर, नदी, नाले, सामूहिकता आणि उदरनिर्वाहाची नैसर्गिक चौकट हे घटक केंद्रस्थानी येतात. 'घर' ही फक्त वास्तू नसून जगण्याची एक परिसंस्था असते. अशा पार्श्वभूमीवर 'गोंडवाना प्रदेश बुडणे' ही घटना केवळ भौगोलिक नुकसान राहत नाही; ती स्मृती, श्रद्धा, कुटुंब, जमात आणि जगण्याचे ज्ञान यांचा तुटवडा निर्माण करते हा तुटवडाच कादंबरीतील वेदना 'आकांत' म्हणून व्यक्त होतो.

**क. पुनर्वसन: 'जागा मिळणे' विरुद्ध 'जीवन उभे राहणे'**

धरणग्रस्तांची मुख्य मागणी 'लाभक्षेत्रातील जमिनीवर पुनर्वसन' अशी दिसते, कारण उपजीविकेची हमी नसली तर पुनर्वसन कागदावरच राहते. त्याच लेखात 'पुनर्वसनाऐवजी मोबदला' ही भूमिका गरीब आदिवासींसाठी घातक ठरू शकते, कारण पैसे संपले की जगण्याचे साधन उरत नाही. हे स्पष्ट केले आहे.

**ड. पुनर्वसन वस्ती: तणावाचा अवकाश**

कोयना धरणग्रस्तांच्या अनुभवात 'स्थानिक आदिवासींमध्ये आणि धरणग्रस्तांमध्ये तणाव' निर्माण झाल्याचा उल्लेख आहे. हा तणाव संसाधने आणि 'आपण कुणाच्या जागेत?' या भावनेतून वाढतो. त्याच ठिकाणी नातेसंबंध विखुरणे काही लोक मूळ भागात, काही मुंबईत, काहींचा पत्ता नाही हे विस्थापनाच्या अवकाशाचे लक्षण म्हणून ठळक होते.

**इ. शहर, झोपडपट्टीचा अनुभव: परकेपणा**

काही धरणग्रस्त 'मुंबईला गेले, तेथे झोपडपट्टीत राहत होते' असा थेट संदर्भ येतो इथे 'नवा अवकाश' म्हणजे अनिश्चित रोजगार, गर्दी आणि सामाजिक प्रतिष्ठेची घसरण असा अनुभवही जोडला जातो.

बाबाराव मडावींच्या 'आकांत'बद्दलच्या अभ्यासलेखात आदिवासी जीवनाची निसर्गाधारित चौकट जंगल, पहाड, नदी, नाले, सामूहिकता, शेतीवरील अवलंबित्व हीच 'घराची' व्याख्या असल्याचे सांगितले आहे; म्हणून शहरातील झोपडपट्टीतील जगणे आदिवासींना 'परके' वाटणे हे स्वाभाविक ठरते.

**३. सांस्कृतिक व मानसिक अवकाश:**

विशिष्ट रुढी, परंपरा, भाषा आणि मूल्ये जिवंत असतात अशी जागा म्हणजे सांस्कृतिक अवकाश होय.

**अ. भौतिक जागा गेल्यावर देव, जत्रा आणि विधी यांचे काय होते?**

भौतिक जागा गेल्यावर देव-देवता, जत्रा आणि विधी 'अदृश्य' होत नाहीत; ते नव्या ठिकाणी पुन्हा मांडले जातात, पण त्यांचे अर्थ, अधिकार संबंध आणि स्त्री-पुरुषांचे सहभागाचे नियम बदलतात. 'आदोर'मध्ये आदिवासी स्त्रीला घरात आणि समाजात मिळणारा, नाकारला जाणारा अवकाश हा असा बदलता सांस्कृतिक व मानसिक अवकाशच उलगडतो.

आदिवासींची भौतिक जागा गेल्यावर देव-देवता, जत्रा आणि विधी 'संपत' नाहीत; ते नवीन ठिकाणी पुन्हा रचले जातात, पण त्यांची जागा, स्वरूप, खर्च, सहभाग आणि अधिकार बदलतात. विस्थापन ही प्रक्रिया स्वतःच समुदायाला 'आपली जागा, इतिहास, संस्कृती' सोडायला लावते, म्हणून धार्मिक, सांस्कृतिक व्यवहारांवर परिणाम अटळ असतो.

नजूबाई गावित यांच्या 'आदोर'मध्ये आदिवासी स्त्रीला घरात आणि समाजात मिळणारा किंवा नाकारला जाणारा अवकाश.

**ब. देव कुठे 'स्थिर' होतो?**

देवाचे स्थान बहुतेकदा विशिष्ट नैसर्गिक चिन्हांशी जोडलेले असते (झाड, दगड, ओढा, टेकडी, देवऱ्या), पण विस्थापनानंतर ते चिन्ह किंवा जागा उपलब्ध नसते, मग देवाचे ‘स्थान’ नव्या परिसरात प्रतीकात्मक रीतीने ठरवले जाते नवीन देव्हारा, ठाणे, तात्पुरती जागा, घरातील देवकोन इत्यादी यामुळे देवाबद्दलचा भाव टिकतो, पण ‘देवाची जमीन, हद्द किंवा परिसर’ ही जी सामुदायिक समज असते ती ढासळू शकते; म्हणजे देव टिकतो, परंतु देव स्थानाशी जोडलेली सामाजिक व्यवस्था मान, हक्क, जबाबदाऱ्या नव्याने ठरवावी लागते.

**क. देव, जत्रा किंवा विधी कुठे जातात?**

‘आदोर’च्या संदर्भात नजूबाई गावितांनी भिल्ल मावची समाजातील लोकजीवन, लोकरूढी, सण-उत्सव, लोकाचार, आणि विविध विधी यांचे सूक्ष्म निरीक्षण नोंदवले आहे. म्हणजेच देव-जत्रा-विधी हे ‘जागेशी बांधलेले’ असले तरी ते समुदायाच्या स्मृतीतून आणि व्यवहारातून टिकतात. पण विस्थापनानंतर ही व्यवस्था ‘जशीच्या तशी’ राहात नाही: विधी टिकतात, मात्र त्यावर जमीनदार, सावकार किंवा प्रशासन यांचे नियंत्रण वाढते.

**ड. मानसिक अवकाश: श्रद्धा, आठवण आणि तुटलेपण**

भौतिक घर किंवा गाव मागे पडले की ‘देव’ हा केवळ मंदिरातला नसतो; तो सामूहिक ओळखीचा आधार बनतो, म्हणून नवीन ठिकाणीही देव-उत्सव, जत्रा हे लोकांना ‘आपण कोण?’ याचे उत्तर देणारे मानसिक आश्रयस्थान वाटू शकते. एकाच वेळी दारिद्र्य, पोटासाठी वणवण, आणि दैन्यदशेचे चित्र ‘आदोर’मध्ये येते; अशा स्थितीत श्रद्धेचा अवकाश हा दिलासा देतो, पण अंधश्रद्धा, लोकभ्रम आणि सामाजिक रूढींचे ओझे वाढवून स्त्रीसारख्या घटकांवर मर्यादा आणू शकतो.

**इ. घरातला अवकाश**

‘आदोर’मध्ये लग्नप्रसंगीची दहेजप्रथा, आंतरिक स्पृश्यास्पृश्य भेदाभेद, आणि दारूत बुडालेल्या सवयी यांसारख्या प्रथांचा उल्लेख आहे; या सगळ्यांचा थेट परिणाम स्त्रीच्या घरातील ‘हालचालीचा’ आणि ‘निर्णयाचा’ अवकाश कमी होण्यात होतो. म्हणजे स्त्रीचे काम व्यापक दिसले तरी सत्ता-निर्णय यावरचा हक्क मर्यादित राहतो हा ‘मानसिक अवकाश’ही संकुचित करणारा अनुभव ठरतो.

**ई. समाजातला अवकाश: मान्यता की नकार?**

नजूबाई गावित आदिवासी स्त्रियांच्या शोषणाविरोधात लढे लढताना ‘आदोर’सारखे लेखन करतात आणि आदिवासी स्त्रियांबाबत होणारा ‘दुटप्पीपणा’ही अधोरेखित करतात, म्हणजे समाजात स्त्रीला दिली जाणारी प्रतिमा आणि वास्तवातील हक्क, नकार यांत दरी आहे. त्यांच्या मुलाखतीत आदिवासी स्त्रियांना हिंदू कोड बिल, द्विभार्या प्रतिबंधक कायद्यासारख्या कायद्यांच्या संरक्षणापासून वगळले जाण्याचे अनुभव येतात; हा ‘कायदेशीर अधिकारांचा अवकाश’ नाकारला गेल्याने सामाजिक अवकाशात स्त्री अधिक असुरक्षित होते.

**४. तुलनात्मक विश्लेषण (Comparative Analysis)**

मुख्यधारेतील साहित्यात निसर्ग हे 'पर्यटनाचे' ठिकाण असते, तर आदिवासी साहित्यात ते 'अस्तित्वाचे' ठिकाण असते. या फरकाचे एडवर्ड सईद (Edward Said) किंवा होमी के. भाभा (Homi K. Bhabha) यांच्या सिद्धांतांच्या आधारे विश्लेषण करण्यात आले आहे.

मुख्यधारेतील साहित्यात निसर्ग ‘दृश्य, अनुभव’ म्हणून मांडला जातो, तर आदिवासी साहित्यात तो ‘जगण्याची अट’ म्हणून येतो. हा फरक ‘अवकाशावरचा हक्क’ यांमधून समजतो.
आणि होमी भाभाकडे ‘थर्ड स्पेस’हायब्रिडिटीमधून म्हणजेच मधल्या अवकाशात होणाऱ्या सांस्कृतिक वाटाघाटीतून स्पष्ट होतो.

**अ. ‘पर्यटनाचे ठिकाण’**

एडवर्ड सईद यांनी १९७८ मध्ये त्यांच्या 'ओरिएंटलिझम' (प्राच्यवाद) या ग्रंथाद्वारे 'ज्ञान आणि सत्ता' यांच्यातील संबंधावर भाष्य करणारा एक क्रांतीकारी सिद्धांत मांडला. त्यांच्या मते, सत्ताधारी विस्थापितांना केवळ निरीक्षणाचा विषय बनवून हीनपणे वागवते. परिणामी, हे लोक स्वतःची ओळख बुजवून, प्रस्थापित आणि विस्थापित या वर्गीकरणात विस्थापित म्हणून कायमच दुर्लक्षित राहतात.

मुख्यधारेतील, विशेषतः शहरी साहित्यात निसर्गाचे चित्रण अनेकदा 'सुंदर' किंवा 'निर्मळ' अशा शब्दांत करून त्याला केवळ 'पर्यटनाचा विषय' बनवले जाते. तिथे लेखक केवळ निसर्ग अनुभवण्यासाठी बाहेरून येतो आणि पुन्हा आपल्या जगात परततो. ही दृष्टी पर्यटनाच्या 'नजरे'शी (Tourist Gaze) साधर्म्य सांगणारी आहे, जिथे एखादी जागा केवळ उपभोगाचे साधन बनते.

या प्रक्रियेत निसर्गासोबतच तिथल्या स्थानिक आदिवासींनाही केवळ 'निसर्गचित्राचा एक भाग' मानले जाते. लेखकाचे लक्ष त्यांच्या हक्कांवर किंवा संघर्षावर नसून, त्यांच्या संस्कृतीतील 'वेगळेपण' किंवा 'अस्सल अनुभवा'वर केंद्रित असते.

**ब. 'अस्तित्वाचे ठिकाण'**

पोस्टकोलोनियल-इकोक्रिटिकल लिखाणात निसर्ग 'मोकळी जागा' किंवा 'निसर्गरम्य दृश्य' नसून लोकांची ओळख, उपजीविका आणि मानव-नॉनह्युमन संबंध यांचा भाग आहे. विकास, शहरीकरण किंवा दबावाने हा संबंध तुटतो असे मांडले जाते.

म्हणजे आदिवासी लेखनात जंगल, नदी आणि डोंगर हे 'बाहेरचे दृश्य' न राहता 'घर' बनते: अन्न-साधन, औषधी ज्ञान, देव-देवऱ्या, दफनभूमी, पूर्वज आणि जमाती मधील नातेसंबंध यांचे अतूट नाते त्यांच्यामध्ये निर्माण झालेले असते. तिथे 'पर्यटन' शक्य असते, पण 'अस्तित्व' प्राथमिक असते. याचमुळे 'निसर्गाचे पर्यटनस्थळ' ही चौकट अनेकदा आदिवासी समाजासाठी हिंसक ठरते. तेथील निसर्ग 'संसाधन' किंवा 'सौंदर्य स्थळ' म्हणून इतरांसाठी उपयोगी ठरत असेलही, पण तेथील लोकांचे ऐतिहासिक, सांस्कृतिक हक्क आणि दैनंदिन जीवन त्यामुळे बाधित होते.

**क. भाभा: Third Space, hybridity मधला 'अवकाश'**

भाभा यांच्या मते संस्कृती किंवा अर्थनिर्मिती ही एका 'थर्ड स्पेस'मध्ये घडते. जिथे मूळ समाज, उपेक्षित आणि स्थानिक यांचा संपर्क होतो आणि नवे संकरित (hybrid) रूप तयार होते.

इथे मूळ भाषा आणि आदिवासी 'अस्तित्व-भाषा' एकत्र येताना दिसतात. उदा., 'इको-टूरिझम', 'हेरिटेज', 'कन्झर्वेशन' हे निसर्गाशी सबंधित शब्द प्रशासनात येतात; पण स्थानिक आदिवासी त्याच निसर्गाला देव-पूर्वज-उदरनिर्वाह म्हणून पूजतात. हाच दोन भिन्न संस्कृती मधला संघर्ष 'थर्ड स्पेस' म्हणून ओळखला जातो. आदिवासी लेखन हे 'प्रतिनिधित्वाची सत्ता' उलटवण्याचा प्रयत्न ठरू शकतो. गेझने ठरवलेल्या अर्थांना आव्हान देऊन निसर्गाला 'आपला' म्हणून पुन्हा बोलते करणे, म्हणजेच अवकाशाचा अर्थ 'संकरीत पण प्रतिरोधक' पद्धतीने पुनर्स्थापित करणे होय. अशी मांडणी भाभा यांच्या सिद्धांताच्या आधारे पुढे येते.

**निष्कर्ष व निरीक्षणे:**

अ. आदिवासी साहित्यातील 'अवकाश' केवळ 'पूर्वानुभव' नसून 'जिवंत पात्र' म्हणून पुढे येते.

आ. 'विकास' या संकल्पनेने आदिवासींचा भौतिक अवकाश हिरावला, ज्यामुळे त्यांच्या सांस्कृतिक घटकांचा ऱ्हास होत आहे.

इ. आदिवासी साहित्य प्रस्थापित सत्तासंबंधांना आणि निसर्ग ओरबाडून केल्या जाणाऱ्या मुख्यधारेतील विकास यातील अवकाशाच्या व्याख्येला प्रतिकार करते.

**संदर्भसूची:**

**प्राथमिक स्रोत:**

१. वाहरू सोनावणे, व्ही. (2021). रोडाली (दुसरी आवृत्ती). विद्रोही सांस्कृतिक चळवळ, महाराष्ट्र.

२. वाहरू सोनवणे: कवी आणि कवित्व मेधा पब्लिशिंग हाऊस.

३. मडावी, बा. (१९९०). आकांत [आत्मकथन]. सुधीर प्रकाशन.

४. गावित, न. (१९९५). आदोर [आत्मकथन]. आज प्रकाशन.

५. गारे, ग. म. (वर्ष). आदिवासींच्या समस्या, विचार आणि विश्लेषण : आदिवासी समस्या आणि बदलते संदर्भ, सुगावा प्रकाशन.

**दुय्यम स्रोत:**

१. मुखर्जी, आर. (२०१८). शिलाँगच्या निवडक कवींच्या साहित्यातून अस्मिता, संस्कृती आणि पर्यावरणाचे उत्तर-वसाहती व पर्यावरण-लक्ष्यी (Eco-critical) वाचन. डायलॉग (Dialog): पंजाब विद्यापीठ, चंदीगडच्या इंग्रजी आणि सांस्कृतिक अभ्यास विभागाचे अर्धवार्षिक पीअर-रिव्ह्यूड जर्नल, (३३), वसंत/शरद (Spring/Autumn). ISSN: 0975-4881.

२. विस्थापन. (२०१९). मराठी विश्वकोश. महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ. https://vishwakosh.marathi.gov.in

३. मारेगांव वार्ता. (2021, December 10). आदिवासी साहित्याचा झंजावात बाबाराव मडावी. https://www.maregaonwarta.com/2021/12/blog-post_70.html

४. शेख, एच. ए. (२०२१, मार्च–एप्रिल). 'आकांत' मराठी आत्मकथेतील चित्रित समस्या. साहित्यसेतू, ११(२), सलग अंक ६२. ISSN: २२४९-२३७२.

५. नस्रुल्लाह मंबरोल (१० नोव्हेंबर, २०२०). एडवर्ड सईद यांच्या 'ओरिएंटलिझम' (Orientalism) ग्रंथाचे विश्लेषण. लिटररिनेस (Literariness.org).

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# आशा बगे यांच्या ' भूमी ' या कादंबरीतील सामाजिक अवकाश

**प्रा. शीतल विजय गाणार**
Satish pradhan dnyanasadhana college, Thane
**Email:** sheetalganar34@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180427
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 127-130
April 2026
**Submitted:** 10 Mar. 2026
**Revised:** 16 Mar. 2026
**Accepted:** 10 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश***

*भूमी या कादंबरीत ग्रामीण समाजजीवन, मानवी नातेसंबंध, स्त्रीचे स्थान, सामाजिक मूल्ये आणि बदलत्या समाजव्यवस्थेचे वास्तववादी चित्रण आढळते. कादंबरीतील सामाजिक अवकाश हा केवळ भौगोलिक परिसरापुरता मर्यादित नसून व्यक्ती, कुटुंब आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचे दर्शन घडवतो.*

उपग्रह तंत्रज्ञानामुळे आज संपूर्ण जग एकमेकांशी जोडले गेले आहे. मोबाईल फोन, इंटरनेट, दूरदर्शन आणि रेडिओ सेवा उपग्रहांच्या मदतीने चालतात. यामुळे माहितीचा प्रसार जलद आणि सोपा झाला आहे.

**२ हवामान अंदाज**

हवामान उपग्रहांच्या मदतीने चक्रीवादळ, पूर, दुष्काळ आणि इतर नैसर्गिक आपत्तींचा अचूक अंदाज घेता येतो. यामुळे लाखो लोकांचे प्राण वाचवणे शक्य झाले आहे.

**३ नेव्हिगेशन प्रणाली**

GPS आणि NavIC सारख्या प्रणालींमुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि सोपा झाला आहे. विमान, जहाजे आणि वाहने या प्रणालींचा मोठ्या प्रमाणावर वापर करतात.

**४ शेती क्षेत्र**

उपग्रहांच्या मदतीने शेतीसाठी महत्त्वाची माहिती मिळते. पर्जन्यमान, जमिनीची स्थिती, पिकांची वाढ यांचा अभ्यास करून शेतकरी योग्य निर्णय घेऊ शकतात.

५.टेलिमेडिसिन आणि दूरशिक्षणाच्या माध्यमातून दुर्गम भागातील लोकांनाही शिक्षण आणि आरोग्य सेवा मिळू शकतात.

**अवकाश संशोधनाचे फायदे:**

1. संप्रेषण व्यवस्था सुधारली
2. हवामान अंदाज अधिक अचूक झाले
3. आपत्ती व्यवस्थापन सुलभ झाले
4. शेती आणि उद्योग क्षेत्राला मदत झाली
5. वैज्ञानिक संशोधनाला चालना मिळाली

**अवकाश संशोधनातील आव्हाने:**

1. अवकाश कचऱ्याची समस्या
2. प्रचंड आर्थिक खर्च
3. सायबर सुरक्षा धोके
4. पर्यावरणीय परिणाम
5. गोपनीयतेचे प्रश्न

**सद्यस्थितीत अवकाश संशोधनाचे महत्त्व:**

आजच्या आधुनिक युगात अवकाश संशोधनाचे महत्त्व अधिक वाढले आहे. अनेक देश अवकाश तंत्रज्ञानाचा उपयोग आर्थिक आणि संरक्षण क्षेत्रात करत आहेत.

भारतानेही चांद्रयान, मंगळयान आणि गगनयान यांसारख्या मोहिमांद्वारे मोठी प्रगती केली आहे. भविष्यात अवकाश पर्यटन, चंद्रावर संशोधन केंद्र आणि इतर ग्रहांवर मानव वसाहती यांसारख्या संकल्पना वास्तवात येण्याची शक्यता आहे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**समारोप (Conclusion):**

अवकाश संशोधनामुळे मानवाच्या जीवनात क्रांतिकारक बदल झाले आहेत. आज अवकाश विज्ञान केवळ वैज्ञानिक संशोधनापुरते मर्यादित नसून ते सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा महत्त्वाचा भाग बनले आहे. संप्रेषण, हवामान अंदाज, शेती, शिक्षण आणि आरोग्य या सर्व क्षेत्रांत अवकाश तंत्रज्ञानामुळे मोठी प्रगती झाली आहे.

भविष्यात अवकाश संशोधनामुळे मानवाला नवीन संधी उपलब्ध होतील. त्यामुळे अवकाश तंत्रज्ञानाचा विकास आणि त्याचा योग्य उपयोग करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संदर्भ (References):**

1. डॉ. रमेश्वर नाईक (2025), परभणी Astronomical Society, परभणी
2. ऋजुता लुकतुके (2021), BBC Marathi News, मुंबई
3. विनोदकुमार शुक्ल (2025), *खिडकीतून शोधलेले अवकाश*, महाराष्ट्र टाइम्स
4. सुजाता बाबर (2025), *सूर्याबाहेरील उद्रेक*, महाराष्ट्र टाइम्स
5. भारतीय अंतरिक्ष संशोधन संस्था (ISRO) – अधिकृत संकेतस्थळ
6. अंतरिक्ष विभाग, भारत सरकार
7. Cosmos – Carl Sagan
8. The Case for Mars – Robert Zubrin
9. Introduction to Space Technology
10. Fundamentals of Space Systems
11. European Space Agency – https://www.esa.int
12. Indian Space Research Organization – https://www.isro.gov.in
13. United Nations Office for Outer Space Affairs – https://www.unoosa.org

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# ठाणे जिल्ह्यातील शेतीतील बदल - एक आर्थिक अभ्यास

**श्री. शत्रुघ्न दशरथ भगत**
सहा. शिक्षक,बी. एन.एन.महाविद्यालय भिवंडी
**Email:** shatrughnabhagat35@gmail.com

**Manuscript ID:** JRD -2026-180439
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 175-178
April 2026
**Submitted:** 12 Mar. 2026
**Revised:** 18 Mar. 2026
**Accepted:** 15 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा:***

*भारताचा प्राचीन इतिहास पहाता कृषिक्षेत्राचा शोध लागल्यापासून दिवसेंदिवस विकास पावला. पूर्वी भटकंती करत असणारा माणूस शेती करू लागाला आणि एका जागी स्थिरावला. सुरुवातीच्या काळात दगडी हत्यार आणि अवजारांचा वापर केला जात होता. त्यानंतर धान्य पिकवण्यासाठी जनावरांचा वापर होऊ लागला. जनावरांपासून मिळणाऱ्या दुध ,मांस इत्यादीही उपयोगात आणले जाऊ लागले. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा मुलभूत कणा मानला गेला. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शेती क्षेत्रामध्ये बदल होताना दिसून आले पहिल्या पंचवार्षिक योजनेत कृषी क्षेत्राला विशेष प्राधान्य देण्यात आले. हरित क्रांती नंतर पिक पद्धती बदलत गेली.एकल पिक पद्धती कडून,संमिश्र पिक पद्धती कडे सुरु झाली. ७०-७५ परंतु काळाच्या ओघात शेती करण्याचे तंत्र बदलत गेले. नवनवीन तंत्रज्ञान विकसित झाले त्याचप्रमाणे पिक पद्धतीही बदलत गेली.ठाणे जिल्हाही याला अपवाद नव्हता. बदलते हवामान ,वाढता खर्च, इत्यादी मुळे शेतकऱ्यांना शेती करताना अनेक आव्हानाचा सामना करावा लागत असताना शेतकऱ्यांनी पिक पद्धती आणि पिक रचना यामध्ये बदल करून समोर आलेल्या आव्हानांचा स्वीकार केला.*

***मुख्य शब्द :*** *कृषी, पिक पद्धती , हवामान बदल , अर्थव्यवस्था*

## प्रस्तावना :

सर्व सजीवांना आवश्यक असलेली दैवी देणगी म्हणजे शेती होय. मनुष्याला आपले अस्तित्व अन्न शिवाय टिकवणे अशक्यप्राय गोष्ट आहे. यावरून शेती क्षेत्र किती महत्वाचे आहे याची कल्पना येते. वाढत्या लोकसंख्येला आवश्यक अन्नधान्य उत्पादन हे एक महत्वाचे आव्हान देशासमोर असताना कृषी क्षेत्रामध्ये बदल होणे अपरिहार्य होते. त्याप्रमाणे काळाच्या ओघातील हे बदल ठाणे जिल्ह्यानेही ही स्वीकारले. हवामान बदल, , निसर्गाचा लहरीपणा वाढते शहरीकरण, विध्वंसक विकास इत्यादीमुळे शेतीच्या उत्पादकतेवर विपरीत परिणाम होत आहे. अनेक दुय्यम उद्योग हे शेती या प्राथमिक क्षेत्रावर अवलंबून आहेत . यामुळे उत्पादन वाढीसाठी आणि नफा मिळविण्याच्या हेतूने पिक पद्धती बदल करून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे याचा आढावा या शोधनिबंधामध्ये करण्याचा प्रयत्न केला आहे.

## संशोधनाची उद्दिष्ट्ये :

१. ठाणे जिल्ह्यातील शेतीमध्ये झालेल्या पारंपरिक व आधुनिक बदलांचा अभ्यास करणे.
२. शेती पद्धतीमध्ये झालेल्या बदलाची कारणमीमांसा करणे.
३. वाढत्या औद्योगीकरणाचा शेती क्षेत्रावर झालेला परिणाम अभ्यासणे.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21272423

**Address for correspondence:**
*श्री शत्रुघ्न दशरथ भगत,सहा. शिक्षक,बी. एन.एन.महाविद्यालय भिवंडी*

**How to cite this article:**
भगत, शत्रुघ्न दशरथ (2026). ठाणे जिल्हयातील शेतीतील बदल - एक आर्थिक अभ्यास. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 175–178. https://doi.org/10.5281/zenodo.21272423*

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधन पद्धती :**

सदर संशोधनासाठी प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाची कृषी विषयक आकडेवारी , महाराष्ट्र शासनाची अंतरजाल साधने यांचा वापर करण्यात आला आहे.

संशोधनाची व्याप्ती : प्रस्तुत संशोधनठाणे जिल्ह्यापुरतेच मर्यादित आहे. तसेच संशोधांचा कालावधी २०१५-२०२५ पर्यंतच मर्यादित आहे. विशेषकरून ठाणे जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील शेतीमध्ये होणाऱ्या बदलांचा आढावा या संशोधनात घेण्यात आला आहे

भारत हा कृषिप्रधान देश असून भारत देशातील बहुतांशी लोकसंख्या कृषी क्षेत्रावर अवलंबून आहे. महाराष्ट्रातील ठाणे जिल्हा हा भातशेतीसाठी प्रसिद्ध आहे. तसेच इतर कडधान्यांचेही उत्पादन घेतले जाते. कोणतेही पिक मातीचा प्रकार , पाऊस ,तापमान इत्यादीवर अवलंबून असते. त्याचप्रमाणे बदलत्या बाजारपेठेचा कल आणि पर्यावरणीय परिस्थिती या अनुरूप शेतकरी आपले पिक उत्पादन निश्चित करीत असतो.

मुंबई पाठोपाठ ठाणे जिल्हा हा महाराष्ट्र राज्यातील आर्थिक दृष्ट्या वेगाने विकसित होत असलेला जिल्हा असून मुंबई नजीक असल्याने औद्योगीकरण ,शहरीकरण आणि सेवा क्षेत्रांमध्ये प्रगती पथावर असलेला जिल्हा आहे.या प्रक्रियेमधून जात असताना जिल्हायतील कृषी क्षेत्रामध्येही तांत्रिक आणि रचनात्मक बदल झालेले दिसून येतात. ठाणे जिल्ह्याची भौगोलिक रचना पाहता भुरचनेच्या दृष्टीने जिल्ह्याचे तीन ठळक विभाग पडतात. पूर्व भागात सह्याद्रिच्या सुमारे १००० मीटर उंचीचा भाग व त्याचा अतीतीव्र पश्चिम उतार ही स्थल वैशिष्ट्ये आढळतात. मातीचे बारीक कान उतारावर वाहून गेल्यामुळे येथील जमीन तांबडी , रेताड आहे.त्यामध्ये पाणी टिकू शकत नाही. मध्यभाग डोंगराळ असून त्याची ऊंची १०० ते ४०० मीटर आहे. येथे जमीन तपकिरी काळसर असून त्यात पाणी टिकू शकते.

ठाणे जिल्ह्याचे हवामान उष्ण , दमट असून आर्द्रता अंतर्गत भागात भासते. सर्वसाधारण वार्षिक तापमान २३° सेल्सियस ते ३१° सेल्सियस च्या दरम्यान आढळते. उत्तरेकडे ते कमी होत जाते[१]

वरील हवामान आणि पर्जन्य तसेच जमिनीचा प्रकार पाहता येथे भात शेती मोठ्या प्रमाणावर केली जाते. तसेच नाचणी , कडधान्ये , भाजीपाला इत्यादीचेही उत्पादन घेतले जाते. ठाणे जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील जमिनीच्या वापरावरून जिल्ह्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांची माहिती घेता येईल.

जमीन लागवड क्षेत्र :

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी ठाणे यांनी दिलेल्या माहितीनुसार २०१६ मध्ये लागवडीखालील क्षेत्र ११०७६८ हेक्टर होते. यापैकी लागवडीखालील एकूण क्षेत्र ६७४६९ हेक्टर होते. यापैकी निव्वळ पेरणी क्षेत्र ६४१९७ हेक्टर होते. यापैकी फक्त ३२७२ हेक्टर क्षेत्र दुसोटा क्षेत्र होते. [२]

सन २०१९-२० पाहता बिगर शेती वापराखालील शेती क्षेत्र ३६३७०होते. सदर वर्षात लागवडी लायक क्षेत्र१११४२९ हेक्टर होते. त्यापैकी लागवडीखालील क्षेत्र ६८६४४ हेक्टर होते.यापैकी निव्वळ पेरलेले क्षेत्र ६६२८१ एवढे होते. तसेच २३६३ हेक्टर दुसोटा (दुबार)क्षेत्र होते. [३]

२०२२ च्या अहवालानुसार ठाणे जिल्ह्यातील बिगर शेती क्षेत्र ३६३७० होते. सदर वर्षात लागवडी लायक क्षेत्र११६७८३ हेक्टर होते. तर लागवडीखालील क्षेत्र ७५७९९ हेक्टर होते.यापैकी निव्वळ पेरलेले क्षेत्र ७१६३५ हेक्टर होते. तसेच ४१६४ हेक्टर दुसोटा क्षेत्र होते.[४]

२०२५ च्या अहवालानुसार बिगर शेती वापराखालील क्षेत्र ३६३७०होते. सदर वर्षात लागवडीखालील क्षेत्र ७२६४१.६१ हेक्टर एवढे झाले. जिल्ह्यातील निव्वळ पेरलेले क्षेत्र ६८२५२.५१ एव्हढे झाले. तसेच ४३८९.१० हेक्टर दुसोटा क्षेत्र झाले. [५]

उपरोक्त जमिनीच्या वापरावरून असे दिसून येते कि, २०१५-१६ मध्ये लागवडीखालील क्षेत्र ६७४६९एव्हढे होते तर २०२४-२५ पर्यंत ५१६२.६१ ने वाढ होऊन ७२६४१.६१ झाले म्हणजे लागवडीखाली क्षेत्रात वाढ स\झालेली दिसून येते. ठाणे जिल्ह्याचे निव्वळ पेरणी क्षेत्र २०१५-१६ मध्ये६४१८७ हेक्टर एवढे होते.त्यामध्ये २०२५ पर्यंत त्यामध्ये ४०६५.५१ हेक्टर एवढी वृद्धी होऊन ६८२५२.५१ एवढे झाले.

दुसोटा क्षेत्राचा विचार करता २०१५-१६मध्ये ३२७२ हेक्टर होते. त्यामध्ये १११७.१ ने वृद्धी होऊन ४३८९.१० एव्हढे झाले. बिगर लागवड क्षेत्र मात्र ३६३७० एवढे कायम राहिलेले दिसून येते. एकंदरीत पाहता ठाणे जिल्ह्यातील शेती क्षेत्रातील जमिनीच्या वापरामध्ये लागवडीखालील क्षेत्र आणि निव्वळ पेरणी क्षेत्रामध्ये वृद्धी दिसून येते.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

पिक उत्पादने :

ठाणे जिल्ह्यातील शेतकरी पारंपारिक पिकांकडून नगदी पिकांकडे वळताना दिसून येतात. ठाणे जिल्ह्याचे हवामान,पर्जन्यमान आणि जमिनीचा प्रकार पाहता सर्वसाधारण पणे भात, वरई, नाचणी, कडधान्ये आणि भाजीपाला यांना पोषक असे वातावरण ही पर्जन्याधारित पिके घेतली जातात. ठाणे जिल्ह्यातून उल्हास आणि वैतरणा नदी वाहत वाहत असली आणि भातसा मोदक सागर , तानसा आणि अप्पर वैतरणा येथील पाणी शहरी भागाला वळविल्यामुळे स्थानिक शेतकऱ्यांना शेतीसाठी मान्सूनवर अवलंबून रहावे लागते.[६] शेती उत्पादनातील बदल अभ्यासताना पिक क्षेत्राचा आढावा घेणे अगत्याचे ठरते.

ठाणे जिल्ह्याचे२०१८-१९ च्या अहवालानुसार एकूण लागवडीखालील ६७४६९हेक्टर क्षेत्रापैकी तृणधान्य पिकाखाली ६३५७३ हेक्टर , कड धान्याखाली २१०६ हेक्टर, फळे व भाजीपाला क्षेत्र १५५९ हेक्टर तर गळीत धान्ये २३० हेक्टर लागवड झाली होती.

२०२०-२१ च्या अहवालानुसार ८१५९० हेक्टर लागवडीखालील क्षेत्रापैकी तृणधान्य पिकाखाली ६०९००हेक्टर, कडधान्याखाली १३४०२ हेक्टर,फळे व भाजीपाला क्षेत्र ६४२० हेक्टर तर गळीत धान्ये ३२९ हेक्टर लागवड झाली होती. २०२१ मध्ये तांदळाचे एकूण उत्पादन १२२३४६ मे. टन झाले होते.[७] २०२३-२४ या वर्षी एकूण लागवडीखालील क्षेत्रापैकी तृणधान्य पिकाखाली ५८८०७ हेक्टर, कडधान्याखाली ५९६३ हेक्टर,फळे व भाजीपाला क्षेत्र ७३४३ हेक्टर तर गळीत धान्ये २४९.४७ हेक्टर लागवड झाली होती. २०२४ या वर्षातील तांदळाचे एकूण उत्पादन १५८५५१ मे. टन झाले होते.

सन २०२४-२५ मध्ये ठाणे जिल्ह्यातील एकूण लागवडीखालील ७२६४१.६१ हेक्टर क्षेत्रापैकी तृणधान्य पिकाखाली ५९७५४.२७ हेक्टर , कडधान्याखाली ५६७९.१६ हेक्टर, फळे व भाजीपाला क्षेत्र ६३८०.३६ हेक्टर तर गळीत धान्ये २७५.३४ हेक्टर लागवड झाली आहे. २०२४-२५ या वर्षातील तांदळाचे एकूण उत्पादन ११७२३७ मे. टन झाले होते.

उपरोक्त माहितीवरून असे दिसून येते कि, २०१८-१९ मध्ये ठाणे जिल्ह्यातील लागवडीखालील क्षेत्र ६३५७३ एवढे होते परंतु २०२३-२४ पर्यंत ४७६६ ने कमी होऊन ५८८०७ झाले तर २०२४ -२५ पर्यंत ५९७५४.२० झाले म्हणजेच एका वर्षात ९४७.२७ हेक्टर ने वाढले. कड धान्ये लागवडीचे प्रमाण मात्र कमी अधिक होताना दिसून आले. २०१८-१९ मध्ये २०१६ हेक्टर असलेले क्षेत्र २०२०-२१ मध्ये १३४०२ म्हणजेच ११२९६ ने वाढलेले दिसून येते. २०२३-२४ मध्ये ते ५९६३ म्हणजेच ७४३९ हेक्टर ने कमी झाले २०२४-२५ मध्ये कड धान्ये २८३.८४ हेक्टर ने कमी झाले.

फळे व भाजीपाला लागवडीखालील क्षेत्र मात्र १५५९ वरून २०२३-२४ पर्यंत ५७९४ हेक्टर ने वृद्धी होऊन ७३४३ एवढे वाढले.यामध्ये भाजीपाला, चिकू ,नारळ, झाले तर २०२४-२५ पर्यंत ९६३ हेक्टरने कमी झाले. एकंदरीत पाहता तृणधान्याचे प्रमाण कमी होऊन फळे व भाजीपाला लागवडीखालील क्षेत्रामध्ये वाढ झालेली दिसून येते.

ठाणे जिल्ह्यातील शेतीतील प्रमुख बदल :

उपरोक्त विश्लेषणावरून ठाणे जिल्ह्यातील शेतीमध्ये बदल घडून आलेले दिसून येतात त्यातील काही प्रमुख बदल पुढील प्रमाणे आहेत.

1. ठाणे जिल्ह्यतील शेतकऱ्यांचा कल पारंपारिक शेतीकडून व्यापारी शेतीकडे :

   ठाणे जिल्ह्यामध्ये तृणधान्य लागवडीखालील क्षेत्र कमी होऊन फळ व पालेभाज्या लागवडीमध्ये वृद्धी दर्शविते म्हणजेच शेतकऱ्यांचा उत्पादनाचा कल पारंपारिक शेतीकडून व्यापारी शेतीकडे जसे भाजीपाला, चिकू ,नारळ यासारख्या आर्थिक फायदा मिळवून देणाऱ्या पिकांकडे वळला आहे.

2. आधुनिक तंत्र ज्ञानाचा वापर :

   ठाणे जिल्ह्यामध्ये पारंपारिक नांगर तसेच मनुष्यबळाचा वापर करून शेती केली जात होती त्यामध्ये बदल होऊन ट्रक्टर ,भात,मळणी मशीन इत्यादी तांत्रिक साधनाचा वापर, रायानिक खते, सेंद्रिय खते आणि कीटक नाशके करून शेती केली जाते . तसेच संकरीत बियाण्यांचा वापर केला जात आहे. जे जास्त उत्पन्न मिळविण्यासाठी उपयुक्त ठरतात.

3. शेतीपूरक व्यवसाय :

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

ठाणे जिल्ह्यातील शेतीला हवामान बदल , अवकाळी पाऊस, यांसारख्या आव्हानांना सामोरे जावे लागते. तसेच काही ठिकाणी शेती फक्त चार महिने चालते त्यामुळे शेतकरी फक्त शेती व्यवसायावर अवलंबून न राहता पशुपालन, दुग्धपालन ,कुक्कुटपालन, मधुमक्षिका पालन, यासारख्या शेतीपूरक व्यवसाय करताना दिसून येतात.[८]

४.शहरीकरण आणि औद्योगीकरण :

वाढत्या शहरीकरणामुळे शेती लागवडीखालील क्षेत्र कमी होताना दिसून येते. त्याचप्रमाणे ठाणे जिल्ह्यामध्ये औद्योगिक विकास झाल्यामुळे ठाणे आणि भिवंडी या पट्ट्यामध्ये वेअर हाउस मोठ्या प्रमाणावर आल्यामुळे शेतजमीन गोदामामध्ये रुपांतरीत होत आहेत. त्यामुळे शेती क्षेत्र कमी होत आहे. तेच लहरी पाऊस ,हवामान बदल यामुये शेतकरी शर्ती सोडून कार्कःने आणि वेअर हाउस मध्ये काम करताना दिसून येतात.[९].

५. सेंद्रिय पिके घेण्याकडे कल:

सेंद्रिय उत्पादनांना आता अधिक बाजारभाव मिळत असल्याने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड आणि शहापूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा कल सेंद्रिय पिके घेण्याकडे वळलेला दिसून येतो.

६ . जमिनीच्या किमतीमध्ये वाढ:

वेअर हाउस, आणि वाढते शहरीकरण यामुळे जमिनीच्या किंमतीमध्ये प्रचंड प्रमाणात वाढ झाली आहे.त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन शेती सुपीक जमिनीवर औद्योगीकरण वाढले आहे.

निष्कर्ष:

उपरोक्त माहितीवरून आपणास असे दिसून येते कि ठाणे जिल्ह्यातील पारंपारीक शेतीकडून फळे व पालेभाज्यांकडे अशा आर्थिक नफा वाढून देणाऱ्या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्रात वाढ झालेली दिसून येते.पूर्वी उपजीविकेसाठी केली जाणाऱ्या शेतीकडे आज व्यापारी दृष्टीकोनातून पहिले जाते. त्याचे मुख्य कारण म्हणजे बाजार रचनेतील व मागणीतील बदल होय. वाढते शहरीकरण व औद्योगिक वसाहतींमुळे ठाणे जिल्ह्यातील शेतीचे प्रचंड भाव वाढत असल्याचे दिसून येते. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील विकासाला बळकटी मिळते परंतु त्याचे कृषी क्षेत्रावर विपरीत परिणाम होऊन पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. शेती मध्ये तंत्रज्ञानाचा वापर वाढला आहे. शासनाने शेतीला केंद्रस्थानी ठेवल्याने ग्रामीण विकासाला आणि अर्थव्यवस्थेला आर्थिक बळकटी मिळेल.

**शिफारशी:**

1. शेतीसाठी सिंचन व्यवस्थेमध्ये सुधारणा केल्यास दुसोटा लागवडीखाली क्षेत्र वाढून पाण्याचा कार्यक्षम वापर करता येईल.
2. लहान शेतकऱ्यांसाठी विविध पिकांचे शास्त्रशुद्ध प्रशिक्षण ,कर्जसहाय्य आणि बाजारपेठेचे ज्ञान देण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे.
3. शेती मालावर र आधारित उद्योग स्थापन केल्यास स्थानिक रोजगार निर्मिती होईल.
4. आधुनिक कृषी तंत्रज्ञान आणि सुधारित बियाणे यामुळे यांत्रिकीकरणाला प्रोत्साहन देणे.

**संदर्भसूची:**

१.के. सागर , ‘महाराष्ट्रातील जिल्हे ‘अनिरुद्ध पब्लिकेशन हाऊस , पुणे, २००१, पृ. क्र . ५९
२. ठाणे जिल्हा सामाजिक व अर्थी समालोचन २०१६ , महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ४,५
३.ठाणे जिल्हा सामाजिक व अर्थी समालोचन २०२० , महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ४,५
४. ठाणे जिल्हा सामाजिक व अर्थी समालोचन २०२३ , महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ,५
५. ठाणे जिल्हा सामाजिक व अर्थी समालोचन २०२५ , महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ,५
६. Agricultureindiandistricts.in retrieved on 20/3/2026
७. ठाणे जिल्हा सामाजिक व अर्थी समालोचन २०२१ , महाराष्ट्र शासन, पृ. क्र. ,५
८. मुलाखत –श्री. वासुदेव पाटील ,मु. कुंभार्ली, ता. कल्याण, जि. ठाणे दि. १६/०३/२०२३
९. मुलाखत-श्री अक्षय घरत ,अनगाव, ता. भिवंडी, जिल्हा- ठाणे दि. १८/०३/२०२६

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची भूमिका व आव्हाने

**कु. पूजा यशवंत जाधव**
सहाय्यक ग्रंथपाल,मातोश्री उषाताई जाधव इंस्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सेंटर, भिवंडी
**Email:** poojayj1297@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180440
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 179-181
April 2026
**Submitted:** 12 Mar. 2026
**Revised:** 18 Mar. 2026
**Accepted:** 15 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***सारांश (Abstract)***

*अवकाश संशोधन क्षेत्रात निर्माण होणाऱ्या प्रचंड वैज्ञानिक व तांत्रिक माहितीचे संकलन, व्यवस्थापन व पुनर्प्राप्तीसाठी डिजिटल ग्रंथालये महत्त्वाची भूमिका बजावतात. प्रस्तुत अभ्यासात NASA, ISRO आणि European Space Agency यांच्या डिजिटल प्रणालींचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला. निष्कर्षानुसार मुक्त प्रवेश धोरण, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड तंत्रज्ञान व मेटाडेटा मानके डिजिटल ग्रंथालये अधिक प्रभावी करतात; परंतु तांत्रिक, आर्थिक व धोरणात्मक अडचणी ही मुख्य आव्हाने आहेत.*

***किवर्ड (Keywords)*** *अवकाश संशोधन, डिजिटल ग्रंथालय, माहिती व्यवस्थापन, मुक्त प्रवेश, मेटाडेटा, कृत्रिम बुद्धिमत्ता, ज्ञान व्यवस्थापन*

**प्रस्तावना**

२१व्या शतकातील विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे अवकाश संशोधन क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर डेटा निर्माण होत आहे. उपग्रह प्रक्षेपण, अंतराळ मोहिमा, ग्रह-अभ्यास, पृथ्वी निरीक्षण आणि हवामान बदल यांसारख्या क्षेत्रांतून दररोज टेराबाइट्स डेटा तयार होतो.

या माहितीचे संकलन, वर्गीकरण, जतन व पुनर्प्राप्ती करण्याची जबाबदारी डिजिटल ग्रंथालयांवर असते. ही ग्रंथालये केवळ ई-पुस्तकांपुरती मर्यादित नसून संशोधन लेख, उपग्रह डेटा, तांत्रिक अहवाल, प्रतिमा, नकाशे व खुली माहिती यांचे एकत्रित ज्ञानसंच असतात.

अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालये संशोधक, विद्यार्थी व धोरणनिर्माते यांना विश्वसनीय व त्वरित माहिती उपलब्ध करून देतात आणि मौल्यवान डेटाचे दीर्घकालीन जतन सुनिश्चित करतात.

**साहित्य समीक्षा (Review of Literature)**

डिजिटल ग्रंथालये व माहिती व्यवस्थापनावर अनेक अभ्यास झाले आहेत. Christine L. Borgman (2015) यांनी बिग डेटा व्यवस्थापनातील आव्हाने स्पष्ट केली, तर Clifford Lynch (2003) यांनी डिजिटल ग्रंथालयांची संकल्पना व विकास विशद केला.

अवकाश क्षेत्रात NASA Technical Reports Server हे मुक्त तांत्रिक अहवालांचे महत्त्वाचे व्यासपीठ आहे. तसेच European Space Agency चे Science Data Archive संशोधकांसाठी उपयुक्त स्रोत आहे. भारतात ISRO विविध मोहिमांचा डेटा सार्वजनिक करते; मात्र या प्रणालींच्या आव्हानांवर मर्यादित संशोधन उपलब्ध आहे.

संशोधन समस्या (Research Problem)

अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालये उपयुक्त असली तरी वाढता डेटा, तांत्रिक गुंतागुंत आणि धोरणात्मक मर्यादा यांमुळे माहिती व्यवस्थापनात अडचणी निर्माण होत आहेत.

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

Quick Response Code:
Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21272472

**Address for correspondence:**
*कु. पूजा यशवंत जाधव,सहाय्यक ग्रंथपाल,मातोश्री उषाताई जाधव इंस्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च सेंटर, भिवंडी*

**How to cite this article:**
जाधव, पूजा यशवंत (2026). अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची भूमिका व आव्हाने. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 179–181.* https://doi.org/10.5281/zenodo.21272472

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

**संशोधन उद्दिष्टे**
१. अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची भूमिका स्पष्ट करणे.
२. माहिती व्यवस्थापनातील तांत्रिक घटकांचा अभ्यास करणे.
३. प्रमुख आव्हानांचे विश्लेषण करणे.
४. भविष्यातील सुधारणा उपाय सुचविणे

गृहीतके (Hypotheses)

H1: मुक्त प्रवेश धोरण संशोधनाची गती वाढवते.

H2: कृत्रिम बुद्धिमत्ता माहिती पुनर्प्राप्ती सुधारते.

H3: तांत्रिक कमतरता डिजिटल ग्रंथालयांच्या कार्यक्षमतेवर परिणाम करते.

संशोधन पद्धती (Research Methodology)

पद्धत: वर्णनात्मक व तुलनात्मक संशोधन
डेटा स्रोत: अधिकृत संकेतस्थळे, वार्षिक अहवाल, संशोधन लेखनमुना: NASA, ISRO, ESA डिजिटल प्रणाली
विश्लेषण: गुणात्मक विश्लेषण व तुलनात्मक अभ्यास
अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची संकल्पना

अवकाश संशोधनाशी संबंधित माहितीचे इलेक्ट्रॉनिक संकलन, व्यवस्थापन व प्रसारण करणारी प्रणाली म्हणजे अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालय.

उदाहरणार्थ:

• NASA Technical Reports Server

• ISRO चे डिजिटल पोर्टल

• European Space Agency चे डेटा संग्रह

ही ग्रंथालये खालील वैशिष्ट्यांनी ओळखली जातात:
• ऑनलाइन प्रवेश
• शोधयंत्र
• मेटाडेटा सूचीकरण
• बहुभाषिक माहिती
• मुक्त प्रवेश धोरण

**संशोधनाचे उद्दिष्टे**
१. अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची संकल्पना समजावणे
२. त्यांची भूमिका व उपयुक्तता दाखवणे
३. माहिती व्यवस्थापनातील तांत्रिक बाबी अभ्यासणे
४. प्रमुख आव्हाने विश्लेषित करणे
५. भविष्यातील सुधारणा व उपाय सुचवणे

अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांची भूमिका
संशोधनासाठी माहिती उपलब्ध करून देणे

वैज्ञानिकांना ताज्या लेखांपर्यंत त्वरित पोहोच, उपग्रह डेटा, हवामान माहिती व अंतराळ मोहिमांचे अहवाल उपलब्ध करून संशोधनास मदत करणे.

- ज्ञानाचे दीर्घकालीन जतन (Digital Preservation)

  अवकाश मोहिमांचे दस्तऐवज, प्रतिमा व डेटा सुरक्षित ठेवून ऐतिहासिक माहिती जतन करणे आवश्यक आहे.

- मुक्त प्रवेश (Open Access) प्रोत्साहन

  संस्था जसे की NASA माहिती खुली करून विज्ञान लोकाभिमुख करतात.

- शैक्षणिक सहाय्य

  विद्यार्थ्यांसाठी ई-संसाधने, मल्टिमीडिया, ई-पुस्तके व संशोधन डेटाबेस उपलब्ध करणे.

- माहिती साक्षरता वाढविणे

वापरकर्त्यांना माहिती शोधणे, मूल्यांकन करणे आणि योग्य संदर्भ देणे शिकवणे.

माहिती व्यवस्थापन तंत्र
मेटाडेटा व सूचीकरण

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

माहिती व्यवस्थापन तंत्र (संक्षेप)

Dublin Core, MARC21 सारख्या मेटाडेटा मानकांचा वापर करून माहितीचे अचूक वर्गीकरण व सूचीकरण करणे.

बिग डेटा व क्लाऊड तंत्रज्ञान

प्रचंड उपग्रह व वैज्ञानिक डेटा साठवण्यासाठी क्लाऊड स्टोरेज व डेटा ॲनालिटिक्सचा वापर.

कृत्रिम बुद्धिमत्ता (AI)

AI च्या साहाय्याने प्रतिमा वर्गीकरण, स्वयंचलित टॅगिंग, शोध सुधारणा व डेटा विश्लेषण केले जाते.

अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालयांपुढील आव्हाने

माहितीचा प्रचंड वेगाने वाढणारा साठा

दररोज निर्माण होणाऱ्या मोठ्या डेटाचे व्यवस्थापन कठीण होते.

- तांत्रिक पायाभूत सुविधांची गरज

  उच्च क्षमतेचे सर्व्हर, सुरक्षित नेटवर्क व बॅकअप प्रणाली आवश्यक.

- डिजिटल संरक्षण (Digital Preservation) समस्या

  फाईल फॉरमॅट बदल आणि सॉफ्टवेअर कालबाह्यता मुळे माहिती गमावण्याचा धोका.
  कॉपीराइट व धोरणात्मक मर्यादा

  राष्ट्रीय सुरक्षा, पेटंट आणि बौद्धिक संपदा हक्कांमुळे काही डेटा उपलब्ध होत नाही.

- आर्थिक मर्यादा

  उच्च दर्जाचे डिजिटल ग्रंथालय तयार करण्यासाठी मोठा निधी आवश्यक.

- माहितीची प्रामाणिकता (Authenticity)

  डेटामध्ये फेरफार होऊ नये यासाठी सायबर सुरक्षा आवश्यक आहे.

- तुलनात्मक दृष्टिकोन

  विकसित देशांची ग्रंथालये तांत्रिकदृष्ट्या सक्षम, तर विकसनशील देशांमध्ये संसाधनांची कमतरता;

उदा., ISRO – मर्यादित संसाधने, European Space Agency – व्यापक मुक्त डेटा धोरण.

भविष्यातील दिशा

1.कृत्रिम बुद्धिमत्ता वाढवणे
2.ब्लॉकचेनद्वारे सुरक्षा
3.मुक्त डेटा धोरणांचा विस्तार
4.आंतरराष्ट्रीय सहकार्य
5. हरित डेटा सेंटर संकल्पना

**निष्कर्ष**

अवकाश डिजिटल ग्रंथालये संशोधन, शिक्षण व विज्ञान प्रसारासाठी महत्त्वाची आहेत. वाढता डेटा, तांत्रिक व आर्थिक आव्हाने व सायबर सुरक्षा योग्यरित्या हाताळणे आवश्यक. भविष्यात AI, क्लाऊड व मुक्त प्रवेश धोरणांनी ती अधिक सक्षम व लोकाभिमुख होतील.

भविष्यात कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाऊड तंत्रज्ञान व मुक्त प्रवेश धोरण यांच्या साहाय्याने अवकाश विषयक डिजिटल ग्रंथालये अधिक सक्षम व लोकाभिमुख बनतील.

**संदर्भ**

NASA – Official Digital Archives

2. ISRO – Digital Resources Portal

3. European Space Agency – Science Data Archive

4. Borgman, C. L. (2015). Big Data, Little Data, No Data.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

Original Article

# अंतरिक्ष कचरा आणि भविष्यातील आव्हाने

**श्री. सुरेश रतन अहिरे,**
शिक्षक, पर्यावरण विभाग,बी.एन.एन. कनिष्ठ महाविद्यालय, भिवंडी,(कला, वाणिज्य, विज्ञान)
**Email:** sursing2222@gmail.com

**Manuscript ID:**
JRD -2026-180441
ISSN: 2230-9578
Volume 18
Issue 4 (XV)
Pp. 182-188
April 2026
**Submitted:** 12 Mar. 2026
**Revised:** 18 Mar. 2026
**Accepted:** 15 Apr. 2026
**Published:** 30 April 2026

***गोषवारा (Abstract):***

*अंतरिक्ष संशोधनावर हे एक उत्तम संशोधन निबंध ठरू शकतो. अनेक संशोधकांनी व अवकाश संशोधन करणाऱ्या शासकीय व खाजगी संस्थांनी अभ्यासपूर्वक आपला अहवाल आणि संशोधन निबंध प्रसिद्ध केले आहे. वरील सर्व घटकांच्या मदतीने हा शोध निबंध तयार करण्यात आले आहे. खऱ्या अर्थाने अंतरिक्ष कचरा पृथ्वीच्या कक्षेत असलेल्या कार्यरत नसलेली मानवनिर्मित वस्तू-उपग्रह, अंतरिक्ष मोहिमा आणि कक्षीय कार्यप्रणालीच्या शाश्वततेला अधिक धोका निर्माण होत आहे.मुख्यत:अंतरिक्ष कचऱ्यामध्ये निष्क्रिय झालेले उपग्रह, रॉकेटचे टप्पे आणि उपग्रहांची टक्कर किंवा स्फोटांमुळे निर्माण झालेले लहान तुकडे यांचा समावेश होतो. सन 1957 मध्ये स्पुटनिक- 1 या पहिल्या उपग्रहाच्या प्रक्षेपणानंतर, शासकीय आणि खाजगी क्षेत्रातील अंतरिक्ष संशोधन प्रक्रियेमुळे जगात उपग्रहांच्या प्रक्षेपणाची स्पर्धा निर्माण झाली आहे. यामुळे पृथ्वीच्या कक्षेत अतिवेगाने अंतरिक्ष कचऱ्याचे संचयन व वाढ सातत्याने होत आहे.पृथ्वीच्या खालच्या कक्षेमध्ये सक्रिय उपग्रहांची वाढती संखेमुळे मानवापुढे मोठे आव्हान निर्माण झाले आहे.*

*सदर संशोधनात अंतरिक्ष कचऱ्याचे प्रमुख स्रोत, प्रकार, परिणाम आणि आव्हाने यांचा अभ्यास करण्यात आले आहे, तसेच सध्याच्या प्रतिबंधक धोरणे आणि शाश्वत व्यवस्थापन पद्धतींचाही आढावा घेण्यात आला आहे. यात आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे, पृथ्वीच्या कक्षेतील कचऱ्याचा शोध घेणे व कमी करण्यासंबंधी तांत्रिकदृष्ट्या नवीन उपाययोजना व जबाबदार अंतरिक्ष उपक्रमांना प्रोत्साहन देणाऱ्या धोरणात्मक चौकटींची भूमिका तपासली आहे. तसेच पुढील भागात संप्रेषण, नेव्हिगेशन, हवामान अंदाज आणि वैज्ञानिक मोहिमांसाठी अंतरिक्ष कचरा वाढीचे आर्थिक आणि सुरक्षाविषयक परिणाम अधोरेखित केले आहेत. अंतरिक्ष पर्यावरणाची सुरक्षा, विश्वासार्हता आणि दीर्घकालीन शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी, तसेच भावी पिढ्यांसाठी त्याचे संरक्षण करण्यासाठी अंतरिक्ष कचऱ्याचे प्रभावी व्यवस्थापन अत्यंत आवश्यक आहे.*

***मुख्य शब्द Keywords :*** *अंतरिक्ष कचरा, अंतरिक्ष पर्यावरण, उपग्रह सुरक्षा, प्रतिबंधक धोरणे, अंतरिक्ष धोरण*

## प्रस्तावना (Introduction)

प्राचीन काळापासून ते आज पर्यंत मानवाने पृथ्वीबरोबरच अवकाशात देखील आपले अस्तित्व सिद्ध केले आहे. मानव आपल्या कल्पक वृत्तीमुळे अनाधिकाळापासूनच अवकाशाचे निरीक्षण अनुमान व अध्ययन करत आला आहे. खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात मानवाने अवकाशात पोहोचण्याचे पहिले यशस्वीप्रयत्न सन 1957 मध्ये स्पुटनिक- 1 च्या प्रक्षेपणापासून व 1958 च्या नासाच्या अंतरिक्ष प्रक्षेपण मोहिमेनंतर जगामध्ये उपग्रह प्रक्षेपणाची तीव्र स्पर्धा निर्माण झाली आहे. सततच्या मानवाच्या हस्तक्षेपामुळे पृथ्वीची कक्षा अधिकाधिक व्यापून गेली आहे. आज अवकाशात सुस्थितीत असलेल्या उपग्रहांसह, टाकून दिलेले रॉकेट सामुग्री,

Quick Response Code:

***Creative Commons (CC BY-NC-SA 4.0)***
*This is an open access journal, and articles are distributed under the terms of the Creative Commons Attribution-NonCommercial-ShareAlike 4.0 International Public License, which allows others to remix, tweak, and build upon the work noncommercially, as long as appropriate credit is given and the new creations ae licensed under the idential terms.*

**Address for correspondence:**
*श्री. सुरेश रतन अहिरे,शिक्षक, पर्यावरण विभाग ,बी.एन.एन. कनिष्ठ महाविद्यालय, भिवंडी,*
*(कला, वाणिज्य, विज्ञान)*

Website: https://jrdrvb.org/
DOI: 10.5281/zenodo.21272519

**How to cite this article:**
अहिरे, सुरेश रतन (2026). अंतरिक्ष कचरा आणि भविष्यातील आव्हाने. *Journal of Research & Development, 18(4(XV)), 182–188.* https://doi.org/10.5281/zenodo.21272519

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

निष्क्रिय झालेली उपग्रह आणि तुकडे होऊन निर्माण झालेला कचरा जमा होत गेला आहे. त्यामुळे पृथ्वीचे कक्षीय वातावरण धोकादायक बनले आहे. अंतरिक्ष कचऱ्यामुळे सक्रिय उपग्रह, अंतरिक्ष यान आणि आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष स्थानकासाठी धोका निर्माण करत आहे. तसेच भविष्यातील अंतरिक्ष अन्वेषणात देखील मोठा अडथळा निर्माण होऊ शकतो. अंतराळातील अतिशय सूक्ष्म ते सुक्ष्म कचऱ्याचे तुकडेही 7–8 किमी प्रति सेकंद वेगाने प्रवास करतात, धडकेच्या वेळी विनाशकारी नुकसान करण्याइतकी गतिज ऊर्जा त्या तुकड्यांमध्ये असते. अशा तुकड्यांमुळे मोठी हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. द्यायचे झालेच तर महाराष्ट्रातील विदर्भ विभागांमध्ये अवकाशातून पडलेल्या धातू सदृश्य वस्तूमुळे पृथ्वीच्या भूपृष्ठावरती देखील धोका निर्माण झालेला आहे. यासारखे अनेक प्रकार घडतांना दिसून येत आहे.अधुनिक काळात

उपग्रह समूह आणि व्यावसायिक अंतरिक्ष उपग्रह प्रक्षेपणाच्या वेगवान वाढीमुळे पृथ्वीच्या खालच्या कक्षेमध्ये (लो अर्थ ऑर्बिटमध्ये) उपग्रहांची गर्दी वाढीस लागली आहे, ज्यामुळे धडक अर्थात टक्कर होण्याची शक्यता वाढली आहे. उपग्रहांच्या धडकांपासून ते अँटी-सॅटेलाइट (ASAT) चाचण्यांपर्यंत अनेक घटनांनी कचरा निर्मितीत लक्षणीय भर पडली आहे, ज्यामुळे समन्वित जागतिक कृतीची आवश्यकता अधोरेखित होते. अंतरिक्ष कचर्याचे स्रोत, जोखीम आणि व्यवस्थापन समजून घेणे हे वर्तमान आणि भावी पिढ्यांसाठी सुरक्षित, विश्वासार्ह आणि जबाबदार अंतरिक्ष कार्य सुनिश्चित करण्याची अत्यावश्यकनिर्माण झाली आहे.





**ध्येय आणि उद्दिष्ट (Aim and Objectives)**

**ध्येय (Aim):**

पृथ्वीच्या कक्षीय वातावरणातील अंतरिक्ष कचऱ्याचे प्रकार, स्रोत, जोखीम आणि शाश्वत व्यवस्थापन धोरणांचा अभ्यास करणे.

**उद्दिष्टे (Objectives):**

1.अंतराळातील कचऱ्याचे परिणाम समजून घेणे.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

2.अंतरिक्ष कचऱ्यामुळे उद्भवणाऱ्या कार्यात्मक आणि पर्यावरणीय जोखमींचे मूल्यमापन करणे.

3.कचरा प्रतिबंधासाठी सध्याच्या तांत्रिक आणि धोरणात्मक उपाययोजनांचा अभ्यास करणे.

4.अंतरिक्ष कार्यप्रणालीमध्ये दीर्घकालीन शाश्वततेला प्रोत्साहन देण्यासाठी धोरणांचा शोध घेणे.

5.कचऱ्यामुळे अंतराळात झालेल्या बदलांचे निरीक्षण करणे.

6.अंतरिक्ष कचऱ्याचे प्रमुख स्रोत आणि प्रकार ओळखणे.

**अभ्यासपद्धती (Methodology)**

या अभ्यासात दुय्यम स्वरूपाच्या माहितीचे विश्लेषणात्मक वापर करण्यात आले असून, शैक्षणिक साहित्य, उपग्रह मोहिमांचे अहवाल, अंतरिक्ष संस्थांची प्रकाशने आणि संदर्भ साहित्य अभ्यासांचा आढावा घेण्यात आला आहे. इस्त्रो, नासा, इसा,(ISRO, NASA, ESA, ) आणि इतर आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष संस्थांकडील माहितीचे विश्लेषण करून अंतरिक्ष कचऱ्याची निर्मिती, निरीक्षण, निष्क्रिय झालेल्या उपग्रहांची विल्हेवाट आणि व्यवस्थापन यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

**अभ्यासपद्धतीचे मुख्य मुद्दे ( Main Points of Methodology ):**

1.साहित्य समीक्षा (Literature Review): अंतरिक्ष कचरा आणि कक्षीय व्यवस्थापनावरील पुस्तके, संशोधन लेख आणि तांत्रिक अहवालांचा सल्ला.

2.माहिती विश्लेषण (Data Analysis): कक्षीय कचऱ्याच्या डेटाबेस, धडक नोंदी आणि उपग्रह निरीक्षण आकडेवारीचे परीक्षण.

3.धोरण समीक्षा (Policy Review): कचरा प्रतिबंधासाठी आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे आणि नियामक चौकटींचे विश्लेषण.

4.शाश्वतता मूल्यांकन (Sustainability Assessment): अंतरिक्ष पर्यावरणाच्या दीर्घकालीन सुरक्षितता आणि शाश्वततेस प्रोत्साहन देणाऱ्या धोरणांचे मूल्यमापन.

**अर्थ ( Meaning )**

अर्थ : अंतरिक्ष कचरा म्हणजे पृथ्वीच्या कक्षेत फिरणारे निकामी उपग्रह, रॉकेटचे भाग आणि इतर मानवनिर्मित वस्तू होय. मानवनिर्मित आवकाशात निर्माण झालेली अप्पती म्हणजे अंतरिक्ष कचरा अर्थात स्पेस डेब्रिज होय.

विश्लेषण आणि चर्चा (Analysis and Discussion)

**विश्लेषण : ( Analysis )**

मानवाने आवकाशात घेतलेल्या गरुड झेपेमुळे पृथ्वीच्या कक्षेत मानवनिर्मित वस्तू, निकामी झालेले उपग्रह, रॉकेटचे तुकडे आणि कृत्रिम सामग्री मोठ्या प्रमाणात जमा होऊन कचऱ्याचे ढिगारे लाखो टनांनी साचले आहे. त्यामुळे भविष्यातील उपग्रह प्रक्षेपणास, अवकाश मोहिमेस आणि अंतराळ पर्यटनाला मोठा धोखा निर्माण झाला आहे.

अवकाशातील सरासरी कचऱ्याचे प्रमाण समजून घेण्यासाठी आजवर झालेल्या विविध शोध निबंध व अंतरीक्ष अहवालांच्या आधार घेण्यात आले आहे. सोबत काही राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय अंतरिक्ष उपग्रह संशोधन करणाऱ्या शासकीय आणि खाजगी संस्थांच्या प्रसिद्ध झालेल्या अहवालाची देखील मदत घेण्यात आलेली आहे.

**1) अंतरिक्ष कचऱ्याचे प्रकार आणि स्रोत (Types and Sources of Space Debris)**

अंतरिक्ष कचऱ्यामध्ये विविध मानवनिर्मित वस्तूंचा समावेश होतो:

1.निष्क्रिय उपग्रह (Defunct Satellites): मोहिम पूर्ण झाल्यानंतर कक्षेत राहिलेले कार्यरत नसलेले उपग्रह.

2.रॉकेट बॉडीज (Rocket Bodies): प्रक्षेपण वाहनांचे म्हणजे रॉकेटचे टाकून दिलेले टप्पे.

3.तुकडे झालेला कचरा (Fragmentation Debris): धडक, स्फोट किंवा उपग्रह तुटल्यामुळे निर्माण झालेले तुकडे.

4.सूक्ष्मकण (Micro particles): रंगाचे तुकडे, बोल्ट किंवा उच्च वेगाने प्रवास करणारे लहान तुकडे, जे गंभीर धडक जोखीम निर्माण करतात. कचऱ्याचे प्राथमिक स्रोत म्हणजे निकामी उपग्रह, विरोधी उपग्रह अर्थात अँटी-सॅटेलाइट (ASAT) चाचण्या आणि रॉकेट टप्प्यांची अयोग्य विल्हेवाट.

**2) अंतरिक्ष कचऱ्यामुळे निर्माण होणारे धोके (Risks Posed by Space Debris)**

1.टक्कर किंवा धडकमुळे निर्माण झालेली जोखीम (Collision Hazards): मिलीमीटर आकाराचा कचरा देखील उच्च कक्षीय वेगामुळे उपग्रह किंवा अंतरिक्ष यानांना गंभीर नुकसान करू शकतो.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

2.कार्यात्मक जोखीम (Operational Risks): कचऱ्यामुळे धडक टाळण्यासाठी हालचाली कराव्या लागतात, ज्यामुळे उपग्रह संचालनाची गुंतागुंत आणि खर्च वाढतो.

3.केसलर सिंड्रोम (Kessler Syndrome): धडकांमुळे अधिक कचरा निर्माण होणारी साखळी प्रतिक्रिया, ज्यामुळे कक्षीय धोके झपाट्याने वाढतात आणि भविष्यातील मोहिमा धोक्यात येतात.

**3) प्रतिबंधक धोरणे (Mitigation Strategies)**

1.कार्यकाल समाप्तीनंतर विल्हेवाट (End-of-Life Disposal): उपग्रहांना पृथ्वीच्या वातावरणात परत आणणे किंवा त्यांना निश्चित "ग्रेव्हयार्ड" कक्षेत हलविणे.

2.धडक टाळणारी प्रणाली (Collision Avoidance system) कचऱ्याचे सातत्याने निरीक्षण आणि कार्यरत उपग्रहांची वेळेवर हालचाल.

3.सक्रिय कचरा हटविणे (Active Debris Removal - ADR): जाळी, रोबोटिक हात किंवा लेझरसारख्या तंत्रज्ञानाचा वापर करून मोठ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे.

**4) नियामक मार्गदर्शक तत्त्वे (Regulatory Guidelines):**

कचरा निर्मिती मर्यादित करण्यासाठी आणि जबाबदार पद्धती प्रोत्साहित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे आणि अंतरिक्ष संस्थांकडून स्वीकारलेली आंतरराष्ट्रीय मानके.

**5) कचरा प्रतिबंधासाठी सध्याच्या तांत्रिक उपाययोजना**

तांत्रिक उपाय मुख्यतः उपग्रह डिझाइन, ऑपरेशन हे उपाय कचरा निर्मिती रोखतात आणि अस्तित्वात असलेल्या कचऱ्याचे प्रमाण कमी करतात.

1.डिझाइन फॉर डिमाइज (Design-for-Demise): उपग्रहांची रचना अशी असावी की कार्यकाळ संपल्यावर वातावरणात पूर्णपणे जळून नष्ट होऊ शकतील; उदाहरणार्थ, अल्युमिनियम संरचना आणि इंधन/बॅटरी डिस्चार्ज.

2.पॅसिव्हेशन आणि ब्रेक-अप प्रतिबंध: इंधन व्हेंटिंग, बॅटरी डिस्चार्ज आणि फेल्युअर मोड विश्लेषणाने स्फोट टाळणे; IADC नुसार 10^{-3} पेक्षा कमी प्रायबेबिलिटी लक्ष्य.

3.टक्कर किंवा धडक टाळणी प्रणाली (Collision Avoidance): SSA (Space Situational Awareness) डेटा वापरून AI-आधारित ऑटोनॉमस मॅन्युएव्हर्स; न्यूरोमॉर्फिक इमेजिंग आणि रिइन्फोर्समेंट लर्निंगद्वारे 95%+ अचूकता.

4.सक्रिय कचरा हटविणे (ADR):

5.नेट कॅप्चर (ESA Remove DEBRIS), हार्पून (Airbus), रोबोटिक आर्म्स (Clear Space CLEAR मिशन).

6.ड्रॅग सेल्स आणि टग सॅटेलाइट्स; Astroscale ADRAS-J2 (JAXA) सारखे मिशन 2026 पर्यंत रॉकेट बॉडी डिऑर्बिट करणार.

7.उद्भवते तंत्रज्ञान: टेराहर्ट्झ सेन्सर्स (DebriSense-THz), ISAC (Integrated Sensing and Communication) सूक्ष्मकण शोधण्यासाठी.

**6) कचरा प्रतिबंधासाठी सध्याच्या धोरणात्मक उपाययोजना**

धोरणे आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे आणि रेटिंग सिस्टीम्सवर आधारित आहेत. ही जबाबदार ऑपरेटर्सना प्रोत्साहित करतात.

1.IADC Space Debris Mitigation Guidelines: चार तत्त्वे – ऑपरेशनल डेब्रिस कमी, ब्रेक-अप टाळणे, EOL डिस्पोजल (25 वर्ष नियम), collision avoidance.

2.ESA Zero Debris Approach: 2030 पर्यंत नेट-झीरो कचरा; नवीन गाईडलाइन्स (2023) passivation आणि ADR इंटरफेस अनिवार्य.

3.NASA आणि USG प्लॅन: डेब्रिस मिटिगेशन, ट्रॅकिंग आणि रिमेडिएशन पिलर्स; SSR (Space Sustainability Rating) MIT ने विकसित – लॉन्च/डिऑर्बिट प्लॅन स्कोअरिंग.

4.राष्ट्रीय कार्यक्रम: UK ADR प्रोजेक्ट (ClearSpace सह), ISRO ISSAR-आधारित मॉनिटरिंग आणि passivation.

5.UN COPUOS आणि ISO स्टॅंडर्ड्स: डेटा शेअरिंग, लायबिलिटी कन्व्हेन्शन; मेगा-कॉन्स्टेलेशन्ससाठी कडक नियम.

**7) अंतरिक्ष पर्यावरण व्यवस्थापनासाठी शाश्वत पद्धती (Sustainable Practices for Space Environment Management)**

1.उपग्रहांची रचना अशी करणे की त्यांच्या कार्यकालाच्या शेवटी नियंत्रित री-एंट्री होईल.

Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

2.प्रक्षेपण आणि उपग्रह संचालनादरम्यान तुकडे निर्माण होणे कमी करणे.

3.कचरा निरीक्षण आणि अंतरिक्ष स्थिती-जाणिवेसाठी आंतरराष्ट्रीय सहकार्य वाढवणे.

4.कक्षीय गर्दी टाळण्यासाठी आणि दीर्घकालीन पर्यावरणीय शाश्वतता सुनिश्चित करण्यासाठी अंतरिक्ष वाहतूक व्यवस्थापन धोरणांची अंमलबजावणी. आंतरराष्ट्रीय मार्गदर्शक तत्त्वे आणि कायदे

IADC Space Debris Mitigation Guidelines – चार मुख्य तत्त्वे:

1.सामान्य ऑपरेशन्स दरम्यान कचरा कमी करणे.

2.on orbit break up पृथ्वीच्या कक्षेतील तुकड्यांचे प्रमाण कमी करणे.

3. प्रक्षेपणा नंतरची विल्हेवाट.

4.उपग्रहांची टक्कर टाळणे.

**अंतरिक्ष कचरा कमी करण्यासाठी करावयाची उपाय योजना**

1)अंतरिक्ष कचरा कमी करण्यासाठी किंवा विल्हेवाट लावण्यासाठी प्रगत राष्ट्रांनी आर्थिक जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे.

2) अमेरिका व रशियासह इतर राष्ट्रांनी अंतरिक कचरा कसे कमी करता येईल यासाठी संयुक्तरीत्या उपक्रम राबविणे किंवा सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक आहे.

3) अंतरिक्ष कचरा निर्मितीसाठी केवळ भारत चीन या राष्ट्रांनाच जबाबदार धरण्यात येऊ नये.

**अनुमान/निष्कर्ष (Conclusion)**

अंतरिक्ष कचरा हा अंतरिक्ष पर्यावरणाच्या शाश्वतता आणि सुरक्षिततेसाठी एक गंभीर आव्हान आहे. त्याचे स्रोत, जोखीम आणि व्यवस्थापन धोरणे समजून घेणे, हे उपग्रह, अंतरिक्ष यान आणि भविष्यातील मोहिमांचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत आवश्यक आहे. कार्यकाल निष्क्रिय झाल्यानंतरची विल्हेवाट, उपग्रहांची टक्कर टाळणे, सक्रिय कचरा हटविणे आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य यासारख्या शाश्वत पद्धती कचऱ्याचे संचयन कमी करू शकतात आणि कक्षीय कार्यप्रणालीचे संरक्षण करू शकतात. अंतरिक्ष कचऱ्याचे सक्रिय व्यवस्थापन हे भविष्यातील वैज्ञानिक, व्यावसायिक आणि अन्वेषणात्मक उपक्रमांसाठी पृथ्वीच्या कक्षीय पर्यावरणाचे जतन करणे अत्यावश्यक आहे.

अंतरिक्ष संशोधन उपक्रमा अंतर्गत 21व्या शतकात उपग्रह प्रक्षेपणाची खऱ्या अर्थाने स्पर्धा रशिया व अमेरिका त्यानंतर युरोपीयन राष्ट्रांनी सुरू करून आशिया खंडातील व इतर खंडातील राष्ट्रांना देखील अंतरिक्ष संशोधन व उपग्रह प्रक्षेपण स्पर्धेत उतरण्यास भाग पाडले आहे. त्यामुळे अनेक आव्हाने निर्माण झाली आहेत.



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org  Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026




अंतरिक्ष कचरा सरासरी प्रमाण

| अ. क्र. | देश | सरासरी प्रमाण  मेट्रिक टन |
|---|---|---|
| 1. | रशिया | ६५१५ |
| 2. | अमेरिका | ६२११ |
| 3. | चीन | ३८३९ |
| 4. | फ्रान्स | ५४७ |
| 5. | जपान | २६६ |
| 6. | भारत | २०२ |
| 7. | इसा (२२ देश ) | १३४ |
| 8. | इतर देश व एजन्सी | २३२ |

G



Journal of Research and Development
A Multidisciplinary International Level Referred and Double-Blind Peer Reviewed, Open Access
ISSN: 2230-9578 | Website: https://jrdrvb.org Volume-18, Issue- 4 (XV)| April- 2026

## संदर्भ (References)

1. European Space Agency. (2024). ESA Space Environment Report 2024. https://www.esa.int/Space_Safety/Space_Debris/ESA_Space_Environment_Report_2024
2. European Space Agency. (2025). ESA Space Environment Report 2025. https://www.esa.int/Space_Safety/Space_Debris/ESA_Space_Environment_Report_2025
3. Indian Space Research Organisation. (2025). Indian Space Situational Assessment Report (ISSAR) 2024. https://www.isro.gov.in/ISSAR_2024.html
4. Inter-Agency Space Debris Coordination Committee. (2002). IADC Space Debris Mitigation Guidelines (Revision https://orbitaldebris.jsc.nasa.gov/library/iadc-space-debris-guidelines-revision-2.pdf
5. Inter-Agency Space Debris Coordination Committee. (2025). IADC Space Debris Mitigation Guidelines. United Nations Office for Outer Space Affairs. https://documents.un.org/doc/undoc/gen/v25/005/01/pdf/v2500501.pdf
6. NASA Orbital Debris Program Office. (2025). Orbital Debris Quarterly News, September 2025 (Vol. 29, Issue 3). https://orbitaldebris.jsc.nasa.gov/quarterly-news/
7. Space Generation Advisory Council. (2024). Beyond mitigation: Progress and challenges of orbital debris remediation. https://spacegeneration.org/beyond-mitigation-progress-and-challenges-of-orbital-debris-remediation
8. Vajiram & Ravi. (2026, January 4). Space debris – Causes, challenges and removal. https://vajiramandravi.com/upsc-exam/space-debris/
9. World Economic Forum. (2026). Clear orbit, secure future: A call to action on space debris. https://reports.weforum.org/docs/WEF_Clear_Orbit_Secure_Future_2026.pdf
10. Space debris:-Models and Analysis--Heiner Klinkrad
11. Space debris:-- Donald J.kesslar
12. Introduction to spacedebris :-Challenges and Removal---lakshya Vaibhav Datta andUgur Given
13. ESA proceedings database---Matthew Wills(Report-2025)
14. Space debris removal-Review of technologies---V.V.Svotina
15. News18Hindi Writer Pradeep
16. Antariksha Yatra:- Vinakaran Muley
17. Science News Explores-- S. ones
18. Space debris and other threats from water space:- Joseph N. Pelton
19. India plan for Junk free space missions by 2030- News Explainer report date 10/05/2024